# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**अनुषंगिक निवड (GEC-1) : मराठी (अभ्यासपत्रिका – अ) : सत्र–१**

**अनुषंगिक निवड (GEC-2) : मराठी (अभ्यासपत्रिका – ब) : सत्र–२**

# शब्दसंहिता

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून

**बी. ए. १/बी. कॉम. १**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
**द्वितीय आवृत्ती :** २०२१
सुधारित आवृत्ती : २०२२
बी.ए./बी.कॉम. भाग-१ (शब्दसंहिता : आवश्यक)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

☐ **प्रती : ५००**

☐ **प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ **मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ ISBN- 978-93-89327-23-6

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**■ मराठी अभ्यासमंडळ समन्वयक ■**

अध्यक्ष **– डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संपादकीय...

विद्यार्थी मित्रहो,

बी. ए. भाग १ आवश्यक अनुषंगिक निवड (GEC-1) : मराठी (अभ्यासपत्रिका-अ) सत्र-१ आणि आवश्यक अनुषंगिक निवड (GEC-2) : मराठी (अभ्यासपत्रिका-ब) सत्र-२ या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने 'शब्दसंहिता' नावाचे पाठ्यपुस्तक तयार केले आहे. या पाठ्यपुस्तकावर आधारित तयार केलेले स्वयंअध्ययन साहित्य आपल्या हाती देताना आम्हांला अतिशय आनंद होत आहे.

'शब्दसंहिता' या पाठ्यपुस्तकातील पहिल्या सत्रातील 'A' आणि दुसऱ्या सत्रातील 'B' अशा अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळे घटक आपणास अभ्यासावयाचे आहेत. प्रथम सत्रासाठी अभ्यासपत्रिका 'A' मध्ये एकूण चार घटकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी पहिल्या दोन घटकांमध्ये 'नापास मुलांची गोष्ट' या अरुण शेवते यांनी संपादित केलेल्या पुस्तकातील पाच निवडक लेख आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे या संपादित ग्रंथातील बळवंत देशमुख यांनी लिहिलेला 'संकल्प सिद्धीला नेणारा महापुरूष : डॉ. बापूजी साळुंखे' हा एक लेख अशा एकूण सहा लेखांचा समावेश करण्यात आला आहे. उर्वरित दोन घटकांत 'व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषा' या उपयोजित मराठीचा समावेश करण्यात आला आहे. 'नापास मुलांची गोष्ट' या पुस्तकातील यशस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी निवड-यशवंतराव चव्हाण, वाटेवरच्या सावल्या- कुसुमाग्रज, पन्नास पैकी शून्य मार्क्स- शांता शेळके, शब्दांचे मोल - चंद्रशेखर धर्माधिकारी आणि संगमनेरचे दिवस- दया पवार या पाच व्यक्तिमत्त्वांचा समावेश केला आहे आणि स्वतःचे संपूर्ण आयुष्य तळागाळातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे या ध्येयाने झपाटून जाऊन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना करणाऱ्या डॉ. बापूजी साळुंखे या संकल्प सिद्धीला नेणाऱ्या महापुरुषाच्या सहाव्या व्यक्तिमत्त्वाचा समावेश केला आहे. तीन आणि चार या उर्वरित दोन घटकांमध्ये विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? ही संकल्पना स्पष्ट व्हावी व व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची ओळख व्हावी, स्वतःचा व्यक्तिमत्त्व विकास घडवून विविध परीक्षा आणि स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करता यावी आणि व्यक्तिमत्त्व विकासामध्ये भाषेचे असणारे अनन्यसाधारण महत्त्व कळावे या उद्देशाने तिसऱ्या घटकाची रचना करण्यात आली आहे तर चौथ्या घटकात श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन या भाषिक कौशल्यांचा सविस्तर परिचय होऊन विद्यार्थ्यांना एक सुसंस्कारित भाषा कमवता यावी, त्याचबरोबर कार्यक्रमाच्या व्यवस्थापनेची सर्वांगीण कौशल्ये त्याला आत्मसात करता यावीत या उद्देशाने अभ्यासपत्रिका 'A' मधील उपयोजित अभ्यासघटकांची रचना केलेली आहे.

अभ्यासपत्रिका 'B' च्या दुसऱ्या सत्रासाठी संतवाङ्मय, शाहिरी वाङ्मय, आधुनिक कालखंडातील मराठीमधील १९२० व १९६० नंतरच्या कवितेतील विविध प्रवाहांबरोबरच विद्यार्थ्यांना उपयोजित मराठीचे अध्ययन करावयाचे आहे. या अभ्यासपत्रिकेत संत नामदेव, शाहीर अनंत फंदी, महात्मा फुले, बालकवी, विंदा करंदीकर, वाहरू सोनवणे, प्रज्ञा दया पवार, एकनाथ पाटील यांच्या प्रत्येकी दोन निवडक कविता आणि निबंध लेखन या उपयोजित घटकांचा समावेश आहे. या घटकांच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना मराठी कवितेच्या विविध प्रवाहांची ओळख होईल आणि भाषिक कौशल्य, निरीक्षण शक्ती, कल्पकता वाढीस लागेल.

म्हणूनच बी. ए. भाग १ अनुषंगिक निवड (GEC-1) आणि आवश्यक अनुषंगिक दिवड (GEC-2) चा मराठीचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास उपयुक्त आहे. विविध साहित्यप्रकाराच्या (गद्य आणि पद्य) अभ्यासातून काळाच्या दीर्घ अवकाशातील मानवी जीवनाचे वास्तव दर्शन घडते. समकालीन जीवनात स्वतःला कसे सिद्ध करावे हे समजून घेता येईल. विद्यार्थ्यांची जिज्ञासा जागृत करून भोवताली घडणाऱ्या घटना-प्रसंगांना प्रतिक्रिया देण्यासाठी, व्यक्तिमत्त्व विकास साधण्याच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम तयार केला आहे. विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेले 'शब्दसंहिता' हे पाठ्यपुस्तक वाचणे अत्यंत गरजेचे आहे. तुम्हा विद्यार्थ्यांना भावी यशस्वी जीवनासाठी शुभेच्छा!

**– संपादक**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ : पेपर–अ** | |
| **प्रा. डॉ. रमेश साळुंखे**<br>देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर, जि. कोल्हापूर | १ |
| **प्रा. डॉ. सुभाष जाधव**<br>श्रीमती ए. आर. पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर | २ |
| **प्रा. डॉ. सर्जेराव जाधव**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, जि. कोल्हापूर | ३ |
| **प्रा. डॉ. दिनेश वाघुंबरे**<br>बळवंत कॉलेज विटा, ता. खानापूर, जि. सांगली | ४ |
| **सत्र–२ : पेपर–ब** | |
| **प्रा. डॉ. चंद्रकांत पोतदार**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | १ |
| **प्रा. डॉ. विनोद कांबळे**<br>म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर | २ |
| **प्रा. डॉ. सुजय पाटील**<br>कमला कॉलेज, कोल्हापूर | ३, ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. सुजय पाटील**
कमला कॉलेज, कोल्हापूर

**प्रा. डॉ. सर्जेराव जाधव**
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
वारणानगर, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| अभ्यासपत्रिका 'अ' सत्र-१ | | पृ.क्र. |
|---|---|---|
| घटक १ | निवड – यशवंतराव चव्हाण<br>वाटेवरच्या सावल्या – कुसुमाग्रज<br>पन्नास पैकी शून्य मार्कस – शांताबाई शेळके | १ |
| घटक २ | शब्दांचे मोल – चंद्रशेखर धर्माधिकारी<br>संगमनेरचे दिवस – दया पवार<br>संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष : डॉ. बापूजी साळुंखे – बळवंत देशमुख | १९ |
| घटक ३ | व्यक्तिमत्त्व संकल्पना, व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक घटक<br>व्यक्तिमत्त्व विकासात भाषेचे महत्त्व | ४७ |
| घटक ४ | भाषिक कौशल्ये, कार्यक्रमाचे संयोजन | ६९ |

| अभ्यासपत्रिका 'ब' सत्र-२ | | पृ.क्र. |
|---|---|---|
| घटक १ | कविता<br>संत नामदेव – पतितपावन, पंढरीस जावे<br>अनंत फंदी – जमाना आला उफराटा, हे मूर्खा खूण तर्का<br>महात्मा फुले – मानवांचा धर्म एक, धीर<br>बालकवी – फुलराणी, अप्सरांचे गाणे | ९९ |
| घटक २ | कविता<br>विंदा करंदीकर – माझ्या मना बन दगड, झपताल<br>वाहरू सोनवणे – गोधड, चळवळ म्हणजे<br>प्रज्ञा दया पवार – माणसासारखा माणूस असूनही, आग आणि फुफाटा<br>एकनाथ पाटील – शहर एक उदास पोकळी, शोधयात्रा | ११२ |
| घटक ३, ४ | निबंध लेखन | १३१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२२-२३ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी क्रमिकपुस्तक, संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र–१ : घटक–१

- **'निवड' – यशवंतराव चव्हाण**
- **'वाटेवरच्या सावल्या' – कुसुमाग्रज**
- **'पन्नास पैकी शून्य मार्कस्' – शांताबाई शेळके**

# १. निवड –यशवंतराव चव्हाण

### १.१.१ उदिष्ट्ये (Objectives) :

१. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिरूची निर्माण करणे.

२. मराठी साहित्याचा परिचय करून देणे.

३. सामाजिक बांधीलकीशी नाते प्रस्थापित करणे.

४. नातेसंबंधांची जोपासना करणे.

५. उदात्त ध्येय्याची जाणीव निर्माण करणे.

### १.१.२ प्रास्ताविक (Introduction) :

आपल्या भवतालासंदर्भात प्रत्येकाला काही म्हणावयाचे–बोलावयाचे असते. त्यातूनच संवाद साधणे ही आजच्या काळाची अपरिहार्य गरज बनली आहे. कारण संवादांअभावी माणूस दिवसेंदिवस कमालीचा पराधीन बनत चालला आहे. आपल्या अवतीभवतीचे राजकीय – सामाजिक वर्तमान कमालीचे स्वार्थी, सत्ताकारणी आणि हिंसक बनत चाललेले आहे. कुणीच कुणाचे ऐकून घेण्याच्या मनस्थितीत राहिल्याचे दिसत नाही. समाजाचा समग्रतेने विचार करणारी विचारधारा आणि कृती यांच्यातील अंतर दिवसेंदिवस वाढतच आहे. या अशा राजकारणामुळेच आमुलाग्र बदलत चाललेले आपले सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण कडेलोटाच्या सीमेवर येऊन उभे राहिलेले आहे. पण या समस्यांचे आणि आपले काही नाते आहे; हा प्रश्नच आपल्या विचारांच्या कक्षेपल्याड गेला आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतरावजी चव्हाण यांचे सर्वांगीण विचार महत्त्वाचे आहेत. यशवंतराव चव्हाण हे राजकारण आणि समाजकारणातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व होते. 'निवड' या पाठाच्या आधारे यशवंतराव चव्हाण यांनी आपले शालेय जीवन, कुटुंबातील संस्कार, शिक्षणासाठी बाहेरगावी राहून समाजातील राजकारण, समाजकारणाचा अनुभव, शिक्षण घेताना आलेले अपयश हे सारे काही या पाठात साध्या सोप्या पण उत्कट भाषाशैलीत सांगितले आहे. त्याचाच विचार आपण येथे करणार आहोत.

- **लेखक परिचय :**

यशवंतराव बळवंतराव चव्हाण – (जन्म १२ मार्च १९१३ – मृत्यू २५ नोव्हेंबर १९८४) यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री आणि महत्त्वाचे राष्ट्रीय नेते होते. सविनय कायदेभंग चळवळीत महात्मा गांधी यांच्यासोबत त्यांचा कृतीशील सहभाग होता. १९४२ च्या छोडो भारत आंदोलनातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतलेला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री अशी जबाबदारीची पदे त्यांनी भूषविली होती. कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते, वक्ते आणि लेखक म्हणूनही ते परिचित आहेत. 'कृष्णाकाठ' हे त्यांचे आत्मचरित्र विलक्षण गाजलेले आहे. 'सह्याद्रीचे वारे' आणि 'युगांतर' या दोन संग्रहातून त्यांची विचारप्रवर्तक भाषणे प्रकाशित झालेली आहेत.

## **१.१.२ विषय विवेचन** (Presentation of Subject matter) :

'निवड' या पाठातून यशवंतराव चव्हाण यांच्या महाविद्यालयीन काळातील जडणघडणीचा प्रत्यय येतो. यशवंतराव चव्हाण यांच्या घरची आर्थिक परिस्थिती तशी बेताची होती पण शिक्षण घेण्याची जिद्द मोठी होती. पुढील शिक्षण घेण्यासाठी आर्थिक जुळवाजुळव करण्याकरिता त्यांनी वडिलोपार्जित शेतजमीन विकण्याचा सल्ला त्यांच्या दोनही बंधूंनी दिला. शेतातून उत्पन्नही फारसे मिळत नव्हते. विट्याला जाऊन त्यांनी जमिनीचे विक्रीखत केले. जमीनीच्या विक्रीतून आलेल्या पैशाचा विनियोग त्यांनी कायद्याच्या अभ्यासासाठी केला. कोल्हापूरशी यशवंतराव चव्हाण यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. या शहराला स्वत:चे असे एक व्यक्तिमत्त्व आहे आणि या शहराने एकदा मनाची पकड घेतली की ती लवकर सुटत नाही; अशी त्यांची धारणा होती. तथापि कायद्याच्या शिक्षणासाठी पुण्यातील महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. पुण्याला जाण्याचा निर्णय घेण्यासाठी आत्माराम बापू यांची त्यांना खूप मदत झाली.

पुणे हे तेव्हाही एक महत्त्वाचे ऐतिहासिक आणि शैक्षणिक केंद्र होते. राजकीय आणि सांस्कृतिक चळवळी मोठ्या प्रमाणात या शहरात होत असत. या वातावरणामुळे यशवंतराव चव्हाण यांची सामाजिक जाण अधिक व्यापक होत गेली. आत्मारामबापू पाटील यांना त्यांच्या प्रेमप्रकरणात यशवंतराव चव्हाण यांनी मदत केली होती. लग्नानंतर आत्माराम पाटील यांनी पुण्यात आपला संसार थाटला होता. त्यामुळे यशवंतराव चव्हाण जेव्हा पुण्याला गेले तेव्हा आत्माराम पाटील यांनी त्यांना आपल्या घरी राहण्याचा आग्रह केला. एक वर्षभर यशवंतराव आत्माराम पाटील यांच्या घरी राहिले. पुण्यासारख्या शहरात एका मित्राला वर्षभर सांभाळणे यावरून माणसे एकमेकांना निस्वार्थीपणे कशी मदत करीत असत याचा प्रत्यय येतो.

यशवंतराव चव्हाण यांचे वाचन अभिजात दर्जाचे होते. वाचनाचे संस्कार त्यांच्यावर पुण्याच्या वातावरणात फार चांगल्या प्रकार झाले. पुण्याच्या हनुमान टेकडीच्या उतरणीवर असलेल्या लॉ कॉलेजची इमारत त्यांना खूप आवडायची. कॉलेजची अभ्यासिका पाहून तर ते चकितच झाले. शिकवणारे शिक्षकही लक्षात राहतील असे होते. त्यापैकी अनुभवाने समृद्ध, विषयावर आणि भाषेवर प्रभुत्त्व असलेले वकील ल.व.भोपटकर यशवंतरावांना खूप आवडायचे. कॉलेजचे तास झाले की यशवंतराव सायकल चालवत

अभ्यासिकेत जात व मनसोक्त पुस्तके वाचीत असत. अशाप्रकारे वाचनाशी जडलेले नाते त्यांनी आयुष्यभर जपले. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे त्यांनी केवळ पुस्तकांचे वाचनच केले नाही; तर आपण एक समाजाचा घटक आहोत आणि समाजाशीही आपली नाळ जुळली पाहिजे, या उद्देशाने त्यांनी वाङ्मयीन आणि राजकीय अभ्यास मंडळे, सभा, संमेलने, मार्क्सवादी विचारसरणीचा परिचय करून घेणे यातही आपले लक्ष केंद्रित केले. यामुळे त्यांना वेगवेगळ्या राजकीय तत्त्वज्ञानाचा विचार ऐकायला मिळत असे. या सर्व गोष्टींमध्ये ते इतके रममाण झाले; की कायद्याच्या अभ्यासापेक्षा त्यांचे लक्ष या गोष्टींकडे अधिक ओढ घेऊ लागले. याचा परिणाम असा झाला की, कायद्याच्या परीक्षेत ते उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. अभ्यासमंडळे, सभा-संमेनातील सहभाग. यासर्वांमुळे कायद्याच्या प्रथमवर्षात त्यांना अपशय आले. ही गोष्ट त्यांच्या मनाला खूप लागून राहिली. आपण नापास कशामुळे झालो आहोत; हे यशवंतराव चव्हाण यांनी मोकळ्यामनाने घरी सांगितले असल्यामुळे घरातून त्यांना सहानुभूतीची वागणूक मिळाली. वर्षभर ते आत्माराम पाटील यांच्या घरी राहिले. पण एखाद्या कुटुंबात राहून अभ्यास होऊ शकणार नाही म्हणून ते स्वतंत्रपणे राहू लागले आणि पुढच्या सहा महिन्यांनंतर यशवंतराव त्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. अपयशाने खचून न जाता कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर यश प्राप्त करता येते हे या उदाहरणावरून दिसून येते.

शिक्षणाबरोबर समाजकारण, राजकारणातील सक्रियता हे यशवंतराव चव्हाण यांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट आहे. यशवंतरावांच्या या अनुभवकथनातून तत्कालीन सामाजिक, राजकीय वातावरणाचा परिचय आपणास होतो. याच कालखंडात आत्माराम पाटील आणि यशवंतराव यांच्यात वैचारिक मतभेद होऊ लागले. याच दरम्यान साऱ्या जगाला हादरवून टाकणारी गोष्ट घडली. इंग्लंड -फ्रान्स विरूद्ध जर्मनी असे दुसरे महायुद्ध सुरू झाले. आपल्या देशातील राजकीय वातावरणावरही याचा परिणाम झाला. जवाहरलाल नेहरू चीनचा दौरा करून परतल्यावर त्यांच्या सल्ल्याने काँग्रेस वर्किंग कमिटीने एक निवेदन प्रसिद्ध केले होते. या निवेदनात, 'जागतिक परिस्थितीचा आढावा घेऊन लोकशाही व फॅसिझम यांमध्ये लोकशाहीचा विजय होणे इष्ट असले, तरी गुलामगिरीत राहिलेल्या हिंदुस्थानला या युद्धाशी काही कर्तव्य नाही. लोकशाहीवर निष्ठा असेल, तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा विचार ब्रिटिश सत्तेने करावा.' असे विचार या निवेदनात मांडण्यात आलेले होते. तर 'या युद्धात फॅसिझमविरूद्ध लढण्यासाठी ब्रिटिश सत्ता उभी राहिली, तर त्यांच्यांशी आपण सहकार्य केले पाहिजे.' अशी भूमिका रॉयवाद्यांनी घेतली होती. शिवाय कम्युनिस्ट पक्षाने १९३९ मध्ये, 'हे साम्राज्यशाही युद्ध आहे आणि या युद्धप्रयत्नाला विरोध केला पाहिजे आणि या युद्धाविरूद्ध जनतेत मोठी चळवळ उभी केली पाहिजे' अशी भूमिका घेतलेली होती. एकूणच काय तर या कालखंडातील राजकीय सामाजिक जीवनात वैचारिक पार्श्वभूमीवर संघर्षाचे आणि तणावाचे वातावरण होते. हे वातावरण यशवंतराव चव्हाण यांनी तपशिलवारपणे या लेखात कथन केलेले आहे. पुढे १९४१ मध्ये रॉयवादी आणि कम्युनिस्ट यांच्या विचारांत एकवाक्यता दिसू लागली. या सगळ्या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाण कमालीचे अस्वस्थ झालेले होते. रॉय यांच्या विचारांशी यशवंतराव चव्हाण सहमत नव्हते. त्यामुळे त्यांच्या विचारांच्या लोकांना ते संकटात टाकणार आहेत अशाप्रकारचा विचार यशवंतराव चव्हाण यांचा होता. या भूमिकेमुळे आत्माराम पाटील आणि यशवंतराव चव्हाण यांच्यातील दरी वाढत गेली आणि 'यशवंतराव, तुमचे आणि

आमचे रस्ते आता वेगळे झाले आहेत' असे आत्माराम पाटील यांनी यशवंतरावांना सांगितले. या प्रसंगानंतर यशवंतरावांचा रॉयवादी राजकारणाशी आणि त्यांच्या मित्रांशी असलेला संबंध कमी होत गेला. कारण हे आमचे युद्ध नव्हे, काँग्रेसने घेतलेल्या या भूमिकेवर यशवंतराव ठाम होते. काँग्रेसचे नेतृत्त्व यशवंतरावांनी मान्य केले होते तरी युद्धविरोधाचा कार्यक्रम काँग्रेस देत नव्हती. विचारासोबत योग्य ती कृतीही केली पाहिजे या विचाराचे यशवंतराव होते. त्यामुळे आपण कम्युनिष्ट पक्षात प्रवेश करावा असाही विचार यशवंतराव चव्हाण यांच्या मनात येऊन गेला. यासंदर्भात त्यांनी आपल्या मित्रांशीही चर्चा केली. नंतर मात्र त्यांनी हा निर्णय बाजूला ठेवला. काँग्रेसची भूमिकाच योग्य आहे असा त्यांचा विचार पक्का झाला. पण कृती कार्यक्रम करण्याच्या विचाराने यशवंतराव खूप अस्वस्थ झालेले होते. पुन्हा आपले शिक्षणाचे एक वर्ष वाया जाते की काय असेही त्यांना वाटू लागले होते. पण हा सारा वैचारिक संघर्ष त्यांनी मोठ्या संयमाने घेतला.

राजकीय आणि सामाजिक जीवनात सक्रिय असतानाच त्यांनी कायद्याच्या दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेची तयारी सुरू केली. आईने मायेने पण हक्काने दिलेला सल्लाही यशवंतरावांनी मनापासून मानला; आणि ते अभ्यासाला लागले. 'अभ्यास करू लागल्यानंतर विषयांमध्ये रस निर्माण होतो आणि मग त्यातील सौंदर्यस्थळे लक्षात यायला लागतात.' असे साधे सोपे पण अर्थपूर्ण विधान ते करतात. त्यांना पुरावा कायदा (एव्हिडन्स ॲक्ट) या विषयाचे विशेष आकर्षण निर्माण झाले. परीक्षा झाल्यावर पुणे सोडून ते परत कराडला परतले, कारण त्यांच्यावर जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदाची जबाबदारी होती.

या लेखात यशवंतरावांनी एक मजेदार अनुभवही कथन केलेला आहे. वालचंद गांधी नावाचे एक काँग्रेसचे कार्यकर्ते होते. ते कराडमधील खादी भांडार चालवित असत. त्यांनी युद्ध विरोधी घोषणा देऊन तुरूंगात जाण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे त्यांनी यशवंतरावांना अशी विनंती केली की, 'मी सभेत घोषणा देऊन तुरूगांत जाणार आहे. तर तुम्ही सभेत येऊन वैयक्तिक सत्याग्रहाची पार्श्वभूमी सांगणारे भाषण कराल का?' अशा प्रकारचे भाषण केल्यामुळे आपणही तुरूंगात जाऊ शकतो, हे यशवंतरावांच्या सभेच्या दिवशीच लक्षात आले होते. पण विचाराने आणि आचाराने कणखर असणारे यशवंतराव सभेला गेले आणि त्यांनी युद्ध झाल्यापासून काँग्रेसने कशा-कशा भूमिका घेतल्या आणि 'या युद्धामध्ये कमीत कमी भाषण स्वातंत्र्याचा हक्क असावा ही महात्मा गांधींनी केलेली मागणी ब्रिटीश सत्तेने कशी नाकारली; याची सर्व हकीकत सांगितली आणि आम्हांला आमचे मन बोलून दाखविण्याचा जेथे अधिकार नाही, तेथे आमच्याकडून युद्धास सहकार्य मागण्याचा ब्रिटिश सरकारला काय अधिकार आहे? असा प्रश्न उपस्थित केला.' अशा या भाषणामुळे खरेतर यशवंतराव चव्हाण यांना तुरूंगवास पत्करावा लागला असता. पण झाले उलटेच, वालचंद शेठजी यांनी उठून युद्धविरोधी घोषणा देताच त्यांना तत्काळ अटक झाली. यशवंतरावांना या गोष्टीचे नवल वाटले. त्यांनी अधिकाऱ्याला 'माझ्या भाषणात आणि त्यांनी दिलेल्या घोषणांमध्ये कोणता फरक वाटला' असे विचारले. अधिकाऱ्याने सांगितले, ''इतक्या बारकाव्यात कोण जातो? तुम्ही फक्त भाषण केले, पण त्यांनी तर तेथे घोषणा दिल्या, म्हणून आम्ही त्यांना पकडत आहोत. तुम्ही तुमच्या घरी जा.'' या प्रसंगावरून यशवंतराव म्हणतात तसे 'वैयक्तिक सत्याग्रहाच्या प्रतीकात्मक स्वरूपाने त्याला एक तांत्रिक, औपचारिक स्वरूप आले होते.' यशवंतराव चव्हाण यांनी कायद्याचे शिक्षण घ्यायची जी खूणगाठ मनाशी बांधली होती

तीही पूर्ण झाली. ते कायद्याच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले याचे समाधान यशवंतरावांना आणि त्यांच्या आईलाही निश्चितच झाले.

### १.१.३ समारोप :

या पाठाच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण यांचे कौटुंबिक वातावरण, शिक्षणाकरिता केलेला त्याग, वाचनाची आवड, आत्मरत न होता समाजाशी असलेले नाते, वैचारिक भूमिकांमधील स्पष्टपणा, कार्यकर्त्यांवर आणि राजकीय पक्षावर असलेली निष्ठा दुसऱ्या महायुद्धासंदर्भात घेतलेली भूमिका, या महायुद्धाचा भारतावर झालेला परिणाम, वेगवेगळ्या विचारसरणींशी करावा लागलेला संघर्ष यांचे प्रतिबिंब या लेखात तपशिलाने आले आहे. शिक्षण घेत असताना आपल्या वर्तमान जगण्याशी असलेले नाते-त्यात सक्रिय सहभाग असूनही आपले व्यक्तिमत्त्व कसे संपन्न, विविधांगी आणि सुसंस्कृत करता येते; याचा प्रत्यय यशवंतराव चव्हाण यांनी अतिशय वेधकपणे या लेखातून वाचकांना दिला आहे.

### १.१.४ वाचनीय उतारा :

हळूहळू पुण्यातल्या इतर काही व्यक्तींच्या ओळखी होऊ लागल्या. तेथे चाललेली वाङ्मयीन आणि राजकीय अभ्यास मंडळे, सभा संमेलने यास मी हजर राहू लागलो. पुण्याचे कम्युनिस्ट नेते विष्णुपंत चितळे हे आमच्या कराडमध्ये पुष्कळ वर्षे राहिले होते. त्यांची माझी विशेष मैत्री होती असे मी म्हणणार नाही; परंतु सुरेख स्नेह होता. कारण कराडमध्ये असताना मी त्यांच्याकडे जाऊन मार्क्सवाद समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असे. त्यावेळी त्यांनी सुचविलेली काही पुस्तके मी पुण्यामध्ये मिळविली आणि त्या विषयाचे अध्ययन सुरू केले. पुण्यात बरीच मंडळे सुरू असत. निदान त्या काळात तरी ही अभ्यास मंडळांची पुण्यामध्ये फॅशनच होती, असे म्हटले तरी चालेल. वेगवेगळ्या राजकीय तत्त्वज्ञानाचा विचार ऐकायला मिळे. त्यामुळे मन पुष्कळ प्रबुद्ध झाले. अशा तऱ्हेने माझा काळ चालला होता आणि पुण्यामध्ये माझे मनही रमले होते. पूर्वी कोल्हापूरहून सातारा जिल्ह्यात मी वारंवार जात होतो, तसे आता जाता येणे अवघड होते. तरी पण महिना, दोन महिन्यातून जाऊनही माझ्या कार्यकर्त्या मित्रांशी संबंध ठेवला होता. १९३८ साल हे कसे गेले, ते कळलेच नाही. पण नंतर माझ्या लक्षात आले, की या कायद्याच्या अभ्यासापेक्षा मी इतर गोष्टींचा अभ्यास जास्त करत होतो. याचा परिणाम असा झाला, की १९३९ सालच्या माझ्या पहिल्या वर्षाच्या कायद्याच्या परीक्षेमध्ये मी उत्तीर्ण होऊ शकलो नाही. निकालानंतर ही गोष्ट माझ्या मनाला लागून गेली. या प्रकाराचा हा माझा पहिलाच अनुभव होता. कायद्याचा अभ्यास हा सर्वसामान्य वाचन करण्याकरता अभ्यास नसतो. त्याच्यामध्ये नेमकेपणा असावा आणि त्यासाठी बरेच पाठांतर करावे लागते. या पाठांतराची मला गोडी नव्हती. त्यामुळे एका विषयात मला मार्क कमी पडले होते. मी विचार केला, की चला, पुन्हा एकदा प्रयत्न करून पाहू. माझ्या पास-नापास होण्याचा माझ्या घरावर काही परिणाम झाला नव्हता, कारण मी त्यांना खरे ते सांगितले होते. हे सबंध वर्ष मी आत्माराम पाटील त्यांच्या घरी काढले. त्यातील सहा महिने शुक्रवार पेठेत आणि पुढचे सहा महिने टिळक रोडवरील 'ॲक्सिडेंट' नावाच्या बंगल्यात आम्ही रहात होतो. मी माझी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकलो नाही, याचे आत्मारामबापूंना आश्चर्य वाटले. त्यांना मी सांगितले, की मी स्वतंत्रपणे

राहूनच माझा अभ्यास केला पाहिजे. नाहीतर माझे दिवस फुकट जातील. हे एका अर्थाने बरोबर होते. कुठल्यातरी एखाद्या कुटुंबात राहून असा अभ्यास करणे हे अवघड आहे आणि त्याप्रमाणे मी माझ्या राहण्याची स्वतंत्र व्यवस्था केली आणि पुढच्या सहा महिन्यानंतर परीक्षा उत्तीर्ण झालो.

### १.१.५ शब्दार्थ :

विपूल = भरपूर अथवा पुष्कळ, ऱ्हास = नष्ट, अनोखे = वेगळे, अविरत = सतत, मोल = महत्त्व, वडिलोपार्जित = परंपरेने वाट्याला आलेली, पौर्वात्य देश = भारताच्या पूर्वेकडील देश, पाश्चात्य देश = भारताच्या पश्चिमेकडील देश.

### १.१.६ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न :

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. नापास मुलांची गोष्ट हे पुस्तक........ यांनी संपादित केलेले आहे.

अ) अरुण शेवते  ब) अरुण नाईक  क) अरुण पाटील  ड) अरुण कुलकर्णी

२. यशवंतराव चव्हाण........ शिक्षण घेण्याकरिता पुण्यास गेले होते.

अ) शेतीचे  ब) विज्ञानाचे  क) कायद्याचे  ड) अर्थकारणाचे

३. .......यांनी यशवंतराव चव्हाण यांना पुण्याला जाण्याकरिता निर्णय घ्यायला मदत केली होती.

अ) बळीबा पाटील  ब) सदानंद पाटील  क) वसंत पाटील  ड) आत्माराम पाटील

४. यशवंतराव चव्हाण यांनी....... यांच्याकडून मार्क्सवाद समजून घेण्याचा प्रयत्न केला होता.

अ) श्रीनिवास जोशी  ब) उदय केळकर  क) विष्णुपंत चितळे  ड) स्नेहा बापट

५. वालचंद गांधी नावाचे एक........ कार्यकर्ते कराडमध्ये खादी भांडार चालवीत असत.

अ) कॉंग्रेस  ब) मार्क्सवादी  क) जहालवादी  ड) हिंदुत्त्ववादी

६. कृष्णाकाठ हे यशवंतराव चव्हाण यांचे....... आहे.

अ) चरित्र  ब) आत्मचरित्र  क) नाटक  ड) प्रवासवर्णन

७. कायद्याच्या शिक्षणासाठी यशवंतराव चव्हाण कोणत्या शहरात दाखल झाले.

अ) पुणे  ब) मुंबई  क) नाशिक  ड) औरंगाबाद

८. यशवंतराव चव्हाण कोणाकडून मार्क्सवाद समजावून घेण्याचा प्रयत्न करीत असत.

अ) वि.स.छापखाने  ब) श्रीकांत शिंदे  क) विष्णुपंत चितळे  ड) ल.व.भोपटकर

९. यशवंतराव चव्हाण यांनी कोणते आत्मचरित्र लिहिले आहे.

अ) आठवणींचा प्रदेश ब) वारणाकाठ क) पथिक ड) कृष्णाकाठ

१०. यशवंतराव चव्हाण यांना 'आता तुझी परीक्षा होईपर्यंत कृपा करून निदान तुरुंगात जाऊ नकोस परीक्षा झाल्यावर काय करावयाचे, ते तू जरूर कर.' असा निरोप कोणाकडून सतत येत असे.

अ) आई ब) वडील क) भाऊ ड) मामा

- **उत्तर :**

१. अ) अरुण शेवंते   २. क) कायद्याचे   ३. ड) आत्माराम पाटील

४. क) विष्णुपंत चितळे   ५. अ) कॉंग्रेस   ६. ब) आत्मचरित्र

७. अ) पुणे   ८. क) विष्णुपंत चितळे   ९. ड) कृष्णाकाठ

१०. अ) आई

**ब) दीर्घोत्तीर प्रश्न.**

१. यशवंतराव चव्हाण यांनी 'निवड' या लेखातून पुण्यातल्या आठवणी कशाप्रकारे शब्दबद्ध केल्या आहेत?

२. यशवंतराव चव्हाण यांचा महाविद्यालयीन जीवनातील राजकीय प्रवास 'निवड' या लेखाच्या आधारे स्पष्ट करा.

### १.१.७ अधिक वाचन / पूरक वाचन :

१. माझे सत्याचे प्रयोग : महात्मा गांधी

२. एक झाड दोन पक्षी : विश्राम बेडेकर

३. सप्तक : महेश एलकुंचवार

# २. वाटेवरच्या सावल्या – कुसुमाग्रज

## १.२.१ उदिष्ट्ये (Objectives) :

१. साहित्याची समज निर्माण करणे.

२. मूल्ययुक्त जीवन जाणीव निर्माण करणे.

३. कलेसोबत खेळालाही प्राधान्य देणे.

४. थोरांच्या आदराची, मानसन्मानाची जाणीव करून देणे.

५. कलांच्या सादरीकरणास महत्त्व देणे.

## १.२.२ प्रास्ताविक (Introduction) :

कुसुमाग्रज यांनी आपल्या शालेय वयातल्या अपयशावर मोकळेपणाने लिहिलेले आहे. 'नापास मुलांची गोष्ट' या पुस्तकातून भेटणारी माणसे समाजासमोर आदर्श आहेत. स्वत:च्या वेगळेपणाचा ठसा उमटविलेली ही माणसे शालेय जीवनात लौकिकार्थाने नापास झालेली होती. तथापि जिद्द, चिकाटी, प्रामाणिकपणा, अविरत कष्ट आणि मूल्ययुक्त जगणे यांच्या जोरावर उत्तुंग यश मिळवून त्यांनी समाजात आदर्श स्थान निर्माण केले. अशाप्रकारे माणसाने अपयशाने खचून न जाता अशा आदर्श व्यक्तिमत्त्वाचे जगणे, त्यांचा आचार आणि विचार यांचा अंगिकार करून आपले आणि आपल्या सभोवतालचे विश्व सुंदर करण्याची शिकवण या पाठातून आपणास मिळते. 'वाटेवरच्या सावल्या'या पाठाच्या आधारे वि.वा.शिरवाडकर यांनी आपले शालेय जीवन, शिक्षक, वडीलधारी माणसे, वाचनाचा छंद आणि शिकत असताना आलेले अपयश यांच्यासंबंधी मोकळेपणाने लिहिलेले आहे.

- **लेखक परिचय :**

कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर (जन्म २७ फेब्रुवारी १९१२ – मृत्यू १० मार्च १९९९) हे मराठी साहित्यातील एक अत्यंत महत्त्वाचे आधुनिक कवी आहेत. ते मुख्यत्त्वे कवी म्हणून जरी परिचित असले तरी त्यांनी काव्यलेखनासोबतच नाटक, कादंबरी, कथा आणि निबंधलेखनही केलेले आहे. त्यांची साहित्यसंपदा आपणास पुढील प्रमाणे सांगता येईल. 'जीवनलहरी', 'विशाखा', 'किनारा', 'मराठी माती', 'स्वगत', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'महावृक्ष' हे काव्यसंग्रह कुसुमाग्रज यांनी लिहिलेले आहेत. याचबरोबर 'दुसरा पेशवा', 'कौंतेय', 'आमचं नाव बाबुराव', 'ययाती' आणि 'देवयानी', 'वीज म्हणाली धरतीला', 'नटसम्राट' ही नाटके त्यांनी लिहिलेली असून ती प्रकाशित आहेत. कालिदासाच्या मेघदूताचे तसेच काही पाश्चात्य नाटकांचे मराठी रूपांतर त्यांनी केले असून 'वैष्णव', 'जान्हवी', 'कल्पनेच्या तीरावर' या कादंबऱ्याही त्यांनी लिहिलेल्या आहेत. शिवाय कथा, निबंध आणि काव्य समीक्षात्मक लिखाणही त्यांनी केलेले आहे. साहित्य अकादमी आणि ज्ञानपीठ या पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. आपणास त्यांचा 'वाटेवरच्या सावल्या' हा लेख अभ्यासावयाचा आहे.

### १.२.३ विषय विवेचन (Presentation of subject matter) :

'वाटेवरच्या सावल्या' या पाठात कुसुमाग्रज यांनी त्यांच्या बालपणातील सुंदर आठवणी ओघवत्या भाषेत कथन केल्या आहेत. साधी, सोपी आणि अत्यंत प्रवाही भाषा त्यांनी या लेखात उपयोजलेली आहे. या पाठाच्या सुरूवातीलाच कुसुमाग्रज यांनी त्यांचा नाशिक या गावाशी पहिला परिचय कसा झाला याची आठवण सांगितली आहे. पिंपळगाव हे कुसुमाग्रज यांचे गाव. ते नाशिकपासून अठरा-एकोणीस मैलांवर आहे. त्यांचे वडील वकिलीचा व्यवसाय करायचे. घरातील वातावरण धार्मिक कर्मकांडात गुंतणारे नव्हते. सण, समारंभ, यात्रा इत्यादींमधील कर्मकांड बाजूला टाकून देऊन त्यातील केवळ आनंद साजरा करावा अशाप्रकारचे त्यांच्या घरचे वातावरण होते. त्यांच्या घरी एक कारकून काम करीत असे; तो जेव्हा नाशिकच्या पर्वणीसाठी जायला निघाला तेव्हा त्यांच्याबरोबर जाण्यासाठी कुसुमाग्रज आणि त्यांच्या थोरल्या भावाला घरातून परवानगी मिळाली. नाशिक मध्ये प्रवेश केल्यावर त्यांना खूप मोठ्या गर्दीशी सामना करावा लागला. व्हिक्टोरिया पुलावरील इतकी गर्दी त्यांनी कधीच पाहिली नव्हती. अखेरीस सोबत आलेल्या त्या कारकुनाने कुसुमाग्रज यांना खांद्यावर घेतले आणि सहीसलामत या तिघांनीही नदीचा तो पूल पार केला. अशाप्रकारे नाशिकशी कुसुमाग्रज यांचा पहिला परिचय झाला.

कुसुमाग्रज यांचे बालपण पिंपळगावात गेले. चौथीपर्यंतचे शिक्षण या गावी झाल्यानंतर पुढील शिक्षणाकरिता कुसुमाग्रज नाशिक या गावी आले. या गावाला त्यांनी देवळांचे गाव असे संबोधले आहे. डौलदार दगडी इमारत आणि ऐसपैस मैदान असलेल्या सरकारी शाळेत कुसुमाग्रज यांचे नाव घालण्यात आले. शिस्तीचे वातावरण असलेल्या या शाळेत स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर आणि कॉम्रेड डांगे असे खूप मोठमोठे लोक या शाळेत शिकलेले होते. सुरूवातीला या शाळेच्या प्रशस्तपणामुळे कुसुमाग्रज यांना शाळेची खूप भीती वाटायची. पण हळूहळू ते या शाळेत रुळू लागले. अभ्यासाइतकीच खेळाचीही मुलांना खूप गरज असते. पण ही जाणीव स्वातंत्र्यानंतर झपाट्याने कमी होऊ लागल्याची खंतही त्यांनी या पाठात बोलून दाखविलेली आहे. कुसुमाग्रज यांना मैदानी खेळ खेळण्याची खूप आवड होती. क्रिकेट हा त्यांच्या आवडीचा खेळ होता. पिंपळगावाहून या शहरात आलेल्या कुसुमाग्रज यांना या वातावरणाशी मिळतेजुळते घ्यायला खूप वेळ लागला. कारण शिक्षक शिकवण्यामध्ये निष्णात आणि सौजन्यशील असले तरी विद्यार्थ्यांशी मैत्री व्हायला वेळ लागला. शिवाय पिंपळगावची आठवणही त्यांना सारखी यायची. शाळा चुकवून नदीकाठी मोरपिसे शोधायला जायची आठवणही या गावी त्यांना सारखी यायची. दिलासा देणारे घरही त्यांच्या सारखे नजरेसमोर यायचे.

या लेखात कुसुमाग्रज यांनी विद्यार्थ्यांची खरी जडणघडण माध्यमिक शाळेत होत असते; असा विचार मांडला आहे. माध्यमिक शाळेत असतानाच कुसुमाग्रज यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्याला संधी मिळाली. साहित्याची विशेषत: काव्याची आवड त्यांना माध्यमिक शाळेत असताना झाली. क्रिकेट या खेळातही ते खूप रमत असत. शिवाय भाषा आणि इतिहास या विषयाचीही आवड त्यांना माध्यमिक शाळेतील पाच वर्षांमध्ये झाली. गणित हा विषय त्यांच्या फारसा आवडीचा नव्हता. हेही त्यांनी अत्यंत खेळकरपणाने या पाठात नमूद केले आहे. शाळेत असताना ते मनसोक्त भटकायचे. याचबरोबर हस्तलिखित अंकही ते काढीत

असत. कुसुमाग्रज यांनी शालेय जीवनात त्यांच्या आयुष्यात घडलेली एक मोठी मजेदार कथाही सांगितली आहे. कुसुमाग्रज यांच्या शाळेत एक सुसज्ज तालीमखाना होता. ते दररोज पहाटे त्या तालीमखान्यात व्यायामाकरिता जात असत. शाळेच्या जवळच एक पीर होता. त्या पीराची देखभाल करण्यासाठी तिथे एक फकीर रहात असे. तेथून जाताना सवय म्हणून कुसुमाग्रज शीळ वाजवत तिथून जायचे. हे त्या फकीराला आवडत नसे. तुसड्या स्वभावामुळे फकीराचा त्रास तसा सर्वांना होत असे. पण कुणीच त्याबद्दल काही बोलत नसे. शीळ न वाजविण्याच्या संदर्भात त्याने तसे कुसुमाग्रज यांना सांगितलेही होते. पण कुसुमाग्रज यांच्या ते ध्यानात रहात नसे. एकदा घडले ते विपरीतच. नेहमीप्रमाणे शीळ घालत कुसुमाग्रज तिथून जात असताना चुलीतील जळते लाकूड घेऊनच तो फकीर कुसुमाग्रज यांच्या अंगावर धावून आला. दोघांची चांगलीच झटापट झाली. आरडाओरडा ऐकून तालमीतील इतर अनेकजणही बाहेर येऊन हा प्रसंग पाहत होते. अखेरीस फकीर खाली पडलेला आणि त्याच्या छातीवर बसलेले कुसुमाग्रज सर्वांनी पाहिले. सर्वजण कौतुकाने कुसुमाग्रज यांच्याकडे पाहत होते. पण कुसुमाग्रज यांना या घटनेबद्दल आनंद वा कौतुक काहीच वाटत नव्हते. फकीराच्या हाडकुळ्या शरीराचा आणि त्याच्या दाढीचा अप्रिय स्पर्श मात्र कुसुमाग्रज यांच्या मनातून जात नव्हता.

शालेय जीवनात असतानाच कुसुमाग्रज यांचे अवांतर वाचन खूप झाले होते. गो.गो.दातार, ह.ना.आपटे, नाथमाधव, राम गणेश गडकरी, बालकवी, भारत गौरव ग्रंथमाला, सुरस ग्रंथमाला असे चौफेर वाचन कुसुमाग्रज करीत असत. कवितेची आवडही कुसुमाग्रज यांच्या मनात निर्माण झाली होती. पण कवितेच्या अंतरंगापर्यंत, तिच्या अर्थापर्यंत कसे जायचे, कविता कशी समजून घ्यायची याचे संस्कार पुरोहितसरांमुळे कुसुमाग्रज यांच्यावर झाले. एका तासाला पुरोहितसरांनी भा.रा.तांबे यांची 'वारा' ही कविता शिकविली. ती कविता कुसुमाग्रज यांना इतकी आवडली की, कविता कशी वाचावी, समजून घ्यावी, कवितेतील भाव सौंदर्य कसे अनुभवावे याचा वस्तुपाठच कुसुमाग्रज यांना मिळाला. कुसुमाग्रज पुढे खूप मोठे कवी झाले. पुरोहितसरांनी कुसुमाग्रज यांना शाळेत प्रमुख पाहुणे म्हणूनही बोलावले. शाळेची थोरवी सांगणारे सर आता अधिक स्थितप्रज्ञ वाटत असल्याची आणि इतिहासातील कथा रसाळपणे सांगणारे पुरोहितसर कंटाळलेले दिसल्याची आठवणही या लेखात कुसुमाग्रज यांनी सांगितली आहे. शिवाय क्रिकेट या खेळाची आवड, त्याकरिता दिवसदिवसभर केलेला सराव, जिद्दीने खेळ जिंकून आणलेली बक्षीसे, दोन संघांमधील चुरस, वैमनस्य, प्रसंगी दोन संघांमधील मारामाऱ्या हे सारेकाही कुसुमाग्रज यांनी या लेखात सांगितलेले आहे.

कुसुमाग्रज यांच्यावर शाळेचे संस्कार जसे झाले होते, तसेच नाशिक या गावाच्या आजूबाजूस असणाऱ्या वातावरणातील संस्कारही खूप मोठ्या प्रमाणात झाले होते. कोणत्याही लेखकावर कुटुंब, शाळा, परिसर, राजकीय, सामाजिक वातावरण यांचे संस्कार होत असतात. कुसुमाग्रजही त्याला अवपाद नव्हते. त्यामुळे त्यांनी 'सप्तशृंग' नावाच्या डोंगराच्या पायथ्याशी असणाऱ्या 'वणी' या गावचा उल्लेख या पाठात केलेला आहे. या गावातल्या इनामदार वाड्याचा आणि तेथील ग्रंथालयाचा उल्लेख कुसुमाग्रज यांनी आवर्जून केला आहे. उन्हाळ्याच्या सुटीत ते या गावी जायचे. मनसोक्त ग्रंथ वाचन करायचे. राम गणेश गडकरी यांची नाटके कुसुमाग्रज यांना याच ग्रंथालयात वाचावयास मिळाली. गडकऱ्यांच्या नाटकांचा खूप प्रभाव कुसुमाग्रज

यांच्यावर होता. या नाटकांमधील उतारे कुसुमाग्रज मोठ-मोठ्याने साभिनय म्हणत असत. नाटकांमधील 'संभाजी' आणि 'सुधाकर' या पात्रांचे संवाद कुसुमाग्रज त्यांच्या भावाला तारस्वरात ऐकवत असत. कुसुमाग्रज जसे मोठे कवी होते; तसेच ते एक यशस्वी नाटककारही होते. नाट्यलेखनाचे बीज कुसुमाग्रज यांच्या मनात रूजले; ते अशाप्रकारे वणी या गावी. इतरही साहित्य त्यांना आवडायचे. त्याचेही वाचन कुसुमाग्रज करायचे पण नाटकाविषयी त्यांच्या मनात महत्त्वपूर्ण स्थान होते. नाटकांशी संबंधीत गोष्टीही ऐकण्यात कुसुमाग्रज रमून जात असत. याच वयात त्यांनी एक नाटकही लिहिल्याची आठवण सांगितेली आहे. नाटकाचे नाव 'योगसंन्यास कि धर्मसंन्यास' आणि नाटकातील नायकाचे नाव 'योगेश्वर' असे राम गणेश गडकरी यांच्या प्रभावानेच त्यांनी ठेवलेले होते. नाटकाची ही आवड त्यांनी पुढील आयुष्यातही जपली. काव्य, नाटक यांच्याशी असलेले नाते कुसुमाग्रज यांनी सदैव जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

### १.२.३ समारोप :

कुसुमाग्रज यांच्या या पाठातून एका संवेदनशील कवीच्या बालपणाची ओळख होते. अत्यंत प्रवाही आणि रसाळपणाने कुसुमाग्रज यांनी आपल्या बालपणाच्या आठवणी सांगितलेल्या आहेत. कौटुंबिक वातावरण, माध्यमिक शाळेत असताना साहित्य, कला, क्रीडा, नाटक यांची लागलेली गोडी. वाचनाचे संस्कार. एका फकीराची अरेरावी वृत्ती व त्याच्याशी झालेली झटापट. शिक्षकांच्या अध्यापनातून झालेले काव्याचे संस्कार. क्रिकेट या खेळाची मनस्वी आवड आणि त्यासाठी केलेल्या खटपटी यांचे मनोरम वर्णन कुसुमाग्रज यांनी केले आहे. शिवाय सप्तशृंग डोंगर, 'वणी' नावाचे लहानसे गाव, या गावातील ग्रंथालय, चिपळूणकरांची ग्रंथमाला, गडकऱ्यांची नाटके, कवितासंग्रह, कादंबऱ्या इत्यादींचे वाचन. नाटक आणि काव्याच्या छंदापायी गणित विषयात आलेले अपयश; हे सारे काही या लेखात कुसुमाग्रज यांनी आत्मीयतेने कथन केलेले आहे.

### १.२.४ वाचनीय उतारा :

नाशिकच्या उत्तर भागी एक मोठा थोरला डोंगर आहे. सप्तशृंग नावाचा. त्याच्या पायाशी एक लहानसे गाव वसले आहे-वणी नावाचे. तेथे एक दोनचौकी इनामदारी वाडा होता. इनामदारी वैभवाच्या व इतिहासाच्या जीर्ण खुणा कोळ्याच्या जाळ्यासारख्या इकडे तिकडे लोंबत होत्या. वाड्याचा दिंडी दरवाजा असा होता की आत प्रवेश करताना आपण भूतकाळात प्रवेश करीत आहोत असे वाटायचे. परंतु या ऐतिहासिक सरंजामात एक आधुनिक प्रकरण तोंड लपवून दडून बसलेले होते. ते म्हणजे एक छोटेसे खाजगी ग्रंथालय. ग्रंथालय हा शब्द अतिशयोक्तीचा आहे. अडिचशे-तीनशे पुस्तकांच्या संग्रहाला आपण ग्रंथालय म्हणत नाही. पण माझ्या शालेय दृष्टीला तेव्हा तरी ते ग्रंथालयच वाटायचे. साहित्याची इतकी पुस्तके एकत्र असू शकतात आणि तीही एका खाजगी घरात, हे मला माहीत नव्हते. एका कपाटात कुलूपबंद करून ठेवलेली ही पुस्तके कोणी आणि कशासाठी घेतली याचा पत्ता लागत नव्हता. आपली आधुनिकता बाजूला ठेवून तो ग्रंथसंग्रह ही भोवतालच्या ऐतिहासिक वातावरणाशी समरस होण्याचा प्रयत्न करीत होता. वणी

म्हणजे आमच्या घराचं महाबळेश्वर-माथेरानच होते. उन्हाळ्याच्या सुट्टीत तेथे आमचा मुक्काम पडल्यावरच या कपाटाचे कुलूप निघायचे आणि आतील अलीबाबाची गुहा आमच्यासाठी खुली व्हायची. चिपळूणकरांच्या निबंधमालेपासून सुरस ग्रंथमालेच्या कादंबऱ्यांपर्यंत सर्व प्रकारची पुस्तके कपाटातून खच्चून भरलेली होती. या ग्रंथागारात नाटक या वस्तूशी माझी पहिली ओळख झाली. निदान वाङ्मयीन स्वरूपात. आणि ही नाटके होती राम गणेश गडकऱ्यांची. वेरूळची लेणी पहावयास निघालेला पाहुणा एकदम कैलासातच जाऊन थडकावा, तसा अनुभव होता तो. पंचक्रोशीतील लहानसहान दैवतांच्या अगोदर एकदम पंढरीच्या राजेश्वराचीच गाठ पडली होती. वाचून सारे काही समजत होते असे नाही. पण आपण काहीतरी फार चांगले वाचत आहोत हे जाणवत होते. वाङ्मयीन वाचनाने सारे काही विसरायला लावणाऱ्या अपूर्व आनंदाचा अनुभव नव्यानेच येत होता. शब्दही फुलांसारखे सुगंधी आणि रत्नांसारखे लावण्यवान असू शकतात, हे अस्पष्टपणे का होईना, पण लक्षात आले. भावाच्या बरोबर या नाटकांच्या प्रवेशांचा अभिनय-उच्चार करण्याची खटपट मी करू लागलो. वाड्याच्या गच्चीवर गेलो की, सप्तशृंगीचा प्रचंड डोंगर हाकेच्या अंतरावर जेठा घालून बसला आहे असे वाटायचे. संभाजीची अथवा सुधाकराची प्रदीर्घ भाषणे हातवारे करून आम्ही तारस्वरात त्याला ऐकवीत होतो. तोही बिचारा आपण साबाजी अथवा रामलाल आहोत असे दर्शवून हा सारा गदारोळ निमूटपणे ऐकून घेत होता. दोन-चार वर्षे उन्हाळी मुक्कामात चाललेल्या या उपक्रमामुळे नाटक मनामध्ये रुतून बसले. प्रेमाचे-नव्हे भक्तीचे केंद्रस्थान झाले.

### **१.२.५ शब्दार्थ :**

पर्वणी = कुंभमेळा, चुरस = स्पर्धा, तालीमखाना = व्यायामशाळा, निर्जन = माणसांचा वावर नसलेले ठिकाण, औटघटकेचा = क्षणभराचा, अरेरावीपणा = भांडखोरपणा, प्राज्ञा = हिंमत, रोमहर्षक = उत्कंठावर्धक, ग्रंथागार = ग्रंथालय, तारस्वरात = मोठ्या आवाजात.

### **१.२.६ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. कुसुमाग्रज यांचे वडील........ हा व्यवयास करीत असत.

अ) डॉक्टर    ब) वकील    क) इंजिनियर    ड) शिक्षक

२. पर्वणीच्या निमित्ताने कुसुमाग्रज यांनी.......हे शहर पहिल्यांदा पाहिले होते.

अ) नाशिक    ब) पुणे    क) सातारा    ड) अमरावती

३. कुसुमाग्रज यांना शालेय जीवनात....... या खेळाची विलक्षण आवड होती.

अ) कब्बडी    ब) व्हॉलीबॉल    क) फुटबॉल    ड) क्रिकेट

४. नाशिकच्या उत्तरेला....... नावाचा डोंगर आहे.

अ) सप्तशृंग    ब) कळसुबाई    क) भामनाथ    ड) दंडोबा

५. कुसुमाग्रज यांच्यावर...... या नाटककाराचा खूप मोठा प्रभाव होता.

अ) गो.ब.देवल ब) काका कालेलकर क) राम गणेश गडकरी ड) नाना जोग

६. कुसुमाग्रज यांनी शालेय जीवनात लिहिलेल्या नाटकातील नायकाचे नाव...... असे होते.

अ) माधवराव ब) योगेश्वर क) विश्वनाथ ड) गणेशशास्त्री

७. कुसुमाग्रज यांचे प्राथमिक शिक्षण कोणत्या गावी झाले होते.

अ) पैठण ब) नाशिक क) वणी ड) पिंपळगाव

८. कुसुमाग्रज यांना पुरोहितसरांमुळे कोणत्या गोष्टीचे मर्म नव्याने उमजले.

अ) कथा ब) कविता क) नाटक ड) प्रवासवर्णन

९. शालेय दिवसात कुसुमाग्रज उन्हाळ्याच्या सुट्टीत मुक्कामासाठी कोणत्या गावी जात असत.

अ) वणी ब) माथेरान क) वेरूळ ड) अजंठा

१०. कुसुमाग्रज यांनी कोणता ललितलेख संग्रह लिहिलेला आहे.

अ) मौनराग ब) वाटेवरच्या सावल्या क) डोह ड) सोन्याचा पिंपळ

- **उत्तरे**

१. ब) वकील २. अ) नाशिक ३. ड) क्रिकेट ४. अ) सप्तशृंग

५. क) राम गणेश गडकरी ६. ब) योगेश्वर ७. ड) पिंपळगाव ८. ब) कविता

९. अ) वणी १०.ब) वाटेवरच्या सावल्या

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. वि. वा. शिरवाडकर यांच्या शालेय जीवनातील आठवणी 'वाटेवरच्या सावल्या' या लेखाच्या आधारे तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

२. वि. वा. शिरवाडकर यांच्यावर वाचन आणि लेखनाचे संस्कार कसे झाले ते 'वाटेवरच्या सावल्या' या लेखाच्या आधारे कथन करा.

### १.२.७ अधिक वाचन / पूरक वाचन :

१. गुरूदत्त - तीन अंकी शोकांतिका : अरूण खोपकर

२. ऋतुचक्र : दुर्गा भागवत

३. दायाद वाससा 'वाडा' त्रयीचा : संपा. प्रशांत दळवी

# ३.पन्नास पैकी शून्य मार्क – शांता शेळके

## १.३.१ उदिष्ट्ये (Objectives) :

१. सर्जनशील साहित्य निर्मितीस प्रोत्साहन देणे.

२. अपयशातूनही सकारात्मकता बाळगणे.

३. अहंकार हा यशाच्या मार्गातील अडसर आहे, या विकाराची जाणीव करून देणे.

४. समानतेची जाणीव अधोरेखित करणे.

५. संवेदनशीलतेशी नाते प्रस्थापित करणे.

## १.३.२ प्रास्ताविक (Introduction) :

आपला स्वाभिमान न सोडता, अपयश पचवून समाजात जे नावलौकिक कमावतात. अशा लोकांचे आयुष्य निश्चितच प्रेरणादायी असते. 'पन्नास पैकी शून्य मार्क' या पाठाच्या माध्यमातून शांता शेळके या कवयित्रीला आपण इतरांपेक्षा हुशार आणि कोणीतरी वेगळे आहोत हा सूक्ष्म अहंकार झालेला दिसून येतो. पण आपल्या या वैगुण्याची जाणीव होऊन त्यात सुधारणा कशी करतात हे त्यांनी स्वत:च कथन केलेले आहे. प्रामाणिकपणाने जगून घेतलेले हे अनुभव शांता शेळके यांनी प्रामाणिकपणाणेच कागदावर उतरवलेले आहेत. त्यामुळे अंलकरणाला बळी न पडता अत्यंत साधेपणाने पण उत्कट भावनेने केलेले ही अनुभवकथन वाचनीय झाले आहे. म्हणूनच या लेखामधील अनुभव प्रेरणादायी आणि अनुकरणीय झालेला आहे.

- **लेखक परिचय :**

शांता जनार्दन शेळके – (जन्म १२ ऑक्टोबर १९२२ – मृत्यू ०६ जून २००२) शांता शेळके या प्रसिद्ध मराठी लेखिका, कवयित्री, अनुवादक व गीतकार होत्या. 'नवयुग' या साप्ताहिकात त्यांनी नोकरी केली. नागपूर, मुंबई येथे मराठीचे अध्यापन केले. कविता, कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, बालसाहित्य, चित्रपटगीते, समीक्षा, आत्मकथन, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारात शांता शेळके यांनी मुक्तपणे लेखन केले आहे. 'वर्षा', 'रूपसी', 'तोच चंद्रमा...', 'गोंदण', 'ओळख', 'जन्मजान्हवी', 'पूर्वसंध्या', 'इत्यर्थ' इत्यादी त्यांचे काव्यसंग्रह व गीतसंग्रह प्रकाशित आहेत. शांता शेळके यांचा 'मुक्ता आणि इतर गोष्टी' हा कथासंग्रह व 'स्वप्नतरंग' ही कादंबरी प्रकाशित आहे. शिवाय 'शब्दांच्या दुनियेत' हा ललितलेखसंग्रह ही त्यांनी लिहिला आहे. त्यांनी अनुवादाच्या क्षेत्रातही चांगली कामगिरी केली आहे. कालिदासाच्या मेघदूत या संस्कृत काव्याचा मराठी अनुवाद त्यांनी केला आहे. शांता शेळके यांनी 'धूळपाटी' हे आत्मकथन लिहिले असून, 'हायकू' या जपानी काव्यप्रकारातही त्यांनी लेखन केले आहे. 'पश्चिमरंग', 'वडीलधारी माणसे' ही त्यांची व्यक्तीचित्रणात्मक पुस्तके आहेत. सर्वच साहित्यप्रकार त्यांनी यशस्वी हाताळले आहेत. साहित्य क्षेत्रात आपल्या अभिव्यक्तीचा मुक्त संचार करणाऱ्या शांता शेळके या आळंदी येथे भरलेल्या अखिल भारतीय

मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या अनेक ग्रंथांना महाराष्ट्र शासनाचे वाङ्मयीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. असे विपूल लेखन करणाऱ्या शांता शेळके यांचा 'पन्नास पैकी शून्य मार्क' हा ललित लेख आता आपण अभ्यासूया.

### **१.३.३ विषय विवेचन** (Presentation of subject matter) **:**

'पन्नासपैकी शून्य मार्क' या लेखात शांता शेळके यांनी शालेय जीवनातील लहानसा पण महत्त्वपूर्ण अनुभव सांगितलेला आहे. बालसुलभ मानसिकता आणि या मानसिकतेत शालेय जीवनात घडलेला प्रसंग शांता शेळके यांनी प्रामाणिकपणे कथन केलेला आहे. या प्रसंगामुळे शांता शेळके यांच्या आयुष्यात आलेले शहाणपण वाचकांच्या मनातही मूल्यभाव निर्माण करते. त्यामुळे या कथनात आलेला प्रसंग लहानसा असला तरी जीवनाकडे व्यापकपणे पहावयास शिकवतो.

शांता शेळके जेव्हा इग्रंजी पहिलीच्या वर्गात शिकत होत्या तेव्हा त्यांच्या आयुष्यात एक प्रसंग घडला. त्या ज्या शाळेत शिकत होत्या त्या शाळेत मुलींपेक्षा मुलांची संख्या खूप होती. शांता शेळके यांच्या वर्गातही त्या मुलगी म्हणून एकट्याच होत्या. सर्व शिक्षक शांता शेळके यांचे अतिशय कौतुक करायचे. सर्वांच्याच त्या लाडक्या होत्या. शाळेत काही चुकले; की मुलांना छडीचा मार मिळत असे. पण असा मार शांता शेळके यांना मिळत नसे. कारण शाळेत त्या खूप हुशार होत्या. हुशारीमुळे खरे तर अंगी नम्रता आली पाहिजे पण झाले उलटेच. शाळेतल्या हुशारीमुळे शांता शेळके यांच्या मनात एक प्रकारचा सूक्ष्म अहंकार निर्माण झाला. आपण कुणीतरी विशेष व्यक्ती आहोत. इतरांपेक्षा आपण वेगळे आहोत; अशी भावना शांता शेळके यांची झालेली होती. पण सर्वच बाबतीत आपण सर्वांपेक्षा अधिक हुशार अथवा कुणीतरी विशेष नसतो. हे शांता शेळके यांच्या लक्षात यायला फार दिवस लागले नाहीत. पुढे घडलेल्या घटनेमुळे त्यांचा अहंकार चटकन मावळून गेला. एके दिवशी शाळेची तपासणी करण्याकरिता एक अधिकारी आलेले होते. त्यावेळी वर्गात शिक्षक 'दारिद्र्य मरण बरे बा दरिद्रता खोटी' ही कविता शिकवीत होते. शांता शेळके यांचा मराठीचा अभ्यास अत्यंत चांगला होता. मराठी हा विषयही त्यांना खूप आवडत असे. त्यामुळे शाळेत आलेल्या शाळा तपासणीसाने खूप प्रश्न विचारले आणि त्या सर्व प्रश्नांची अतिशय योग्य अशी उत्तरेही शांता शेळके यांनी दिली. अर्थातच त्या अधिकाऱ्याकडून आणि शिक्षकांकडूनही त्यांचे खूप कौतुक झाले. शिक्षकांनी शाबासकीही दिली. या प्रसंगामुळे शांता शेळके यांना आनंद झाला आणि ते स्वाभाविकही होते. पण या कौतुकाने त्या जास्तच हुरळून गेल्या. आपण खूपखूप हुशार आहोत. माझ्यासारखे हुशार कुणीच नाही अशी भावना त्यांची झाली. ती इतकी वाढली की त्या दिवशी शांता शेळके वर्गात कुणाशी बोलायलाही तयार होईनात.

शांता शेळके यांचा हा आनंद मात्र फार वेळ काही टिकला नाही. शाळेत मराठी विषय शिकवणारे शिक्षकच त्यांना गणित हा विषयही शिकवीत असत. मधल्या सुट्टीनंतर गणिताचा तास होता. गेल्या आठवड्यात घेतलेल्या गणिताच्या पेपर्सचे मार्क शिक्षकांनी मुलांना दाखविण्याकरिता आणलेले होते. शांता

शेळके यांची गणित याविषयात फारशी प्रगती नव्हती; त्यामुळे त्या पेपर्सचा गठ्ठा पाहून त्या घाबरून गेल्या होत्या. आधीच्या तासाला त्यांचे जे कौतुक झालेले होते, त्यामुळे त्या अजूनही त्याच आनंदात आणि अहंकारात होत्या. त्यांना मनातून असे वाटू लागले की गणितात आपणास फार नसले तरी पास होण्यापुरते मार्क नक्कीच मिळतील. पण त्यांना हे असे वाटलेले चुकीचे ठरले. त्या गणित विषयात नापास झाल्या होत्या. गणित विषयात त्यांना चक्क शून्य मार्क मिळालेले होते. शिक्षक गणिताचे मार्क सांगताना विद्यार्थ्याचे नाव वाचून मग मार्क सांगायचे. आपले नाव शिक्षक केव्हा उच्चारतात आणि मार्क केव्हा सांगतात; अशी भावना होऊन शांता शेळके फार घाबरून गेल्या होत्या. शेवटी एकदाचा त्यांचा नंबर आला. शांता शेळके यांचा पेपर हातात घेऊन शिक्षक जेव्हा रूक्ष आवाजात म्हणाले, 'शांता शेळके, मार्क शून्य' तेव्हा त्यांना आपल्या पायात कुणीतरी मणामणाच्या बेड्या घातल्या आहेत, असे वाटू लागले. जड पावलांनी त्यांनी शिक्षकाकडून पेपर घेतला. इतर मुलांप्रमाणेच त्यांच्याही हातावर शिक्षकांनी सणसणून दोन छड्या मारल्या. दिवसभरात जो अहंकार शांता शेळके यांच्या मनावर स्वार झाला होता; तो खाड्कन उतरला. हा प्रसंग शांता शेळके यांनी आयुष्यभर ध्यानात ठेवला. या लेखाच्या शेवटी त्यांनी लिहिले आहे. कोणत्यातरी गोष्टीवरून त्यांचे खूप कौतुक होऊ लागले; की त्या शाळेतील गणिताचा पेपर आठवतात आणि तत्काळ भानावर येतात. सर्व गोष्टीत आपण हुशार अथवा प्रवीण नसतो. आपण आपणास झालेल्या  आनंदाला आपल्या ताब्यात ठेवून अहंकाराला बळी पडू नये हा धडा शांता शेळके यांनी या प्रसंगातून घेतला. हा प्रसंग छोटासा असला तरी त्या प्रसंगातून मिळालेली शिकवण सर्वांनी आचरणात आणावी अशी आहे.

### १.३.४ समारोप :

शांता शेळके यांनी या लेखात त्यांच्या शालेय जीवनातील एक महत्त्वाचा प्रसंग ओघवत्या भाषेत सांगितलेला आहे. मुलांच्या शाळेतील एकटीच मुलगी. मराठी विषयात अतिशय हुशार असल्यामुळे जागृत झालेला सूक्ष्म अहंकार. शाळेच्या इन्स्पेक्शनमध्ये झालेले कौतुक. पण गणिताच्या पेपरामध्ये पन्नासपैकी शून्य मार्क मिळाल्यामुळे झालेले गर्वहरण. या लेखाच्या माध्यमातून शांता शेळके यांनी माणसाला कितीही मोठे यश मिळाले अथवा त्याच्या वाट्याला कितीही मोठे कौतुक आले; तरी माणसाने अहंकारी न होता सदैव नम्रता अंगी बाणवावी अशी शिकवण देण्याचा प्रयत्न केला आहे. नेमक्या आणि प्रासादिक शब्दकळेमुळे हा अनुभव विलक्षण प्रत्ययकारी झाला आहे.

### १.३.५ वाचनीय उतारा :

मास्तरांनी विद्यार्थ्यांचे नाव व मार्कांचा आकडा वाचीत एकेक पेपर द्यावयास सुरुवात केली. टेबलावरचा गठ्ठा जसजसा कमी होऊ लागला, तसतशी माझी छाती धडधडू लागली. माझ्या ओठांना कोरड पडली आणि डोळ्यांपुढे काजवे चमकू लागली. अखेर शेवटी टेबलावर एकच पेपर उरला. तो हाती घेऊन मास्तर रूक्ष स्वरात म्हणाले, 'शांता शेळके, मार्क शून्य'. त्या गणिताच्या पेपरामध्ये खरोखरच पन्नासपैकी शून्य गुण मिळवून मी दणदणीत नापास झाले होते. पायात कोणीतरी मणामणाच्या बेड्या घातल्या आहेत,

अशा थाटात टेबलाजवळ जाऊन मी पेपर घेऊन आले. त्या दिवशी नापास झालेल्या इतर मुलांप्रमाणे माझ्याही हातावर सणसणून दोन छड्या बसल्या. आणि दुपारपासून जी ऐट चढली होती ती तत्काळ नष्ट झाली. अजूनसुद्धा एखादे दिवशी माझे कशावरून तरी कोणी विशेष कौतुक केले किंवा मला स्वत:लाच स्वत:विषयी फार कौतुक वाटू लागले तर लगेच त्या गणिताच्या पेपराची मला आठवण होते आणि मी तत्काळ भानावर येते.

### १.३.६ शब्दार्थ :

अहंकार : 'मी'पणा, मन:पूर्वक = मनापासून, धुंदी असणे = रममाण होणे, खचितच = नक्कीच, रूक्षपणे = कठोरपणे, तत्काळ = लगेचच.

### १.३.७ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न :

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'आपण इतरांपेक्षा विशेष कुणीतरी आहोत' असा अहंकार ...... यांच्या मनात निर्माण झाला होता.

अ) दुर्गा भागवत  ब)मालती बेडेकर  क) इंदिरा संत  ड) शांता शेळके

२. ...... हा विषय शांता शेळके यांच्या खूप आवडीचा होता.

अ) मराठी  ब) समाजशास्त्र  क) इंग्रजी  ड) राज्यशास्त्र

३. शांता शेळके यांना......हा विषय आवडत नव्हता.

अ) गणित  ब) भूगोल  क)अर्थशास्त्र  ड) मानसशास्त्र

४. शांता शेळके यांनी....... या संस्कृत काव्याचा मराठीत अनुवाद केला आहे.

अ) त्रिवेणी  ब)महावृक्ष  क) मेघदूत  ड) रूपसी

५. शांता शेळके यांचे शिक्षक वर्गातील इन्स्पेक्शनच्या वेळी कोणता साहित्य प्रकार शिकवत होते?

अ) कथा  ब)कविता  क)नाटक  ड) कादंबरी

**उत्तरे :**

१. ड) शांता शेळके  २. अ) मराठी  ३. अ) गणित  ४. क) मेघदूत.  ५. ब) कविता

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. शांता शेळके यांनी 'गणिताच्या पेपराची आठवण येते आणि मी तत्काळ भानावर येते' असे का म्हटले आहे, ते स्पष्ट करा.

२. 'पन्नासपैकी शून्य मार्क' या लेखातून कोणता मूल्यात्मक संस्कार वाचकांना मिळतो, ते तुमच्या शब्दात लिहा.

**१.३.८ अधिक वाचन / पूरक वाचन :**

१. सोन्याचा पिंपळ : श्रीनिवास विनायक कुलकर्णी

२. मृदगंध : इंदिरा संत

३. विचारसंचित : दुर्गा भागवत.

• • •

४. शब्दांचे मोल - चंद्रशेखर धर्माधिकारी
५. संगमनेरचे दिवस - दया पवार
६. संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष : डॉ. बापूजी साळुंखे (व्यक्तिविशेष लेख) - बळवंत देशमुख

## ४ शब्दांचे मोल - चंद्रशेखर धर्माधिकारी

### ४.१ उद्दिष्ट्ये (Objectives) :

'शब्दांचे मोल' हा पाठ अभ्यासल्यानंतर आपणास.

१. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे व्यक्तिमत्व समजेल.

२. शब्दांचे महत्त्व जाणून घेता येईल.

३. 'वक्तृत्व' कला कशी विकसीत करावी हे समजेल.

४. चंद्रशेखर धर्माधिकारी हे नापास का झाले हे समजेल.

५. लेखकाच्या काळात शिक्षण घेण्याची पद्धती कशी होती हे समजेल.

### ४.२ प्रास्ताविक (Introduction) :

मराठी साहित्यिकांनी कथा, कादंबरी, नाटक, काव्य या सारख्या वाङ्मयप्रकाराबरोबरच ललित साहित्य हाही एक वाङ्मयप्रकार मोठ्या प्रमाणात हाताळलेला आहे. ललितलेखाच्या अनुषंगाने निबंध, लघुनिबंध, व्यक्तिचित्रण अशा स्वरुपात लेखन झाले आहे त्यामध्ये उदा. विद्याधर पुंडलिक - आवडलेली माणसे, रामदास भटकळ - बिंब प्रतिबिंब व कुलकर्णी सर, विणा देव - आशफ मस्त फकीर, सुनिता देशपांडे - सोयरे सकल, आनंद आंतरकर - रत्नकीळ इत्यादींचा उल्लेख करता येईल. याचप्रकारचे संपादन नापास मुलांची गोष्ट हे अरुण शेवते यांनी केले आहे.

चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या 'काळाची पाऊले' या पुस्तकातून 'शब्दांचे मोल' हा उतारा घेतला आहे. या पाठातून चंद्रशेखर यांनी स्वत:च्या वडिलांकडून आलेले काही अनुभव सांगितलेले आहेत. चंद्रशेखर लहान असताना स्नेहसंमेलनात अभिनयासह स्वगत सादर करीत असत. इंग्रजी पहिलीत असताना 'अहिंसा' या विषयावर भाषण केले आणि पुढे उत्कृष्ट वक्ते झाले. चंद्रशेखरचे वडील दादा धर्माधिकारी यांनी त्यांची तयारी करून घेतली. चंद्रशेखर यांनी दादांची व विनोबांची भाषणे ऐकूण वक्तृत्व कला विकसीत केली. दादांच्यामुळे आवाजातील चढ-उतार, एकाग्रता, आत्मविश्वास या गोष्टी समजून घेतल्या. याच्या जोरावर चंद्रशेखर यांनी अनेक पारितोषिके मिळविली. दादांनी 'सटरफटर' या सदराखाली जे लिहून ठेवले होते त्याचा उपयोग

लेखकाला झाला. व्याख्यानानंतर प्रश्न विचारले तर त्याची उत्तरे कशी द्यावीत हे ही ते दादांकडून शिकले. हुशार व शब्दावर प्रभुत्व असलेले चंद्रशेखर एल. एल. बी. मध्ये मात्र नापास होतात. आई नाराज होऊन म्हणते की, तू हुशार असूनही नापास कसा झालास? असे म्हणून ती स्वत: कधीही नापास झालो नाही हे सांगते आणि पुढे म्हणते की, मी आयुष्यात कधी परीक्षेला बसलेच नाही. याचा अर्थ असा की, जो परीक्षेला बसत नाही तो कधीच नापास होत नाही. जो प्रयोग करतो तो यशस्वी होतोच हा संदेश येथे मिळतो. कारण लेखक पुन्हा जोमाने अभ्यास करतात आणि नापास झालेल्या विषयात चांगले गुण मिळवून पुढील ध्येय गाठतात.

## ४.३ लेखक परिचय :

चंद्रशेखर शंकर धर्माधिकारी यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२७ ला रायपूर या गावी झाला. त्यांचे उच्च शिक्षण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे पूर्ण झाले. चंद्रशेखर मराठी वकील व मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते. न्यायाधीश असूनही त्यांची एक भारतीय स्वातंत्र्य सैनिक व लेखक म्हणून प्रसिद्धी आहे. दादा (शंकर) धर्माधिकारी हे यांचे वडील. चंद्रशेखर यांनी लेखक म्हणून अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. 'अंतर्यात्रा', 'काळाची पाऊले', 'भारतीय संविधानाचे अधिष्ठान', 'मंझिल दूरच राहिली', 'माणूसनामा', 'मानव निष्ठा' अध्यात्म', 'शोध गांधींचा', 'समाजमन', 'सहप्रवास', 'सुर्योदयाची वाट पाहूया' इत्यादी अशा अनेक मराठी पुस्तकांचे लेखन केले. त्यांची 'न्यायमूर्ती का हलफनामा' व 'लोकतंत्र एवं राहों के अन्वेषण' ही दोन हिंदी पुस्तकेही प्रसिद्ध आहेत. या त्यांच्या साहित्य लेखनाची दखल घेऊन इ.स. २००४ साली त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## ४.४ विषय विवेचन (Presentation of Subject matter) :

मराठी साहित्यात ललित लेखन या सदराखाली छोट्या मोठ्या विषयावर लेखन केले जाते. यातीलच एक भाग म्हणून व्यक्तिचित्रणाकडे पहाता येते. एखादी व्यक्ती अनेक संकटांना सामोरे जाते व उच्च पदावर जाऊन पोहोचते. तेव्हा ती व्यक्ती आलेले अनुभव लिहिण्याचा प्रयत्न करते. यातून ती व्यक्ती स्वत: अभिव्यक्त होऊ पहाते. अशा व्यक्तींपैकी चंद्रशेखर धर्माधिकारी हे एक व्यक्तिमत्व आहे त्यांनी 'काळाची पाऊले' या पुस्तकात अशा काही घटनांची नोंद केली आहे. यातील एक प्रसंग म्हणजे आपण नापास कसे झालो हे सांगण्याचाच त्यांनी केलेला प्रयत्न होय. तो इतरांच्या दृष्टीने प्रेरणादायी आहे. स्वत:चे व्यक्तिमत्त्व सिद्ध करण्यासाठी हा पाठ अतिशय महत्त्वाचा असून तो आपल्याला योग्य दिशा देणारा आहे.

शाळेत असताना चंद्रशेखर हे नाटकात काम करायचे. मामा वरेरकरांच्या 'हाच मुलाचा बाप' या नाटकातील एक अंक त्यांनी शाळेतील स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी बसविला होता. या बरोबरच त्यांनी चिं. वी. जोशींच्या 'वायफळाचा मळा' या पुस्तकातील कांही प्रसंग सादर केले होते. त्यांनी राम गणेश गडकरी यांच्या 'राजसंन्यास' व विष्णुपंत औंधकर यांच्या 'बेबंदशाही' नाटकातील संभाजीची स्वगते अभिनयासह सादर केली होती. त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुकही करण्यात आले. बोलण्यातील भारदस्तपणा आणि चांगल्या अभिनयाच्या

जोरावर नाट्यक्षेत्रात आपण करिअर करू शकतो असा त्यांच्यात विश्वास निर्माण झाला. दरम्यानच्या काळात 'चले जाव' आंदोलनाची चळवळ सुरू झाली आणि शाळाच बंद पडली. यावेळी अखिल भातीय स्तरावरील टुर्नामेंट होत असत. या फक्त म्हणायलाच अखिल भारतीय असत. यात विजय मिळाला की अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धा जिंकण्याचा आंनद होत असे. आजही विश्व विद्यालय असे म्हणत असताना त्यात खऱ्या अर्थाने विश्व कोठे असते हा प्रश्नच असतो.

चंद्रशेखर धर्माधिकारी इंग्रजी पहिलीत असताना पहिल्यांदा 'अहिंसा' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतात. भाषण त्यांनी दादांच्याकडून लिहून घेतले होते. कुठे थांबायचे, आवाज कुठं वाढवायचा व कमी करायचा, सुरूवात व शेवट कसा करायचा हे सर्व दादाकडून समजावून घेतात. त्याची रंगीत तालीम होते. नेहमी हाफ पॅन्ट वापरणारे चंद्रशेखर हे यावेळी पायजमा घालून भाषण करतात. कारण पाय थरथरले तर ते समोरच्यांना दिसणार नाहीत याची दक्षता घेतात. सर्व भाषण न चुकता सादर झाले. यातील मुद्दे चंद्रशेखर यांना समजले नाहीत. पण परीक्षकांना समजले असावेत याचा परिणाम म्हणजे त्यांना स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला. दादासारखा पिता भाषण लिहून देणारा लाभला याचा त्यांना अभिमान होता. चंद्रशेखर हे दादांची व विनोबांची भाषणे तन्मयतेने ऐकत असतं. नंतर नंतर नावाजलेल्या वक्त्यांची इंग्रजी व मराठी भाषणे तोंडपाठ केली. अनेक स्पर्धेत बक्षीसे मिळाल्याने उमेद वाढली. पुढे पुढे ते स्वत:च भाषणे लिहून पाठ करू लागले. नंतर फक्त मुद्यांच्या आधारे भाषण करू लागले. अंगी सभाधीटपणा येऊन उत्कृष्ट बोलण्याची सवय झाली. बोलण्यावर त्यांनी विजय मिळविला. परिणामी त्यांना वक्तृत्व स्पर्धेत अनेक बक्षीसे मिळत गेली.

वक्तृत्व ही कला की शास्त्र हा न संपणारा विषय असला तरी ती कला असून तिथे शास्त्रोक्त पद्धतीने विषयांची मांडणी करावी लागते. कला व शास्त्र या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भाषण करताना शब्द कसे उच्चारावेत, कोठे थांबावे, कोणत्या शब्दावर भर द्यावा, हावभावांचा वापर कसा करावा, आवाजाचा आरोह-वरोह म्हणजे चढ-उतार कसा करावा, मनाची एकाग्रता, आत्मविश्वास इ. गोष्टी कशा साध्य कराव्यात हे त्यांनी लहानपणीच दादाकडून समजावून घेतले. दादा वाचन करीत असताना महत्त्वाचे मुद्दे नोंदवून ठेवत असत. त्या नोंदवहीला त्यांनी 'सटरफटर' असे नाव ठेवले होते. या वहीचा वापर चंद्रशेखरनी भाषणाच्या वेळी केला. परिणामी आपण खूप वाचन करतो असे ते भासवत असत. नंतर यांनाही वाचन करताना नोंदी ठेवण्याची सवय लागली. दादांना वाचनाचा खूप छंद होता. पेनने खुणा केल्याशिवाय त्यांचे वाचन होत नसे. त्यामुळे पुस्तक विकत घेऊनच वाचत असत. या सवयीमुळे घरी चांगले ग्रंथालय निर्माण झाले होते.

एके दिवशी दादांचे शाळेत अहिंसेवर भाषण झाले. भाषणानंतर विद्यार्थ्याने दादांना प्रश्न केला. ''आजपर्यंत कधीतरी, कुठेतरी, कुणालातरी इतिहासात अहिंसेने स्वराज्य मिळाले आहे काय? मग हिंदुस्थानला कसे मिळेल?'' (पृ. १७) या प्रश्नाला दादांनी उलट प्रश्न केला. ते म्हणाले -

''आजवर इतिहासात दादा धर्माधिकारी कधी झाला होता का? म्हणूनच तर आज मी जन्माला आलो

आहे. इतिहासात कधीच घडलेले नसते, तेही घडू शकते. किंबहूना तेच घडत असते. इतिहासाचा अभ्यास वर्तमान जगण्यासाठी, भविष्य कवेत घेण्यासाठी करावयाचा असतो. आजवर इतिहासात कुणालाही अहिंसेने स्वराज्य मिळाले नाही, म्हणूनच हिंदुस्थानला ते तुमच्या पुरुषार्थाने मिळणार आहे.'' (पृ. १७)

हे सांगून झाल्यावर समोरून येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे आपण कशी द्यायची हे या प्रसंगातून चंद्रशेखर शिकले. एके दिवशी चंद्रशेखर आपल्या मुलाला रागावतात आणि म्हणतात -

''एखाद्या दिवशी अशानं मोटारखाली येऊन मरशील ना....?'' (पृ. १७) यावर त्या मुलाने शांतपणे उत्तर दिले.

''अनेक दिवसांपासून अशीच सायकल चालवतो आहे. अजून मेलो नाही...?'' (पृ. १७) हे ऐकताना दादा बाजूलाच बसले होते. ते त्यावेळी म्हणाले -

''बेटा, म्हणूनच तर मरण्याची भीती आहे. ते आगाऊच घडले असते तर हा प्रश्नच उपस्थित झाला नसता.'' (पृ. १७)

दादा असे वेळ प्रसंग पाहून प्रश्नांची उत्तरे देत असत. यातून चंद्रशेखर यांना खूप शिकायला मिळाले. समोरून आलेले प्रश्न हे वक्त्याची परीक्षा घेण्यासाठी विचारले जात नाहीत तर मनातील शंका दूर करण्यासाठी असतात हे लक्षात घेतले पाहिजे.

दादांचे गांधींच्या विचारावर एकदा शाळेत भाषण झाले. भाषणानंतर प्रश्न विचारा असे म्हणतात पण कोणीही प्रश्न विचारला नाही. म्हणून चंद्रशेखर यांनीच प्रश्न विचारला. ते म्हणाले -

''समजा, उद्या वर्ध्याच्या गांधी चौकात एखादा गुंड एखाद्या अबलेचा विनयभंग करीत असेल, अशा वेळी माझ्याजवळ असलेली तलवार उपसून मी त्याची गर्दन छाटून टाकली तर गांधीच्या अहिंसेचे काय होईल?'' (पृ. १८)

येथे मुलगाच आपल्या वडिलांना प्रश्न विचारतो हे पाहून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसतो. परंतु दादा शांतपणे त्याला उत्तर देतात ते म्हणतात -

''तुला महात्मा गांधींकडून अहिंसेचे सर्टिफिकेट आणून देईन; पण केव्हा? तू ज्या मुलीसोबत शाळेत जातोस, ज्या स्त्रियांसोबत बाजारात हिंडतोस, त्या साऱ्या जर तुझ्या नजरेतून वाचल्या असतील, तर तू त्या गुंडाची गर्दन जरूर छाटून टाक. एरवी तुझ्यात आणि त्या गुंडात फक्त डिग्रीचा फरक राहील.'' (पृ. १८) येथे हे लक्षात येते की, कोणतीही गोष्ट उघडपणे करायला हिंमत लागते. इतरांच्यात ती नसते. म्हणून ते लोक छुपे रूस्तम असतात. ते अधिक धोकादायक असतात. येथे सामाजिक ब्रह्मचर्य हे वैयक्तिक ब्रह्मचर्यपेक्षा मोलाचे असते. गांधीजींची अहिंसा भेकडांसाठी नव्हती. अहिंसेचा संबंध वीर वृत्तीशी आहे वैर वृत्तीशी नाही. कसाई हा शुरवीर नसतो. अशा अनेक अनुभवातून चंद्रशेखर यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे कशी द्यावीत हे शिकता आले.

चंद्रशेखर यांना पोष्टाची तिकिटे गोळा करण्याचा छंद होता. ते एकदा किशोरभाई मश्रुवालाकडे तिकिटे बघायला गेले. यावेळी आलेल्या टपालात एक तिकीट शिक्का मारून रद्द केलेले नव्हते ते पुन्हा वापरता येण्यासारखे होते. म्हणून त्यांनी किशोरभाईंच्या निदर्शनास आणून दिले. लगेच किशोरभाईंनी तिकीटावर पेनाने क्रॉस करून ते तिकीट रद्द केले. हे पाहून चंद्रशेखर त्यांना म्हणाले की, -

''आपलं इंग्रजी सरकाराशी भांडण आहे. या पोस्टाच्या तिकीटांच्याद्वारे सरकारला अर्थप्राप्ती होत असते. तेव्हा ते कोरे करकरीत राहिलेले तिकिट पुन्हा वापरायला काय हरकत होती?'' (पृ. १८) हे ऐकूण किशोरभाई म्हणाले -

''सरकारशी आपलं भांडण उघड आहे. छुपं नाही आणि ते सत्यावर आधारित आहे. बेईमानी किंवा अप्रामाणिक नाही. त्या तिकीटाचा असा पुन्हा उपयोग करणे अप्रामाणिकपणाचे आहे आणि अप्रामाणिकपणाशी आपले भांडण नाही.'' (पृ. १८)

ही गोष्ट छोटी होती पण आशय मोठा होता. ज्या पद्धतीने दादांनी गांधींच्या अहिंसेविषयीच्या प्रश्नांचे उत्तर दिले त्याच पद्धतीने किशोरभाईंनी त्यांना उत्तर दिले होते. अशा लहान-मोठ्या गोष्टींतून चंद्रशेखर यांना खूप शिकायला मिळाले. त्यावेळी बजाजवाडीतील मंडळी पाठकोरी कागदं वापरत असत. मासिकाचे, वर्तमानपत्राचे वेष्टण सुद्धा वापरत असत. येथे कंजुषीची भावना नव्हती तर अपव्यय टाळण्याची प्रवृत्ती होती.

इ.स. १९४९ साली नागपूर महाविद्यालयातून बी.ए. ची परीक्षा चंद्रशेखर द्वितीय श्रेणीत पास झाले. या काळात एकाच वेळी २ (दोन) पदव्या घेण्याची सोय होती. म्हणून चंद्रशेखर यांनी एल.एल.बी. आणि एम.ए. अशा दोन पदव्यांचा सलग चार वर्षाऐवजी तीन वर्षात पदव्या पूर्ण करण्यासाठी प्रवेश घेतला. एम.ए. साठी नागपूर महाविद्यालयात तर एल.एल.बी. साठी लॉ कॉलेज मध्ये ते जात असत. पण इतर उद्योगामुळे चंद्रशेखर यांचे लक्ष अभ्यासात कमी होते. त्यामुळे ते १९५१ मध्ये एम.ए. च्या परीक्षेला बसत नाहीत. इ.स. १९५२ मध्ये एल.एल.बी. च्या परीक्षेत नापास झाले. तर एम.ए. च्या परीक्षेत तृतीय श्रेणीत पास झाले. शेवटी इ.स. १९५३ मध्ये चंद्रशेखर हे एल.एल.बी. च्या द्वितीय वर्षाची परीक्षा पास झाले. त्यांचे थोरले बंधू बबनराव मात्र दोन्ही परीक्षा पास होऊन जुलै १९५१ मध्ये त्यांनी वकिली सुरू केली. चंद्रशेखर नापास झाले तेव्हा त्यांच्या आईला फार वाईट वाटते ती त्याला म्हणते की -

''तुला लोक इतका हुशार विद्यार्थी मानतात; मग तू कसा नापास झालास? नाही तर मी बघ. आयुष्यात कधीच नापास झाले नाही.'' (पृ. १९)

आपण नापास झालो नाही हे सांगताना तिला अभिमान वाटतो पण आपण नापास का झालो नाही याचे कारणही ती पुढे सांगताना म्हणते -

''ह्याचे कारण असे आहे की मी आयुष्यात कधी परीक्षेलाच बसले नाही?'' (पृ. १९)

परीक्षेला न बसणारा माणूस कधीच नापास होत नसतो. तसेच जो माणूस कुठलाही प्रयोग कधीच करत

नाही. त्याचा प्रयोग अयशस्वी होत नाही हे सत्य आहे. म्हणजेच आपण सत्याचा सामना केला पाहिजे. आईच्या या विधानातून दोन गोष्टी लक्षात येतात. प्रयत्न करणाऱ्याला अपयश येते. पण अपयश आले म्हणून मनातून खचून जाऊ नये तर आपण आपली चूक समजावून घेऊन पुन्हा प्रयत्नपूर्वक यश संपादन केले पाहिजे. अशा विचाराने त्यांची आई त्यांना बोलते. 'काळाची पाऊले' या पुस्तकात स्वत:च्या आयुष्यातला नापास झालेला प्रसंग सांगताना लेखक हेच सांगतात की, एखाद्या वेळेस आपल्या वाट्याला अपयश आले तर मनातून खचून न जाता पुन्हा प्रयत्न केला तर यश हे आपलेच आहे.

### ४.५ **समारोप** (Summary) :

चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी 'काळाची पाऊले' या पुस्तकातून 'शब्दांचे मोल' हा उतारा घेतला आहे. या उताऱ्यातून त्यांनी वक्तृत्व कला कशी विकसीत करावी हे सांगत असताना स्वत:च्या वडिलांकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या याविषयीचे अनुभव सांगितले आहेत. यातून त्यांनी स्वत:चे व्यक्तिमत्त्व विकसीत केले आहे. हे सांगत असताना चंद्रशेखर यानी दादांनी लिहून दिलेल्या इंग्रजीतील पहिलीच्या वर्गातील भाषणापासून ते एल.एल.बी. च्या पदवी शिक्षणापर्यंतचा सर्व भाग सांगितला आहे. नापास झाल्यावर आईची नाराजी आणि तिने उच्चारलेल्या उद्‌गारातून मनातून खचून न जाता नव्या उमेदिने पुन्हा उभारण्याचं बळ दिसून येते. जो परीक्षा देतो तोच नापास होतो. जो परीक्षा देत नाही तो कधीच नापास होत नाही. हे सांगताना आयुष्यात वेगवेगळे प्रयोग केले पाहिजेत तरंच नवीन काहीतरी निर्माण होऊ शकते. हे ही ते सांगताना दिसतात. नवीन प्रयोग करीत असताना एखाद्यावेळेस अपयशही येते. पण त्या अपयशाकडे दुर्लक्ष करून पुन्हा नव्याने प्रयत्नपूर्वक यश संपादन करता येते हे येथे चंद्रशेखर यांनी सिद्ध केले आहे.

### ४.६ वाचनीय उतारा (पृष्ठ १६–१७)

वक्तृत्व ही कला आहे की शास्त्र आहे हा कधीही न संपणारा वाद आहे. वक्तृत्व ही कला असून या कलेस उपकारक अशी तत्त्वे अनेक शास्त्रांमधून घेता येण्यासारखी आहेत असेही मानले जाते. व्याख्यान परिणामकारक ठरण्यासाठी विराम म्हणजे वाक्य बोलत असताना ठिकठिकाणी कमी–जास्त प्रमाणात थांबण्याची क्रिया ह्याचा जितका चातुर्याने उपयोग करण्यात येईल, तितके भाषण परिणामकारक ठरू शकेल. भाषणाची गती किती व कशी ठेवावी, विरामाप्रमाणेच कटाक्ष शब्दाघात, साहजिकपणा व प्रगल्भ विचारशैली ह्याही गोष्टी महत्त्वाच्या असतात. आवाजाचे आरोहावरोह म्हणजे चढउतार, एकाग्रता, कळकळ, आत्मविश्वास ह्याही गोष्टी आत्मसात कराव्या लागतात. सभास्थानी कुठले कपडे यालाही महत्त्व असते. 'सभ्य गृहस्थहो' हे संबोधन वापरायचे असेल तर वक्ताही सभ्य असला पाहिजे व दिसला पाहिजे. हावभाव हेही महत्त्वाचे असतात. यासोबत भाषणाची तयारीही महत्त्वाची असते. विषय व्यवस्थित व शिस्तवार मांडण्यासाठी वाचन असणे अर्थातच आवश्यक आहे. लहानपणीच हे माझ्या ध्यानात आले, की दादा कुठलेही पुस्तक वाचत असताना महत्त्वाची वाक्ये व उतारे अधोरेखित करीत असत. एवढेच नव्हे, ते वहीत उतरवूनही ठेवीत. भाषणापूर्वी अगर तेच न जमले तर भाषणानंतर भाषणातील मुद्दे नोंदवहीत नमूद करून ठेवीत. या नोटबुकचे

नाव दादांनी ‘सटरफटर’ असे ठेवले आहे. माझ्या भाग्याने अशा वह्यांचा संग्रहच माझ्या हाती पडला व मी त्यांचा दिलखुलासपणे उपयोग करू लागलो. त्यामुळे माझे वाचन फारसे नसले तरी ते खूप आहे असा गैरसमज होण्यास मदत झाली. मीही दादांची हीच पद्धत स्वीकारली. मी आजवर केलेल्या भाषणांचे मुद्दे या नोंदवहीत आहेतच. पण त्यासोबत काहीही व कुठेही वाचले ते आवडले, कधीतरी उपयोगी पडेल असे वाटले, की मी ते नोंदवहीत उतरवून ठेवतो. तशी मला सवय पडली आहे. दादांच्या या नोंदवह्या ही माझी खरी संपत्ती आहे. माझा खाजगी पुस्तक संग्रह अगर ग्रंथालयही बऱ्यापैकी आहे. पुस्तकावर खुणा केल्याखेरीज वाचनाची सवय नसल्याने मी बहुधा पुस्तक विकत घेऊनच वाचतो. दादांचे वाचन खूप होते. त्यांच्या आवडीच्या विषयावर प्रसिद्ध झालेले प्रत्येक पुस्तक ते वाचत असत. त्यापैकी मी काय वाचले पाहिजे हेही मला कळवित. यामुळे बापाच्या भरवशावरच माझा ‘दिमाख’ कायम राहत आला आहे; आणि तोही अगदी लहानपणापासून. (पृ. १६-१७)

**४.७ शब्दार्थ :**

लौकिक - प्रसिद्धी

स्वगते -नाटकातील पद्य रचना (गीते), स्वत:शी बोलणे

उमगणे - कळणे, उलगडा होणे

हिरिरीने - आवडीने, पुढाकाराने,

टुर्नामेन्ट - स्पर्धा

अहिंसा - प्राण्यांस न मारणे, न दुखविणे.

पोपटपंची - पाठ केलेले बडबडत जाणे

नाद - सवय,

तन्मयतेने - एकाग्रतेने

वाणी - बोलणे,

बहुश्रुतता - चौफेर ऐकण्याची कला

चातुर्याने - कलात्मक पद्धतीने,

शिस्तवार - पद्धतशीरपणे

अधोरेखित - शब्दाखाली खुणा करणे,

सटरेंटर - सर्व काही एकत्र असलेले, बारीकसारीक

भरवशावर - विश्वासावर,

दिमाख - मोठेपणा

खेकसणे - चिडणे, ओरडणे,

न गडमगता - न घाबरता

एरवी - इतर वेळी

छाटने - तोडून टाकणे

सर्टिफिकेट - प्रमाणपत्र

छुपेपणाने - गपचुपपणे, कुणालाही न कळता

भेकडांसाठी - भित्र्यांसाठी

डाक - पत्र

निदर्शनास - नजरेस

वेष्टण - मासिकाच्या वर अवरण म्हणून लावलेला कागद

कंजुषी - चिकाटी, न देण्याची वृत्ती.

## ४.८ स्वाध्याय :

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या वडिलांचे नाव काय ?

अ) दादा धर्माधिकारी　　ब) आण्णा धर्माधिकारी
क) बाबा धर्माधिकारी　　ड) काका धर्माधिकारी

२. चंद्रशेखर धर्माधिकारी हे कोणत्या क्षेत्रात काम करीत होते?

अ) डॉक्टर　ब) इंजिनिअर　क) वकील　ड) ऑडीटर

३. पहिलीत असताना चंद्रशेखर यांनी कोणत्या विषयावर वक्तृत्व स्पर्धेत भाषण केले होते?

अ) हिंसा　ब) अहिंसा　क) प्रशंसा　ड) जिज्ञासा

४. उत्कृष्ट वक्तृत्व सादर करण्याची कला चंद्रशेखर यांनी कोणाकडून शिकली?

अ) काका　ब) मामा　ड) मावसा　ड) वडील

५. 'शब्दांचे मोल' हा लेख कोणत्या पुस्तकातून घेतला आहे?

अ) काळाची पाऊले　ब) कृष्णाकाठ　क) बलुतं　ड) वाटेवरच्या सावल्या

६. अहिंसेचा संबध कशाशी आहे?

अ) वीरवृत्ती　ब) वैरवृत्ती　क) गरीबी　ड) भेकडपणा

७. दादांनी वहीत उतरवून ठेवलेल्या नोंदींना काय नाव दिले होते?

अ) डायरी　ब) सटरफटर　क) नोंदवही　ड) टिपण्णी

८. मामा वरेरकरांच्या कोणत्या नाटकातील अंक शाळेच्या स्नेहसंमेलनाच्या वेळी निवडला होता?

अ) कुंजविहारी　　ब) हाच मुलाचा बाप
क) सन्याशाचा संसार　　ड) बहिणी

९. 'वायफळाचा मळा' हे पुस्तक कोणाचे आहे.

अ) चिं.वि.जोशी　ब) पु. ल. देशपांडे　क) शंकर पाटील　ड) द. मा. मिरासदार

१०. चंद्रशेखर धर्माधिकारी कोणाची भाषणे तन्मयतेने ऐकत असत.

अ) दादांची व नेहरुंची　　ब) दादांची व महात्मा फुलेंची
क) दादांची व विनोबांची　　ड) दादांची व डॉ. आंबेडकरांची

११. एल.एल.बी. ची परीक्षा कोणत्या वर्षी चंद्रशेखर धर्माधिकारी नापास झाले?

अ) इ.स. १९५३　ब) इ.स. १९५१　क) इ.स. १९५२　ड) इ.स. १९५४

१२. चंद्रशेखर यांना काय गोळा करण्याचा छंद होता?

अ) निसर्गाची चित्रे ब) पोष्टाची पाकिटे क) नेत्यांची चित्रे ड) पोष्टाची तिकिटे

१३. इंग्रज सरकारशी आपले भांडण कसे हाते?

अ) उघड ब) छुपे क) समोरासमोर ड) अप्रामाणिक

१४. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा जन्म कोणत्या गावी झाला?

अ) राजूरी ब) राजापूर क) रायबाग ड) रायपूर

१५. इ.स. २००४ साली चंद्रशेखर धर्माधिकारी यांना कोणत्या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले?

अ) भारतरत्न ब) पद्मभूषण क) डी.लिट. ड) पद्मश्री.

१६. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे उच्च शिक्षण कोणत्या गावी झाले?

अ) मुंबई ब) पुणे क) नागपूर ड) नाशिक

**उत्तर :**

१. अ) दादा धर्माधिकारी, २. क) वकील, ३. ब) अहिंसा, ४. ड) वडील,
५. अ) काळाची पाऊले, ६. ब) वैरवृत्ती ७. ब) सटरफटर, ८. ब) हाच मुलाचा बाप,
९. अ) चिं. वि. जोशी, १०. क) दादांची व विनोबांची, ११. क) इ.स. १९५२,
१२. ड) पोस्टाची तिकीटे, १३. अ) उघड, १४. ड) रायपूर, १५. ब) पद्मभूषण, १६. क) नागपूर

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. ‘शब्दांचे मोल’ या पाठाच्या आधारे चंद्रशेखर धर्माधिकारी यांना काय संदेश द्यायचा आहे. ते सोदाहरण लिहा.

२. वक्तृत्व ही कला साध्य करावयाची असेल तर काय केले पाहिजे. हे ‘शब्दांचे मोल’ या पाठाच्या आधारे सांगा.

३. चंद्रशेखर धमाधिकारी यांनी आपल्या आयष्यातील नापास झालेला महत्त्वाचा प्रसंग ‘शब्दांचे मोल’ या पाठात कसा सांगितला आहे ते सविस्तर लिहा.

**४.९ संदर्भ ग्रंथ :**


१. शब्दसंहिता - संपादक - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. काळाची पाऊले - चंद्रशेखर धर्माधिकारी.

३. प्रदक्षणा - खंड दुसरा - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - ३०

४. मराठी वाङ्मयाचा इतिहास - खंड सातवा - १९५० ते २००० भाग तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - ३०.

# ५. संगमनेरचे दिवस – दया पवार

## ५.१ उद्दिष्ट्ये (Objectives) :

'संगमनेरचे दिवस' हा पाठ अभ्यासल्यानंतर आपणास.

१. दया पवार यांचे व्यक्तिमत्त्व समजून येईल.

२. दया पवारांचे संगमनेरमधील वसतिगृहात व्यथित केलेले अनुभव समजतील.

३. दया पवार यांचे लग्न कसे झाले हे समजेल.

४. दया पवार हे नापास का झाले हे समजेल.

५. दलित साहित्यिक म्हणून दया पवारांचा परिचय होईल.

६. नापास झालेल्या विषयात जिद्दीने जादा मार्क्स पाडता येतात हे समजेल.

## ५.२ प्रास्ताविक (Introduction) :

मराठी साहित्यात 'आत्मकथन' हा वाङ्मय प्रकार स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात लिहिला गेला. यामध्ये प्रामुख्याने दलित लेखकांनी आत्मकथने लिहिलेली दिसतात. देश स्वतंत्र्यानंतर पहिली दलित पिढी शिकली व सुज्ञ झाली. त्यांना स्वत:वर होणाऱ्या अन्यायाची जाणीव झाली. याबरोबरच आपण जे आयुष्य भोगले हे जगाला समजणे महत्त्वाचे आहे हे त्यांनी मानले. या अनुषंगाने त्यांच्याकडून विविध वाङ्मयप्रकारांचे लेखन झाले. यात कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथन, प्रवासवर्णन इत्यादी प्रकारांचा समावेश होतो. आत्मकथनाच्या अनुषंगाने विचार करता शंकरराव खरातांचे 'तराळ-अंतराळ', रुस्तम उचल खांब यांचे 'गावकी', शरणकुमार लिंबाळे यांचे 'आक्करमाशी', लक्ष्मण माने यांचे 'उपरा', किशोर शांताबाई काळे यांचे 'कोल्हाट्याचं पोर', दादासाहेब मोरेंचं 'गबाळं' इत्यादी लेखकांनी आत्मकथने लिहिली आहेत. याच काळात दया पवार हे साहित्याचे लेखन करीत होते. विविध वाङ्मय लेखनाबरोबरच त्यांनी 'बलुतं' हे आत्मकथन लिहिले आहे. या आत्मकथनातून वेगळ्या जगाची ओळख त्यांनी समाजाला करून दिली. या आत्मकथनामधील कांही भाग 'संगमनेरचे दिवस' या शीर्षकाखाली या पाठात मांडलेला आहे. त्या अनुषंगाने हा पाठ महत्त्वाचा आहे.

दया पवार यांचा 'संगमनेरचे दिवस' हा लेख नापास मुलांची गोष्ट या अरुण शेवते यांनी संपादित केलेल्या पुस्तकातील आहे. सदरचा उतारा हा दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनातून घेतलेला आहे. त्यांची जडणघडण ही संगमनेरमध्ये झाल्याने तेथील आठवणींना त्यांनी या पाठातून उजाळा दिला आहे. शिक्षण घेण्यासाठी त्यांना बोर्डिंगमध्ये रहावे लागते. जाती व्यवस्थेच्या चाकोरीतून जाताना अनेक वाईट अनुभव त्यांना येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा पगडा यांच्यावर होता. दया पवारांच्या तात्याचं निधन होते. त्यालाच सर्व विधी करावे लागतात. तात्यानं परस्पर दयाचं लग्न ठरविलं याचा राग त्याला येतो. पण दया जेव्हा मुलीला बाजारात चोरून पाहतो तेव्हा तो तिला पुन: पुन्हा पहाण्यासाठी संगमनेरच्या शनिवारच्या

आठवडी बाजाराची वाट पाहू लागतो. मनानेच तिचं नाव सई ठेवतो. याचा परिणाम म्हणजे कधीही नापास न झालेला दया १० वीत नापास होतो. त्याची त्याला चूक कळते. नंतर तो वसतिगृहात रहाता येत नसल्याने कोंबड्यांच्या खुराड्यात राहून अभ्यास करतो व १० वीत पास होतो. पुन्हा त्याच्या स्वप्नांना बळ येते. या पाठातून स्वत:च्या आत्मविश्वासावर आपण कसे पुढे जाऊ शकतो हे दाखवून दिले आहे.

## ५.३ लेखक परिचय :

दया पवार यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील धामणगांव या खेडेगावात १५ सप्टेंबर १९३५ ला झाला. तर मृत्यू नवी दिल्ली येथे २० डिसेंबर १९९६ रोजी झाला. मराठी साहित्य क्षेत्रात त्यांनी स्वत:चा वेगळा ठसा उमटविला आहे. त्यांचे मूळ नाव दगडू मारुती पवार. दया पवार या टोपण नावाने त्यांनी साहित्य लेखन केले. त्यांचे शिक्षण संगमनेरच्या बोर्डिंगमध्ये पूर्ण झाले. १० वीत ते नापास झाले. कारण चुलत्याने त्यांचे लग्न कोणालाही न विचारता ठरविले होते. त्यामुळे त्यांचे लक्ष विचलीत झाले. पण नंतर ते १० वी पास झाले. दलित साहित्य लेखन करणारे हे अग्रस्थानचे लेखक आहेत. 'बलुतं' हे त्यांचे आत्मकथन खूपच गाजले. या आत्मकथनाचे अनेक भारतीय भाषांमध्ये भाषांतरे झाली. इतकेच नव्हे तर इंग्रजी, फ्रेंच आणि जर्मन या युरोपियन भाषांत रुपांतरे झाली आहेत. 'अछूत' ('बलुतं'चा हिंदी अनुवाद) व जेरी पिंटो यांचा इंग्रजीत अनुवाद प्रसिद्ध आहे. काव्य क्षेत्रात त्यांचे 'कोंडवाडा', 'धम्मपद' असे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. 'चावडी', 'जागल्या', 'पासंग' असे काही कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. याशिवाय त्यांचे 'पाणी कुठवर आलं गं बाई' व 'विटाळ' (वैचारिक) 'बीस रुपये' (विटाळचा हिंदु अनुवाद) असे लेखन प्रसिद्ध आहे. 'बलुतं' या पुस्तकाला महाराष्ट्र सरकारचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार १९७९ ला देण्यात आला. त्याबरोबरच त्यांना पद्मश्री या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे.

## ५.४ विषय विवेचन (Presentation of Subject matter) :

मराठी वाङ्मयात कथा, कादंबरी, नाटक, काव्य, यासारख्या वेगवेगळ्या वाङ्मयप्रकार लेखनाबरोबर स्वातंत्र्योत्तर काळात दलित आत्मकथने मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. देश स्वतंत्र झाल्यावर दलित समाजातील लोक शिकू लागले. शिकलेल्या लोकांना त्यांच्या स्वाभिमानाची जाणीव झाली. ते स्वत:चा, समाजाचा विचार करू लागले. यातूनच ते लेखनास प्रवृत्ती झाले. आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. यातूनच दलित साहित्याची निर्मिती झालेली दिसते. शिकलेली पहिली पिढी इ.स. १९६० नंतर साहित्य निर्माण करू लागली. वेगवेगळ्या जातीधर्मातील लोक लिहू लागले. एकूण दलित साहित्याची निर्मिती ही स्वातंत्र्योत्तर काळात जोमाने झालेली दिसते. याच काळात दया पवार यांनी वेगवेगळ्या साहित्यप्रकारांचे लेखन केले. त्यांचे 'बलुतं' हे आत्मकथन प्रसिद्ध आहे. त्यांनी आयुष्यभर सहन केलेल्या यातना 'बलुतं' मध्ये मांडल्या. यातील काही भाग म्हणजे 'संगमनेरचे दिवस' हा लेख होय. वसतिगृहात व्यथित केलेले दिवस याठिकाणी ते सांगतात आणि आठवणींना उजाळा देताना दिसतात. या पाठातून त्यांच्याविषयी काही प्रमाणात जीवनविषयक माहिती मिळते.

संगमनेर गावातील आठवणी सांगताना दया पवार सांगतात की, त्यावेळी ते शाळेत शिकत होते. सवर्ण मुलांत आणि दलित मुलांत फार फरक होता. याची जाणीव त्यांना शाळेतच झाली. एकदा साने गुरुजींच्या 'भारतीय संस्कृती' या पुस्तकावर निबंध स्पर्धा होती. या वेळी मी भारतीय संस्कृतीची खूपच टवाळी केली होती. त्यांचा निबंध वाचून कुलकर्णीसर अस्वस्थ होतात. ते त्यांना बोलवून म्हणतात –

''तू जे विचार मांडतोस, तो खरं म्हणजे राष्ट्रद्रोह आहे.'' याविषयी दया पवार त्यांच्याशी भांडतो, एस.एस.सी. च्या वर्गात असताना शेवटच्या दिवशी विद्यार्थी दिन साजरा केला जायचा. यावेळी दयाने शिक्षकाच्या पेहरावात तास घेतला होता. मराठीच्या तासाला कविता म्हणून दाखविली. तर इतिहासाच्या तासाला जातिव्यवस्था कशी निर्माण झाली हे सांगितले. ब्राह्मण शिक्षक त्याला थांबविण्याचा प्रयत्न करतात. पण तो थांबत नाही. कारण 'शूद्र मुळचे कोण होते?' हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तक दयाने वाचलेले. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव दयावर होता. 'जनता' साप्ताहिक ते नियमीत वाचत यातून त्यांना मानसिक बळ येत गेले. डॉ. आंबेडकरांचे विचार हे आपले विचार आहेत असे त्यांना वाटायला लागले.

साहित्याची जाणीव याच वेळी समजून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. कुलकर्णीसर मराठी शिकवायचे. ठेंगणी मूर्ती, एकटांगी धोतर, कोट व पांढरी टोपी, पायतान घालून वर्गात येणारी अशी होती. एम.ए. मध्ये क्लास चुकला म्हणून हायस्कूल मास्तर झालेले. मराठी शिकविताना ते नेहमी शांता शेळके यांच्या कविता रंगात येऊन शिकवीत असत. बहुतेक शांता शेळके या त्यांच्या क्लासमेंट असाव्यात. त्यामुळे मुलंही यांना शांता शेळकेंच्या कविता शिकविण्यास सांगत असत. ते रागावले म्हणजे पेन्सिलने मारत असत. ते कथाही लिहित असतं. मासिकातून छापलेल्या एक-दोन कथा दयाने पाहिल्या होत्या. दया जेव्हा त्यांना कथा वाचण्यासाठी मागतो तेव्हा ते म्हणतात – ''शाळेतील मुलांनी वाचण्यासारखी नाही.'' याचं दयाला खूप हसू येत असतं. असं लपविण्यासारखं काय बरं कथेत लिहिलं होतं हे समजत नाही. कुलकर्णीसर दयाला शाळकरी पोरगं समजत असत.

दयाला जीवनात अनेक चढ-उतार येत होते. दयाचा तात्या मुंबईत सिरियस असल्याची तार येते. तात्या मरताना दयानं पाणी पाजावं असं घरातल्यांच मत होतं. कारण पुतण्यानं पाणी पाजणं महत्त्वाचं मानले जाई. दयाच्या वडिलांना तात्यानं पाणी पाजलं आणि तात्याला दयानं पाणी पाजलं. वडिलांचं आणि तात्यांचं स्पिरिटमुळं (दारुमुळं) लिव्हर नासलेलं त्यामुळे दोघांचेही मृत्यू झाले. तात्या मेला म्हणून आजी हमसून हमसून रडत होती. मला मात्र रडू येत नव्हतं. कारण तात्यानं आईचा केलेला उद्धार मी विसरलो नव्हतो. दयाला काकूचं मात्र नवल वाटते. ती गळ्यात नादाळी (दर्शनीमाळ) घालायची, कुणी मेलं तर तिला धडकी भरायची, त्यामुळे ती बाहेर यायची नाही. मात्र नवरा मेलेला असताना सुद्धा ती बाहेर येत नाही. त्यामुळे पूर्ण कावाखाना काकूविषयी चर्चा करतो. काकू नवऱ्याला शेवटची आंघोळ घालायलाही येत नाही. कदाचित तिला तात्याच्या सहवासातून एकदाची सुटले असे वाटले असावे.

दयाचा मेलेल्या माणसाला पाणी पाजण्याचा पहिलाच प्रसंग होता. पूर्वी महार लोक प्रेतं पुरत असत. पण नंतरच्या काळात लोक प्रेतं जाळू लागली. शेवटी सरणावरही पाणी पाजलं जायचं हे सर्व करताना 'खासेला चकरा का मारायच्या', मडकं फोडताना बोंब का मारायची याचा अर्थ दयाला कळत नव्हता. सर्व विधी झाले. सर्वजण तळाखाली हातपाय धुतात आणि हॉटेलमध्ये जाऊन चहा पिऊन विडीपान घेत असत. ही प्रथाच होती. त्या दिवशी घरी चूल पेटत नसे. नातेवाईक भाजी भाकरी घेऊन येत असत. यावेळी तेराव्या दिवशी दया डोक्यावरचे केस काढण्याचे कटाक्षानं टाळतो. कारण त्याला काही गोष्टी पटत नसतात. वडील वारले तेव्हा घरच्यांच्या अग्रहाखातर घासाला शिवतो. माणूस मेल्यावर एका ताटाखाली पीठ पसरून ठेवले जात असे आणि तेराव्या दिवशी पाहिलं जाई. त्या पीठावर जी नक्षी येईल त्याच्या पोटी मेलेल्या माणसाने जन्म घेतला असे म्हातारी माणसं सांगत असत. पण या सर्व गोष्टी दयाला हास्यास्पद वाटत असतं.

तात्या मरून गेला पण दयासमोर एक वाट ठेवून गेला. त्या वाटेवरून जाताना दयाला खूपदा हेलकावे खावे लागले. एखाद्या महाकाय अजगरानं गिळावं असं दयाला झालं होतं. रोमँन्टिक जीवन बदलून वाळवंटासारखं रखरखीत झालं होतं. कारण तात्यानं आईला व दयाला न विचारताच दयाचं लग्न ठरविलं होतं. त्यांच्या दृष्टीने आपण एक पोरक्या मुलास मदत करत आहोत अशी भावना होती. पण मला संकट निर्माण झालेले. पंचात सुपारी फोडलेली त्यामुळे आजी दयाला सांगते–

''लेका, तात्यानी दिलेलं वचन मोडू नकोस, टाकलेला थुका पुन्हा गिळायचा नसतो. आणि तुला ठरवलेली बायको किती नाटक आहे – वाण्या – बामनावाणी! चंद्राला म्हणती 'उगवू नको' आणि सूरयाला म्हणती 'मावळू नको अशी!' (पृ. २२)

कारखान्यातल्या बायाही दुजोरा देत होत्या. दोन्ही घराण्यांचा भाऊपणा खूपच दाट होता. पण यात दयाचा बकरा होत होता. मुलीला न पहाताच आपण कसं लग्न करायचं. त्यात मुलगी खेड्यात राहणारी आणि अंगठा उठवणारी. जरी गोरीपान असली तरी लग्न करू नये असं वाटायचं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यासारखं खूप शिकावं अशी ऊर्मी दाटून येत होती. लग्नानं आयुष्याचं खोबरं होणार होतं. पण आईला मनातून आनंद झालेला. नातवंड पहाण्यासाठी तिचे डोळे आसुसलेले होते.

मुलीचं गाव संगमनेरपासून पाच सहा मैलांवर होतं. दर शनिवारी संगमनेरला आठवड्याचा बाजार भरायचा. शाळेच्या मधल्या वेळेत बोर्डिंगमधील मुलं बाजारातून फिरायची. एक दिवशी दयाला त्याचे नातेवाईक होणाऱ्या पत्नीला लांबूनच दाखवितात. तिला पाहताच तो चांगलाच उडतो. तिच्या आईबरोबर ती बसली होती. उन्हामुळे तिचे गाल लाल झाले होते. तिनं चिटाचा परकर आणि चिटाचाच पोलका घातलेला. त्यामुळे ती देखणी दिसत होती. घाऱ्या डोळ्यांची, कट्यारी धारदार नाकाची व शेलाट्या अंगाची असणारी ही मुलगी दहा ते बारा वर्षाची असेल. तिला आपल्या वर्गातील मुलींचा पेहराव घातला तर हिच्या पुढं पासंगालाही कुणी उभ्या राहू शकणार नाहीत असे दयाला क्षणभर वाटून गेले. त्यावेळी बोलणं शक्य नव्हतं. दया बोर्डिंगात परत येतो. तेव्हा त्याच्या लक्षात येतं की, आपल्या मनाला पंख फुटलेत. मनाला हुरहुर लागली

आहे. ती शाळेत जरी गेली नसली तरी लग्न तिच्याशीच करायचं. तिला लिहिता वाचता येत नाही या गोष्टी आता त्याला फालतू वाटू लागल्या. तिच्या हुरहुरीमुळे आता दया शनिवार उगवायची वाट पाहू लागला.

दया तिचं नाव मनातून सई असं ठेवतो. एकवेळ देवगडच्या यात्रेत तिचं जवळून दर्शन होतं. ही यात्रा चैत्र महिन्यात भरते. संगमनेरपासून दोन तीन मैलांवर देवगड होतं. खंडोबाची जागती ज्योत देवस्थान म्हणून प्रसिद्ध होते. महारांच हे परंपरेने चालत आलेले देवस्थान, तो यांचा रक्षणकर्ता असे मानले जात असे. प्रत्येकाच्या घरात कोंबडं किंवा बकरं असायचं, मुंबईवरून आलेले मावस चुलते बोकड कापीत. यात्रेतील देवदर्शनापेक्षा तमाशा आणि बरबाट याचं दयाला आकर्षण वाटायचं. सईला अशी यात्रेत टोपपदरी भडक लुगड्यात पहातो. ती या प्रसंगी लाजते. तिला मुली चिडवायच्या– ''हा बघ तुझा नवरा'' ती हे ऐकूण पळून जायची. यावेळी बोलण्याचं धाडस होत नसे. कारण तसा रिवाजच नव्हता. एखादं लग्न झालेला नवीन नवरोबा बायकोला कडेवर घेऊन गडाच्या पायऱ्या चढताना दिसायचा. हे पाहून दयालाही हा क्षण आपल्या वाट्याला कधी येईल असं वाटत होते. एकदा दया सईच्या गावी आजीबरोबर जातो. तो तिला नजरेने शोधू लागतो. ती दिसत नाही. रात्री जेवणानंतरही ती दिसत नाही. तो बेचैन होतो. सकाळी मात्र सई कोकराशी खेळताना दिसते. दयाला पाहून ती घरात पळून जाते. यावेळी त्याला 'शकुंतला' चित्रपट आठवतो. सईच्या घरात वडिलांसह चार-पाच भावांचं एकत्र कुटुंब, घरी भरपूर मेंढ्या, या मेंढ्या शेतात बसवायच्या. लोकरीतून उत्पन्न मिळायचं, जो तो वेगवेगळ्या उत्पन्नावर हात मारायचा. मात्र सईचा बाप दिसायला वेगळा होता. काळा डांबरासारखा पण अंगानं मजबूत तो पी.डब्ल्यू.डी. मध्ये मुकादम म्हणून काम करायचा. सई इतकी गोरी कशी झाली हा प्रश्न दयाला पडतो. तेव्हा तिच्या आईकडे पाहिल्यावर त्या प्रश्नाचं उत्तर मिळतं. आई गोरी होती म्हणून सई गोरी झालेली. मात्र तिचे निळसर डोळे हे वेगळं व्यक्तिमत्त्व होतं. आपला नातू गोकुळात पडला म्हणून दयाची आजी आनंदी होती.

या सगळ्या गोष्टीचा परिणाम म्हणजे दया एस.एस.सी. परीक्षेत नापास होतो. तो हमसून हमसून रडू लागतो. आई, मामा त्याला धीर देतात. समजावतात. आपण नापास कसे झालो? हा प्रश्न त्याला पडतो. मार्कशीट हातात पडल्यावर नापास होण्याचं कारण समजलं. इंग्रजी विषयात २८ मार्क असतात. इंग्रजी पास झाला असता तर दयाला फर्स्ट क्लास ठरलेला होता. इंग्रजी विषयाचा दयाने आठवीपासून धसका घेतला होता. दयाला इंग्रजी फारसं बोलता येत नाही. किंवा लिहिताही येत नाही. श्रीमंताच्या मुलांसारखं दयाला शिकवणी लावणं शक्य नाही.

नापास झाल्यामुळे दयाच्या आयुष्यातील उभारी संपते. पुढे आपण शिकू असं त्याला वाटत नाही. मनाची घुसमट वाढत जाते. नापास झाल्याने पुन्हा बोर्डिंगात रहाता येत नव्हते. तो संस्थापकांच्या हातापाया पडतो. पण ते नाही म्हणतात. बाहेर रहायची अडचण होती. कारण पैसे नसतात. स्वत:चं आयुष्य पाल्यापाचोळ्यासारखं उडून जाणार असं वाटू लागलं. दया बाहेर गेला तर त्याची आईही जाणार हा विचार संचालकांनी केला आणि स्पेशल केस म्हणून त्याला बोर्डिंगमध्ये राहण्याची परवानगी दिली. कारण दयाची आई जेवण विभागात कामाला असते. नापास झाल्यामुळे इतर मुलं त्याची कुचेष्टा करायचे. थोड्याशा

अन्नासाठी आपण किती लाचार झालोय याबद्दल त्याला राग यायचा. तो मुलांच्या नजरा चुकवित असे. बोर्डिंगजवळ एक कोंबड्यांच खुराडं होतं. तेथे तो अभ्यास करू लागतो. सईचा विचार करणं सोडून देतो. पूर्ण पुस्तक पाठ करतो. परिणामी त्याला ऑक्टोबरच्या परीक्षेत इंग्रजीत ६० मार्क मिळतात. यामुळे त्याचे इंग्रजी सुधारले असे नाही तर पाठांतराचा फायदा झाला. आपल्याला एवढे मार्क पडतील असे त्याला स्वप्नात सुद्धा वाटलं नव्हते.

एकूणच दया पवार यांनी 'संगमनेरचे दिवस' यातून आठवणींच्या माध्यमातून आयुष्यातील एक महत्त्वाचा आणि मोठा प्रसंग चित्रीत केला आहे. तो प्रसंग आयुष्य घडवूही शकतो आणि बिघडवूही शकतो. पण दयाने येथे सकारात्मक विचार केला. सईचा विचार बाजूला ठेवला आणि आपले जे ध्येय आहे ते तो साकारण्यास सरसावतो. यात तो यशस्वी होतो. अनावधानाने जर आपल्याला आयुष्यात अपयश आले तर मनातून खचून न जाता जोमाने प्रयत्न केल्यास यश हे नक्कीच मिळते हे या पाठातून सिद्ध होते. मनातील ध्येय गाठण्यासाठी कष्ट करण्याची मनाची तयारी असावी लागते. स्वत:कडे आत्मविश्वास असावा लागतो. तरच आपण आयुष्यात यशस्वी होऊ शकतो. हा संदेश लेखक या पाठातून देताना दिसतात.

## ५.५ **समारोप** (Summary)

'संगमनेरचे दिवस' या पाठातून दया पवार यांनी स्वत:च्या आयुष्यात घडलेल्या काही प्रसंगांची माहिती दिली आहे. शिक्षण घेत असताना तो संगमनेर मधील बोर्डिंगमध्ये रहात असतो. तेथे वेगवेगळ्या स्पर्धेत भाग घेतो. प्रसंगी शिक्षकांशी चर्चा करतो. भांडतो (वैचारिक पातळीवर) कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव त्याच्यावर पडला आहे. आपणही त्यांच्यासारखे ज्ञानी व्हावे ही त्याची महत्त्वाकांक्षा असते. तात्याच्या निधनानं त्याला वेगळीच कलाटणी मिळते. तात्यानं दयाचं लग्न ठरलिल्यानं तो चिडतो. पण नंतर तो सईच्या विचारात गुरफटून जातो. याचा परिणाम असा होतो की, तो १० वीत नापास होतो. त्याने पाहिलेले स्वप्न भंग पावते. पुन्हा आपल्याला वसतिगृहात राहता येणार नाही या विचाराने तो खचतो. पण आईच्या कामामुळे तो पुन्हा बोर्डिंगात राहतो. तो सावरतो व पुन्हा अभ्यास करून १० वीत इंग्रजी विषयात ६० गुण मिळवून पास होतो. यावेळी मात्र तो सईचा विचार करत नाही आणि ध्येयाचा पाठलाग करीत राहातो.

या पाठाच्या अनुषंगाने दया पवार आपल्या आयुष्यात असे अनेक चांगले-वाईट प्रसंग येतात, या प्रसंगातून आपण विचार करून सावरू शकतो हे सांगत असताना स्वत:वरचा आत्मविश्वास महत्त्वाचा असल्याचं सांगतात. कोणतीही गोष्ट साध्य होत नाही असे नाही ती साध्य करणे आपल्यावर अवलंबून असते. ध्येयाने झपाटून जाऊन जर आपण प्रयत्न केले तर कोणतीही गोष्ट सहज साध्य होऊ शकते हे येथे दिसते. स्वत:वरचा विश्वास कोणत्याही परिस्थितीत खचू द्यायचा नाही असे केल्यास स्वत:स सावरून आपण यश संपादन करू शकतो हा संदेश या पाठातून मिळतो.

### ५.६ वाचणीय उतारा :

तिचं गाव संगमनेरपासून पाच-सहा मैलांवर, संगमनेरला शनिवारी आठवड्याचा बाजार भरायचा. आमच्या शाळेला दुपारी सुट्टी असायची. त्यावेळी बाजारात फिरणं हा आमचा बोर्डिंगच्या मुलांचा छंद. एकदा असाच बाजाराच्या गर्दीतून फिरत असताना एका नातेवाईकानं तिच्याबद्दल सांगितलं. तिला दुरुनच दाखवलं. लाह्या फुटाव्यात तसं रणरणतं उन होतं. त्या उन्हाचं चांदणं झालं असं काही मी म्हणणार नाही. पण तिला पाहताच चांगलाच उडालो होतो. आजूबाजूच्या गावची मंडळी आपल्या शेतातील माल विकायला घेऊन यायची. पंगत बसावी, तसे ते बाजारात दाटीवाटीनं बसत. तिच्याही पुढ्यात पाटी असते. आपल्या आईबरोबर ती आलेली असते. ती गिऱ्हाईकांना माल तागडीनं तोलून देत असते. तिच्या आईवडिलांचा छोटासा मळा आहे, हे मला कळलेलं असतं. मी दुरुनच तिच्याकडे एकटक पाहत असतो. रणरणत्या उन्हामुळं तिचे गाल लाल झालेले असतात. तिनं चिटाचा परकर आणि चिटाचाच पोलका घातलेला. अस्ताव्यस्त केस कपाळावर येत असतात. ती खूपच देखणी असते. तिचे निळसर घारे डोळे, नाकाचे कट्यारीसारखे धारदार वळण आणि गुलाबी रंग हे सारं सारं पाहून मी जागीच थिजून गेलेलो असतो. तिचं वय बहुधा दहा-बारा वर्षाचं असावं. ती शेलाट्या अंगकाठीची असते. संगमनेरच्या बाजारात भाजीपाला विकण्यास ही कुणी अस्मानीची परी तर आली नाही ना, अशी शंका चाटून जाते. मनात विचार येतो, आपल्या वर्गातील मुलींसारखा हिला पेहराव घातला, तर हिच्यापुढं कुणी पासंगालाही उभ्या राहू शकणार नाहीत.

जवळ जाऊन बोलणं शक्यच नसतं. मी बोर्डिंगवर परततो तेव्हा लक्षात येतं. आपल्या मनाला पंख फुटले आहेत. मनात विलक्षण, टोकाची हुरहुर दाटून येते आहे. ती केव्हाच शाळेत गेली नाही, तिला लिहिता वाचता येत नाही. हे प्रश्न फालतू वाटू लागतात. लग्न करायचं तर ह्याच मुलीशी, हा ध्यास मनाला लागतो. शनिवार उगविण्याची वाट पाहू लागतो. तिला दूर उभं राहून पाहणं हा मात्र मनाला चाळाच लागला. तिला मात्र याची जाणीव शेवटपर्यंत झाली नाही.

मी तिचं मनोमनीच सई ठेवलेलं नाव तसं गावठी होतं. पण तिला ते शोभून दिसत होतं. पुढं एकदा देवगडच्या यात्रेत तिचं जवळून दर्शन झालं. देवगडच्या यात्रेला रस्ता जायचा तो बोर्डिंगवरूनच, बहुधा चैत्र महिन्यात ही यात्रा भरायची. मुंबईहून मावसचुलते आपल्या कुटुंबासमवेत ह्या यात्रेला जायचे. संगमनेरपासूनच दोन तीन मैलावर हे देवगड, तिथलं खंडोबाचं जागती ज्योत देवस्थान प्रसिद्ध, महार मंडळींचं पिढ्यान पिढ्या चालत आलेलं हे दैवत, त्या जत्रेला नातेवाईक नियमितपणे येत. तोच आपला रक्षणकर्ता, ही समजूत त्यांच्यात खोलवर रुजलेली. प्रत्येक घरटी कोंबडं किंवा बकरं पडे. मावस चुलते हमखास बोकड कापीत. देवदर्शनापेक्षा जत्रेतला तमाशा, हंगाम आणि बरबाटं ह्यांचंच मला आकर्षण वाटायचं. (पृ. २३-२४)

### ५.७ शब्दार्थ :

संस्कृती : रूढी परंपरेनुसार चालत आलेल्या गोष्टी

राष्ट्रदोह : देशविरोधी कारवाया किंवा देशाविषयी तिरस्कार, द्वेष

पायतान : चामड्यापासून बनविलेल्या चपला.

सिरियस : गंभीर

स्पिरिट : दारू (अल्कोहोल)

नादाळी : देवीच्या नावाने गळ्यात घातलेली माळ, दर्शनीमाळ.

धडकी भरणे : घाबरून जाणे.

कावाखाना : महार समाजाच्या वस्तीचा परिसर

खासेला : सरणावर प्रेत ठेवून लाकडं रचल्यावर गोल फेऱ्या मारणे.

महाकाय : खूप मोठा

रोमँन्टिक : आनंदी, सुखी, स्वच्छंदी

मैल : अंतर मोजण्याची जुनी पद्धत

मुकादम : प्रमुख

घुसमट : गुदमरणे, कोंडल्यासारखे होणे.

खुराडं : कोंबड्या ठेवण्याची जागा.

कट्यार : एक टोकदार हत्यार.

पासंगाला : बरोबरीला

बरबाटं : मटणाचा घट्‌शार रसा.

## ५.८ स्वाध्याय :

### अ) योग्य पर्याय निवडा.

१. दया पवार हे कोणत्या प्रकारचे लेखन करणारे लेखक आहेत?

अ) आदिवासी ब) ग्रामीण क) दलित ड) नागरी

२. दया पवारांचा जन्म कोणत्या गावी झाला?

अ) धामणगाव ब) धामणी क) धारवाड ड) अहमदनगर

३. दया पवारांच्या कोणत्या पुस्तकास महाराष्ट्र सरकारचा उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचा पुरस्कार मिळाला?

अ) पासंग ब) धम्मद क) कोंडवाडा ड) बलुतं

४. दया पवारांना कोणता पुरस्कार मिळला?

अ) भारतरत्न ब) पद्मश्री क) पद्मभूषण ड) डी.लिट

५. 'संगमनेरचे दिवस' हा पाठ कोणत्या पुस्तकातून घेतला आहे ?

अ) बलुतं ब) जागल्या क) विटाळ ड) चावडी

६. दया पवारांच्या विचारांवर कोणाचा प्रभाव होता?

अ) महात्मा फुले ब) छ. शाहू महाराज क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर ड) महात्मा गांधी

७. दया पवारांचे लग्न परस्पर कोणी ठरविले होते?

अ) बाबांनी ब) तात्यांनी क) मामानी ड) काकांनी

८. दया पवारांचे मूळ नाव काय आहे?

अ) कोंडीबा ब) विठोबा क) दगडू ड) धोंडू

९. दया पवारांनी होणाऱ्या पत्नीचे नाव मनातल्या मनात काय ठेवले?

अ) सई ब) राई क) जाई ड) जुई

१०. दया पवार १० वीत कशामुळे नापास होतात?

अ) घर बांधल्यामुळे ब) आजारी पडल्यामुळे
क) लग्न ठरल्यामुळे ड) परीक्षा चुकल्यामुळे

११. संगमनेरला आठवड्याचा बाजार कोणत्या दिवशी भरत असे?

अ) सोमवार ब) मंगळवार क) शुक्रवार ड) शनिवार

१२. दहावीत असताना दया पवार कोणत्या विषयात नापास झाले?

अ) गणित ब) इंग्रजी क) संस्कृत ड) विज्ञान

१३. मुलांची कुचेष्टा टाळण्यासाठी दया पवार अभ्यासासाठी कोठे बसत असत?

अ) गोठ्यात ब) खुराड्यात क) घरात ड) झोपडीत

१४. देवगडची यात्रा कोणत्या महिन्यात भरायची?

अ) भाद्रपद ब) श्रावण क) चैत्र ड) कार्तिक

१५. देवगडला कोणत्या देवाची यात्रा भरायची?

अ) नागनाथाची ब) बिरोबाची क) खंडोबाची ड) जोतीबाची

१६. सईने बाजारात कोणता परकर व पोलकं घातलं होतं?

अ) चिटाचा ब) फुलाचं क) नीच ड) चौकोनाचं.

१८. सईच वय किती वर्ष होत?

अ) आठ-दहा ब) दहा-बारा क) बारा-चौदा ड) चौदा सोळा

**उत्तर :**

१. क) दलित, २. अ) धामणगाव, ३. ड) बलुतं, ४. ब) पद्मश्री, ५. अ) बलुतं

६. क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ७. ब) तात्यानी, ८. क) दगडू, ९. अ) सई

१०. क) लग्न ठरल्यामुळे, ११. ड) शनिवार, १२. ब) इंग्रजी, १३. ब) खुराड्यात

१४. क) चैत्र, १५. क) खंडोबाची, १६. अ) चिटाचा, १७. ब) दहा-बारा

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) 'संगमनेरचे दिवस' या लेखातून दया पवार यांना आलेले अनुभव तुमच्या शब्दात लिहा.

२) आपण नापास का झालो हे सांगताना दया पवार कशा पद्धतीने अभिव्यक्त होतात ते 'संगमनेरचे दिवस' या पाठाच्या आधारे लिहा.

३) दया पवार होणाऱ्या पत्नीचे वर्णन कशा पद्धतीने करतात ते सोदाहरण लिहा.

४) बोर्डिंगमध्ये आलेले अनुभव दया पवार कशाप्रकारे चित्रीत करतात?

५) 'संगमनेरचे दिवस' या पाठातून दया पवार यांना काय सांगायचे आहे ते सोदाहरण लिहा.

## ५.९ संदर्भ ग्रंथ :

१) शब्दसंहिता - संपादक, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

२) बलुतं - दया पवार.

३) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ वा - १९५० ते २००० (भाग १, २ व ४), महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

# ६. संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष : डॉ. बापूजी साळुंखे

**– प्रा. बळवंत देशमुख**

## ५.१ उद्दिष्ट्ये (Objectives) :

'संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष – डॉ. बापूजी साळुंखे' हा पाठ अभ्यासल्यानंतर आपणास.

१. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याची ओळख होईल.

२. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी कोणाच्या प्रेरणेतून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करण्याचे ठरविले हे समजेल.

३. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे कोणाच्या आचार–विचारांचे आचरण करीत असत हे समजेल.

४. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना ज्ञानसूर्य बापूजी असे का म्हटले आहे हे समजून घेता येईल.

५. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांची माहिती होईल.

## ६.२ प्रास्ताविक (Introduction) :

संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष : डॉ. बापूजी साळुंखे हा पाठ प्राचार्य सुरेश पाटील व प्रा. तुकाराम पाटील यांनी संपादित केलेल्या 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे' या पुस्तकातून घेतला आहे व तो प्रा. बळवंत देशमुख यांनी लिहिला आहे. हा पाठ व्यक्तिविशेषपर असून शैक्षणिक क्षेत्रात बापूजींनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकणारा आहे. या पाठातून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्वत:चे संपूर्ण आयुष्य तळागाळातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे या ध्येयाने झपाटून जाऊन महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचेच कार्य पुढे चालू ठेवताना दिसतात. जातीव्यवस्थेच्या पलिकडे जाऊन सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे असा विचार डॉ. बापूजी साळुंखे यांनी मांडला. शिक्षण क्षेत्रात क्रांती घडविण्यासाठी ते अहोरात्र झटले. स्वत:च्या वैयक्तिक विकासाचा विचार न करता स्वत: जवळचे २१००/– रुपये देऊन निस्वार्थीपणे त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज लाखो विद्यार्थी या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण घेताना दिसतात. बापूजींनी जो संकल्प केला तो या माध्यमातून आज सिद्धीस गेलेला दिसतो. बापूजींच्या माध्यमातून मानवी जीवनाचे सार त्यांनी लिहिलेल्या संस्थेच्या प्रार्थनेतून मांडलेले आहे. आपण स्वत:साठी न जगता इतरांसाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करून जीवन जगले पाहिजे हा मंत्र डॉ. बापूजी साळुंखे यांनी समाजाला दिला आहे. या पाठाच्या अनुषंगाने डॉ. बापूजी साळुंखे यांची जडण–घडण, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना, शिक्षणसंस्था काढण्यामागील वैचारिक भूमिका, त्यांच्या प्रेरणा, त्यासाठी केलेला त्याग, परिश्रम आदींच्या माध्यमातून बापूजी साळुंखे यांचे ध्येयवादी व्यक्तिमत्त्व, शैक्षणिक व सामाजिक योगदान यांचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखकाने या पाठातून केला आहे.

## ६.३ लेखक परिचय :

प्रा. बळवंत देशमुख हे मराठी विषयाचे व्यासंगी अभ्यासक, समीक्षक व लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज येथे त्यांनी अनेक वर्षे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या सहवासात आल्यानंतर बापूजींनी बळवंत देशमुख यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या उस्मानाबाद येथे सुरू केलेल्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यभार सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. 'मराठी लावणी वाङ्मय' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे.

## ६.४ विषय विवेचन (Presentation of Subject matter) :

मराठी वाङ्मयात ललित लेखन या सदराखाली अनेक छोट्या मोठ्या विषयांवर लेखन झालेले आहे. निबंध, लघुनिबंध, याबरोबरच व्यक्तिपरलेखाच्या अनुषंगानेही लेखन झालेले दिसते. अनेक लेखकांनी वेगवेगळ्या व्यक्ती जशा अनुभवल्या तशा कागदावर उतरविल्या आणि त्यातूनच व्यक्तीवर्णनपर लेख लिहिलेली पुस्तके निर्माण झाली. जसे की, विद्याधर पुंडलिक - आवडलेली माणसे, रामदास भटकळ - बिंब-प्रतिबिंब व कुलकर्णीसर, सुनिता देशपांडे - सोयरे सकल, वीणा देव - आशफ मस्त फकीर, आनंद अंतस्कर - रत्नकीळ इत्यादी लेखकांची उदाहरणे देता येतात. याच पद्धतीने प्राचार्य सुरेश पाटील, प्रा. तुकाराम पाटील यांनी प्राचार्य डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारा संपादित ग्रंथ प्रकाशित केला. या पुस्तकात प्रा. बळवंत देशमुख यांनी 'संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष : डॉ. बापूजी साळुंखे' या शीर्षकाखाली बापूजींचे व्यक्तिवर्णन केले आहे. शिक्षण क्षेत्रात बापूजींनी दैदिप्यमान असे कार्य केले आहे. या कार्याची तुलना लेखकाने महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या प्रतीकांनी केलेली आहे.

महाराष्ट्र हा कणखर आहे. त्याच बरोबर येथील माणसांची मने ध्येयवादी आहेत. एखाद्या ध्येयाने ती झपाटली की, पेटून उठतात. सर्वव्यापी तिलांजली देण्याची तयारी करतात. म्हणून महाराष्ट्रातील श्रेष्ठ पुरुषांच्या जीवनाचा इतिहास म्हणजे एका एका वादळाचा इतिहास म्हटले जाते. असेच एक वादळ निर्माण झाले ते म्हणजे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे. समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण मिळाले पाहिजे असे स्वप्न त्यांनी पाहिले. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले म्हणूनच त्यांना 'संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष' असे म्हटले गेले. त्यांची गणना महापुरुषात केली गेली. आजच्या तरूण पिढीला बापूजी साळुंखे यांचे जीवन आणि कार्य एक आदर्श ठेवा म्हणून ठेवण्यासारखेच आहे.

बापूजी यांचा जन्म पाटण जवळील 'रामपूर' या छोट्याशा खेडेगावात इ.स. ९ जून १९१९ रोजी झाला. यांचे मूळ नाव गोविंद असे आहे. पण त्यांच्या कार्यामुळे लोकांनी त्यांचे बापूजी असे नामकरण केले. गोविंदा पासून ते बापूजी पर्यंतचा त्यांचा जीवनप्रवास म्हणजे त्यांनी घेतलेली एक झेप आहे. आई-वडील यांचे छत्र लहानपणी हरवले. लहान वयातच पोरकेपणाचे चटके सोसत सोसत बापूजींनी स्वत:ला सिद्ध केले. सातारा जिल्ह्याच्या मातीत आणि कृष्णा कोयना नदीच्या पाण्यामध्ये प्रचंड शक्ती आहे. या शक्तीने महाराष्ट्राला तेजस्वी आणि प्रकाशमान अशी अनेक हिरे माणके दिली. त्यापैकी कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बापूजी

साळुंखे हे दोन महापुरुष आहेत. या दोन शिक्षणमहर्षींची तपोभूमी व स्फूर्तिभूमी ही साताराच आहे. या दोघांनी शेकडो विद्यामंदिरे उभी केली आहेत. मातीत पाय घट्ट रोऊन उंच आकाशात झेप कशी घ्यावी हे या परिसराने यांना शिकविले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सानिध्यात बापूजींनी शिक्षणाचे धडे गिरविले. इ.स. १९४५ ते १९५५ या काळात बापूजींनी कर्मवीर आण्णांच्या सोबत रयत शिक्षण संस्थेत काम केले. नंतरच्या काळात इ.स. १९५५ साली रयत शिक्षण संस्था सोडली. कारण त्यांना नवीन काहीतरी निर्माण करायचे होते. तेथून ते तासगांव येथे आले. तेथे त्यांनी प्राचार्य भगवानराव बाबर यांच्या मळ्यात विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. रामानंद स्वामी यांनी या संस्थेचे 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' असे नामकरण केले. येथूनच बापूजींच्या शैक्षणिक कार्याचा शुभारंभ झाला.

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या विचारधनावर महाराष्ट्रात शिक्षण व्यवस्था जोपासलेली दिसते. महात्मा फुले यांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व मानवता या तत्त्वांचा उद्‌गाता, नवविचारांचा प्रणेता म्हणतात. दलितांना व सामान्यांना ह्रदयाशी कवटाळून शिक्षण देणारा समाज सुधारक म्हणजे महात्मा फुले होय. डॉ. बापूजी साळुंखे यांनी महात्मा फुलेंना आपल्या पहिल्या गुरुस्थानी मानले. दुसरे गुरुस्थान राजर्षी शाहू महाराजांना दिले. जाती-पातीच्या रूढी परंपरा मोडून काढून विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून शाहू महाराजांनी कार्य केले. म्हणूनच त्याकाळी शिक्षणाची अन्नछत्रे महाराजांनी सुरू केली. पुढील काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित शोषित समाजाला शिक्षणाची नवसंजीवनी दिली. माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. या महान त्रयींच्या विचारांचा पगडा बापूजींच्यावर होता.

बापूजींचे शिक्षण कोल्हापूरात झाल्याने कोल्हापूरशी त्यांची नाळ जुळली होती. शाहू महाराजांच्या नगरीत शिक्षणकार्याची मुहूर्तमेढ रोवण्याचा निश्चय करून बापूजींनी स्वत:जवळचे श्रमाचे-घामाचे २१००/- रुपये घालून श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली. संस्थेचा कार्यभार हळूहळू वाढू लागला. अनेक भागात हायस्कूल निघाली, आश्रमशाळा, वसतिगृहे निघाली. बघता बघता अल्प कालावधीतच लोकाश्रयाच्या मदतीने संस्थेच्या कार्याचा विस्तार वटवृक्षासारखा वाढला. यातून उच्च शिक्षण देण्याचा विचार बापूजींच्या डोक्यात घोळू लागला. कोल्हापूरमध्ये राजर्षी शाहू महाराज व ताराराणी यांनी समतेचा झेंडा उंच उभारून माणसातच नव्हे तर मातीच्या कणाकणात शौर्य फुंकले. या करवीर नगरीत बापूजींनी नव्या जोमाने कोल्हापूरचे ज्ञानपूर निर्माण करण्याचा ध्यास घेतला. हे सर्व करताना प्रत्येकवेळी बापूजींना लोकांचे सहकार्य मिळाले असे नाही तर काही ठिकाणी विरोधही पत्करावा लागला. त्या विरोधाची तमा न बाळगता, न थकता बापूजी कार्य करीत राहिले. माध्यमिक शाळेबरोबरच त्यांनी महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला. अल्पावधीतच मराठवाड्याने बापूजींना हाक दिली. या हाकेला होकार देत उस्मानाबाद येथे रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाची स्थापना केली.

शेतकरी, कष्टकरी दलितांच्या पोरांना शिक्षणाच्या माध्यमातून बोलते केले. मातीच्या पुत्रांना सरस्वती पुत्र करण्याचा ध्यास घेतला. विविध क्षेत्रात त्यांना स्वत:च्या पायावर उभे केले. शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्रात डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख व डॉ. बापूजी साळुंखे यांच्या कार्याला तोड नाही. या तिघांच्या शिक्षणक्रांतीने बहुजनांच्या मनामध्ये स्वाभिमान व आत्मविश्वास निर्माण होऊन नवचैतन्याचे वारे वाहू लागले. मागील पन्नास वर्षाचा काळ हा शिक्षणाचा सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. शिक्षण प्रसार हे एक व्रत म्हणून बापूजींनी स्वीकारले. माणसाकडे केवळ ज्ञान, विज्ञान असून समृध्दी होणार नाही त्या बरोबरच त्याच्यावर सुसंस्काराची गरज आहे. तरच आपणास आनंदी जीवन जगता येते हे बापूजींनी ओळखले. म्हणूनच 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' असे संस्थेचे ब्रीद वाक्य निवडले. या ब्रीद वाक्यानुसार बापूजींनी आपले कार्य चालू ठेवले. रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचे आचार-विचार बापूजी आचरणात आणत असत. त्यांनी निस्वार्थीपणे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत शेकडो प्राथमिक, माध्यमिक, ज्युनिअर व सिनिअर महाविद्यालये, वसतिगृहे, डी.एड्. बी.एड्. महाविद्यालये सुरू केली. हे सर्व लोकाश्रयामुळेच बापूजींना शक्य झाले. खेडोपाड्यात संस्कार केंद्रे उभी करून ज्ञानदानाचे कार्य केले. बापूजींना लोकाश्रय असल्याने ते नेहमी लोकांना म्हणत असत की, ''जनता जनार्दन तुम्हा आळवी, द्या आम्हा जळण्याची संधी'' (पृ. २८) स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने बापूजींनी संस्कार केंद्रे सुरू करून सुसंस्कारी व विज्ञानशील माणूस घडविला आहे. इतकेच नव्हे तर गावकऱ्यांच्या मदतीने शिक्षकच (गुरुदेव कार्यकर्ते) त्या संस्कार केंद्राचे स्थानिक व्यवस्थापन पहातील अशी व्यवस्था करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले.

शिक्षणाचे हे कार्य करताना बापूजींना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. ते या संकटांना कधीही डगमगले नाहीत. कारण ते एक सच्चे लढवय्ये स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांच्या या अद्वितीय कार्यामुळेच लोक त्यांना शिक्षणमहर्षी म्हणून संबोधू लागले. बापूजींनी शेवटच्या श्वासापर्यंत शिक्षणाचा ध्यास घेतला. बापूजींचे संस्कृत भाषेवर प्रभूत्व होते. त्यामुळे त्यांची आध्यात्मिक बैठक चांगली होती. मानवी जीवनाचे सार सांगताना त्यांनी कांही तत्त्वे अंगी बानवली व ती संस्थेच्या प्रार्थनेतून मांडली. राम कृष्ण, रहिम, ख्रिस्त, बुद्ध, महावीर आदी संतांना मानवतेचे दीपस्तंभ म्हटले आहे. सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणूकीस आळा ही मूल्ये सर्वांनी आचरणात आणावीत. माणसांनी गुण्यागोविंदाने एकत्र राहून नम्रपणे एकमेकांना वंदन केले पाहिजे अशी त्यांची विचारधारणा होती. यामुळे मानवाच्या जीवनाला अधिष्ठान प्राप्त होईल. जाती-भेदाच्या पलिकडे जाऊन बापूजींनी शिक्षण क्षेत्रात कार्य केले. म्हणूनच त्यांना महाराष्ट्र शासनाने 'दलित मित्र' हा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. इतकेच नव्हे तर शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट. ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी देवून त्यांच्या कार्याचा गौरव केला. असे हे ज्ञानतपस्वी, ज्ञानसूर्य डॉ. बापूजी साळुंखे ८ ऑगस्ट १९८७ रोजी या इहलोकातून अनंतात विलीन झाले. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या शिक्षण परंपरेतील एक दुवा निखळला. बापूजी जरी अनंतात विलीन झाले असले तरी त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याने ते अजरामर झाले आहेत. त्यांच्या या कार्यातून त्यानी जो संकल्प केला होता तो सिद्धीस गेलेला दिसून येतो.

## ६.५ **समारोप** (Summary) :

'संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष : डॉ. बापूजी साळुंखे हा पाठ प्राचार्य सुरेश पाटील व प्रा. तुकाराम पाटील यांनी संपादित केलेल्या शिक्षमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे या ग्रंथातून घेतलेला आहे. या पाठाच्या अनुषंगाने लेखक प्रा. बळवंत देशमुख यांनी व्यक्तिविशेषपर लेखातून डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावर व त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला आहे. सुरूवातीच्या काळात डॉ. बापूजी साळुंखे यांनी रयत शिक्षण संस्थेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांचे समवेत शिक्षणाचे धडे गिरविले. पण नंतर त्यांना त्यात समाधान मिळेणा म्हणून व नवनिर्मितीच्या अनुषंगाने रयत मधून त्यांनी राजीनामा दिला व इ.स. १९५५ मध्ये श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. तळागाळातील, दलित, शोषित समाजातील लोकांच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे हा त्यांचा ध्यास होता. म्हणूनच त्यांनी गावोगावी जाऊन खेड्यापाड्यातील स्थानिक लोकांना भेटून माध्यमिक शाळा, वसतिगृहे, आश्रमशाळा, ज्युनिअर कॉलेज, डी.एड., बी.एड् महाविद्यालये व सिनिअर महाविद्यालये सुरू केली. कोल्हापूरचे ज्ञानपूर करण्याचा ध्यास त्यांनी घेतला, तो एक संकल्प केला. त्या संकल्पपूर्तीच्या अनुषंगाने त्यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन कार्यरत राहिले. अल्पावधीतच एका छोट्या रोपट्याचे आज वटवृक्षात रुपांतर झालेले दिसते. एकूणच शैक्षणिक क्षेत्रात बापूजींना मिळालेले सन्मान आणि त्यांनी केलेल्या कार्यातून त्यांनी केलेला संकल्प सिद्धीस गेलेला दिसतो. त्यांचे हे कार्य आजही गुरुदेव कार्यकर्ते निष्ठापूर्वक करताना दिसतात.

## ६.६ वाचनीय उतारा :

बापूजींचे शिक्षण कोल्हापूरात झाल्याने कोल्हापूर त्यांना जवळचे व जिव्हाळ्याचे होते. या शाहूनगरीत शिक्षण कार्याची मुहूर्तमेढ रोवण्याचा निश्चय बाजूजींनी केला. प्रथम पैशाचा प्रश्न उभा राहिला. स्वत: जवळचे श्रमाचे, घामाचे २१००/- रुपये त्यांनी घातले. संस्थेचा कल्पवृक्ष तरारू भरारू लागला. आश्रमशाळा निघत होत्या. वसतिगृहे स्थापन होत होती. दशका-दशकांनी माध्यमिक शाळांचा प्रपंच वाढत होता. बापूजींची धावपळ वाढत होती. आपल्या हातून महाविद्यालये निर्माण व्हावीत अशी तळमळ त्यांना लागली होती.

जेथे राजर्षी शाहूराजांनी समतेचा झळाळता ध्वज उंचच उंच उभा केला. ताराराणीसारखी महाराणी जिथे झाली व जिने केवळ माणसा-माणसातच नव्हे तर मातीच्या कणाकणातही शौर्य फुंकले. अशा करवीर नगरीत बापूजींनी पुऱ्या जोमाने महाराष्ट्रातील अज्ञान दूर करण्याचा व कोल्हापूरचे ज्ञानपूर निर्माण करण्याचा ध्यास घेतला. हे कार्य करताना त्यांना केवळ सहकार्यच लाभले असे नव्हे, अनेकदा विरोध पत्करावा लागला. पण बापूजी थांबले नाहीत, थकले नाहीत. अशीच एकदा त्यांना मराठवाड्याने हाक दिली. केवळ माध्यमिक शाळाच नव्हेत तर संस्थेचे पहिले महाविद्यालय बापूजींनी तेथे काढावयाचे ठरविले. व अल्पावधीत उस्मानाबाद येथे त्यांनी रामकृष्ण परमहंस महाविद्यालय सुरू केले.

एवढेच नव्हे तर माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये यांचे उपवनच त्यांनी निर्माण केले. शेतकरी कामकऱ्याच्या मुलांना, दलित-पतितांच्या पोरांना त्यांनी चालते बोलते केले. मातीच्या पुत्रांना सरस्वतीपूत्र बनविले. शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य केले. शिक्षणाच्या क्षेत्रात, निदान महाराष्ट्रात डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शिक्षणकार्याला तोड नाही. त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे बहुजन समाजातील तरुणांत नवचैतन्याचे वारे वाहू लागले. त्यांच्यात स्वाभिमान व आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे असे म्हणता येईल की, गेल्या पन्नास वर्षाचा काळ हा महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या शिक्षणाचा सुवर्णकाळ होय. अशी या काळाची इतिहासाला नोंद घ्यावी लागेल. यामुळे महाराष्ट्राच्या समाजकारण, अर्थकारण व राजकारण यात आमूलाग्र क्रांती झाली. (पृ. २७)

**६.७ शब्दार्थ :**

संकल्प - मनामध्ये निश्चय करणे.

सिद्धी - पूर्णत्वाला नेणे.

निस्वार्थी - स्वत:च्या प्रगतीचा विचार न करणारा

महापुरुष - स्वत:च्या कार्याने मोठा असलेला.

दैदिप्यमान - नजरेत भरण्यासारखे, भरणारे

कणखर - कठीण

तिलांजली - सर्व काही सोडून देण्याची वृत्ती.

छत्र - सावली.

नामकरण - नाव ठेवणे

विषमता - एकसारखे नसणे.

शिक्षणाची अन्नछत्रे - वसतिगृहे.

लोकाश्रय - गावातील लोकांची मदत व सहकार्य असणे.

शौर्य - धाडस

नवचैतन्य - आनंदाचे, प्रगतीचे

व्रत - एखादी गोष्ट पूर्ण करण्याचा मनोदय.

ज्ञान - एखाद्या विषयाची माहिती असणे.

विज्ञान - शास्त्राविषयी विशेष ज्ञान असणे.

सुसंस्कार - चांगले विचार आचरणात आणणे.

ज्ञानदान - स्वत:कडील माहिती दुसऱ्यास देणे.

स्वातंत्र्य सेनानी - स्वातंत्र्य चळवळीमध्ये सक्रिय भाग घेणारा.

दीपस्तंभ - दिशा दर्शविणारा स्तंभ.

अजरामर - कधीही मरण न पावणारा.

जिव्हाळा - ओढ असणे, आपुलकी असणे.

मुहूर्तमेढ - सुरूवात करणे.

सुवर्णकाळ - प्रगती झालेला कालखंड.

**६.८ स्वाध्याय :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा जन्म कोणत्या गावी झाला?

अ) रामपूर ब) पाटण क) सातारा ड) महाबळेश्वर

२. बळवंत देशमुख यांनी प्राचार्य म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कोणत्या संस्कार केंद्रात (महाविद्यालयात) काम पाहिले?

अ) तुळजापूर ब) उस्मानाबाद क) कोल्हापूर ड) सातारा.

३. 'संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष' : डॉ. बापूजी साळुंखे हा पाठ कोणत्या संपादित ग्रंथातून घेतला आहे?

अ) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

ब) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : व्यक्ती आणि कार्य

क) शिक्षणमहर्षी डॉ. बापूंजी साळुंखे : शोध आणि बोध

ड) ज्ञानपंढरीचा वारकरी : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

४. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे मूळ नाव काय ?

अ) गोपाळ ब) गणेश क) गोविंद ड) गणपती

५. डॉ. बापूजी साळुंखे यांनी रयत शिक्षण संस्था केव्हा सोडली?

अ) इ.स. १९५४ ब) इ.स. १९५५ क) इ.स. १९५६ ड) इ.स. १९५३

६. डॉ. बापूजी साळुंखे यांनी कोणाला गुरुस्थानी मानले होते?

अ) महात्मा फुले ब) महात्मा गांधी

क) छ. शाहू महाराज ड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

७. शिक्षणाची अन्नछत्रे कोणी सुरू केली?

अ) महात्मा गांधी ब) राजर्षी शाहू महाराज

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ड) महात्त्मा फुले

८. कोणाच्या विचारांचा पगडा बापूजींच्या मनावर बसला होता?

अ) राजर्षी शाहू महाराज ब) महात्मा फुले

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ड) वरीलपैकी सर्व

९. शिक्षणकार्याची मुहूर्तमेढ रोवल्यानंतर बापूजींनी स्वत:जवळचे श्रमाचे-घामाचे किती रुपये घातले?

अ) २१०० ब) २२०० क) २३०० ड) २४००

१०. डॉ. बापूजी साळुंखे यांनी कोणाच्या आचार-विचारांचे आचरण केले होते?

अ) महात्मा फुले व महात्मा गांधी

ब) राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क) महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ड) रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद

११. डॉ. बापूजींनी कोणत्या माध्यमातून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था उभी केली?

अ) लोकाश्रय ब) राजाश्रय क) धर्माश्रय ड) धनाश्रय

१२. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे कोणत्या भाषेवर प्रभुत्व होते?

अ) हिंदी ब) इंग्रजी क) संस्कृत ड) कन्नड

१३. महाराष्ट्र शासनाने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना कोणता पुरस्कार देऊन सन्मानित केले?

अ) भारतरत्न ब) दलितमित्र क) पद्मश्री ड) पद्मभूषण

१४. कोणत्या विद्यापीठाने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शिक्षणाची दखल घेऊन त्यांना डी.लिट. ही शिक्षणक्षेत्रातील सर्वोच्च पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला?

अ) पुणे विद्यापीठ ब) औरंगाबाद विद्यापीठ क) मुंबई विद्यापीठ ड) शिवाजी विद्यापीठ

१५. ज्ञानसूर्य डॉ. बापूजी साळुंखे हे कोणत्या वर्षी इहलोकातून अनंतात विलीन झाले.

अ) ८ ऑगस्ट १९९५ ब) ८ ऑगस्ट १९८६

क) ८ ऑगस्ट १९८७ ड) ८ ऑगस्ट १९८८

**उत्तर :**

१. अ) रामपूर, २. ब) उस्मानाबाद, ३. अ) शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे,
४. क) गोविंद, ५. ब) इ.स. १९५५, ६. अ) महात्मा फुले, ७. ब) राजर्षी शाहू महाराज
८. ड) वरील पैकी सर्व, ९. अ) २१००, १०. ड) रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद
११. अ) लोकाश्रय, १२. क) संस्कृत, १३. ब) दलितमित्र, १४. ड) शिवाजी विद्यापीठ,
१५. क) ८ ऑगस्ट १९८७

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घ्या.

२. 'संकल्प सिद्धीला नेणारा महापुरुष' असे डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विषयी का म्हटले गेले. ते सोदाहरण लिहा.

३. 'संकल्प सिद्धीला नेणारा महारुष : डॉ. बापूजी साळुंखे' या पाठाच्या आधारे डॉ. बापूजी साळुंखे यांचे जीवन चित्रण लिहा.

## ६.९ संदर्भ ग्रंथ :


१. शब्दसंहिता - प्रकाशक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे - संपा. प्राचार्य सुरेश पाटील, प्रा. तुकाराम पाटील.

३. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : व्यक्ती आणि कार्य.

४. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे : शोध आणि बोध.

५. ज्ञानपंढरीचा वारकरी : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे.


●●●

सत्र-१ : घटक-३

# व्यक्तिमत्त्व संकल्पना, व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक घटक, व्यक्तिमत्त्व विकासात भाषेचे महत्त्व

## ३.१ उद्दिष्टे (Objectives) :

व्यक्तिमत्त्व संकल्पना, व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक घटक आणि व्यक्तिमत्त्व विकासात भाषेचे महत्त्व हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला-

१. व्यक्तीत्व अणि व्यक्तिमत्त्व या संकल्पना स्पष्ट होतील.

२. व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? ते समजेल.

३. व्यक्तिमत्त्व ही संकल्पना स्पष्ट होईल.

४. व्यक्तिमत्त्व विकास कसा होतो ते समजेल.

५. व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांचा परिचय होईल.

६. व्यक्तिमत्त्व विकासात भाषेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे हे लक्षात येईल.

७. एकापेक्षा अधिक भाषा येणे हे व्यक्तिमत्त्वासाठी आवश्यक आहे हे लक्षात येईल.

८. व्यक्तिमत्त्व विकासामध्ये मौखिक भाषेबरोबरच देहबोलीला महत्त्व आहे हे लक्षात येईल.

९. दैनंदिन जीवनात आवश्यक असणारी भाषिक कौशल्ये कशी आत्मसात करावयाची ते समजेल.

## ३.२ प्रास्ताविक (Introduction) :

आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात एकूणच मानवी जीवनाला अतिशय गतिमानता प्राप्त झाली आहे. रोजच्या धावपळीबरोबरच मानवाची अस्वस्थता ही वाढली आहे. मूलभूत गरजांबरोबरच त्याला शिक्षण घेणेही महाग आणि दुरापास्त झाले आहे. अगदी सामान्य माणसाचेही जगण्याचे संदर्भ बदलत आहेत. दैनंदिन जीवनव्यवहारातून तो स्वत:ला घडविण्याचा, यशस्वी व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो आहे. या पार्श्वभूमीवर व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळेच की काय आजकाल प्रत्येक व्यक्ती आपल्या व्यक्तिमत्त्वाविषयी अधिक सजग होताना दिसते. या सजगतेतूनच अशा व्यक्ती आज आपल्या विकसित व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर विविध क्षेत्रात यशोशिखरावर पोहोचताना दिसतात. या यशस्वी व्यक्तींना आदर्श मानून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधने हे प्रत्येकालाच आज आवश्यक वाटू लागले आहे. कारण व्यक्तिमत्त्व विकास हीच आपली ओळख असते किंबहुना आपण कोण आहोत याची जाणीव

करून देत असते. आपण पाहातोय की समाजातील कित्येक व्यक्तींना कमालिची प्रतिष्ठा प्राप्त झालेली असते; इतरांवर त्यांची छाप असते, अशा व्यक्तींना सर्वजण भेटायला, त्यांच्याशी बोलायला इतकेच नव्हे तर, त्यांना बघायलाही इच्छूक असतात; आणि समाजात असेही लोक आहेत की ज्यांना आपण टाळतो किंवा त्यांची एक नकारार्थी छाप आपल्यावर पडलेली असते. या सर्व बाबींचा विचार केला तर मानवी जीवनातील जे जे उत्तम, उदात्त, उन्नत ते ते प्रयत्नपूर्वक, श्रद्धापूर्वक, विचारपूर्वक साध्य करण्याचा ध्यास हाच व्यक्तिमत्त्व विकास होय.

## ३.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter) :

आपल्या अवती-भोवती लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत अनेक व्यक्ती वावरत असतात. या व्यक्ती दिसायला सारख्या असल्या तरी त्यापैकी कोणत्याही दोन व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व संपूर्णतः सारखे आढळत नाही. समान वयाची दोन लहान बालके जरी घेतली तरी ती एकमेकांहून भिन्न असतात. इतकेच नव्हे तर एकबीज जुळ्यांच्याही व्यक्तिमत्त्वात फरक आढळून येतो. या एकबीज जुळ्यांचा किंवा समान वयाच्या एकापेक्षा अधिक मुलांचा विचार केला तर त्यापैकी एकाच्या हालचाली चपळ असतात तर दुसऱ्याच्या हालचाली मंद असतात. त्याचप्रमाणे जन्मतःच त्यांच्या वर्तनात आणि एकप्रकारे व्यक्तिमत्त्वात फरक आढळून येतो. त्यांचे हे वर्तन वाढत्या वयानुसार सातत्याने बदलत जाते आणि त्यांचे एक वेगळे व्यक्तिमत्त्व आकाराला येते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आसपासच्या सर्व घटकांचा कमी-अधिक प्रभाव झालेला असतो; तसेच आसपासच्या घटनांविषयी, प्रसंगांविषयी त्या दोघांच्या किंवा इतरांच्या प्रतिक्रिया देण्याच्या त्यांच्या विशेषांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण होत असते.

याबरोबरच या घटकाच्या अधिक स्पष्टतेसाठी असे म्हणता येईल की अनौपचारिकरित्या एकापेक्षा अधिक माणसे एकत्र आली म्हणजे त्यांच्या वागण्या-बोलण्यातून वेगवेगळी व्यक्तिवैशिष्ट्ये प्रकट होऊ लागतात. यापैकी एखादा इतरांवर छाप पाडण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतो; एखादा कमी बोलत असेल आणि जास्त ऐकून घेत असेल तर त्याच्याविषयी एक वेगळे मत तयार होते; त्यापैकी एखादा बहुमताची अनुकूल कृती करेल तर एखादा बहुमताला प्रतिकूल मत व्यक्त करेल. या सर्वांच्याच वर्तन वैशिष्ट्यांमधून जे जे उदात्त, सुंदर, उत्तम, उन्नत वैशिष्ट्ये आढळतात त्या सुवैशिष्ट्यांच्या समग्र रूपालाच व्यक्तिमत्त्व असे म्हटले जाते. एकंदरीत अशा विवेचनावरून आपण आता व्यक्तिमत्त्व ही संकल्पना नेमकेपणाने समजून घेऊया.

### ३.३.१ व्यक्तिमत्त्व संकल्पना :

व्यक्तिमत्त्वात व्यक्तीत्व (Individuality) आणि व्यक्तिमत्त्व (Personality) अशा दोन गोष्टींचा समावेश असतो. त्यापैकी एक म्हणजे प्रत्येक व्यक्ती ही जन्मतःच काही वेगळे विशेष आणि वेगळे अस्तित्व घेऊन जन्मलेली असते. थोडक्यात दोन व्यक्तींच्या शारीरिक ठेवणीतील चटकन नजरेत भरणारे वेगळेपण. हे वेगळेपण म्हणजे त्या त्या व्यक्तीचे व्यक्तीत्त्व आणि दुसरे म्हणजे या व्यक्तीत्वावर सभोवतालच्या परिस्थितीचे

घटना प्रसंगांचे, बऱ्या वाईट जीवनानुभवांचे परिणाम झाले की त्याचे रूपांतर व्यक्तिमत्त्वात होते. व्यक्तीत्त्व व्यक्तिमत्वाचा एक भाग आहे तर व्यक्तिमत्त्वात व्यक्तीत्व हे अंतर्भूत असते. असा या दोहोंचा अनोन्य संबंध आहे. याचाच अर्थ व्यक्तीत्व हे जन्मजातच आहे तर व्यक्तिमत्त्व हे विकसित करावयाचे असते.

'व्यक्तिमत्व' या संकल्पनेला इंग्रजीत Personality (पर्सनॅलिटी) ही संज्ञा वापरली जाते. 'पर्सोना' या लॅटिन शब्दापासून Personality हा शब्द तयार झाला आहे. पर्सोना म्हणजे मुखवटा, प्राचीन रोमन काळात नट आपल्या तोंडावर मुखवटा धारण करीत व बोलत. 'जसे पात्र तसा मुखवटा व जसा मुखवटा तसा आवाज' अशा संयुक्तिक रूपाने रोमन नाटकातील पात्रे आपली भूमिका वठवित असत. या भूमिका वठविताना त्या पात्राकडून जे वर्तन होई त्या वर्तनाचा बघणाऱ्यावर जो ठसा उमटतो त्याला त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व म्हणतात. असे असले तरी व्यक्तिमत्त्वाचा हा अर्थ एकदमच एकांगी आणि संकूचित वाटतो. कारण व्यक्तिमत्त्व ही संकल्पनाच फार व्यापक आहे. या संकल्पनेत व्यक्तीचे एकंदर दिसणे, तिची आकर्षक शरीरयष्टी, चेहरेपट्टी, ठेवण, बांधा, बोलणे, विशिष्ट सवयी, स्वभाव वैशिष्ट्ये, चारित्र्य, त्याची बुद्धिकौशल्ये, क्षमता, अभिरूची, आवड-निवड, संपादित गुण आणि कर्तृत्व इ. गोष्टींचा समावेश होतो. या सर्व गोष्टींचा व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या जगण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.

व्यक्तिमत्त्व ही संकल्पना अधिकतेने स्पष्ट करण्यासाठी मानसशास्त्रज्ञांनी, विचारवंतांनी व्यक्तिमत्त्वाच्या काही व्याख्या केलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे-

१) **बॅरन :** ''व्यक्तिमत्त्व म्हणजे इतरांपासून असलेल्या वेगळेपणातून स्पष्ट होणारे व्यक्तीच्या ज्ञानात्मक, क्रियात्मक, भावात्मक व शारीरिक वैशिष्ट्यांचे संघटन होय.''

२) **जी. डब्लू. ऑलपोर्ट :** ''व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीचे स्वतःच्या परिसराशी जे वैशिष्ट्यपूर्ण समायोजन होत असते त्याला कारणीभूत असणारी व वर्तनाला चालना देणारी शारीरिक व मानसिक यंत्रणांची गतिशील संघटना होय.''

३) **वुडवर्थ :** ''सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या संपूर्ण वर्तनाची सर्वांगस्पर्शी व संघटित स्वरूपाची गुणात्मकता (Total quality of and individuals) म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.''

४) **नॉर्मल एलमन :** ''व्यक्तीची शरीररचना, वर्तनविशेष, गरजा, अभिरूची, अभिवृत्ती, कृतिक्षमता यांचे वैशिष्ट्यपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व.''

वरीलप्रमाणे व्यक्तिमत्त्वाच्या महत्त्वाच्या अशा चार व्याख्या पाहिलेल्या आहेत. पण यातील कोणत्याही एका व्याख्येतून व्यक्तिमत्त्वाचा नेमकेपणाने अर्थ स्पष्ट होत नाही. त्यासाठी सर्वच व्याख्या विचारात घ्याव्या लागतात. वरील सर्व व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की, व्यक्तीच्या कोणत्याही एका शारीरिक, मानसिक, बौद्धिक गुणधर्मात व्यक्तिमत्त्व साठविलेले नसून ते संघटनस्वरूपी आहे. व्यक्तीच्या शारीरिक आणि मानसिक गुणांचा समुच्चय तिच्या व्यक्तिमत्त्वात झालेला असतो. त्याचबरोबर तिची शरीरयष्टी, बुद्धी, चारित्र्य,

स्वभाव, कृतिप्रवणता, वर्तन, इतरांवर छाप पाडण्याची शैली, अभिवृत्ती, भावनात्मक अवस्था, संयम व ध्येयधारणा इ. गोष्टींनीही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होत असते.

त्याचबरोबर व्यक्तिमत्त्व ही सातत्याने बदलणारी गोष्ट आहे. व्यक्तीच्या एकंदर आयुष्यात जीवनाच्या विविध टप्प्यावर येणाऱ्या अनुभवांची त्यात भर पडत असते. ही भर कधी आंतरिक स्वरूपाची तर कधी बाह्य स्वरूपाची असते. जसजसा अनुभव तसतसा जीवन प्रवास त्यामुळे अनुभवात विभिन्नता असल्यामुळे प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व एकमेकांहून भिन्न, स्वतंत्र आणि वेगळे राहते. या वेगळेपणाची इतरांहून वेगळी असणारी ओळख म्हणजे त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व होय. व्यक्तीच्या आंतरविश्वात व बाह्यविश्वात नेहमीच उलथापालथ होत असते. यातूनच तिचा शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकास होत असतो. या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तीचा हा घडलेला पिंड म्हणजे तिचे व्यक्तिमत्त्व होय.

### ३.३.२ व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक घटक

व्यक्तिमत्त्व विकास घडवायचा असेल तर काय काय करावे लागेल याचा आता आपण विचार करूया. मुलतः व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला दोन बाजू आहेत. पहिली बाह्य बाजू आणि दुसरी आंतरिक बाजू. बाह्य बाजूत आपले दिसणे महत्त्वाचे असते आणि आंतरिक बाजूत आपले असणे महत्त्वाचे असते. आणि व्यक्तीच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासामध्ये या दोन्ही बाजू लक्षात घेणे गरजेच्या आहेत. या दोन्ही बाजूंच्या समन्वयातून घडून येणारा व्यक्तिमत्त्व विकास ही एक निरंतर चालणारी, प्रगतिशील साधना आहे. पण या साधनेची चर्चा मात्र शालेय जीवनापेक्षा महाविद्यालयीन जीवनामध्ये अधिक होताना दिसते. याचे कारण शोधायचे झाले तर महाविद्यालयीन विद्यार्थी चांगल्या करिअरसाठी धडपडत असतात. त्यांना या वयात जबाबदारीची जाणीव झाल्याने विविध क्षेत्रातील नोकरीसाठी किंवा एखाद्या व्यवसायासाठी स्वतःला सिद्ध करता करता स्वतःचा अंतर्बाह्य असा सर्वांगीण विकासही ते साधत असतात. हा विकास साधताना त्यांना आत्मविश्वास, कार्यक्षमता, स्मरणशक्ती, अभ्यासाची तंत्रे, भाषण व संभाषण कला, वेळेचे नियोजन, ताण-तणावाचे व्यवस्थापन, सकारात्मक दृष्टीकोन, ध्येयनिष्ठा, प्रयत्नांची पराकाष्ठा अशा अनेक घटकांचे साहाय्य होते. यातून ते स्वतःला सक्षम, निरोगी, क्रियाशील, प्रगल्भ, सृजनशील व विकसनशील बनवत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधतात. कारण आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्याला सद्यस्थितीत कमालीचे स्पर्धामय जीवन जगत असताना आपले व्यक्तिमत्त्व विकसित करणे ही काळाची गरज भासू लागली आहे. त्यासाठी या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा आकार देणारे आणखी काही आवश्यक घटक खालीलप्रमाणे-

#### ३.३.२.१ **'स्व'ची ओळख** (Self Identity)

व्यक्तिमत्त्व विकास प्रक्रियेचा प्रारंभच स्वतःपासून होतो. जो मनुष्य स्वतःला व स्वतःच्या शक्तीला ओळखतो तो जीवनात सारे काही प्राप्त करून घेतो. आपण समजतो किंबहूना कल्पना करतो त्यापेक्षा कितीतरी पटीने आपल्यात सुप्त शक्तींचा प्रचंड साठा असतो. माणूस जेवढा बाहेरून दिसतो त्यापेक्षा जास्त

तो 'आत' मध्ये असतो. विख्यात मनोविश्लेषण तज्ज्ञ डॉ. सिग्मंड फ्रॉइड यांनी मानवामधील या सुप्त शक्तीला हिमनगाची उपमा दिली आहे. हिमनग हे पाण्यावर तरंगणारे असते. हिमनग हे पाण्यावर एक अष्टमांश तर पाण्याखाली सात अष्टमांश असते. आपल्याला फक्त पाण्यावरचा भाग दिसतो पाण्याखालचा मोठा भाग दिसत नाही. मनुष्याचेही तसेच आहे. मानवाला आपल्या आतल्या 'स्व'चे ज्ञान झाल्यावर जे सद्या आहोत तेवढेच आपण राहात नाही तर त्यापेक्षा कितीतरी मोठे दिसायला लागतो. म्हणूनच सर्वप्रथम स्वतःला ओळखणे महत्त्वाचे आहे. 'स्व'ची ओळख ही आत्मोन्नतीची, प्रगतीची, यशस्वीतेची, ध्येयपूर्ततेची गुरूकिल्ली आहे. निसर्गाने मानवाला अमाप गुणांचे वरदान दिले आहे. फक्त आपल्याला ते अनभिज्ञ असतात म्हणून आपण चाचपडत असतो. एकदा का स्वतःचे अंतर्विश्व प्रकाशमान झाले की आयुष्याच्या वाटेवरचा सर्व अंधकार दूर झालाच म्हणून समजा. परंतु स्वतःला ओळखण्याची क्षमता व्यक्तिपरत्वे भिन्न असल्यामुळे कोणाला या आत्मसामर्थ्याचा प्रत्यय लवकर येतो तर कुणाला उशिरा. त्यामुळे प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्व विकासात भिन्नता आढळते. आज आधुनिक मानसशास्त्रातही विद्यार्थ्यांची प्रगती जाणून घेण्यासाठी किंवा करिअरच्या दृष्टिकोनातून त्यांचा कल कशाकडे अधिक आहे हे जाणून घेण्यासाठी निरनिराळ्या अभिवृत्ती व अभिक्षमता चाचण्यांचे उपयोजन केले जाते. 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' यासारख्या उक्तीही स्वत:ला ओळखा हेच सांगत असतात. 'स्व' शक्तीची ओळख करून घेतलेले महात्मा गांधी, अब्राहम लिंकन, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, येशूख्रिस्त, महंमद पैगंबर, श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम अशी असंख्य उदाहरणे देता येतील ज्यांनी या जगाला स्वयंज्ञानाने प्रकाशमान केले.

### ३.३.२.२ **इच्छाशक्ती** (Willpower) :

यशप्राप्तीसाठी लागणारे सर्व काही व्यक्तीकडे आधीपासूनच असते. सर्व प्रकारच्या क्षमता आपल्या ठायी कार्यरत असतात पण अभाव असतो तो इच्छाशक्तीचा, ईश्वराने आपल्याला काहीही करण्याची, मिळवण्याची व बनण्याची शक्ती देऊन जन्म दिला आहे. पण या शक्तीचा वापर करण्यासाठी आवश्यक आहे ती इच्छा. आपण आपल्या मूळ इच्छा ओळखू शकलो आणि निर्णय घेत गेलो तर यश निश्चित आहे. आपल्याला कोणी प्रेरणा देऊ शकत असेल तर ही आहे आपली मूलभूत इच्छा. जेव्हा मूलभूत इच्छा आपलं सारथ्य करते तेव्हा जीवनप्रवासात येणारे अडथळे आपण लीलया पार करू शकतो. आपली मूलभूत इच्छा आपल्याला कार्यप्रवृत्त करते. यशस्वी माणसांमध्ये काय वेगळं असतं तर त्यांच्याकडे असणारी तीव्र इच्छाशक्ती जिला इंग्रजीमध्ये Willpower म्हणतात. इच्छा म्हणजे हृदयातून आलेला विचार. मूलभूत आणि प्रबळ इच्छा हे यशाचे उगमस्थान आहे. इतकेच नव्हे तर आपल्या इच्छेनुसार घडणाऱ्या गोष्टी उच्च स्तरावरील यश, आनंद व समाधान देतात. समजा आपल्याला डॉक्टर होण्याची तीव्र इच्छा आहे त्यावेळी आपल्याला सर्वप्रथम शास्त्र महाविद्यालयातून व नंतर वैद्यकीय महाविद्यालयामधून उत्तीर्ण व्हावं लागेल. हा मार्ग त्रासदायक, अवघड, खर्चिक असला तरी आपल्याला त्याचे काही वाटणार नाही कारण तो आपल्या आवडीचा मार्ग आहे. उलट पालक सांगत आहेत म्हणून हे सर्व करणं त्रासदायक होईल. प्रबळ इच्छा शक्तीच्या जोरावर अशक्य ते शक्य होऊ शकते. त्यासाठी आपण एका प्रख्यात गायकाचे उदाहरण घेऊ.

अमेरिकन गायक गोरिन यांना संगीत शिकत असताना चिरूट होण्याची सवय होती. त्यांना गुरु म्हणाले, तुला महान संगीततज्ज्ञ व्हायचे आहे की, चिरूट बहाद्दर व्हायचं हे आधी ठरवावं लागेल. दोन्ही एकाच वेळेस होणार नाही. याचा परिणाम म्हणून गोरिनने चिरूट ओढणे सोडून दिले आणि महान गायक बनला. थोडक्यात उत्तुंग स्वप्नं पाहण्यासाठी आणि साकारण्यासाठी गरज असते ती उदंड इच्छाशक्तीची.

### ३.३.२.३ उत्साह :

इच्छाशक्तीला उत्साहाची जोड देऊन अनेक लोक यशोशिखरावर पोहोचलेले दिसतात. उत्साहाचे किरण सदैव यशोमार्ग दाखवित असतात. अंगात सळसळणारा उत्साह व्यक्तीमधील सुप्त सामर्थ्याला कार्यरत करतो. उत्साहाला वयाची अट नसते म्हणून म्हणतात की, उत्साह म्हणजे तारुण्य आणि निरुत्साह म्हणजे म्हातारपण. उत्साहाच्या जोरावर समाजकार्याने झपाटलेल्या अनेक जगप्रसिद्ध व्यक्तींची उदाहरणे देता येतील. त्यापैकी एक म्हणजे मदर तेरेसा. त्यांना अनाथाश्रम बांधावयाचा होता आणि त्यांच्याजवळ तीन शिलींग इतकेच भांडवल होते. जवळच्यांनी त्यांना हा विचार सोडून देण्याचा सल्ला दिला. त्यावर मदर तेरेसा म्हणाल्या. ''तीन शिलींगमध्ये मदर तेरेसा काहीच करू शकत नाही. पण उत्साह, महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास आणि ईश्वरावरील श्रद्धा यांच्या जोरावर असे काही नाही की जे मदर तेरेसा करू शकत नाही. सळसळत्या उत्साहाचे आणखी एक उदाहरण देता येईल आणि ते म्हणजे स्टॅन्डर्ड मोटर कंपनीचे व्यवस्थापक श्री. डिक यांचे, श्री. डिक यांनी एकदा आपल्या तरुण कामगाराला विचारले, ''तुझ्या कामात तू नेहमी उत्साही असतो. कारण मला सांगू शकशील? माफी असावी साहेब, एक दिवस तुमच्या या खूर्चीवर बसण्याची माझी इच्छा आहे.'' भविष्यात तो संचालक बनला.

### ३.३.२.४ ध्येयपूर्ती (To complete a Goal), (Target) :

व्यक्तिमत्त्व विकासासाठी सर्वात आवश्यक घटक म्हणजे ध्येयपूर्ती होय. महाविद्यालयीन शिक्षणाचा कालखंड म्हणजे जीवनातील वसंतऋतू होय. युवकांनी बहरावे, फुलावे, मोहरावे असा हा काळ. बोरकरांच्या भाषेत सांगायचे झाले तर 'दिवस तुझे हे फुलायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे'. अशा उमलत्या वयात विद्यार्थ्यांनी काही उच्च ध्येय उराशी बाळगून मार्गक्रमण केले पाहिजे. कारण ध्येयपूर्तीसाठी लागणारी सर्व ती शक्ती तरुणांच्यामध्ये असते. एक निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे. डोळ्यासमोर ध्येय नसेल तर व्यक्तीमत्त्व विकसित होणारच नाही. जसे कुठल्या गावाला जायचे ते ठरवलेले नाही, पण बस स्टॅन्डवर उभे आहोत. कितीही वेळ बस स्टॅन्डवर उभा राहिलो तरी जोपर्यंत नेमके कोठे जायचे आहे ते ठरवत नाही तोपर्यंत प्रवास होणारंच नाही. त्यामुळे जीवनप्रवास हा विशिष्ट ध्येयपथावर होणे आवश्यक आहे. असे असले तरी ध्येय गाठण्यासाठी एखादा जादूचा दिवा किंवा मंत्र नसतो तर त्यासाठी हवी असते सर्वतोपरी कष्टाची तयारी. उदात्त ध्येय उराशी बाळगणे म्हणजे स्वत:चा विकास घडवून आणणे होय. प्रसिद्ध नृतिका सूधाचंद्रनने अपघातात एक पाय गेला असतानाही नृत्यसम्राज्ञी होण्याचे ध्येय एका पायावर नृत्य करून का होईना पूर्ण केले. डॉ. अब्दुल कलाम यांनी 'प्रज्वलित मने' या ग्रंथात महर्षी पतंजलीचा ध्येयशक्ती विषयी एक सुंदर विचार नोंदवला आहे तो असा – ''एखाद्या विलक्षण ध्येयाने तुम्ही प्रेरित होता किंवा एखादी

असामान्य कामगिरी तुम्हाला जेव्हा आव्हान देते तेव्हा तुमचे विचार सर्व मर्यादा झुगारून देतात. मर्यादांच्या पलिकडे जाऊन तुमचं मन विचार करू लागते. प्रत्येक दिशेने तुमची जागृती होते. आणि एका सुंदर विलोभनीय अशा जगात तुमचा प्रवेश होतो. तुमच्यात वास करीत असलेल्या सर्व प्रेरणा आणि तुमची हुशारी पूर्णपणे जागृत अवस्थेला पोहोचते आणि मग तुम्ही स्वत:ला समजत असता त्यापेक्षा आपण कितीतरी मोठे असल्याचा शोध तुम्हाला लागतो.''

### ३.३.२.५ आत्मविश्वास (Confidence) :

आत्मविश्वास हा ध्येयनिष्ठेचा पहिला हुंकार आहे. आत्मविश्वास ही मानवाला लाभलेली फार मोठी शक्ती आहे. तिच्या जोरावर मानवाला असामान्य यश मिळविता येते. मानवाजवळ आत्मविश्वास नसेल तर त्याच्या शारीरिक व मानसिक अशा सर्व शक्ती निष्फळ ठरतात. असे म्हणतात की, केवळ बंदूका लढत नसतात तर त्यांच्या पाठीमागचे मन व मनगट लढत असते हे खरे आहे कारण आत्मविश्वास जागृत झाला की, मानवातील सर्व सुप्तशक्ती जागृत होतात. आत्मविश्वास हे कतृत्वाचे महान तत्व आहे. आत्मविश्वासाच्या पायावर यशस्वी जीवनाचा डोलारा उभा असतो. किंबहूना कोणतेही कार्य सिद्धीस जाते ते आत्मविश्वासाच्या बळावरच. कारण पोहावे कसे हे पुस्तक वाचून शिकता येत नाही तर त्यासाठी पाण्यात पडावे लागेल आणि पाण्यात पडण्यासाठी जो आत्मविश्वास लागतो तो त्याला स्वत:ला कमवावा लागतो. आत्मविश्वास सैल करणाऱ्या अनेक गोष्टी आपल्या आसपास कार्यरत असतात त्याकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांनी स्वत:च्या जीवनाला आत्मविश्वासाने सामोरे जाणे म्हणजे यश. ज्याचा आत्मविश्वास संपला त्याचे सर्व काही संपले. या देशाचा इतिहास म्हणजे  प्रचंड आत्मविश्वास असणाऱ्या मूठभर लोकांचा इतिहास. आत्मविश्वास ही संकल्पना नीट समजावून घेण्यासाठी आपल्याला आता आत्मविश्वासाच्या जोरावर यशस्वी झालेल्या काही प्रसिद्ध महामानवांची उदाहरणे पाहता येतील. 'अशक्य हा शब्द माझ्या शब्दकोशातच नाही!' नेपोलियनचे हे उद्‌गार आत्मविश्वासाचे द्योतक आहेत. मिशेल ओबामा या आत्मविश्वासाने भरलेल्या महिला आहेत. मिशेल आपल्या पतीबरोबर म्हणजे बराक ओबामांबरोबर एका हॉटेलात जेवायला जातात. टेबलवर मेन्यूकार्ड येताच मिशेल म्हणाल्या. या हॉटेलचा मालक माझ्या परिचयाचा आहे. त्याने मला लग्नाची मागणी घातली होती. तेव्हा अतिशय मिस्कीलपणाने बराक म्हणाले, तसे झाले असते तर तू आज या हॉटेलची मालकीन असतेस यावर लगेच मिशेल म्हणाल्या, मी या हॉटेलची मालकीन झाले नसते तर तो राष्ट्राध्यक्ष झाला असता. आत्मविश्वासाचे प्रतीक असलेले आणखी एक उदाहरण म्हणजे संदीप माहेश्वरी. भारतातील सर्वात वेगवान वाढणाऱ्या उद्योजकांपैकी एक आहे संदीप माहेश्वरी ज्याने आत्मविश्वासाच्या जोरावर जगभरात प्रसिद्धी मिळविली. अजून एक उदाहरण पाहूया. यादवी युद्धात एका वृद्ध स्त्रीने अब्राहम लिंकनला विचारले ''बाबा रे ! तू एवढा त्या गुलामांसाठी झटत आहेस पण तुला असे वाटते का ईश्वर तुझ्या बाजूने आहे?'' त्यावर लिंकनने दिलेले मार्मिक उत्तर आत्मविश्वासाने भरलेले आहे ते म्हणाले, ''देव माझ्या बाजूने आहे की नाही माहित नाही, पण मी देवाच्या बाजूने आहे हे निश्चित.'' अशी काही उदाहरणे पाहिल्यावर आत्मविश्वास ही संकल्पना आपल्याला नेमकेपणाने समजून येते.

### ३.३.२.६ बौद्धिक सामर्थ्य (Intellectual Nourishment) :

व्यक्तिमत्त्व विकासामध्ये व्यक्तीच्या बौद्धिक सामर्थ्याला अधिक महत्त्व आहे. शिक्षणानेच बौद्धिक विकास शक्य आहे. किंबहुना ते महत्त्वाचे साधन आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आलेली घर आणि शाळा ही दोन महत्त्वाची संस्कार केंद्रे आहेत. या संस्कार केंद्रांतून विद्यार्थ्यांवर सर्वांगीण संस्कार होत असतात. म्हणूनच म्हटले जाते की, Mother is a first teacher and teacher is a second mother. विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास व्हावा म्हणून शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन जीवनापर्यंत अनेक विविधांगी उपक्रम राबविले जातात. विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. या सर्व उपक्रमांमध्ये आणि स्पर्धांमध्ये सहभाग म्हणजे बौद्धिक सामर्थ्याला पूरक आहार होय. शाळा महाविद्यालयांतील शिक्षणाबरोबरच जीवनाच्या पाठशाळेत जो शिकतो तो स्वत:चा कायाकल्प करू शकतो. कारण समाजातील काही व्यक्ती शिक्षणापेक्षा व्यावहारिक हुशारीच्या जोरावर यशाच्या शिखरावर पोहोचतात हे ही नाकारून चालणार नाही. रोजच्या व्यवहारात आपण कस वागतो, येणाऱ्या अडचणींना कशाप्रकारे सामोरे जातो, कठीण प्रसंगामध्ये कसे मार्गक्रमण करतो, ध्येय साध्य करण्यासाठी कसा प्रयत्न करतो, इतरांकडून आपण काय शिकतो त्याचबरोबर इतरांना त्यांच्या अडीअडचणींना किंवा एखाद्या प्रसंगी कसे मार्गदर्शन करतो यावर आपल्या बौद्धिक सामर्थ्याचा कस लागत असतो. आपल्या हातून होणारी प्रत्येक चांगली कृती ही बौद्धिक सामर्थ्याची निशाणी आहे.

### ३.३.२.७ शारीरिक क्षमता (Physical Ability) :

बौद्धिक सामर्थ्याबरोबरच शारीरिक क्षमताही तितकीच महत्त्वाची आहे. अलिकडच्या काळात फिगर, झिरो फिगर, फिटनेस याचे जणू फॅडच आलेले आहे आणि ते बरोबरही आहे. कारण कोणत्याही कामासाठी शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती आवश्यक आहे म्हणून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक जीवनात विविध खेळात भाग घेऊन किंवा व्यायामशाळेत कसरत करून स्वत:ला सक्षम किंवा तंदुरुस्त ठेवावे. व्यायामशाळेतील कसरतीपेक्षा खेळ अनेक पटींनी फायदेशीर ठरतो. खेळाच्या अनेक फायद्यांबरोबरच आणखी एक चांगला फायदा म्हणजे, खेळामुळे शारीरिक कसरत होऊन चांगली भूकही लागते आणि झोपही. स्वत:ला फिट ॲण्ड फाईन ठेवायचे असेल तर भूक आणि झोप या दोन्हीही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्याचबरोबर खेळाच्या जोरावर विद्यार्थ्यांना स्वत:चे करिअर घडविता येते. उदाहरणच द्यावयाचे झाले तर वीरधवल खाडे यांनी स्विमींग क्षेत्रात मिळविलेले जागतिक धवलयश त्याच्या व्यक्तिमत्त्वाला झळाळी प्राप्त करून देते. जागतिक यशाबरोबर खेळाच्या जोरावर त्याला शासकीय नोकरीही प्राप्त झाली आहे. त्याचबरोबर मीलींद कुलकर्णी (आयकर अधिकारी), तेजस्वीनी सावंत, राही सरनोबत, सानिया मिर्झा, पी.व्ही. सिंधू, सुहास खामकर अशी कितीतरी नावे घेता येतील की ज्यांनी खेळाच्या जोरावर मोठे यश प्राप्त केले आहे. कालपरवाच शासनाने ३२ खेळाडूंना शासकीय नोकरी देण्याचे आश्वासित केले आहे. कोणतातरी एक खेळ व्यक्तीला आयुष्यभर तंदुरुस्त ठेवतोच, त्याचबरोबर तो व्यक्तीला आयुष्यभर साथसंगतही करीत असतो. आजच्या विद्यार्थ्याने अभ्यासाबरोबरच खेळालाही महत्त्व दिले पाहिजे. कारण पदवीचा किंवा स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना

एकाग्रतेची नितांत गरज असते. कोणतीही शारीरिक व्याधी नसेल तर विद्यार्थी निरोगी शरीराने हवा तेवढा वेळ अभ्यासाला बसू शकतो आणि खेळामुळेच शरीराच्या बारीक-सारीक तक्रारी दूर होऊन एकाग्रक्षमता वाढीस लागते. ही एकाग्रक्षमता खेळामुळे तसेच ध्यानधारणा, प्राणायाम आणि योगशिबिरातूनही प्राप्त करता येते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील पूर्ण केलेला एखादा हॅपिनेस प्रोग्रामही निरोगी शरीर, कुशाग्र बुद्धी, आत्मविश्वास, प्रभावी निर्णयक्षमता, रागावर नियंत्रण आणि तणावमुक्त जीवन जगायला मोलाची मदत करतो.

### ३.३.२.८ सकारात्मक दृष्टिकोण (Psitive Attitude) :

यशाचा किंवा ध्येयाचा पाठलाग करण्यासाठी व्यक्तीजवळ कठोर मेहनत, कष्ट, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास याबरोबरच सकारात्मकतेचीही नितांत आवश्यकता असते. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास अवघडातल्या अवघड आव्हानांना सामोरे जाता येते. जीवनातल्या प्रत्येक गोष्टीकडे आपण सकारात्मकतेनेच बघितले पाहिजे. सकारात्मकता किंवा सकारात्मक विचार व्यक्तीचे आयुष्य सुंदर बनवितो तर नकारार्थी विचार माणसाचे आयुष्य पोखरून टाकतो. विधायक विचाराने माणसे एकत्र येतात व आपला विकास साधतात. ज्या प्रकारचे विचार आपल्या मनात येतात त्याप्रकारचे वर्तन आपल्या हातून घडते. समाजपरिवर्तन आपल्या हातात नसते पण स्व परिवर्तन आपल्या हातात असते याचे भान ठेवून प्रत्येक कृती सकारात्मक विचाराने केली तर यश निश्चित आहे. म्हणजे मुलाखतीला जाताना माझी मुलाखत चांगलीच होणार हा सकारात्मक विचार आपण मनात घेऊन गेलो तर मुलाखतही चांगली होऊन आपली निवड होण्याची शक्यता जास्त असते. सकारात्मकताच आपल्या व्यक्तिमत्त्व विकासात भर घालत असते. उदाहरणच पहायचे झाले तर कायद्याची परीक्षा दोनदा नापास झालेला तरूण उद्विग्न अवस्थेत मानसोपचार तज्ज्ञाकडे गेला. त्या तज्ज्ञाने त्याला तीन प्रश्न विचारले. पहिला - तुझे लग्न झाले आहे? हो, माझ्या अपयशामुळे माझ्या पत्नीस भयंकर दिव्यातून जावे लागले तरीही तिने माझी साथ सोडली नाही. दुसरा प्रश्न - तुला आजार वगैरे ? नाही. मी ठणठणित आहे आणि कॉलेजात बास्केटबॉल खेळत होतो. तिसरा प्रश्न - शाळेतील शिक्षक कसे होते? खूपच चांगले, मी अभ्यासात कमी असूनही सर्वांचा लाडका होतो. या प्रश्नावर तज्ज्ञाने तीन टीपणे लिहिली एक-पत्नीचे प्रेम आहे, तिची सदैव साथ मिळते, दोन-तब्बेत एकदम उत्तम आहे आणि तीन-महत्त्वाकांक्षी प्रेरणेमुळेच शाळेत लोकप्रिय. कमाल आहे. अपयशाचे भूत मानगूटीवर घेऊन मी उगाचच कुढत होतो याची प्रचिती त्या तरुणाला आली ती या गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यामुळेच. आपल्याजवळ सगळे असते आणि एखादी गोष्ट नाही म्हणून आम्ही दुःखी होतो याला नकारात्मकता कारणीभूत असते. जे आहे त्यामध्ये समाधान मानले की जीवन सुखी होते. समाजातील अनेक यशस्वीतांनी जे हिमालयाएवढे यश मिळविले आहे त्यापाठीमागे त्यांची सकारात्मकताच कारणीभूत असते. पेला अर्धा सरला आहे म्हणण्यापेक्षा पेला अर्धा भरला आहे म्हणणे सकारात्मक दृष्टिकोनाचे उत्कृष्ट उदाहरण होय.

### ३.३.२.९ संयमशीलता :

व्यक्तिमत्त्व विकासासाठी संयमशीलता हा घटकही अत्यंत महत्त्वाचा आहे. अवती-भवतीच्या सामाजिक पर्यावरणामध्ये अनेक गोष्टी आपल्याला पटणाऱ्या नसतात. किंबहूना दैनंदिन व्यवहारामध्येही काही गोष्टी

मनाविरुद्ध घडतात. तेव्हा आपली फार चिडचिड हाते. यातूनच आपल्याकडून बारीक-सारीक चुका होत असतात ज्या आपल्या व्यक्तिमत्व विकासाला हानी पोहोचवितात. हे टाळण्यासाठी अवती-भवतीची सामाजिक परिस्थिती बदलण्याची वाट पाहाण्यापेक्षा स्वत:मध्ये बदल करणे आवश्यक आहे आणि हा बदल संयमशीलतेतूनच घडून येतो. दैनंदिन व्यवहारामधील प्रत्येक कृती ही जेवढी संयमाने केली जाते तेवढी ती अधिक फायदेशीर ठरते. अधीरतेने किंवा घाई गडबडीने केलेली कोणतीही गोष्ट हानिकारकच होते. त्यासाठी संयम महत्त्वाचा, संयम हे सभ्यतेचे पहिले लक्षण आहे. संयम म्हणजे स्वत:चे स्वत:वर नियंत्रण असणे. त्यामुळे आत्मसंयम ही फार प्रभावी शक्ती आहे जी रागावर विजय मिळविते, रागाला अधिन ठेवते. व्यक्तीच्या ध्येयपूर्ती आणि साध्य यांच्या आड येणारी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे राग, या रागाला संयमाचा बांध घातला की, आपली शक्ती व उत्साह विधायक कार्याकडे वळविता येईल. आपल्या भावना, आपला राग यांच्यावर मनाचे तर मनावर बुद्धिचे नियंत्रण हवे. हे सूत्र जुळले की, व्यक्ती विवेकी पदाला पोहोचते आणि जीवनही यशस्वी होते. त्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासासाठी संयमशीलता ही गोष्ट महत्त्वाची आहे. संयम ही संकल्पना नेमकेपणाने समजून घेण्यासाठी एखादे उदाहरण पाहू. देश स्वतंत्र झाल्यावर आपले पहिले पंतप्रधान पंडित नेहरु इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांना भेटायला गेले होते. सोबत इंदिरा गांधी होत्या. या भेटीत चर्चिल इंदिरा गांधीना म्हणाले, ''तुमच्या वडिलांना आणि त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांना मी अनेक वर्षे तुरुंगात डांबले होते. तुमच्या मनातला त्याचा राग आता संपला की नाही?'' एका क्षणाचाही विचार न करता इंदिरा गांधीनी त्यांना उत्तर दिले. त्या म्हणाल्या ''आम्ही गांधीजींचे अनुयायी आहोत. त्यांनी आमच्यावर राग, द्वेष व सूडाचे संस्कार केलेले नाहीत. याचाच अर्थ असा की, संयम हा संस्कारातून साकार होणारा सद्‌गुण आहे.

### ३.३.२.१० **पोषाख** (Costume) :

चांगली कपडे परिधान केल्याने आपण दिवसभर तजेलदार आणि प्रफुल्लित राहतो. त्याचबरोबर आपला आत्मविश्वासही वाढतो हे मानसशास्त्रीयदृष्ट्या सत्य आहे. आपल्या 'स्व'त्वाचा भारदस्तपणा वाढवायचा असेल तर आपल्याला आवडणारी कपडे घातली पाहिजेत कारण व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व पोषाखामुळे प्रभावित होत असते. परंतु आपण वापरत असलेल्या कपड्याबद्दल आपण फारसे जागृत असत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्याला कपड्यांच्या वापराबद्दल अतरिक्त अशी काही माहितीच नसते. आपण कोणत्या ठिकाणी, कोणत्या प्रकारचे कपडे वापरावेत यालाही काही नियम आहेत. अर्थात हे नियम कसलेही बंधन म्हणून नव्हे तर एक पद्धत म्हणून विचारात घेतले आहेत. सर्वसाधारणपणे आपले कपडे दोन प्रकारांमध्ये मोडतात. पहिला प्रकार म्हणजे औपचारिक (Formal) आणि दुसरा प्रकार म्हणजे अनौपचारिक (Informals). आपण या दोन्ही प्रकारांचा जाणिवपूर्वक वापर करणे गरजेचे असते. कार्यक्रमाला, कॉलेजला अथवा ऑफिसला फॉर्मलच कपडे घालावीत, तर पार्टीला जाताना पार्टी लूक देणारी कपडे घालावीत. सहलीसाठी जाताना कॅज्युअल (Informals) कपडे परिधान करावीत. या सर्वाचे तारतम्य ज्याला साधले त्याच्या व्यक्तिमत्त्वाला सोन्याची झालर लाभते हे निश्चित. कपड्यांच्या या दोन प्रकारांचा विचार करून आपल्याला शोभतील असे कपडे

आपण परिधान केले पाहिजेत. ऋतुमानानुसारही पोषाख परिधान करावा. परिधान केलेला पोषाख स्वच्छ, निटनेटका व इस्त्री केलेला असायला हवा. कारण आपल्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये पोषाखाला अत्यंत महत्त्व आहे. आपल्याला नोकरीच्या मुलाखतीसाठी जायचे असेल आणि आपण जर का गरजेपेक्षा जास्त नट्टापट्टा करून गेलो तर त्याचा अनुकूल परिणाम होण्यापेक्षा प्रतिकूलच परिणाम होऊ शकतो हे ही लक्षात घेतले पाहिजे. आपण योग्य ते कपडे परिधान केले तर आपले व्यक्तिमत्त्व उठून दिसते. ''एक नूर आदमी और दस नूर कपडा'' असे म्हटले जाते ते यामुळेच. याचबरोबर शरीर स्वच्छ ठेवणे, योग्य केश रचना करणे, नीटनेटके कपडे वापरणे इ. गोष्टींमुळे व्यक्तिमत्त्व उठून दिसते. अनेकदा चित्रपट किंवा टी.व्ही. पाहताना कुणी कुठल्या प्रसंगी कसले पोषाख वापरले आहेत हे बारकाईने पाहिले तरी आपल्याला त्याची जाण येईल.

### ३.३.२.११ **शिष्टाचार** (Manners)

दैनंदिन जीवनात शिष्टाचाराला फार महत्त्व आहे. शिष्टसंमत बोलणे आणि चालणे म्हणजे शिष्टाचार. काही शिष्टाचार अंगभूत असतात तर काही नव्याने परिस्थितीनुरुप शिकावे लागतात. व्यक्तीच्या शिष्टसंमत बोलण्यातून तिची पारख होत असते. शिष्टाचार हे मानवाचे सर्वात मोठे भूषण आहे. सौजन्यशील व शिष्टाचारयुक्त वर्तन हा लोकव्यवहाराचा पाया असतो. सौजन्यशीलतेमुळे संभाव्य संघर्ष व दुर्घटना टळू शकते. समाजजीवनामध्ये वावरत असताना शिष्टाचाराचे भान सातत्याने ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. इतरांबरोबर गोड संभाषण, थोरा-मोठ्यांप्रती आदराने बोलणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण आहे. मित्र-मैत्रिणींमध्ये बोलतानाही सभ्य भाषेचा वापर करावा. बोलणे-चालणे-हसणे-खिदळणे हे खालच्या पटीत असावे. आवश्यकता नसताना गाडीचा हॉर्न वाजविणे, रस्त्यावर अडथळा होईल असे वाहन उभे करणे, चुकीच्या बाजूने गाडी चालविणे, कोठेही थुंकणे, बोलण्यात शिव्यांचा वापर करणे इ. गोष्टी टाळल्या पाहिजेत. नम्रता हे आपल्या सद्भावाचे प्रतीक असले पाहिजे. जी व्यक्ती यासारखे मूलभूत शिष्टाचार पाळते त्या व्यक्तीबद्दल निश्चितच इतरांचे मत चांगले होते. शिष्टाचार अंगिकारणे हे व्यक्तिमत्त्व विकासाला अत्यंत पोषक आहे.

शिष्टाचाराच्या जोरावर यशस्वी जीवनाचे अनेक मार्ग गवसतात. समाजाच्या सर्वच क्षेत्रात शिष्टाचाराला अत्यंत महत्त्व आहे. शिष्टाचारामुळे, शिष्टसंमत बोलण्याने राजकीय पक्षा-पक्षांमध्येही सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण होते. उदाहरणच द्यायचे झाले तर एकदा काँग्रेस कार्यकारिणीत महात्मा गांधी व सरदार पटेल यांची थोडी खडाजंगी झाली. त्यासंदर्भात महात्मा गांधीनी श्री वल्लभभाईंना पत्र लिहिले त्या पत्राला श्री. पटेल यांनी तत्परतेने पुढीलप्रमाणे उत्तर पाठविले - ''मी तुमच्या पत्रावर काय बोलणार? बहूत करून माझेच चुकले असणार. पण ते माझ्या लक्षात आले नाही, याचे मला खूप वाईट वाटते. मी जरा तापूनच बोललो. तो माझ्या स्वभावाचा दोष आहे. माझ्या मनात मात्र काही नाही.'' श्री. पटेलांचे हे उत्तर शिष्टाचारासंबंधी बरेच काही सांगून जाते. संघर्षाची किंवा नातेसंबंधामध्ये दुरावा येण्याची चाहूल लागताच थोडी माघार घेणे, नमते घेणे हे ही शिष्टाचाराचे लक्षण आहे.

या मूलभूत शिष्टाचारांबरोबरच काही बारीक-सारीक गोष्टीही व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. जशा की, कोणत्याही कार्यालयात गेल्यावर समोरच्या अधिकाऱ्याने सांगितल्याशिवाय बसू नये,

बसतानाही वेडेवाकडे बसू नये, टेबलावर हात टेकून बसू नये, सार्वजनिक ठिकाणी आळस देताना, खोकताना, शिंक आल्यावर तोंडावर हात ठेवावा. चार चौघात ढेकर देणे टाळावे, ढेकर आलीच तर माफ करा म्हणावे, दुसऱ्यांच्या वस्तूला न विचारता हात लावू नये, दुसऱ्याची डायरी, पत्रे कधीही उघडून पाहू नयेत. गरज असेल तेथे कमीपणा न मानता प्लीज, थँक्यू हे शब्द वापरावे, आपल्याला भेटायला आलेल्यांसमोर टी.व्ही. बघणे, भ्रमणध्वनीचा वापर करणे टाळावे. कारण आपले असे वागणे समोरच्याला अपमानकारक वर्तणूक आहे हे लक्षात ठेवावे, दुसऱ्याच्या माघारी त्याची निंदा करणे टाळावे, कारण नसताना इतरांच्या चुका काढत बसू नये, याहून अधिकही या विषयासंबंधी अनेक गोष्टी सांगता येतील. परंतु या गोष्टींचे पालन केले तर आपल्या माघारीही लोक आपल्याला चांगलेच म्हणतील हे ध्यानात ठेवावे या सर्व गोष्टींची व्यक्तिमत्व विकासासाठी नितांत आवश्यकता आहे.

### ३.३.२.१२ **आचार-विचार** (Action - Thought) :

आचार म्हणजे कृती आणि विचार म्हणजे तत्त्व. मनुष्याचे मनुष्यत्व त्याच्या विचारशक्तीत असते. विचार अणि कृतीची सुयोग्य सांगड जीवन सुखी आणि सफल करण्यास मदत करते. जर जीवनात काही करून दाखवायचे असेल तर विद्यार्थ्यांनी चांगले विचार आत्मसात केले पाहिजेत. आपल्या विचारांना कृतीचीही जोड दिली पाहिजे. आपले आचार-विचारच आपल्या व्यक्तिमत्त्वाला उठावदार बनवितात. विद्यार्थी जीवनात विद्यार्थ्यांनी समाजातील थोर, यशस्वी लोकांचे विचार अंगिकारणे आणि ते विचार आपल्या जीवनात आणणे महत्त्वाचे. प्रभावी व्यक्तिमत्त्वासाठी विद्यार्थ्यांनी जीवनमूल्यांचा अंगिकार करावा. आपल्या कोणत्याही कृतीच्या गाभ्यामध्ये एक विशिष्ट विचार असतो. हा चांगला-वाईट विचारच आपलं जीवन घडवित आणि बिघडवित असतो हे ही लक्षात घेतले पाहिजे. ज्यावेळी आपण एखादा विचार करतो त्यावेळी त्या विचारातून एकप्रकारची चुंबकीय ऊर्जा निर्माण होऊन आपल्या हातून कृती घडते. त्या चांगल्या-वाईट कृतींतच व्यक्तिमत्त्व विकासाची बीजं रोवलेली असतात. आपल्या विचारांना भावनेची जोड दिली की, मानसिक स्पंदन निर्माण होतात. ज्यातून चांगली चांगली अथवा महान कार्ये घडून येतात. त्यासाठी निकोप विचार महत्त्वाचे. निकोप विचाराबरोबरच खेळकर स्वभाव, प्रसन्न हास्य, मधूरवाणी, दुसऱ्याचा आदर, उदारता, दयाशीलता, क्षमाशीलता, चारित्र्य इ. मूल्येही जोपासल्याने व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आपले विचार आचारात परावर्तीत होण्यासाठी स्वामी विवेकानंद किंवा शिवाजीराव भोसले, यशवंतराव चव्हाण या महान व्यक्तींचे भाषणसंग्रह वाचावेत.

### ३.३.२.१३ **स्वयंशिस्त** (Self discipline) :

आपला व्यक्तिमत्त्व विकास साधावयाचा असेल तर प्रत्येकाने स्वत:ला काही शिस्त लावून घेणे आवश्यक आहे. या शिस्तीमध्ये प्रामुख्याने सकाळपासूनचा आपला वर्तन व्यवहार, कोणत्या गोष्टीला किती महत्त्व, चांगल्या गोष्टींचा स्वीकार अणि वाईट गोष्टींचा अव्हेर, दिनचर्येतील प्राधान्यक्रम, आचार-विचारांची पावित्र्यता, झोपण्या-उठण्यातील कालबद्धता, खाण्या-पिण्यातील दक्षता, फिरणे-खेळणे, अभ्यास करणे यामधील शिस्तबद्धता आणि चालण्या-बोलण्यातील सौजन्यशीलता इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो. जीवनाच्या

यशस्वीतेसाठी स्वयंशिस्तीची नितांत आवश्यकता आहे. स्वयंशिस्तीच्या जोरावर सामान्य माणूस असामान्यत्वाकडे वाटचाल करू शकतो. स्वयंशिस्त ही सर्वांगीण यशाची, महानतेची गुरुकिल्ली आहे. आयुष्यात येणारे अपयश, दु:ख, वैफल्य, अपमान, संघर्ष, औदासिन्य आणि न्यूनगंड याचे प्रमुख कारण आहे ते स्वयंशिस्तीचा अभाव. स्वत:च्या जीवनाला लावून घेतलेल्या स्वयंशिस्तीच्या वाटेवरून मार्गक्रमण केले तर यश निश्चित हा विचार मनात सातत्याने बिंबवणे आवश्यक आहे.

स्वयंशिस्तीमध्ये वेळेच्या नियोजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या वेळेचे नियोजन जो योग्यप्रकारे करतो त्याला प्रत्येक क्षेत्रात यश मिळविता येते. मात्र ज्याला वेळेची किंमत कळत नाही त्याची प्रगती होण्याऐवजी अधोगतीच होते. त्यामुळेच वेळेचं महत्त्व ओळखून आपल्या कामाचे जर आपण योग्य नियोजन केले तर ठरवलेल्या ध्येयापर्यंत पोहोचता येते हे निश्चित. जगातील प्रत्येक व्यक्तीला सारख्याच प्रमाणात वेळ उपलब्ध असतो. एखाद्या कार्यालयातील अधिकारी म्हणतो मला वेळच मिळत नाही आणि एखादी सर्वसामान्य व्यक्ती म्हणते टाईमपास म्हणून मी हे करतो. या दोन्हीमध्ये तफावत दिसते ती वेळेचा उपयोग करण्याच्या पद्धतीमुळेच याचाही विचार करणे आवश्यक आहे. वेळेचे नियोजन करायचे असेल अथवा आपल्याला तशी सवय लावून घ्यायची असेल तर उद्या किंवा पुढे आपल्याला कोणती कामे करायची आहेत त्याचे आराखडे बांधले पाहिजे. वेळेचे नियोजन हा यशस्वी जीवनाचा गुरुमंत्र आहे हे ध्यानात घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला पाहिजे.

### ३.३.२.१४ कौटुंबिक आणि शैक्षणिक पर्यावरण :

घर हा व्यक्तीचा पहिला सामाजिक परिसर त्यानंतर शेजारी, मित्र आणि दुसरा सामाजिक परिसर म्हणजे शाळा-महाविद्यालये, समाज आणि संस्कृती हा होय. या सर्व घटकांचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर, विकासावर परिणाम होत असतो. किंबहूना या सर्व घटकांच्या संस्कारातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकार घेत असते. व्यक्तिमत्त्व विकासासाठी आई-वडील तसेच अन्य व्यक्तींचे वर्तनही पोषक ठरते. ज्या कुटुंबात प्रेमळ वातावरण असते त्या कुटुंबाला अगणित लाभ होतात. ज्या घरातील माणसांमध्ये परस्पर प्रेम, जिव्हाळा, त्यागी वृत्ती, संयमशीलता, मनमोकळेपणा, वैचारिक ऐक्य व निस्वार्थीपणा इ. गुण असतील तर ते कुटुंब म्हणजे पृथ्वीवर अवतरलेला स्वर्गच म्हणायला हवा. अशा कौटुंबिक संस्कारात वाढलेली व्यक्ती वैयक्तिक अथवा सामाजिक क्षेत्रात येणाऱ्या आव्हानांना, संकटांना, समस्यांना यशस्वीपणे सामोरी जाताना दिसते. आई-वडिलांचा प्रभाव व्यक्तीच्या सांस्कृतिक विकासाच्यादृष्टीने महत्त्वाचा असतो. त्यामुळे आई-वडिलांनी परस्परांमधील वाद, दोन अपत्यांमध्ये मुलगा-मुलगी असा केला जाणारा भेदभाव, लिंगभेदाची विषमता इ. गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात आणि आपल्या मुलांना चांगल्या सवयी, सुसंस्कार देऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होण्यास पूरक वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी कर्तव्य म्हणून पार पाडावी. कुटुंबाबरोबरच चांगले शेजारी आणि मित्र यांच्या सहवासामुळेही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला चांगले पैलू पडतात.

शाळा, परिसर, वातावरण आणि शिक्षण यांचाही मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होत असतो. शाळा महाविद्यालयांमधील शिक्षकांचे व्यक्तिमत्व, विविध विषयांचा अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रम पुरक उपक्रम

इत्यादींच्या परिणामातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडत असते. घरात ज्याप्रमाणे मुलांच्या डोळ्यासमोर आईवडिलांचा आदर्श असतो. त्याप्रमाणे शाळेत त्यांच्यासमोर शिक्षकांचा आदर्श असतो. घरात जसे आईवडिलांशी त्याचे तादाम्य होते, तसेच तादात्म्य शाळेत शिक्षकांशी होते. त्यामुळे आई वडिलांच्या आणि शाळेतील शिक्षकांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वालाही योग्य वळण लागते. शिक्षकांच्या व्यक्तिमत्त्वात जे गुणदोष असतात तेच गुणदोष कमी-अधिक फरकाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात उतरतात. याचा विचार करून शिक्षकांनी शाळेत अथवा महाविद्यालयांमध्ये आपले सर्वांगीण आचरण चांगले ठेवणे आवश्यक आहे. कारण शाळा, महाविद्यालयेही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला मोलाचा हातभार लावत असतात.

कुटुंब आणि शाळा महाविद्यालयांबरोबर सुसंस्कृत समाजात वाढणाऱ्या व्यक्ती, त्याग सेवा आणि सहिष्णूता इ. मूल्यांची जोपासना करीत स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत असतात. उदाहरणच द्यायचे झाले तर गांधीजींनी सांगितलेल्या सत्य, अहिंसा, असंग्रह, अस्तेय, अभय, स्वदेशी, स्वार्थभावना, सर्वधर्मसमभाव, शरीरश्रम, आस्वाद आणि ब्रह्मचर्य अशा एकादश सूत्रांवर आज समाजातील काही महान व्यक्ती मार्गक्रमण करताना दिसतात. त्यांनाच आपण गांधीवादी म्हणतो. यासारख्या महनिय व्यक्तीचे संस्कार व्यक्तिमत्त्वावर होऊन व्यक्तीचा सामाजिक विकास होत असतो. त्यामुळे व्यक्तीला लाभलेल्या कौटुंबिक आणि शाळा महाविद्यालयीन पर्यावरणाबरोबरच तिला लाभलेले सामाजिक पर्यावरण आणि परिस्थिती तिच्या विकासाला सहाय्यभूत ठरत असते.

अशाप्रकारे वरील घटकांची सरमिसळ झाल्यावर जे बनते त्यास व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व म्हणता येईल. जीवनातील यशाचे किंवा व्यक्तिमत्त्व विकासाचे खरे रहस्य या घटकांमध्ये सामावलेले आहे. वर विवेचन केलेल्या घटकाव्यतिरिक्त आणखीही काही घटक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाला कारणीभूत होऊ शकतील. पण व्यक्तित्व विकासासाठी या घटकांचा प्रामुख्याने सर्वत्र विचार केला जातो. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांनी एवढे घटक जरी अंगिकारले किंवा त्यांचा वापर आपल्या दैनंदिन जीवनामध्ये केला तरी यश त्यांच्यापासून लांब नाही हे निश्चित!

### ३.३.३ व्यक्तिमत्त्व विकासात भाषेचे महत्त्व :

व्यक्तिमत्व विकासात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे हे लक्षात घेऊन प्रारंभी आपल्याला भाषा म्हणजे काय किंवा भाषेचे स्वरूप पाहाणे आवश्यक आहे. भाषा हे मानवी व्यवहाराचे, संपर्काचे, विनिमयाचे, संदेशनाचे व संप्रेषणाचे प्रभावी माध्यम असल्यामुळे भाषेला मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाला आपल्या मनातील भाव-भावना, विचार अधिक चांगल्या रीतीने किंवा निसंदिग्ध शब्दांत व्यक्त करण्यासाठी भाषेइतके प्रभावी माध्यम दुसरे असूच शकत नाही. मानव आपले सर्वच व्यवहार भाषेद्वारे पूर्ण करतो. इतकेच काय तर तो स्वप्नदेखील भाषेतच बघतो. म्हणून भाषा हा मानवी जीवनाचा तसेच त्याच्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. भाषेद्वारे व्यक्ती एकमेकांशी संपर्क साधू शकते. मानवी जीवनातील भाव-भावना, विचार, माहिती, ज्ञान आणि अनुभव यांची देवाण-घेवाण भाषेद्वारेच झाल्यामुळे मानवी व्यवहार सुलभ होण्यास मदत होते. एकूणच काय तर मानवाचे सर्वांगीण जीवन भाषेने व्यापलेले आहे. मानवी

जीवनाबरोबरच समाज जीवनालाही भाषा व्यापून राहिली आहे म्हणून भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. सामाजिक व्यवहाराचे ते महत्त्वाचे साधन आहे. मानवी आणि समाज जीवनाला व्यापून राहिलेली ही भाषा मानवाला जन्मजात किंवा अनुवंशिकतेने मिळत नाही तर ती त्याला शिकावी लागते हे ही खरेच. त्यामुळे ज्या भाषेच्या संपर्कात माणूस येतो तो ती भाषा शिकतो. असे असल्यामुळे जुन्या पिढीच्या शब्दभांडारात नवीन पिढी नव्या ज्ञानानुसार काही एक भर टाकून भाषिक वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द करीत असते. त्यामुळे भाषेद्वारे पिढ्यान्‌पिढ्या मानवी व्यवहार सुलभ होतात. भाषा अशी विकसित होते हे पाहिल्यानंतर असे म्हणता येईल की, माणसाच्या विचारशक्ती, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्तीसाठी भाषेला पर्याय राहात नाही. शिक्षणप्रक्रियेमध्येही भाषेच्या अध्ययन, अध्यापनाला अतिशय महत्त्व आहे. समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात भाषेला सर्वांगीण महत्त्व असल्याने भाषा हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वाचे साधन आहे या निष्कर्षापर्यंत आपण सहजंच पोहोचतो.

वरीलप्रमाणे भाषेचे स्वरूप पाहिल्यानंतर व्यक्तिमत्त्व विकासात भाषेचे नेमकेपणाने काय आणि किती महत्त्व आहे हे पाहाणे आवश्यक आहे. भाष् म्हणजे बोलणे आणि व्यक्तिमत्त्व विकासात बोलणे महत्त्वाचे ठरतेच. आपण काय बोलतो, कसे बोलतो आणि किती बोलतो यावर समोरची व्यक्ती आपल्याविषयी अंदाज बांधीत असते. म्हणजेच शब्द उच्चारणामागे त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व उभे असते. शब्दाचे उच्चारण किंवा बोलणे सुरू होते ते जीभ या शारीरिक अवयवापासून. हा अवयव दोन प्रकारचे कार्य करीत असतो. त्यापैकी एक म्हणजे ताटातील अन्न ओठामध्ये घेऊन ते पोटात ढकलणे आणि दुसरे म्हणजे पोटातील भावना ओठातून बाहेर टाकणे. ओठातून बाहेर पडलेल्या शब्दांना मांगल्याचा स्पर्श झाला की त्या शब्दाची ओवी होते. पण त्याच शब्दांना जर क्रौर्याचा स्पर्श झाला की त्याच शब्दांची शिवी होते. माणसाचे व्यक्तिमत्त्व या ओवीवरून आणि शिवीवरून ठरत असते. व्यक्ती आपल्या चालण्या-बोलण्यातून समोरच्या व्यक्तीच्या मनावर जसा आपला ठसा उमटविते त्यातून त्या व्यक्तीचे आपल्याविषयी जे एक मत तयार होईल तेच आपले व्यक्तिमत्व होय. त्यामुळेच भाषा आणि व्यक्तिमत्त्व यांचा जवळचा संबंध असलेला पाहायला मिळतो. व्यक्तीला शिक्षण, कला, व्यवसाय, उद्योग, साहित्य, राजकारण आणि समाजकारण इत्यादी क्षेत्रातील ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचे असेल किंवा प्रगती साधावयाची असेल तर त्या व्यक्तीला त्या त्या क्षेत्रानुसार काही भाषिक कौशल्ये आत्मसात करावी लागतात. सफाईदार भाषा बोलणे ही आज सर्वच क्षेत्राची सर्वांगीण गरज आहे हे ओळखून सफाईदार भाषा बोलण्याची कला अवगत केली पाहिजे. सर्वचकाळी भाषेला मानवी जीवनात महत्त्व राहिलेले आहे. पण आधुनिक काळात मात्र हे महत्त्व वाढलेले दिसते. आजच्या जागतिकीकरणाच्या नव्या ज्ञानयुगात अर्थव्यवस्थेला आवश्यक असलेली संभाषण कौशल्ये आत्मसात करताना शब्दातील स्पष्टता, सुगमता, आटोपशीरता, नम्रता, विचारांतील स्वतंत्रता, बोलण्यातील मधुरता, कुशलता आणि आशयघनता इत्यादी भाषेची तांत्रिक अंगे कष्टसाध्य व प्रयत्नसाध्य केली पाहिजेत. ही तंत्रे विकसित करताना शब्दांच्या उच्चारणावर अधिक लक्ष दिले पाहिजे. कारण व्यक्तीचं व्यक्तिमत्त्व साकारण्याचे सामर्थ्य शब्द उच्चारणात असते. त्यामुळे बोलण्याआधी शब्द तोलले पाहिजेत. बोलून विचारात पडण्यापेक्षा विचार करून बोलले पाहिजे. बोलणेही सोपे व आटोपशीर असावे कारण सोपेपणा हा ही भाषेचा सौंदर्यालंकार असतो. त्याचबरोबर

बोलणे आणि जास्त ऐकूण घेणे जमले पाहिजे. बोलण्यामध्ये सुगमता, आंतरिक जिव्हाळा, आत्मियता हवी. स्वामी विवेकानंदांनी 'बंधुनो आणि भगिनींनो' या दोन शब्दांनी समस्त अमेरिकनांची अंत:करणे जिंकली होती याची इतिहास साक्ष देतो. बोलण्यातील शब्दाचा मोजकेपणा आणि नेमकेपणा हे भाषेवर प्रभूत्व असण्याचे प्रतीक आहे. शब्दांबरोबरच मुद्देसूदपणा हा शहाणपणाचा आत्मा आहे. बोलतानाही काही शिष्टाचार पाळले पाहिजेत. एखादी गोष्ट किंवा आपल्याला जे म्हणावयाचे आहे ते नेमक्या आणि मोजक्या शब्दात व्यक्त करता आले पाहिजे. समाजाला आज पाल्हाळिकपणा आणि लांब पल्याचे लफ्फेदार भाषण आवडत नाही. म्हणून काही काही ठिकाणी आपले म्हणणे थोडक्यात मांडा अशा पाट्याच लावलेल्या असतात. या सर्वांचा विचार करून योग्य आणि मुद्याचे तेच बोलले पाहिजे. बोलण्यात आणि आवाजात आर्जव व मृदुता असावी. आपली मते किंवा विचार नम्रपणे मांडावेत. बोलण्यात तळमळ आणि कळकळ हवी. शब्द ओठांतून न येता ह्रदयातून आले पाहिजेत. आणि तसे झाले तर आपल्याबरोबर समाजही चांगला राहतो. म्हणूनच म्हटले जाते की, 'इफ टंग इज गूड, द टाऊन इज गूड.'' शब्दांबरोबरच भाषेवरही प्रभूत्व हवे. पण भाषेच्या स्वरूपाचे ज्ञान, भाषा निर्मितीचे ज्ञान, भाषेचे छंद व अलंकार, भाषेचे सौंदर्यशास्त्र आणि शब्दाच्या उच्चारातील चढ-उतार यांचे अचूक आकलन असल्याशिवाय भाषेवर प्रभूत्व मिळविता येत नाही. भाषेचे सौंदर्य आणि व्याकरणिक अंगे ही कौशल्य आत्मसात केली की, भाषा सुधारते. व्यक्तिमत्व विकासाला अशा सफाईदार भाषेचा, सुधारलेल्या भाषेचा मोठा हातभार लागतो.

भाषेचा सुयोग्य उपयोग करता येणे हे एक कौशल्य आहे. या भाषिक कौशल्याची यशस्वी करिअरसाठी तसेच व्यक्तीविकासाला किंवा व्यक्तिमत्त्व विकासाला मोठी मदत होते. आज स्पर्धेच्या युगात भाषिक कौशल्ये आत्मसात केल्याशिवाय पर्याय राहात नाही. कारण बदलत्या तंत्रज्ञानाने आज जग फार जवळ आले आहे. कार्पोरेट क्षेत्राने भौगोलिक सीमा पार केल्या आहेत. उद्योगक्षेत्रांचे जागतिकीकरण झाले आहे. आर्थिक धोरणे बदलत आहेत. या सर्व बदलांचा सामना करण्यासाठी प्रत्येकालाच आज स्वत:मध्ये सर्वांगीण बदल घडवून आणावे लागत आहेत. या बदलाबरोबरच व्यक्तीने आज जगातल्या वेगवेगळ्या संस्कृतीशी समरस होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याला आज चांगल्या करिअरसाठी खूप धडपड करावी लागते, कमालीच्या स्पर्धेला सामोरे जावे लागते आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि उद्योग इ. अशा विविध कारणास्तव त्याला सतत फिरावे लागते आहे. अशावेळी त्याला एकच एक भाषा अवगत होऊन चालत नाही. आपल्या मराठी या मातृभाषेबरोबरच शेजारील राज्यांच्या भाषेचेही थोडेफार ज्ञान अवगत करावे लागते. मातृभाषेशिवाय इतर भाषांमध्ये व्यवहारापुरती का होईना संवाद कौशल्ये विकसित करता आली पाहिजेत. तरच आपण सीमेपलिकडील भागात आर्थिक स्थैर्य प्राप्त करून घेऊ शकतो. आज भारतात देश-विदेशातील तरूण व्यवसायानिमित्त येऊन स्थिर झालेले पाहायला मिळतात. केवळ महाराष्ट्राचाच विचार करावयाचा झाला तर चायना देशातील कितीतरी युवक आज अनेक हॉटेलमधून आर्थिक स्थैर्य प्राप्त करून घेताना आढळतात.

इतर राज्यांच्या भाषेबरोबरच विद्यार्थ्याने एखादी परदेशी भाषा शिकली तर अधिक चांगले. कारण अनुवादाच्या क्षेत्रात आज करिअरच्या चांगल्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अनुवाद किंवा भाषांतर कौशल्ये

आज आवश्यक आणि अर्थप्राप्तीचे साधन मानले जाते. साहित्य क्षेत्राचा विचार केला तर या क्षेत्रात इंग्रजीतून मराठीत, मराठीतून इंग्रजीत, हिंदीत किंवा इतर भाषांमध्ये अनुवाद करण्यासाठी उत्कृष्ट अनुवादकांची आवश्यकता निर्माण झाली आहे. अनुवादाची, भाषांतरांची तंत्रे आत्मसात केल्यास साहित्याबरोबर आर्थिक गणिताचाही मेळ बसणे सोपे होईल.

प्रभावी संभाषण कला व नेतृत्वगुण व्यक्तीच्या किंवा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला प्रकाशमान करतात. संवाद कौशल्ये विकसित झाली तर त्यातून लोकसंपर्क वाढीस लागतो. भाषेचा अभ्यास करणारा विद्यार्थी भाषा क्षेत्रात उत्तम करिअर करू शकतो. कारण भाषेचे उपयोजन दैनंदिन व्यवहाराबरोबरच वृत्तपत्रे, आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी या प्रसारमाध्यमांतही होत असते. या माध्यमांमध्ये वार्ताहर, मुद्रितशोधक, संपादक, उद्घोषक, दिग्दर्शक, जाहिरात संहितालेखक, वृत्तपत्रसदर लेखक म्हणून चांगले करिअर होऊ शकते. याचा विचार करून विद्यार्थ्याने सफाईदार भाषा कमविली पाहिजे. भाषिक तंत्रे किंवा कौशल्ये आत्मसात केलेला भाषिक कॉलसेंटरमध्येही नोकरी मिळवून अर्थार्जन करू शकतो. संगणकीय भाषा अवगत केलेला विद्यार्थी संगणक क्षेत्रात करिअर घडवू शकतो. मराठी विषयातून पदवी घेतलेले विद्यार्थी विद्यार्थीनी वेबडिझाईनसारख्या क्षेत्रात एखाद्या कंपनीला आपली सेवा पुरवून घरबसल्या आपल्या करिअरला अर्थप्राप्तीची जोड देऊ शकते. अशी असंख्य उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. याबरोबर ज्याने सफाईदार भाषा कमावलेली आहे तो वक्तृत्वासारख्या क्षेत्रात भरारी मारु शकतो. विविध महाविद्यालयांमधून आयोजित केलेल्या राज्यस्तरीय अथवा राष्ट्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धामधून स्वत:चे भाषिक करिअर घडवू शकतो. त्याबरोबर थोडेफार अर्थार्जनही करू शकतो. 'स्वच्छता करंडक' सारखी वक्तृत्व स्पर्धा वक्तृत्व पटूला वर्षाकाठी अर्धा ते पाऊण लाख रुपये मिळवून देऊ शकते. याबरोबरच अभिनय, नृत्य, नाट्य, संगीत अशा ललित कलांच्या क्षेत्रातही भाषिक क्षमतांची जोपासना करता येते. या सर्वच क्षेत्रात भाषेला अथवा भाषिकाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या क्षेत्राला लागणारी भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आज कम्युनिकेशन स्किल्स, बिझनेस कम्युनिकेशन, व्हॉइस् कल्चर, स्पीच कल्चर, पब्लिक स्पीच, सादरीकरण कौशल्ये, पॉवर पॉईंट प्रोग्रॅम, मुलाखती, गटचर्चा, पत्रकारिता, वृत्तलेखन, चित्रपट कथालेखन इ. चे शिक्षण देणाऱ्या संस्थाही कार्यरत आहेत. त्यांचाही उपयोग करून घेतला पाहिजे.

मौखिक अथवा लिखित भाषेबरोबरच विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्व विकासात देहबोली (Body Language) अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडते. शब्दांची देवघेव न करता शरीराने किंवा देहाने केलेला अबोल संवाद म्हणजे देहबोली होय. तिलाच आपण शरीराची भाषा या नावाने ओळखतो. आपल्या मनातील भाव भावना, विचार कळत-नकळत आपल्या शारीरिक अथवा देहाच्या विविध अवयवातून केलेल्या हालचालीतून व्यक्त होत असतात. या हालचालीतून एकमेकांशी शाब्दिक भाषेइतका नसला तरी कांही अंशी प्रभावी संवाद घडून येत असतो. इतकेच नव्हे तर हा संवाद अतिशय वेगाने घडून येतो. शारीरिक हालचालीतून मनातले भाव अथवा संदेश भराभर पाठवले जातात. ज्यांमधून विविध पातळ्यांवर भावनांचे प्रकटीकरण होत असते. उदाहरणच द्यायचे झाले तर मराठमोळ्या सिनेमातील देता येईल. पडद्यावर मुलगी दाखवण्याचा कार्यक्रम चालू

असतो. चहापान होतं, उपवर मुलगी लाजत मुरडत मंदावल्या पावलाने येते, पुढे प्रश्नोत्तरे होतात. नायक विनासंकोच ''मला मुलगी पसंत आहे; पण मी मुलीला पसंत आहे का ते विचारा !'' असे म्हणतो. नायिकेचे वडील आनंदाने हरखून ''काय ग मुली?'' असे विचारतात. मग कॅमेरा नायिकेच्या पावलांवर हळूवार स्थिरावतो. तेव्हा उपवर मुलीच्या एका पावलाचा अंगठा हळूवारपणे जमीन उकरत असतो. नंतर सर्वजण खुश होऊन हसायला लागतात. नायिका हाताच्या ओंजळीत चेहरा झाकून आत पळते. अशा प्रसंगी ती काहीही न बोलता तिचे उत्तर पडद्यावरच्या उपस्थितांना आणि आपल्यालाही कळतं, सर्वांना समजलेलं तिचे उत्तर हा देहबोलीचा उत्तम नमुना आहे असे म्हणता येईल.

देहबोलीचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे या देहबोलीच्या माध्यमातून मनात असणाऱ्या भाव-भावनांच्या तरंगातून निर्माण होणाऱ्या कायिक हालचाली व्यक्ती लपवू शकत नाही. पण एकवेळ खोटं बोलून भाषेचा दुरुपयोग करू शकते. त्यामुळे शब्दाच्या भाषेने कधी-कधी फसगत होऊ शकते. तशी फसगत कायिक हालचालीद्‌वारे निर्माण झालेल्या देहबोलीतून होत नाही. समोरची व्यक्ती आपल्या शाब्दिक भाषेतून फसवत आहे किंवा खोटे बोलत आहे हे तिच्या देहबोलीच्या निरीक्षणातून आपल्याला समजते. त्यामुळे शब्दांच्या भाषेइतकेच महत्त्व किंबहूना थोडे अधिकचे महत्त्व देहबोलीला आहे असं म्हटलं तर फारसं वावगं ठरू नये. देहबोलीतूनही योग्य ते संप्रेषण साधले जाते यासाठी आपण चित्रपटक्षेत्रातील संवादाचे स्वरूप पाहू. बोलपटाइतकेच मूकपटही प्रेक्षकांना समजत होते. एकेकाळी चार्ली चॅप्लीन आणि लॉरेल हार्डी यांच्या कायिक हालचालीतून घडत जाणाऱ्या घटना प्रेक्षकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवत होत्या हे ही विसरून चालणार नाही. त्यामुळे देहबोलीला व्यक्तिमत्त्व विकासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. विद्यार्थ्याने आपले दैनंदिन उठणे, बसणे, वागणे आणि वर्तन नीटनेटके ठेवले पाहिजे. यातून त्याच्या व्यक्तिमत्वाची छाप समोरच्यावर आपोआपच पडत असते. आपण समाजाकडे दोन डोळ्यांनी पाहतो, पण समाज आपल्याकडे हजारो डोळ्यांनी पाहतो याचे सातत्याने भान ठेवले पाहिजे. या हजारो डोळ्यांना प्रभावित करण्यासाठी आपल्याला देहबोली, मुद्राभिनय, हस्तमुद्रा, मान व खांदे यांची ठेवण, पायातील चाळे, उभे राहाण्याची पद्धत (stance) यांच्या माध्यमातून एक लाईफस्टाईल जपता येते जी आजच्या प्रेझेंटेशनच्या युगात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. देहबोलीतून आपला आनंदी स्वभाव, इतरांबद्दलची आत्मियता, कामाबद्दलची तळमळ व्यक्त झाली पाहिजे. मुखातील शब्द आणि देहबोली यातून प्रगट होणारी व्यक्तिमत्त्वाची अभिव्यक्ती मोठमोठ्या सभा जिंकण्यास किंवा समोरच्यावर प्रभाव पाडण्यास सहाय्यभूत होते. यासंदर्भात अंजली पेंडसे म्हणतात. ''शब्दाविणे संवाद साधू पाहणाऱ्या देहबोलीचे आपण जाणीवपूर्वक निरीक्षण केले, विचार केला आणि अर्थ लावला तर माणसांचे वर्तन समजावून देणाऱ्या दालनाचे दार उघडण्याची गुप्त कळंच आपल्याला ठाऊक होते.'' (देहबोली : अंजली पेंडसे, पृष्ठ ५). देहबोली हे व्यक्तिमत्त्व विकासाचे बाह्य लक्षण असले तरी व्यक्तिमत्त्व विकासात त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वरीलप्रमाणे विवेचित केलेली सर्व भाषिक कौशल्ये आत्मसात केली की आपले व्यक्तिमत्त्व चार-चौघांत उठावदार होते. व्यक्तिमत्व विकासामध्ये सफाईदार बोलण्याबरोबरच देहबोलीचाही मोलाचा वाटा आहे हे सातत्याने लक्षात ठेवावे.

### ३.३.४ समारोप :

सारांशाने पाहाता आजच्या स्पर्धेच्या युगात व्यक्तिमत्त्व या संकल्पनेला फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यक्तीचे हे व्यक्तिमत्व त्याच्या विचार, विकार, सवयी, अभिरुची, प्रवृत्ती, मनोवृत्ती, बुद्धिकौशल्ये, इ. अंतर्घटकांनी आणि व्यक्तीची शरीररचना, बांधा, उंची, वजन, वर्णन, शारीरिक क्षमता आणि देहबोली या बाह्य घटकांनी युक्त आहे. त्यामुळे या सर्वच घटकांचा विकास साधणे म्हणजे व्यक्तिमत्त्व विकास होय. त्या संदर्भात प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी आपल्या 'यक्षप्रश्न' या ग्रंथात व्यक्तिमत्त्व विकासाचे व्याकरण छान समजावून सांगितले आहे. ते म्हणतात, ''आपल्या ठायी जे आहे त्याचे सर्वार्थाने उपयोजन करणे हा जीवन सार्थकतेचा मार्ग आहे. ओस पडलेल्या ऐसपैस शेतापेक्षा जमिनीचा कसलेला लहान तुकडा उदंड धनधान्य देऊन जातो. व्यक्तिमत्त्वाच्या बाबतीत असेच काही म्हणता येईल. जे लाभले नाही आणि लाभणारही नाही त्यासाठी आसवे ढासळण्याऐवजी जे लाभले त्याचे सोने करणे आपल्या हाती आहे.'' (सहावे सुख : यशवंत पाटणे पृष्ठ ३७) एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीहून वेगळी असल्याने व्यक्तीपरत्वे व्यक्तिमत्त्वाचे विशेष विभिन्न असतात. थोडक्यात दैनंदिन जीवनामध्ये स्वत:ला घडवत यशस्वी ध्येयाकडे वाटचाल करून आपले व्यक्तिमत्त्व विकसित करणे ही काळाजी गरज आहे. त्यासंदर्भात डॉ. मधुकर मोकाशी म्हणतात. ''यशस्वी जीवनासाठी उत्तम व्यक्तिमत्त्व व उत्कृष्ट भाषिक कौशल्ये हवीतच! आजच्या जागतिकीकरणाच्या व ज्ञान-विज्ञानाच्या युगात करिअरची नवनवीन दालने खुणावत आहेत. त्यासाठी ज्ञान, कौशल्य, भाषा व व्यक्तिविकास यांचे 'स्पेशलायझेशन' झाले आहे. दुसऱ्या बाजूने गुणवत्ता, दर्जा आणि कार्यक्षमता प्रमाणभूत मानून सर्वत्र संभाषणापासून संगणकापर्यंत महत्त्व प्राप्त होताना प्रभावी संज्ञापन 'स्मार्टनेस' या गोष्टीही व्यक्तिमत्त्व विकास आणि भाषिक कौशल्ये यांस पूरक मानल्या जात आहेत.''

## ३.४ कठीण शब्दांचे अर्थ :

१. सजग - सावध
२. अनुकूल - परिस्थितीस समर्थनीय, पोषक
३. प्रतिकूल - आपल्या विरोधी किंवा परिस्थिती विरोधी
४. व्यक्तीत्व - व्यक्तीचे दिसणे, तिची शारीरिक वैशिष्ट्ये
५. व्यक्तिमत्त्व - व्यक्तीचे असणे, व्यक्तीचे गुणविशेष.
६. समुच्चय - समूह, ढीग.
७. प्रगल्भ - धीट, शहाणा प्रौढ
८. हिमनग - हिमालय पर्वत.

९. अनभिज्ञ - अजाण, माहित नसणे.

१०. लीलया - सहजपणे

११. चिरूट - तमाखूपत्रांची जाड विडी

१२. उद्विग्न - उदासीन, औदासिन्य

१३. तारतम्य - सारासार विचार

१४. भूषण - अलंकार, शोभा.

१५. प्रतीक - चिन्ह, खूण.

१६. सौहार्दपूर्ण - स्नेहभावाचे, मित्रत्वाचे.

१७. अव्हेर - टाळणे.

१८. तादात्म्य - एकरूपता

१९. सृजनशीलता - नवनिर्माण वृत्ती

२०. अविभाज्य - वेगळे करता येत नाही असे अखंड.

२१. क्रौर्य - निर्दय

२२. आर्जव - विनवणी

२३. सीमा - मर्यादा, हद्द

२४. कम्युनिकेशन स्किल्स - संवाद कौशल्ये.

२५. बिझनेस स्किल - व्यावसायिक संवाद / कौशल्ये

२६. व्हॉइस् कल्चर - आवाजाचा पोत

२७. स्पीच कल्चर - संवादातील चढउतार

२८. पब्लिक स्पीच - भाषण.

२९. मुद्राभिनय - चेहऱ्यावरील सूक्ष्म हावभाव

३०. हस्तमुद्रा - हाताच्या हालचाली, हातवारे

३१. लाईफस्टाईल - जीवनपद्धत

३२. प्रेझेंटेशन - अभिव्यक्ती, सादरीकरण

३३. ठायी - ठिकाणी

३४. स्पेशलायझेशन – विशेषीकरण

३५. स्मार्टनेस – हुशारी, चलाखी

३६. संप्रेषण – संदेशवहन, संदेशाची देवाण-घेवाण.

## ३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (लघुत्तरी प्रश्न) (५ मर्कासाठी एक प्रश्न)

१. व्यक्तिमत्व ही संकल्पना स्पष्ट करा.

२. व्यक्तीत्व आणि व्यक्तिमत्व यातील भेद स्पष्ट करा.

३. व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक घटकांची साधार चर्चा करा.

४. व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या अंतर्घटकांची थोडक्यात चर्चा करा.

५. व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बाह्य घटकांची थोडक्यात चर्चा करा.

६. भाषेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व कसे घडते हे स्पष्ट करा.

७. 'भाषा हे व्यक्तिमत्व विकासाचे अधिष्ठान समजले जाते' या विधानाचा साधार परामर्श घ्या.

८. व्यक्तिमत्व विकासातील भाषेचे महत्त्व विशद करा.

९. 'व्यक्तिमत्व विकासात भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे' या विधानाचा थोडक्यात परामर्श घ्या.

१०. कोणत्या आवश्यक घटकांतून व्यक्तिमत्व विकास साधतो ते स्पष्ट करा.

११. व्यक्तिमत्व विकास आणि भाषा यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

१२. व्यक्तिमत्व म्हणजे काय ते लिहा.

१३. अंतर्बाह्य घटकांचे व्यक्तिमत्व विकासातील महत्त्व विशद करा.

१४. भाषिक संवाद आणि देहबोली यातील साम्यभेद स्पष्ट करा.

## ३.६ संदर्भ ग्रंथ :


१. गोखले हेमंत : व्यक्तिमत्व विकासाचे सोपे मार्ग, विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्रथमावृत्ती, २०१२

२. ज्युफेल्ट जॅक : डीएनए ऑफ सक्सेस, अनुवाद : प्रसाद ढापरे, मिरट पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती ऑगस्ट २०१४.

३. पवार प्रदीप : झटपट व्यक्तिमत्व कसे सुधाराल ? इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे-३०, प्रकाशन दिनांक १२ जानेवारी २००२

४. मोकाशी मधुकर : व्यक्तिमत्व विकास आणि भाषा, स्नेहवर्धन प्रकाशन क्र. ७३३, पुणे-३०, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २००९.

५. पाटील दत्ता, शिंदे अरुण (संपा.) शब्दसंहिता (बी.ए. भाग १ व बी.कॉम भाग-१, क्रमिक पुस्तक) शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, जून २०१८.

## ३.७ अधिक किंवा पुरक वाचनासाठी पुस्तके :

१. पवार प्रदीप : यशाचे रहस्य, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे-२०, प्रथमावृत्ती २००३.

२. पवार प्रदीप : भरारी ध्येयवाड्यांची, विवेक पब्लिकेशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००४.

३. कोतेकर विठ्ठल (संकलक) : विचारांचा आविष्कार, विवेक पब्लिकेशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५.

४. पाटणे यशवंत : सहावे सुख, शब्द प्रकाशन, सातारा, चौथी आवृत्ती २०१४.

५. पंडित र. वि., कुलकर्णी अ.वि., गोटे चं. वि. : सामान्य मानसशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, १ ली आवृत्ती १९९९.

६. पंडित र. वि. : मानसशास्त्राची मुलतत्वे, विद्या प्रकाशन, नागपूर, पुनर्मुद्रण २०१०.

७. पेंडसे अंजली : देहबोली, नीलकंठ प्रकाशन-३०, चौथी आवृत्ती, २००७.

●●●

सत्र-१ : घटक-४

# भाषिक कौशल्ये, कार्यक्रमाचे संयोजन

## ४.१ उद्दिष्टे (Objectives) :

भाषिक कौशल्ये, कार्यक्रमाचे संयोजन हा घटक अभ्यासल्यानंतर -

१. श्रवण, वाचन, भाषण व लेखन इत्यादी कौशल्यांचा विकास होईल.

२. व्यक्तिमत्त्व संपन्न होईल.

३. प्रमाण व बोली भाषेकडे बघण्याचे सजग भान येईल.

४. व्यवस्थापनाचे कौशल्य आत्मसात करता येईल.

५. संप्रेषण कौशल्ये हस्तगत करता येतील.

६. कार्यक्रमाच्या संयोजनाचे स्वरूप लक्षात येईल.

७. कार्यक्रमपत्रिका तयार करता येईल.

## अ) भाषिक कौशल्ये

## ४.२ प्रास्ताविक (Introduction) :

माणूस हा विकसित होणारा प्राणी आहे. काळाच्या ओघात त्याने विविध प्रकारचे शोध लावले आणि त्याचा उपयोग त्याने आपल्या विकासासाठी केला. 'भाषा' हा देखील त्याने स्वत:च्या प्रज्ञेने लावलेला अफलातून शोध आहे. जगाच्या पाठीवर विविध मानवी समूहाने आपापल्या पातळींवर भाषांचा शोध व उपयोग केलेला दिसून येतो. भाषेच्या शोध आणि उपयोजना बरोबरच भाषेचा शास्त्रशुद्ध अभ्यासही भाषाविज्ञानासारख्या विषयांमध्ये केला आहे. या भाषाविज्ञानामध्ये सांकेतिक-चिन्हांकित भाषांपासून ध्वनीयुक्त भाषेपर्यंतच्या विविध टप्प्यांचा विस्ताराने अभ्यास केला आहे. त्याचबरोबर संदेशाचे दळणवळण आणि ज्ञानाचे संकलन-संवर्धन हे भाषेचे मुख्य उद्दिष्ट आहे हे ही स्पष्ट केले आहे. प्रस्तुत घटकामध्ये माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना ज्या मूलभूत कौशल्यांचा विचार केला जातो; त्यात श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन या कौशल्यांचा अंतर्भाव होतो जी कौशल्ये भाषेशी निगडीत आहेत.

भाषा हे भावना, विचार प्रकट करण्याचे प्रभावी साधन आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करावयाचा असेल, तर चांगले बोलता आले पाहिजे व चांगले लिहिताही आले पाहिजे. त्यातून आपल्या

समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येतो. अनेकदा भाषेच्या आणि संवादाच्या स्तरावरून व्यक्तीची गुणवत्ता आणि सामाजिक स्तर ओळखला जातो. त्यामुळे व्यक्तिमत्त्व आणि भाषा यांचा सहसंबंध अतूट स्वरूपाचा आहे. त्यातून माणसाची विद्‌वत्ता, व्यासंग याचा परिचय होतो. त्याचा समाजमनावर प्रभाव पडतानाही दिसून येतो.

## ४.३. विषय विवेचन (Presentation of subject matter) :

श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन ही चारही भाषिक कौशल्ये परस्परांशी निगडित अशी आहेत. कारण ती माणसाच्या व्यक्तित्वाशी आणि व्यक्तिमत्त्वाशी संबंधित अशी आहेत. व्यक्तीचा सामाजिक परिसर, शैक्षणिक स्तर, अभिरुची इत्यादी बाबी त्यांतून स्पष्ट होत जातात. त्यामुळे श्रवणापासून लेखनापर्यंतची सर्व कौशल्ये ही आत्मसात होणे आवश्यक आहेत. उत्तम बोलण्यासाठी उत्तम ऐकणे आणि उत्तम लेखनासाठी उत्तम वाचणे या व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीतील महत्त्वाच्या बाबी आहेत. त्यातून शब्दांचे विविध अर्थ, भाषेच्या विविध छटा, भाषा वापरण्याची हातोटी, प्रसंगपरत्वे संभाषण करण्याचे कौशल्य, समूहाप्रमाणे संवाद साधण्याचे कौशल्य, जनसंपर्क, प्रगल्भ अभिव्यक्ती, गुणवत्तापूर्ण लेखन इ. बाबी लिलया जमू शकतात. त्यामुळे या सर्वांचा समन्वय व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व संपन्न करत असते. या चारही भाषिक कौशल्यांमध्ये श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन अशा चढत्या क्रमाने या कौशल्यांचा विचार करावा लागतो. यात लेखन कौशल्य हे शेवटचे कौशल्य मानले आहे.

### ४.३.१ श्रवण कौशल्य (Auditiory skill) :

श्रवण हे उपरोक्त कौशल्यांमधील मूलभूत कौशल्य आहे. श्रवणातूनच आपण बोलणे शिकत असतो. अगदी लहानपणापासून आपल्या अवतीभोवती असणाऱ्या लोकांच्या बोलण्याचे उच्चार हे कानावर पडत असतात. आणि त्यातून आपण शब्द उच्चारण्याचे शिकत असतो; सराव करत असतो. त्यामुळे श्रवण हे अत्यंत काळजीपूर्वक शिकावयाचे कौशल्य आहे. विविध वस्तूंचे ध्वनी, पशु-पक्षांचे आवाज, यंत्राचे-मशीनचे आवाज त्याचबरोबर माणसांचे शब्दोच्चारण हे सतत कानावर पडत असतात आणि त्यातून त्या शब्दांचा अर्थव्यवहार ठरत असतो. प्रसंगानुसार, संदर्भानुसार, ध्वनींच्या आरोह-अवरोहानुसार, आघातानुसार ऱ्हस्व-दीर्घ असे शब्दांचे उच्चार होत असतात आणि त्यातून भाषाग्रहणाची प्रक्रिया होत असते. त्यामध्ये श्रवणाचे सातत्य असणे आवश्यक असते. काळानुसार, वाढत्या वयानुसार जेव्हा समूहाशी, समाजाशी संवाद साधण्याची वेळ येते तेव्हा मात्र भाषेचे काळजीपूर्वक आकलन होणे गरजेचे आहे. कारण समाजामध्ये आपण बोलीभाषेत आणि व्यावहारिक भाषेत संवाद साधत असतो. अशावेळी शब्दांच्या, वाक्यांच्या, म्हणींच्या, वाक्‌प्रचाराच्या अर्थच्छटा व वापर हा गरजेचा असतो. त्यामुळे श्रवणातून त्याचा उपयोग कसा आणि कुठे करावयाचा असतो. हे आपणाला कळते. त्यामुळेच श्रवण कौशल्य हे मूलभूत कौशल्य मानले गेले आहे.

#### ४.३.१.१ श्रवण म्हणजे काय? :

श्रवण (Listening) या शब्दाच्या अनेक व्याख्या केल्या जातात. 'विशिष्ट संदेश देणारे अर्थपूर्ण ध्वनी लक्षपूर्वक ऐकणे व त्याचा अर्थबोध होणे म्हणजे श्रवण होय.' समोरच्या व्यक्तीने बोललेले शब्द नीट ऐकणे

व त्याला काय म्हणायचे आहे ते समजून घेणे या प्रक्रियेला श्रवण असे म्हणतात. 'मौखिक संभाषण समजून घेण्याची व त्याला अनुसरून परिणामकारक प्रतिसाद देण्याची कुवत ज्यामुळे निर्माण होते, ते 'श्रवण-कौशल्य' होय, असे डॉ. दत्तात्रेय गंधारे म्हणतात. येथे ऐकणाऱ्याचे आकलन आणि प्रतिसाद यांचाही समावेश श्रवण या संकल्पनेमध्ये केलेला दिसतो.

**४.३.१.२ श्रवणाचे स्वरूप व महत्त्व :**

इंद्रियांच्याद्वारा घटना-प्रसंगांचे केलेले आकलन म्हणजे ग्रहण होय. दृश्य, नाद, गंध, स्पर्श आणि चव या माध्यमांतून माणूस भोवतालच्या जगाचे आकलन आणि ग्रहण करत असतो. त्यामध्ये नाद म्हणजे श्रवण ही संकल्पना अभिप्रेत आहे. कानावर आलेला प्रत्येक ध्वनी हा अर्थपूर्ण असतोच असे नाही; तर भोवतालच्या समाजव्यवस्थेने ज्या ध्वनींना रूढार्थाने जो अर्थ प्राप्त करून दिलेला आहे त्या अर्थाचा संस्कार, पूर्वसंदर्भ, पूर्वज्ञान, त्याची नियमितता आणि परंपरा या सर्वांचे संमिश्रण म्हणजे रूढार्थ; हा त्या श्रवणातून अभिप्रेत असतो. श्रवणाच्या या सातत्यपूर्ण प्रक्रियेतूनच आकलनाचा आणि ज्ञानाचा स्तर उंचावत असतो. उत्तम संवाद हा उत्तम आकलनाने आणि श्रवणाने होत असतो. त्यामुळे श्रोता म्हणून आपले 'अवधान' एकाग्र असणे आवश्यक असते. अवधानाशिवाय श्रवण शक्य नाही. वक्त्याच्या संवादाकडे एकाग्र चित्ताने लक्ष दिले तरच उत्तम श्रवण होऊ शकते, हे ध्यानात घ्यावे लागते.

**४.३.१.३ श्रवणाचे फायदे :**

व्यक्तीच्या जडणघडणीत, व्यक्तिमत्त्व विकासात श्रवण कौशल्य महत्त्वपूर्ण ठरते. लक्षपूर्वक ऐकणाऱ्या व्यक्तीच्या आकलनाचा व ज्ञानाचा स्तर खूप उंचावतो. बहुश्रुत व्यक्ती हळूहळू अनेक विषयात पारंगत होऊ लागते. एखाद्या विषयाची खोली व व्याप्ती कळू लागते. म्हणजेच उत्तम श्रवण असणारी व्यक्ती प्रगल्भ होत जाते. उत्तम श्रवण असणारी व्यक्ती समोरच्या बोलणाऱ्या व्यक्तीस त्याच्या भाव-भावना, दृष्टिकोण यासह ओळखू लागते. उत्तम श्रवणामुळे गैरसमज न होता, चुकीचा अर्थ न घेता संवाद होत राहतो. कामात गतिमानता येते. त्यामुळे उत्तम श्रवण असणारी व्यक्ती इतरांना प्रिय व आदरणीय ठरते. याउलट ज्याचे श्रवण चांगले नाही, जो ऐकलेल्या गोष्टींचा योग्य अर्थ समजू शकत नाही, त्याच्याबरोबर इतरही संवाद करण्यास टाळाटाळ करतात. असा माणूस अप्रिय ठरतो.

**४.३.१.४ श्रवण प्रक्रियेतील अडथळे :**

श्रवण प्रक्रियाही विनाअडथळा पूर्णहोत नाही तर तीमध्ये काही अडथळे येतातच. हे अडथळे पुढीलप्रमाणे सांगता येतील. १. मनाची एकाग्रता न होणे, भाषण/संभाषण/ व्याख्यानावेळी मनात इतर विचार येणे, २. ऐकता ऐकता इतर कृतीही करत राहाणे. (लिहिणे/खाणे इ.), ३.अनारोग्य, शारीरिक पिडा, वेदना इ., ४. झोपेचा अंमल, सुस्ती, नशा, आजारपणाची ग्लानी, ५. संभाषणातील विषयाबाबत अरुची, ६. व्यक्तीबद्दल, चर्चाविषयाबद्दल पूर्वग्रह, ७. 'मला माहीत आहे, मला सगळे येते या भावनेने केलेले दुर्लक्ष, ८. चर्चाविषयाचे पूर्वसंदर्भ माहीत नसणे, ९. संभाषणात येणाऱ्या अनाकलनीय संकल्पनांमुळे, शब्दांमुळे भाषण जड वाटणे, १०. गोंगाट, कोलाहल, ११. ऐकतानाच त्यावर विचार करण्याची सवय, मनात नवीन मुद्दे

सुचणे, १२. समोरच्याचे भरभर बोलणे, एकाच वेळी अनेक संदेशांची गर्दी किंवा हळू आवाज, संथ बोलणे, १३. निरुत्साह, उदासीनता, कोणत्याही प्रतिक्रियेशिवाय निष्क्रिय ऐकणे, १४. वक्त्याचे असंबंद्ध बोलणे, बोलण्यात सुसंगती नसणे इ. गोष्टी श्रवणप्रक्रियेमध्ये अडथळा आणतात.

### ४.३.१.५ श्रवण कौशल्य सुधारण्याचे उपाय :

उत्तम श्रवणात अडथळा आणणाऱ्या बऱ्याच अडचणी या श्रोत्यानेच निर्माण केलेल्या असतात. पूर्ण क्षमतेने व चिकाटीने प्रयत्न केल्यास श्रोता त्यावर मात करू शकतो. श्रोत्याने सर्वप्रथम स्वत:च्या मनावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करावा. लक्षपूर्वक ऐकणे ही स्वत:चीच गरज आहे, हे मनावर बिंबवावे. बोलणारी व्यक्ती, बोलण्याचा विषय याबाबत सकारात्मक विचार करावा. बोलणाऱ्याच्या शब्दांबरोबरच त्याच्या हावभावांच्या आधारे त्याला काय म्हणायचे आहे, हे समजून घ्यावे. श्रवण करताना मनामधील राग-लोभादी भावनांचा प्रक्षोभ टाळावा. बोलणाऱ्याला असे दर्शवा की तुमची पुढे ऐकण्याची इच्छा आहे. ऐकताना महत्त्वाचे मुद्दे टिपून घेण्याची सवय लावा. ऐकत असताना इतरांशी बोलणे, दुसरीकडे लक्ष किंवा मोबाईलशी चाळे करणे असले उद्योग करू नका. लक्षपूर्वक ऐकणे या कृतीशी तुम्ही जेवढे प्रामाणिक असाल, एकरूप असाल तेवढे अडथळे दूर होत राहतील. बोलणाऱ्याचे मुद्दे, मांडणी नाकारायची आहे, असे अगोदरच ठरवून श्रवण प्रक्रियेत जाऊ नका. तटस्थपणे, अवधान देऊन श्रवण करा. बोलणाऱ्याची भूमिका, भावना, दृष्टिकोण लक्षात घेऊन त्याने मांडलेला विषय श्रवण करा. आपोआपच आपले श्रवणकौशल्य वाढेल. लवकरच तुम्ही ज्ञानी श्रोता ठराल. मग बोलणाऱ्याच्या मांडणीतील उणिवा, दोष, विसंगती तुम्ही लक्षात आणून दिली तर बोलणारा ते आदरपूर्वक स्वीकारेल.

### ४.३.१.६ श्रवण : मार्गदर्शक तत्त्वे

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी श्रवणासंदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे सांगितलेली आहेत. (जोशी, २००७:७६)

१. कोणतीही बाब सर्व प्रकारच्या प्रतिसादांसहित सक्रिय स्वरूपात श्रवण करणे.

२. जे बोलले गेलेले नाही, वगळले गेलेले आहे त्याचाही बोध करून घेतला जाणे. भाषेतर हातवारे, हालचाली, अंगविक्षेप इ. बाबतीत दडलेला अर्थ शोधता येणे.

३. बोलणाऱ्यास जे वाटते त्याची ऐकणाऱ्यास जाणीव होणे. केवळ वैचारिक नव्हे तर भावनात्मक ऐक्याची प्रस्थापना होणे.

४. खुल्या दिलाने ऐकणे.

५. शोधक, विवेचक पद्धतीने ऐकणे.

श्रवण केलेल्या ज्ञानातील १० टक्के गोष्टीच आपल्या लक्षात राहतात. त्यामुळे श्रवण केलेल्या मोठ्या एकसलग मजकुराचा सार काय हे लक्षात घेणे गरजेचे असते. उत्तम श्रोता बोलणाऱ्याच्या शैलीचे सौंदर्य

आणि त्याच्या विचारांची सुसूत्रता एकाच वेळी अनुभवतो. अशा वेळी श्रवण ही आनंददायी ज्ञानसाधना आहे, असे म्हणता येते.

### ४.३.२ वाचन कौशल्य (Reading skill) :

दुसरे मूलभूत कौशल्य म्हणजे वाचन हे होय. व्यक्तिमत्त्व विकासामध्ये या कौशल्यालाही महत्त्वपूर्ण स्थान आहे. अक्षरओळख झाल्यानंतर उत्तमोत्तम साहित्य वाचून, अर्थबोध, अर्थनिर्णयन करून आपल्या विचारांमध्ये, कल्पनाशक्तींमध्ये भर घालण्यासाठी हे कौशल्य गरजेचे ठरते. आपल्या संस्कृतीच्या रूढी-परंपराची ओळखही यातून होते. लिपीचा शोध लागल्यानंतर प्रत्येक समाजाने आपला इतिहास, भूगोल, विज्ञान, साहित्य आणि संस्कृतीही लिपियुक्त भाषेत बद्ध केलेली आहे. त्या-त्या समाजाची स्वत:ची अशी स्वतंत्र भाषा असते. तिचा स्वीकार त्यांनी केलेला असतो. त्यामुळे व्यक्तीचे वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवन संपन्न करण्यासाठी वाचन हे कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. डॉ.ल.रा.नसिराबादकर यांच्या मते, विद्यार्थांच्या दृष्टीने वाचनाचा मोठा लाभ म्हणजे त्यांचा शब्दसंग्रह वाढतो. म्हणी-वाक्प्रचार माहीत होतात. नवनव्या शब्दांची ओळख होते. कठीण शब्दांचे अर्थ कळतात. शब्दांच्या अर्थच्छटा समजतात. एखादा लेखक जीवनाविषयी कसा विचार करतो ते वाचनातून कळते. त्यांचा संवेदनक्षम मनांवर संस्कार होतो. क्रमिक पुस्तकांशिवाय अवांतर विषयांवरील पुस्तकांचे, संदर्भ ग्रंथांचे वाचन आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढविते. अभिजात साहित्यकृतींतील (शाकुंतल, उत्तररामचरित, नामदेव-तुकोबांचे अभंग, कबीरांचे दोहे, रघुनाथपंडितांचे नलदमयंती स्वयंवर, मोरोपंतांचे आर्याभारत; 'पण लक्षात कोण घेतो!', 'मी', 'गारंबीचा बापू', 'पडघवली', 'धग' इ. कादंबऱ्या) जीवनाशयाने, धीरोदात्त नायक-नायिकांच्या चित्रणांनी उच्च जीवनाच्या जाणिवा संस्कारित होतात. मनाची उंची वाढते. त्यातील निसर्गवर्णनांतील कल्पनाविलासाने आपल्याही कल्पनाशक्तीला पंख फुटू शकतात. अभिरुची संस्कारित होते. भाषासमृद्धी होते. अभिजात कथनपद्धतीही शिकायला मिळते. जुन्या काळातील कीर्तनसंस्थेत माणसाची श्रवण-वाचनाची कौशल्ये समृद्ध करण्याचे केवढे तरी सामर्थ्य होते. एकूण, वाचनाने माणूस बहुश्रुत होतो. वाचन हे भाषिक कौशल्य व्यावहारिक आणि कलात्मक अशा दोन्ही स्तरांवर महत्त्वाचे आहे. (नसिराबादकर, २००८,३)

#### ४.३.२.१ वाचन कौशल्याचे स्वरूप व महत्त्व :

वाचन हे दोन प्रकारचे असते. त्यातील पहिला प्रकार हा प्रकट वाचनाचा असतो; तर दुसरा प्रकार हा मूक वाचनाचा असतो. प्रकट वाचनाचा संबंध हा मोठ्याने वाचण्याशी येतो. पुस्तकातील शब्दांवर किंवा वाक्यांवर नजर ठेवून मोठ्याने उच्चारण करणे म्हणजे प्रकट वाचन होय. प्रकट वाचनातून शब्दांचा भाव उच्चारातून व्यक्त होणे अपेक्षित असते. यामध्ये शब्दांतील विविध अक्षरांवर विशिष्ट असा आघात देऊन हे वाचन केले जाते. प्राथमिक शाळेतील मुलांकडून प्रकट वाचन हे अपेक्षित असते. कारण भाषेची प्राथमिक जाण त्यांना या वयात अपेक्षित असते. त्यामुळे मोठ्याने वाचल्याने स्पष्ट ध्वनी उच्चारण्याची सवय त्यांना लागते. शिवाय जोडाक्षरांचे उच्चार, अवघड शब्दांचे उच्चार, शब्दांचे रूढ उच्चार, एकाच वर्णाचे दोन भिन्न उच्चार या सर्व प्रकट वाचनाने आत्मसात होणाऱ्या बाबी आहेत. त्यामुळे प्राथमिक पातळीवर प्रकट वाचन

ही गरजेची बाब आहे. त्यानंतरचा प्रकार म्हणजे मूक वाचन. हे वाचन केवळ डोळ्यांनी, मनातल्या मनात केले जाते. वाढत्या वयानुसार विशेषत: माध्यमिक स्तरातील विद्यार्थ्यांपासून पुढे सर्व वयोगटांमध्ये ही वाचन-प्रक्रिया प्रचलित असलेली दिसून येते. इथे भाषेची ओळख, जाण आत्मसात केल्यामुळे विविध शब्दोच्चारण, अर्थच्छटा माहीत असल्यामुळे अर्थबोध, अर्थनिर्णयन हीच बाब महत्त्वाची ठरते. चित्त एकाग्र करून मूक वाचन केले जाते. त्यामुळे मजकुरातील आवश्यक तो अवकाश आत्मसात करता येतो. त्याच्या अवतीभोवतीचे सर्व संदर्भ व त्याचे अन्वयार्थ लावण्याची प्रक्रिया आपोआप चालू होते. काळाचा पट आपोआप डोळ्यासमोर उभा राहतो. शिवाय मजकुराविषयी आपली स्वत:ची एक मनोभूमिकाही निश्चित होत जाते.

वाचन कशासाठी? या प्रश्नाचीही विविध उत्तरे मिळतात. आनंद व मनोरंजनासाठी वाचन, लोकरंजनातून लोकशिक्षण घडविण्यासाठी वाचन, मानवी जीवनाचे, मनाचे व्यामिश्र गुंतागुंतीचे स्वरूप समजून घेण्यासाठी वाचन, माणूस, निसर्ग समजून घेण्यासाठी वाचन आणि अध्ययन व ज्ञानप्राप्तीसाठी वाचन असे अनेक हेतू आपणास सांगता येतात. एखादी व्यक्ती मनोरंजनासाठी वाचत असली तरी तिला विविध गोष्टींचे ज्ञान होत जाते. याउलट अध्ययन किंवा ज्ञानप्राप्तीसाठी वाचणाऱ्यांनाही नवीन काही शिकता आले याचा आनंद होत राहतो. मुळात वाचन व त्याद्वारे घडणारे शिक्षण ही आनंदमय प्रक्रिया आहे. जलद वाचन व संथ, चिंतनात्मक वाचन असे वाचन कौशल्याचे दोन प्रकार आढळतात. हलकेफुलके साहित्य, गोष्टींची पुस्तके भरभर वाचून होतात. कारण अशा पुस्तकांचे आकलन लवकर होते. त्यामुळे वाचनवेग वाढतो. याउलट शास्त्रीय माहिती देणारे ग्रंथ, संशोधनपर ग्रंथ, समीक्षा ग्रंथ हे संथ गतीने वाचले जातात. कारण त्यातील आशय समजून घेण्यास वेळ लागतो. काही वेळेस एखादा परिच्छेद पुन्हा वाचावा लागतो. वाचलेल्या वाक्यांवर चिंतन करावे लागते. लिहिलेल्या आशयातील तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान समजून घ्यावे लागते. म्हणून हे वाचन संथ व चिंतनात्मक होत राहते.

### ४.३.२.२ वाचन कौशल्यात येणारे अडथळे :

वाचन कौशल्याच्या वापरात व विकासात तीन प्रकारचे अडथळे येतात - १. बाह्य अडथळे, २. शारीरिक अडथळे, ३. मानसिक पातळीवरील अडथळे यांचे विवेचन खालीलप्रमाणे -

१) बाह्य अडथळ्यांमध्ये शांत वातावरणाचा अभाव, अचानक व्यत्यय आणणाऱ्या व्यक्ती, मध्येच लागलेले काम, इतरांनी घातलेली बंधने यांचा समावेश होतो.

२) शारीरिक अडथळ्यांमध्ये आजारपण, झोप, थकवा, शारीरिक दुर्बलता, भूक लागणे, एकसलग बसण्यास येणारी अडचण, दृष्टिदोष यांचा समावेश होतो.

३) मानसिक व बौद्धिक अडथळ्यांमध्ये उदासीनता, निरुत्साह, अरुची, मनात राग-द्वेष-प्रेम-असूया अशा भावनांचा होणारा उद्‌भव, मनाची चंचलता, अचानक येणारे अनेक विचार यांचा समावेश होतो.

वरील अडचणींमुळे वाचन नीटपणे होत नाही. याशिवाय वाक्यरचनेचा नेमका अर्थबोध न होणे, बौद्धिक थकवा याही कारणाने वाचन नीट होत नाही. काही वेळेस सलग खूप वेळ वाचन, अभ्यास केल्याने नंतर

एक अशी वेळ येते की आपण काय वाचत आहोत, त्याचा अर्थ काय, ते कळेनासे होते. थोडी विश्रांती घेऊन वाचन सुरू केले की अर्थबोध होतो.

**४.३.२.३ वाचन कौशल्य विकासाचे उपाय :**

वाचन कौशल्य विकसित होण्यासाठी काही उपाय करावे लागतात. डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी वाचन कौशल्य विकासाचे खालील उपाय सांगितलेले आहेत.

१. नेहमी शारीरिक स्वास्थ व मानसिक प्रसन्नता असताना वाचन करावे.

२. वाचनाचा उत्साह असतो तेव्हा कठीण वाटणारा विषय प्रथम वाचावा.

३. कोणत्याही विषयाचे शास्त्रीय लेखन हे संकल्पनात्मक असते. त्यामुळे प्रारंभीच्या संकल्पना समजल्याशिवाय पुढच्या समजू शकत नाहीत.

४. शब्दसंग्रह वाढवावा. गरजेनुसार शब्दकोश, म्हणी व वाक्प्रचार कोश, संकल्पना कोश यांचा वापर करावा.

५. वाचलेल्या मजकुराचे मनन, चिंतन करावे. वाचलेल्या मजकुरासंबंधी इतरांशी चर्चा करावी.

६. वाचनात सातत्य असावे.

७. वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासात आणि ज्ञानवृद्धीस अत्यंत आवश्यक असते, याचे भान बाळगावे.

८. वाचन हे आनंददायी असते असे स्वत:ला पुन:पुन्हा सांगावे.

९. वाचताना इतर गोष्टी करणे (उदा. खाणे, इतरांशी बोलणे, फोनचा वापर, चालणे) हे टाळावे.

१०. वाचताना मनात येणारे इतर विचार प्रयत्नपूर्वक टाळावेत. मन एकाग्र करून वाचन करावे.

**४.३.२.४ उत्तम वाचनाची पद्धती :**

विद्यार्थ्यांसाठी उत्तम वाचनाची एक प्रचलित पद्धती आहे. तिला SQRR असे संबोधले जाते. सर्वेक्षण (Surve), प्रश्न (Question), वाचन (Reading), आठवणे (Recall the memories), पुनरावलोकन (Review) या टप्प्यांनी केलेले वाचन हे आकलनास सुलभ व दीर्घकाळ लक्षात राहणारे असते.

१. **सर्वेक्षण :** तुम्ही जो घटक, जे पुस्तक वाचणार आहात त्याचे ढोबळ निरीक्षण करणे म्हणजे सर्वेक्षण होय. पाठाचे, पुस्तकाचे शीर्षक, लेखक, प्रस्तावना, सारांश, पृष्ठसंख्या, आतील चित्रे किंवा आकृत्या यावर प्रथम लक्ष देणे.

२. **प्रश्न :** प्रस्तुत पाठ, पुस्तक वाचताना कोणते प्रश्न उपस्थित होतील याचा अंदाज करणे व वाचताना त्या प्रश्नांच्या उत्तराचा शोध घेणे. उदाहरणार्थ, एखादी कथा वाचताना कथेचे शीर्षक काय? कथेचे लेखक कोण? कथानक कोणते? व्यक्तिरेखा कोणत्या? कथेत काय घडते? कथेचा संदेश काय? असे प्रश्न अगोदर मनात उपस्थित करून वाचन करत गेल्यास वाचन अधिक प्रभावी होते.

**३. वाचन :** पाठ, पुस्तक पूर्ण वाचणे. सोबत दिलेली चित्रे, आकृत्या, आलेख व माहिती यांचा संबंध पडताळून पाहणे.

**४. आठवणे :** वाचताना मध्ये मध्ये थांबून वाचलेला भाग आठवणे. शेवटी संपूर्ण पाठाचा गोषवारा आठवणे.

**५. पुनरावलोकन :** आपण मनात जो हेतू ठेवून, जे प्रश्न उपस्थित करून वाचन केले, त्या हेतूची, प्रश्नांची पूर्तता झाली का, ते पाहणे.

पाठात, पुस्तकात शाब्दिक मजकूरासोबत चित्रे, रेखाटणे, आकृत्या, तक्ता, आलेख यांचाही वापर केला जातो. मूळ मजकूराचे आकलन सुलभपणे व्हावे यासाठी ही चित्रभाषा असते. मजकूरात वापरलेली चित्रभाषा वाचन कौशल्याला प्रोत्साहन देणारी ठरते.

मो.रा.वाळंबे यांच्या मते, सर्वच ज्ञानशाखांशी आपला परिचय वाढत जातो तो वाचनाने. त्यामुळे वाचनाचे महत्त्व लक्षात घ्यावे. गणित विषयातील 'उदाहरण' कसे वाचावे, 'भूमिती' विषयातील 'प्रमेय' कसे वाचावे, एखादा वस्तुनिष्ठ, माहितीपूर्ण विज्ञानाचा पाठ कसा वाचावा, एखाद्या भावपूर्ण गद्य उताऱ्याचे वाचन कसे करावे, विचारप्रवर्तक गद्य उताऱ्याचे वाचन कसे करावे, गेय कवितेचे लयबद्ध वाचन कसे करावे, मुक्तच्छंदातील कवितेचे वाचन कसे करावे इत्यादी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी सहेतूक, योजनाबद्ध प्रयत्नांचा सातत्यपूर्ण अभ्यास आवश्यक आहे. वाचनासाठी पुस्तके व वह्या कशा हाताळाव्यात, ग्रंथमैत्री कशी विकसित व्हावी, ग्रंथालय संपर्क कसा वाढवावा, यासाठीही नियोजनबद्ध प्रयत्न आवश्यक आहेत. वाचनाचा वेग क्रमाने वाढवित नेणेही आवश्यक आहे. (वाळंबे, २०१५:३३६) याचा अर्थच वाचनप्रक्रिया ही विषयानुसार आणि आशयानुसार भिन्न भिन्न पद्धतीची असू शकते. त्यामुळे वाचकाने वा विद्यार्थ्यांने प्रत्येक विषयाची वाचनपद्धती आत्मसात करणे आवश्यक आहे. त्या वाचनपद्धतीचा संस्कार स्वत:वर करून घेणे गरजेचे आहे. तरच त्याला योग्य वाचन करता येऊ शकेल. अन्यथा त्याला संबंधित विषयाचे आकलन होण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

### ४.३.३ भाषण कौशल्य (Speech skill) :

मूलभूत भाषिक कौशल्यांमध्ये भाषण या कौशल्याचाही प्रामुख्याने समावेश होतो. भाषण म्हणजे एका व्यक्तीने आपल्या मनातील विचार योग्य शब्दात व प्रभावी शैलीत मांडणे होय. 'आपले विचार स्पष्ट, मुद्देसुद, परिणामकारक, साभिनय व्यक्त करण्याची कला' अशी भाषणाची व्याख्या केली जाते. संवाद किंवा भाषणाचे मुख्यत: दोन प्रकार मानले जातात. त्यात औपचारिक भाषण वा संवाद आणि अनौपचारिक भाषण वा संवाद. अनौपचारिक भाषण वा संवादामध्ये समूहामध्ये किंवा व्यक्तीव्यक्तीमध्ये कोणत्याही विषयाशी संबंधित अनौपचारिक म्हणजे घरगुती प्रकारचा संवाद होत असतो. त्यामध्ये विषयाच्या मांडणीत घरगुती गप्पांचे स्वरूप येते. विषयामध्ये सुसूत्रता असेलच असे नाही. किंबहुना संवादाचे किंवा भाषणाचे स्थळ हे बसण्याची-उठण्याची नियमित जागा असते. त्यामुळे त्याला भव्य-दिव्य किंवा लक्षवेधी स्वरूप असतेच असे

नाही. औपचारिक भाषण व संवादाचे स्वरूप मात्र यापेक्षा वेगळे असते. यामध्ये बऱ्याच बाबींचा जाणीवपूर्वक विचार करावा लागतो. त्यामध्ये प्रेक्षकांचा, श्रोत्यांचा आणि प्रत्यक्ष वक्त्याचा संबंध हा हेतुपुरस्सर आलेला असतो. त्यासाठी विशिष्ट कार्यक्रमाची आखणी केलेली असते. त्यामुळे अनेक गोष्टींचा विचार व सराव त्यासाठी आवश्यक असतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अनेक प्रसंगात उदा. सेमिनार, मुलाखती, विविध स्पर्धांमध्ये आपले विचार मांडावे लागतात. एखाद्या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करावे लागते. एखाद्या विषयावर व्याख्यान देण्यापर्यंत असा हा सगळा मौखिक अभिव्यक्तीचा भाग भाषण या संज्ञेत येतो. अशा वेळी भाषणाची पूर्वतयारी असणे आवश्यक असते.

औपचारिक भाषणव्यवस्थेमध्ये बहुसंख्य व्यक्तींच्या समूहापुढे व्यक्तीला संवाद साधावयाचा असतो. विशिष्ट विषयाचे प्रतिपादन करावयाचे असते. त्यामुळे विषयाच्या मांडणीत सुरुवात-मध्य-शेवट असा क्रम असणे गरजेचे असते. कोणत्याही कार्यक्रमाची आखणी ही विशिष्ट हेतूसाठी करण्यात आलेली असते. त्या हेतूची पूर्ती हेच त्या कार्यक्रमाचे उद्दिष्ट असते. त्यामुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये बोलावण्यात आलेले वक्तेही त्याच पद्धतीचे भाषण वा संवाद साधणारे असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वक्त्याच्या वाणीमध्ये आवाहकता असणे आवश्यक असते. जो मनुष्य वक्ता म्हणून समूहाला भावनिक आवाहन करू शकतो; तो वक्ता समूहाच्या मनावर अधिराज्य गाजवू शकतो. त्यामुळे भाषणामध्ये आवाहकता हा गुण आवश्यक असतो. आणि ही आवाहकता भाषेमध्ये असते. त्यामुळे वक्त्याकडे भाषाप्रभुत्व, समोर बसलेल्या समूहाची भाषा किंबहुना काही पारिभाषिक शब्द त्याला अवगत असणे गरजेचे असते. जीवनाविषयी सकारात्मक धारणा, विविध अनुभवांचे आकलन, मांडण्याची हातोटी, वाचनाचा व्यासंग इत्यादी बाबी त्याला अवगत असाव्या लागतात. शिवाय त्यांच्यापद्धतीची वेशभूषा जर त्याने परिधान केली तर तो लोकांना आपलासा वाटतो. हे ध्यानात घ्यावे लागते. व्यक्तिमत्त्व आणि भाषा यांचा अतूट संबंध असतो. पहिला प्रभाव हा व्यक्तिमत्त्वाचा ठरत असतो. त्यामुळे बाह्य पातळीवर व्यक्तीचे व्यक्तित्व रूबाबदार असणे गरजेचे असते. शिवाय संवादाच्या सुरुवातीपासूनच अर्थवाहकतेमुळे तो आपल्या भाषेच्या माध्यमातून स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा परिचय करून देऊ शकतो. काही व्यक्ती या मृदुभाषी असतात; अशा व्यक्ती लोकांना लगेच आपलंसं करतात. ज्यांचा चेहरा हसतमुख असतो; त्यांच्याकडे पाहून मन प्रसन्न होते. हा एकूणच व्यक्तिमत्त्वाचा प्रभावंच मानावा लागतो. डॉ.ल.रा.नसिराबादकर यांच्या मते, प्रसंगानुरूप शब्दयोजना विशिष्ट वातावरण निर्माण करते. आशयानुरूप केलेली अभिव्यक्ती श्रोत्यांना आपल्या कवेत घेते. जाणती माणसे शब्दांची व्याप्ती व शक्ती नुसती पाहात नाहीत, ऐकत नाहीत, वाचत नाहीत; तर अनुभवतात. भाषणातून एकाच शब्दाची जे सतत पुनरुक्ती करत राहातात, त्यांचे शब्ददारिद्र्य तर प्रकट होतेच, पण ते हास्यास्पदही ठरतात. जाणता वक्ता श्रोत्यांना उद्देशून उच्चारलेल्या संबोधनातूनच सभा जिंकतो. शब्द हा तुमच्या संस्कारित, समग्र व्यक्तिमत्त्वाचा हुंकार असतो. 'ब्रदर्स ॲण्ड सिस्टर्स' या संबोधनातून स्वामी विवेकानंदांनी केवळ धर्मपरिषदच जिंकली नाही, तर अर्धे जग जिंकले. 'सभ्य गृहस्थहो,' हे आचार्य अत्रे यांचे उद्गार बाहेर पडताच श्रोत्यांतून हास्याच्या लाटा उसळत. (नसिराबादकर,२००८:५)

डॉ. ल.रा.नसिराबादकर यांनी परिणामकारक अभिव्यक्तीसाठी कोणकोणत्या गोष्टी आत्मसात केल्या पाहिजेत हे सांगितले आहे. परिणामकारक अभिव्यक्तीसाठी समोरच्या व्यक्तीशी, सभेतील श्रोत्यांशी संवाद साधण्यासाठी भाषा प्रमाणशुद्ध बोलभाषा असावी, तीत ग्रांथिकता नसावी. अलंकृती, संस्कृतप्रचुरता व विद्वज्जड शब्द टाळावेत. तसेच ग्राम्यताही टाळावी. नेहमीच्या बोलण्यातील सहजता तीत असावी. 'पाहुण्यांच आगमन झालं' ऐवजी 'पाहुणे आले'; 'प्रतिपादन केलं' ऐवजी 'सांगितलं' अशी सोपी भाषा श्रोत्यांना मानवते. ही आपली भाषा आहे, असे त्यांना वाटते. समाजातील वक्त्याला लोकांची भाषा अवगत असेल तर लोकांत त्याच्याविषयी स्नेहाची व आदराची भावना निर्माण होईल. भाषेच्या साधेपणामुळे तो अर्थ मनात बरोबर बिंबतो. म्हणून तर भाष्य करताना ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी 'आबालसुबोध' ओवी वापरली. वक्त्यानेही श्रोत्यांचे बौद्धिक वय आणि स्तर यांनुसार भाषा वापरावी. महत्त्वाचे म्हणजे, आपले बोलणे मैत्रीपूर्ण शैलीतील व आवाजातील असावे. संस्कृतिरक्षकाच्या दंडधारी आदेशासारखे नसावे. भाषणाचा शेवट परिणामकारक होईल अशी मांडणी असावी. पाठांतर, कवितांची अवतरणे, सुभाषिते, थोरांची वचने, श्रेष्ठ साहित्यकृतींचे संदर्भ भाषणातील विचार पटवून द्यायला उपयुक्त ठरतात त्या विचाराला धाडसपणा आणतात. शब्दयोजना भाषणाचा पोत भरीव करते. पाठांतरामुळे अवतरणक्षमता तर वाढतेच पण, शब्दभांडारही समृद्ध होते. मात्र भाषणात केवळ पाठांतराचा किंवा अवतरणांचाच वर्षाव नसावा. अन्यथा तुमचे स्वत:चे विचार कोणते, असा प्रश्न निर्माण होईल. (नसिराबादकर,२००८:६)

वक्त्याकडे बोलीभाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. एकाच प्रदेशातील विविध बोलींचे विशेष त्याला स्थूलमानाने अवगत असले पाहिजे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर कोंकणी, पुणेरी, मराठवाडी, वैदर्भी, खान्देशी, नगरी आदी मराठींच्या बोलींचा परिचय त्याला असावा. जेणेकरून भाषण करताना त्या भाषेचा आणि भाषणाचा ठसा त्याला श्रोत्यांवर किंवा प्रेक्षकांवर करता येईल. समजा एखादा वक्ता कोल्हापूरातील व्यासपीठावरून भाषण देत आहे तर त्याने कोल्हापूरी बोलीतील काही खास शब्द भाषणात वापरले तर श्रोत्यांना ते आपले वाटून त्यांच्यावर त्या भाषणाचा प्रभाव अधिक होतो. त्यामुळे उत्तम प्रतीचा शब्दसंग्रह, त्याच्या अर्थच्छटा या त्याला माहीत असणे आवश्यक असते.

शब्दसंग्रहाबरोबर भाषण कौशल्यामध्ये आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे वक्त्याचा आवाज हा होय. वक्त्याचा आवाज जितका श्रवणीय असेल तितका तो सभेला संमोहित करू शकतो. त्यामुळे वक्त्याने आपला आवाज ऐकीव करणे आवश्यक आहे. त्यासाठी भाषण करतेवेळी शब्दांवर योग्यवेळी आघात करणे गरजेचे आहे. प्रसंगी आवाजात चढ-उतार करणे गरजेचे आहे. संवादात अस्खलीतपणा गरजेचा आहे. अनेकदा श्रोत्यांना अर्थ उमजण्यासाठी प्रसंगी विराम घेणे आवश्यक आहे. शिवाय अनेक सभेतील श्रोत्यांना प्रश्न विचारून त्यांच्याकडून प्रतिक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. जेणेकरून श्रोते हे आपले भाषण ऐकत आहेत, याची ती पोचपावती ठरेल. व्यक्तिमत्त्वात व्यक्तीत्वाचाही समावेश होत असतो. त्यामुळे देहबोलीलाही विशिष्ट असा अर्थ असतो. श्रोत्यांच्या नजरेला नजर मिळवून संवादी स्वरूपात आपले भाषण करणे; हे कोणत्याही वक्त्यासाठी हितकारक ठरणारे असते. अन्यथा विषय, आशय, वाणी ही कितीही मधुर असली

तरी भाषण पडण्याची शक्यता टाळता येत नाही. वक्ता हा भाषणाबरोबर हावभावही करत असतो. ते जर त्याच्या व्यक्तिमत्त्वातून दिसले नाहीत तर भाषण हे परिणामकारक ठरू शकत नाही. त्यासाठी वक्त्याकडे शब्दांवरचे प्रभुत्व, समयसूचकता, हजरजबाबीपणा, बुद्धिमत्ता, चातुर्य, मानवी स्वभावाचा अभ्यास, विनोदबुद्धी, योग्य तेवढा अभिनय, वेळेची अचूक जाण आणि कोठे थांबायचे याचे भान या गोष्टींची बोलण्यात, भाषणात आवश्यकता असते.

प्रत्येक माणूस सतत काही ना काही बोलत असतो. परंतु खूप बोलणे, सतत बोलणे, भरभर बोलणे आणि प्रभावी बोलणे यामध्ये अंतर असते. बोलण्यापूर्वी मनातल्या मनात शब्द, वाक्यरचना यांची जुळवाजुळव केली जाते. काय व कसे बोलायचे यांचा विचार केला जातो. कारण 'बोलून विचार करण्यापेक्षा विचार करून बोलणे' केव्हाही चांगले. मनात शब्द व वाक्यनिश्चिती झाल्यानंतरच बोलणे सुरू होते. ज्यांना मनातील विचार व त्याला अनुरूप शब्दांची व वाक्यांची निश्चिती भरभर जमते तो भरभर बोलतो. कोणतेही कौशल्य, क्षमता यांच्या विकासासाठी स्वत:कडून होणाऱ्या चुकांची दुरुस्ती करत केला जाणारा सराव महत्त्वाचा असतो. आपण जे बोलत आहोत ते समर्पक, अर्थपूर्ण आणि प्रभावी आहे का, हे स्वत:च तपासावे. बोलण्यात नवनवीन अर्थपूर्ण शब्दांचा व वाक्यबंधांचा वापर करण्याचा प्रयत्न करावा. उपमा, दृष्टांत, प्रतिमा अलंकार, म्हणी यांच्या वापराने भाषण शैलीदार व प्रभावी होते. डॉ.ल.रा.नसिराबादकर यांच्या मते, एखादा विचार श्रोत्यांच्या मनात बिंबविण्यासाठी किंवा त्यांच्या भावनांना आवाहन करण्यासाठी शब्दांची पुनरुक्ती किंवा पर्यायी शब्दांचा वापर उपयुक्त ठरतो. एखादी वस्तू, व्यक्ती, प्रसंग यांचे वर्णन करताना पर्यायवाची शब्द एकामागोमाग उच्चारले किंवा एखाद्या प्रसंगातील वर्णनात भावजागृतीसाठी छोटी वाक्ये लागोपाठ उच्चारली तर ती परिणामकारक ठरतात. परिणाम साधण्यापुरती केलेली पुनरुक्ती योग्यच असते. पण एकदा वापरलेली उपमा, विशेषणे, क्रियापदे यांचा शक्यतो पुन: पुन्हा वापर करू नये. बोलताना, भाषणात इंग्रजी शब्द शक्यतो टाळावेत, ते अजिबात वापरू नयेत असे नाही, गरजेपुरते वापरावेत. विशेषत: विज्ञानविषयक परिभाषा टाळणे शक्य नसते, तेवढ्यापुरते ते वापरावेत. त्यांचा अर्थही सांगितला तर श्रोत्यांना चांगला कळतो. पण फॅशन म्हणून किंवा प्रतिष्ठितपणा, पुढारलेपण मिरवण्यासाठी काही लोक इंग्रजी शब्द वापरतात. तसे करू नये. तसेच ग्राम्य, असभ्य शब्दही वापरू नयेत.

**४.३.३.१ भाषण कौशल्य विकासाचे उपाय :**

१. प्रथम घरात, मित्रांमध्ये बोलते व्हावे. काय बोलू, कसे बोलू हा संकोच सोडून बोलावे.

२. सोप्या वाटणाऱ्या विषयावर वडीलधाऱ्यांसमोर, शिक्षकांसमोर, समूहासमोर स्वमत प्रकट करावे, बोलावे.

३. जाणत्यांनी बोलण्यातील चूक दाखविली तर त्यावर विचार करावा. चुकीचे समर्थन करू नये.

४. एकांतात मोठमोठ्याने बोलण्याचा सराव करावा त्यामुळे भीती निघून जाते. शब्दोच्चार, बोलणे सुधारते.

५. हळू आवाजात बोलणे, तोंडातल्या तोंडात पुटपुटल्यासारखे बोलणे, अडखळत बोलणे, संथगतीने

बोलणे व पाल्हाळीक बोलणे हे भाषण कौशल्याच्या दृष्टीने दोष आहेत. तसेच संदिग्ध (अर्थ स्पष्ट न होणारे) बोलणे दोषास्पद आहे. प्रयत्नपूर्वक हे दोष टाळावेत.

६. वडीलधारे लोक, शिक्षक, हुशार वाटणारे लोक व श्रोतासमूह यांचे मनावर दडपण घेऊ नये. जे मनात असेल ते स्पष्ट, स्वच्छ व मनमोकळेपणाने बोलावे.

७. बोलण्याच्या संदर्भातील भीती मोडल्यावर प्रभावी बोलण्याच्या संदर्भात प्रयत्न करावेत.

८. इतरांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकावे. प्रभावी भाषण करणाऱ्यांचे बोलणे प्रभावी का वाटते आणि ज्यांचे बोलणे रटाळ, कंटाळवाणे वाटते ते कशामुळे, याचा विचार करावा.

९. बोलताना शब्दांची, वाक्यांची पुनरावृत्ती टाळावी.

१०. एक तास बोलण्यासाठी सहा तास तयारी करावी लागते. ही तयारी आशय व शैली या दोन्ही पातळीवरील असावी.

थोडक्यात, वाचन-निरीक्षण-श्रवण या गोष्टी बोलण्यास बळ देतात. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना भाषणातील सुभाषिते, काव्यपंक्ती यांचे आकर्षण असते. महाविद्यालयीन स्तरावर विचारसौंदर्याला महत्त्व प्राप्त होते. कमी वेळेत मुद्देसूद, सुसूत्र व प्रभावी बोलणे म्हणजे उत्तम भाषण कौशल्य होय.

### ४.३.४ लेखन कौशल्य (Writting skill) :

भाषिक कौशल्यांमधील शेवटचे कौशल्य म्हणजे लेखन कौशल्य हे होय. श्रवण, वाचन आणि भाषण ही कौशल्य हस्तगत झाल्यानंतर व्यक्तीला लेखन कौशल्यदेखील आत्मसात होणे गरजेचे आहे. खरे म्हणजे अनेक लेखकांना 'सिद्धहस्त लेखक' असे म्हटले जाते. साक्षात सरस्वतीच त्यांच्या लेखनातून संवाद साधत असते. याचा अर्थ त्यांनी आपल्या लेखनसरावातून या कौशल्यावर मजबूत पकड निर्माण केलेली असते. आपली लेखनप्रतिभा पणाला लावून ते साहित्याचे लेखन करत असतात. त्यामुळे त्यांचा स्वत:चा स्वतंत्र वाचकवर्ग तयार झालेला असतो. किंबहुना भाषेला अर्थाचे विविध पदर ते देऊ पाहातात. त्यामुळे त्यांचे लेखन हे शैलीदार स्वरूपाचे झालेले असते. असे आपणाला दिसून येते. उदा. वि. स. खांडेकर हे लेखक. याचा अर्थ अभिव्यक्तीचे एक महत्त्वपूर्ण कौशल्य म्हणून याकडे पाहिले जाते.

कोणतेही लेखन हे प्रासंगिक, अल्पकालिक किंवा दीर्घकालीन प्रक्रियेचा भाग असते. त्यामुळे लेखकाला विशिष्ट अशा मनोवृत्तीतून प्रवास करावा लागतो. अनेकदा समाजापासून दूर जाऊन एकांतात ही प्रक्रिया पूर्ण करावी लागते. कोणताही अनुभव हा सामाजिक असतो; परंतु अभिव्यक्ती मात्र वैयक्तिक असते. अनेकदा तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयाचे लेखन हे एकांतातच पूर्ण केले जाते. याचा अर्थ लेखन ही एकांतात घडणारी प्रक्रिया असते. असे असले तरी लेखनक्रियेसाठी काही गोष्टी या भाषेच्या आणि अभिव्यक्तीच्या अंगाने आत्मसात करणे आवश्यक असतात. कारण कोणतेही लेखन हे जेव्हा समाजात पोहोचते तेव्हा त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया या होत असतात. तेव्हा आपली लेखनी समतोल ठेवण्यासाठी लेखकाला अनेकदा बारीक-सारीक गोष्टींचा विचार करावा लागतो. त्याची जबाबदारी त्याला स्वीकारावी लागते ते ध्यानात घेणे

गरजेचे आहे. अभिव्यक्तीचा लेखनप्रकार (उदा. कथा, कविता, पत्रलेखन, लघुनिबंध वगैरे.) कोणताही असो; परंतु लेखनाच्या स्वरूपात ते विचाराअंतीच येणे गरजेचे असते. लेखनाचा वाचकवर्ग कोणता यावरही लेखन अवलंबून असते. लहान मुले, प्रौढ लोक, केवळ स्त्रीया, अल्पसाक्षर वर्ग, ग्रामीण वा शहरी वाचकवर्ग यांवर लेखनाचा विषय, आशय व प्रतवारी ही ठरलेली असते.

लेखन कौशल्यात सुलेखन, जलद लेखन, मुद्देसूद व प्रभावी लेखन व शैलीदार लेखन यांचा समावेश होतो. त्याबरोबर प्रमाणभाषेच्या लेखनविषयक नियमांनुसार व व्याकरणशुद्ध लेखनाला महत्त्व असते. लेखनाचे औपचारिक लेखन व अनौपचारिक लेखन असे दोन प्रकार पडतात. सर्व प्रकारचे कार्यालयीन लेखन हे औपचारिक लेखन असते. यामध्ये कार्यालयीन पत्रे, सर्वसामान्य सूचना, बैठकीची सूचना, निवेदन, आदेश, सभा वृत्तांत, टिप्पणी लेखन, इतिवृत्त लेखन, अहवाल लेखन, बातमी लेखन यांचा समावेश असतो. अनौपचारिक लेखनात वैयक्तिक भावभावना व्यक्त करणाऱ्या सर्व लेखनाचा समावेश होतो. कौटुंबिक पत्रे, मित्र-मैत्रिणीस लिहिलेली पत्रे, प्रेमपत्रे, रोजनिशी लेखन, विशिष्ट घटना-प्रसंगांचे केलेले वर्णन, आठवणींचे लेखन हे सारे अनौपचारिक लेखन असते. तर कथा, कविता अशा वाङ्मयाची निर्मिती व संशोधनपर, समीक्षात्मक लेखन हे अधिक उच्च दर्जाचे असते. त्यामध्ये शैलीची विविधता असते. त्यासाठी स्वतंत्र प्रज्ञेची, व्यासंगाची व अभ्यासाची गरज असते.

खरे तर लेखनाचा प्रवास हा अक्षरापासून वाक्यापर्यंत आणि पुढे परिच्छेद, लेख, कार्यालयीन पत्रव्यवहार, वैचारिक व ललित लेख, कथा, दीर्घकथा, निबंध, कादंबरी किंवा कविता इ. पर्यंत येऊन ठेपत असतो. त्यामुळे व्यक्तीला या सर्वांची प्राथमिक माहिती असणे आवश्यक असते. म्हणजे एका अर्थाने भाषेची जाण असणे महत्त्वपूर्ण ठरते. भाषेचे निरीक्षण, शब्दाच्या विविध अर्थच्छटा, वाक्यरचना, म्हणी, वाक्प्रचार, त्याचा प्रासंगिक उपयोग, विरामचिन्हांचा उपयोग, भाषेचे व्याकरण इ. वर हातखंडा असणे आवश्यक आहे.

विषयानुसार लेखनाचे विविध प्रकार संभवत असतात. व्यावहारिक लेखन, कार्यालयीन लेखन, ललित लेखन, वैज्ञानिक लेखन, सामाजिक लेखन, संशोधनपर लेखन, माहितीवजा लेखन, वर्णनपरलेखन, विश्लेषणपर लेखन इत्यादी. त्यामुळे प्रत्येक लेखनप्रकाराचा स्वभावविशेष हा भिन्न भिन्न असतो. त्यानुसार विषयाची कोशगत भाषा, सैद्धान्तिक भाषा आणि लेखनशैली इत्यादींचा लेखनासाठी उपयोग केला जातो. व्यावहारिक लेखनामध्ये, नातेसंबंधात्मक व्यवहारात आपुलकीची, भावात्मक भाषा असते; तर कार्यालयीन पातळीवर औपचारिक भाषेचा उपयोग केला जातो. तर संशोधनक्षेत्रात उद्दिष्टानुसार भाषेची निवड असते, हे ध्यानात घ्यावे लागते. लेखनकौशल्यामध्ये स्थूलमानाने खालील बाबींचा विचार अग्रक्रमाने होणे अपेक्षित आहे.

आपल्या मनात घोळत असणारे विचार लेखनातून व्यक्त होण्यासाठी सर्वप्रथम योग्य अशा शब्दांची निवड अपेक्षित असते. लेखनातून परिणाम दिसण्यासाठी अचूक व अर्थपूर्ण शब्दांची निवड करण्यात यावी. जेणेकरून लेखक म्हणून आपणाला अपेक्षित असणारा अर्थच वाचकाच्या मनात स्पष्टपणे उमटेल. अन्यथा वाचक आपल्यापरीने शब्दांचा अर्थ लावून त्याला हवा असणारा अर्थ काढू शकतो. त्यामुळे अनेकदा अर्थच्युती, अर्थविपर्यास, अर्थभेद इ. प्रकार संभवू शकतात. एकाच अर्थाचे अनेक शब्द असू शकतात; परंतु

लेखनाचा प्रकार व भाषा पाहता योग्य शब्दांची निवड येथे अपेक्षित असते. उदा. बोलीभाषेतील लेखनात 'आबा', 'बा' हे शब्द प्रचलित आहेत. त्याऐवजी 'पप्पा', 'पिताश्री' या सारख्या शब्दांचा वापर हा एका अर्थाने औचित्यहानीच म्हणावा लागतो हे लेखक म्हणून आपल्याला माहीत असणे आवश्यक आहे. शब्दसंग्रह हीच लेखनकौशल्यातील मूलभूत सामग्री असते. त्यातूनच स्वत:ची लेखनशैली विकसित होऊ शकते त्याचबरोबर विविध अर्थच्छटा निर्माण करणारी वाक्यरचना होऊ शकते. शब्दसामग्री जर नसेल तर लेखनामध्ये एकप्रकारचे साचलेपण येण्याची दाट शक्यता असते. त्यातून काही शब्द सातत्याने पुनरुक्त झाल्याचे निदर्शनास येऊ शकतात. यातून लेखनशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याची दाट शक्यता असते. डॉ.ल.रा.नसिराबादकर यांनी आपल्या 'व्यावहारिक मराठी' या ग्रंथामध्ये स्त्रीचे रूप, वय, अवस्था, नाते इत्यादींचा विचार करता विविध समर्पक शब्दांची यादी दिली आहे. इच्छुकांनी ती आवर्जून वाचावी. त्यातून आपणाला अर्थाच्या विविध छटा असणारे शब्द प्रत्ययाला येतील.

भाषेतील शब्दांच्या विविध जातीही माहिती असणे गरजेचे आहे. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियाविशेषण, क्रियापद, अव्ययाचे विविध प्रकारही अवगत असणे आवश्यक आहे. त्याशिवाय वाक्यरचना करणे शक्य होणार नाही. प्रत्येक भाषेची स्वतंत्र अशी वाक्यरचनापद्धती असते. ती माहीत असणे आवश्यक आहे. त्यातूनच आपण विविध स्वरूपाची वाक्ये तयार करू शकतो. विधानार्थी, उद्गारवाचक, प्रश्नार्थक असे वाक्याचे विविध प्रकार हाताळता येऊ शकतात. लेखन करताना स्थूलमानाने शब्दांचे समानार्थी आणि विरुद्धार्थी अशा शब्दप्रकारांचाही विचार अपेक्षित असतो. या शब्दप्रकारांप्रमाणेच अभ्यस्त शब्द, जोडशब्द, सामासिक शब्द, पारिभाषिक शब्द, समूहदर्शक शब्द, अनेकार्थी शब्द, तर-तमवाचक शब्द यांचा संग्रह लेखनासाठी आवश्यक आहे. एकूण भाषेच्या लेखनव्यवहारामध्ये शब्द हा सर्वात महत्त्वपूर्ण घटक आहे. त्याचा विचार अपरिहार्य असा आहे.

लेखनव्यवहारात अभिधा, लक्षणा, व्यंजना अशा तीन प्रकारच्या शब्दशक्ती मानल्या गेलेल्या आहेत. त्यांनाच अर्थाच्या परिभाषेत वाच्यार्थ, लक्षार्थ आणि व्यंग्यार्थ असे म्हणतात. याचा अर्थ एका विधानातून जेव्हा एकच अर्थ प्राप्त होतो तेव्हा त्यास वाच्यार्थ अथवा अभिधा शब्दशक्ती असे मानले जाते. शब्दाच्या उच्चाराबरोबर एकच प्रतिमा वाचकाच्या डोळ्यासमोर उभी रहाते तेव्हा त्यास वाच्यार्थ असे म्हणतात. 'घोडा' शब्द उच्चारताच घोड्याची प्रतिमा उभी रहाते हा वाच्यार्थाचा व्यवहार होय. जे शब्दाच्या संदर्भात; तेच वाक्याच्या संदर्भातही घेता येईल. विशेषत: शास्त्रीय साहित्यामध्ये आणि सामाजिक शास्त्रांच्या लेखनामध्ये विधानात्मकता म्हणजे वाच्यार्थानेच लेखनव्यवहार होत असतो. तिथे अन्य कोणताही अर्थ अभिप्रेत नसतो. गणितशास्त्र, भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्रातील विविध गुणसूत्रे ही याची उदाहरणे म्हणून घेता येतील. व्यावहारिक स्तरावरील संवादाचाही यात समावेश करता येईल. त्यात व्यवहाराची पूर्तता हाच एकमेव उद्देश असतो. दुसरी शब्दशक्ती लक्षणा ही होय. यात शब्दाच्या किंवा वाक्याच्या मूळ अर्थाबरोबर लक्षणेने सूचित केलेला अर्थही कळतो. परंतु याठिकाणी मूळ अर्थ हा बाजूला ठेवला जातो. आणि लक्ष्यार्थावर भर दिला जातो. उदा. 'माझ्या दारावरून हत्ती गेला.' या उदाहरणात 'दारावरून' असा शब्दश: अर्थ न घेता

'दारासमोरून' घेणे हेच उचित ठरेल. याला लक्षार्थ असे म्हणता येईल. याला भाषेची पुरती ओळख असणेही आवश्यक आहे. तिसरी शब्दशक्ती म्हणजे व्यंजना शब्दशक्ती होय. या शब्दशक्तीचा वापर हा मुख्यत: साहित्यांतर्गत खूप मोठ्या प्रमाणात होतो. यात लिहिणाऱ्याला जो अर्थ अभिप्रेत असतो; तोच अर्थ वाचकाला समजेल असे नाही. उलट वयानुसार, अभिरुचीनुसार, आकलनक्षमतेनुसार विधानाचे किंवा काव्यपंक्तीचे विविध अर्थ संभवू शकतात. त्यामुळे इथे अनेकदा संदर्भानुसार अर्थ काढले जातात. 'सूचकता' हा अर्थ काढण्यासाठीचा एक महत्त्वपूर्ण विशेष मानता येईल. उदा. 'सूर्योदय झाला.' या विधानातून प्रत्येक व्यक्ती आपापल्या परीने अर्थ काढू शकतो. एका अर्थाने हे विधान सूचक वक्तव्याचेच काम करते. त्यामुळे अनेकार्थता हा या विधानाचा विशेष मानता येईल हे ध्यानात घ्यावे लागते. याची जाणदेखील साहित्यांतर्गत वाचक-लेखक यांना असणे आवश्यक आहे. किंबहुना नवोदित लेखकांनाही भाषेचा साहित्यांतर्गत कसा उपयोग केला जातो हे समजणे गरजेचे आहे. अशा प्रकारचे लेखन हे लालित्यपूर्ण आणि सौंदर्यपूर्ण लेखन म्हणून ओळखले जाते. त्याचबरोबर ओज, तेज, सौंदर्य, गोडवा आणि माधुर्य निर्माण करणाऱ्या शब्दांचीही ओळख लेखकाला, व्यक्तीला असणे गरजेचे आहे. लेखन कौशल्याचा तोही एक महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. त्याचबरोबर रूढ, योगिक आणि योगरूढ यासारखेही शब्दही माहीत असणे आवश्यक आहेत. विशेषत: भाषेचेही निश्चित आकलन असणे आवश्यक आहे. कारण प्रादेशिक भाषेत, मातृभाषेत निश्चितच शब्दसंग्रह हा जास्त असतो. मावशी, मामी, आत्या, नणंद, भावजय, आजी यासारखे नातेसंबंधदर्शक शब्द हे भाषेत समाविष्ट झालेले आहेत. त्यामुळे भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. बाळ, कोकरू, पाडस, बछडा या शब्दांतील अर्थच्छटा या त्या शब्दांचा रूढ वापर निश्चित करत असतात. कोणताही शब्द कुठेही वापरून चालणार नाही. अन्यथा अर्थच्युती किंवा अर्थहानी होण्याची दाट शक्यता असते. मानवी विकासामध्ये नवनवीन क्षेत्रे उदयाला आलेली आहेत. त्यानुसार वस्तूंची निर्मिती, त्यांना मिळालेली संबोधने या सर्वांचा परिचय व शब्द माहीत असणे आवश्यक आहे. त्यामुळे व्यवहार सुलभ होतो. म्हणजेच जास्तीत जास्त शब्दसंग्रह हा लेखनाविष्कारासाठी गरजेचा आहे. त्यातूनच लेखकाची गुणवत्ता आणि लेखनाचे प्रवाहीपण सिद्ध होऊ शकते. प्रत्येक भाषेची वाक्यरचना ही वेगळी असते. त्यामुळे आपण ज्या भाषेत लेखन करणार आहोत. त्या भाषेची वाक्यरचना अवगत असणे आवश्यक आहे. वाक्यातून अर्थ प्रकट होणे आवश्यक असते. त्यामुळे त्या भाषेच्या रचनेनुसारच लेखन गरजेचे आहे. वाक्याचे विविध प्रकार असतात. तेही माहीत असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्या भाषेचे व्याकरण, लेखन नियम, विरामचिन्हे इत्यादींचा परिचय असणे आवश्यक आहे. त्यामुळे लेखनपूर्तता अचूक होऊ शकते. त्याचबरोबर सदोष लेखन करता कामा नये. लेखनदोष टाळणे आवश्यक आहेत. किंबहुना लेखनाची पुनरुक्ती टाळणेही आवश्यक आहे. याचा विचार लेखन कौशल्य हस्तगत करताना करणे आवश्यक आहे.

### ४.३.४.१ लेखन कौशल्यासाठीचे अर्जित गुण :

लेखन कौशल्याचा विकास झाला आहे की नाही ते पुढील क्षमतांच्या आधारे स्पट होते.

**१. सुलेखन :** सुंदर हस्ताक्षर हा सुलेखनाचा पाया आहे. सातत्याने व जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यास

हस्ताक्षर सुंदर होण्यास मदत मिळते. तज्ज्ञ मार्गदर्शकाची मदत घेतल्यास आणि रोज वळणदार अक्षर लेखनाचा सराव केल्यास हस्ताक्षर सुधारते. बऱ्याच विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर चांगले नसते. त्याचे कारण आळस, बेपर्वा, अक्षर लेखनाची आत्मसात केलेली चुकीची पद्धती (चुकीच्या पद्धतीने अक्षर काढणे), हस्ताक्षराला महत्त्व न देणे, लेखन सरावाचा अभाव आणि मनावर असणारा विलक्षण ताण हे असते. हस्ताक्षराबरोबरच प्रमाणबद्ध, आखीव-रेखीव लेखनास तितकेच महत्त्व असते. दोन अक्षरांत, दोन शब्दांत योग्य अंतर असावे. लिहिताना समास सोडावा, योग्य ठिकाणी परिच्छेद करावा, खाडाखोड टाळावी, प्रत्येक ओळीतील पहिले अक्षर एकाखाली एक यावे, शब्दांवर रेषा द्याव्यात, जोडाक्षर योग्य पद्धतीने लिहावे. या गोष्टी प्रयत्नाने सहज जमू शकतात.

**२. जलद लेखन :** भरभर व अचूक लिहिता येणे हेही एक प्रकारचे लेखन कौशल्य आहे. अचूक याचा अर्थ जसे सांगितले तसे व लेखन नियमानुसार बरोबर, असा आहे. स्वत: विचारपूर्वक लिहिताना लेखनाचा वेग मंदावतो. सरावाने त्यामध्येही प्रगती करता येते.

**३. मुद्देसूद व सुसूत्र लेखन :** लिहिताना स्वत:च्या मनातील विचार सुसूत्रपणे, योग्य त्या क्रमाने कागदावर उतरविता येणे महत्त्वाचे असते. प्रारंभ आकर्षक, मध्य विश्लेषणात्मक व मुद्देसूद आणि समारोप प्रभावी निष्कर्षात्मक असणे हे चांगल्या लेखनाचे वैशिष्ट असते. विचारांची मांडणी चढत्या क्रमाने व्हावी. ज्ञाताकडून अज्ञाताकडे, सुलभाकडून काठिण्याकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे अशी मांडणीची पद्धती असावी. स्वतंत्र लेखनात नावीन्याची अपेक्षा असते. माहिती, विचार किंवा दृष्टिकोण यातील नवीनता आपणास मांडता येणे अपेक्षित असते. आपल्या विचारांना, मुद्यांना इतर मान्यवरांच्या विचारांचा आधार दिला की लेखन अधिक प्रभावी होते. त्यामुळे गरजेनुसार इतरांची अवतरणे उद्धृत करता येणे, हाही लेखन कौशल्याचा एक भाग आहे.

**४. शैलीदार लेखन :** प्रत्येक माणसाची स्वत:ची शैली असते. ती त्याच्या लेखनातही दिसते. शिक्षकांना लिहिलेले पत्र, वडिलांना लिहिलेले पत्र आणि प्रेयसीस लिहिलेले पत्र या तीनही ठिकाणी भिन्न भिन्न शैली सहजपणे वापरली जाते. ते गरजेचेही असते. वैचारिक निबंधाची शैली वेगळी, आत्मवृत्तात्मक निबंधाची शैली वेगळी आणि ललित निबंधाची शैली वेगळी असते. विद्यार्थ्यांनी लिहिताना जाणीवपूर्वक स्वत:ची शैली विकसित केली पाहिजे. आपण कोणाशीतरी बोलत आहोत, आपल्या मनातील विचार क्रमवार सांगत आहोत, अशी संवादी शैली लेखनात प्रभावी ठरते. गरजेनुसार लेखनात म्हणी, सुभाषिते, उपमा, दृष्टांत, उदाहरणे, किस्से, अलंकारिक भाषा यांचा वापर करणे योग्य ठरते. क्वचित बोलीभाषेतील शब्द, संवाद यांचाही वापर करता येतो.

**५. लेखनविषयक नियमांचे पालन :** मराठी भाषेचे लेखनविषयक नियम निर्धारित करण्यात आले आहेत. अनुस्वार, ऱ्हस्व-दीर्घ, जोडाक्षरे या संदर्भात हे नियम आहेत. विद्यार्थी लिहिताना वेलांटी, उकार, न-ण या अक्षरांचा अचूक वापर, विविध काळातील क्रियापदांची रूपे, शीर्षबिंदूंचा वापर, ष-श-स या अक्षरांचा वापर यामध्ये गल्लत करतात. त्यामुळे त्यांच्या असंख्य चुका होतात. लेखनविषयक नियम आत्मसात

करावेत. लिहिलेला मजकूर तज्ज्ञ व्यक्तीकडून तपासून घ्यावा. सातत्यपूर्वक केलेल्या प्रयत्नाने ही लेखनक्षमता प्राप्त होते.

**६. व्याकरणशुद्ध लेखन :** लिहिताना विद्यार्थ्यांकडून लिंग, वचन, काळदर्शक क्रियापदे, शब्दरूपे, वाक्यातील पदांचे, शब्दांचे क्रम याबाबत असंख्य चुका होतात. त्या चुका टाळण्यासाठी विचारपूर्वक लिहावे. लिहिलेले पुन्हा वाचावे. आपणास अभिप्रेत असलेला अर्थ नेमकेपणाने उतरला आहे का ते तपासावे. व्याकरणाच्या दृष्टीने अचूक लेखन ही एक भाषिक क्षमता आहे. त्यामुळे लेखन कौशल्य विकसित होते.

**७. विरामचिन्हे :** योग्य जागी योग्य विरामचिन्हांचा वापर गरजेचा असतो. विरामचिन्हांशिवाय केलेले लेखन अर्थाचा अनर्थ करते. त्यामुळे विरामचिन्हांच्या वापरासाठी दक्ष असणे हे लेखन कौशल्यात अनिवार्य असते. 'मृणालने आंबा खाल्ला' या विधानाच्या शेवटी पूर्णविराम, प्रश्नचिन्ह, उद्‌गारवाचक चिन्ह यांपैकी जे विरामचिन्ह वापरले जाईल त्यानुसार त्या विधानाचा अर्थ बदलेल. यावरून विरामचिन्हाचे महत्त्व लक्षात येईल.

**८. शब्दभांडार :** लिहिणारी व्यक्ती शब्दप्रभू असेल तर त्याचे लेखन प्रभावी होते. लिहिताना अचूक अर्थ व्यक्त करणारे शब्द योजावे लागतात. भाषेत एका शब्दाला अनेक पर्यायी शब्द असतात. उदा. वडील, पिता, बाबा, बाप, बा, पिताजी, तात, जन्मदाते, पिताश्री, जनक इ. परंतु सगळ्या शब्दांना समान भाव नसतो. अशावेळी आपणाला योग्य शब्दाची निवड करता येणे जमले पाहिजे. विविध अर्थच्छटा व्यक्त करणारे अनेक शब्द माहीत असणे, विविध संज्ञा व संकल्पनांचे अर्थ माहीत असणे प्रभावी लेखनासाठी गरजेचे असते. विद्यार्थ्यांनी त्यासाठी शब्दकोश, म्हणींचा कोश, वाक्‌प्रचार कोश, संज्ञा-संकल्पना कोश यांचा वापर करण्याची सवय लावून घ्यावी. भरपूर वाचावे. वाचनात, श्रवणात येणाऱ्या नवीन व कठीण शब्दांचे अर्थ समजून घ्यावेत. शब्दभांडार वाढवावे. तरच लेखन अर्थपूर्ण, प्रवाही, प्रभावी व शैलीदार बनते.

थोडक्यात, लेखन ही एक कला आहे. सुंदर हस्ताक्षर, भरभर लिहिणे, लेखन नियमानुसार अर्थपूर्ण व प्रभावी लिहिणे याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दुर्दैवाने 'मातृभाषा मराठी म्हणजे सोपा विषय' या भावनेने विद्यार्थी मराठी विषयाचा अभ्यास गांभीर्याने करत नाहीत. लेखन कौशल्याबाबत उदासीनता, अनास्था वाढत आहे. चांगले लिहिणारे लोक दुर्मिळ आहेत. विद्यार्थ्यांनी वेळीच आपले लेखन कौशल्य वाढविले तर आयुष्यभर त्यांना ते उपयोगी पडेल. आनंद देईल. अनौपचारिक पत्रे, डायरी लेखन, वाचकांची पत्रे, निबंधलेखन, अनुभव कथन अशा लेखनाद्वारे सराव करत आपली लेखनक्षमता वाढविता येते.

## आ) कार्यक्रम व्यवस्थापन (Event Management) :

**प्रस्तावना :**

आजच्या आधुनिक जगामध्ये कार्यक्रमांचे स्वरूप आणि पद्धती बदललेल्या आहेत. प्रत्येक कार्यक्रम हा यशस्वी कसा होईल? याकडे आयोजकांचे लक्ष असते. कार्यक्रमाची लोकप्रियता, यशस्वीता, हेतू किंवा उद्देश

हे कार्यक्रमाच्या नियोजनावर व व्यवस्थापनावर अवलंबून असते. त्यामुळे योग्य व्यवस्थापन हा कोणत्याही कार्यक्रमाचा आत्मा असतो. कार्यक्रम लहान असो वा मोठा, घरगुती असो वा व्यावसायिक त्यासाठी योग्य व्यवस्थापन हे आलेच. आणि व्यवस्थापन हे व्यक्तीने किंवा समूहाने संस्थात्मक पातळीवर करावयाचे नियोजन असते.

कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजन ही ऐनवेळी करावयाची बाब नाही; त्याला काही काळ अगोदरपासून पूर्वतयारी करावी लागत असते. कार्यक्रमाच्या स्वरूपावर त्या सर्व बाबी अवलंबून असतात. उदाहरणार्थ वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, कविसंमेलन, शिबिरे, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रकाशन समारंभ, विवाहसोहळा, डोहाळ जेवण, बारसे इत्यादी व्यावसायिक व कौटुंबिक कार्यक्रम हे पूर्वनियोजनानेच यशस्वी होऊ शकतात. ऐनवेळी काही करण्याचा प्रयत्न केला तर कार्यक्रम अयशस्वी होण्याची दाट शक्यता असते हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे कार्यक्रमांचे नियोजन करणाऱ्या संस्था किंवा व्यक्ती व्यावसायिक तत्त्वांवर स्वत: सर्व जबाबदारी स्वीकारून कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करताना दिसतात. हे एक व्यवसायाचे, उपजीविकेचे, भाषिक अभिव्यक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे साधन म्हणून पाहाता येईल. व्यवस्थापनामध्ये प्रत्यक्ष कार्यक्रमात सहभागी असणारा वर्ग आणि कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीपर्यंतचे सर्व नियोजन, भौतिक सुविधा पुरविणारा वर्ग असे दोन वर्ग आपणाला पाडता येईल. पैकी भौतिक सुविधा पुरविणारा वर्ग हा प्रत्यक्ष कार्यक्रमात सहभागी होईलच असे सांगता येत नाही. प्रत्यक्ष सहभागी होणारा वर्ग कार्यक्रम हा नियोजनानुसार पुढे नेण्याचे काम करतो. तो कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होतो. त्यामुळे त्याच्याकडे इतरांपेक्षा काही कौशल्ये अधिकची असणे आवश्यक आहेत. त्यामध्ये त्याच्या व्यक्तीत्वापासून ते त्याच्या अभिव्यक्तीपर्यंतचे सर्व घटक समाविष्ट होतात. डॉ.ल.रा.नसिराबादकर यांच्या मते, अशा कार्यक्रमांच्या सूत्रबद्ध नियोजनासाठी कार्यक्रमपत्रिका तयार करावी लागते. दीप प्रज्वलन, स्वागतगीत, प्रास्ताविक, पाहुण्यांचे स्वागत-परिचय, प्रासंगिक भाषण, अध्यक्षीय समारोप, आभार, समारोप गीत या कार्यक्रमपत्रिकेवरील ठळक गोष्टी. प्रसंगविशेषी त्यात कमीअधिक बदल घडतो. अशा वेळी संबंधितांशी चर्चा करून, माहिती व तपशील घेऊन स्वागत, प्रास्ताविक, परिचय, प्रासंगिक भाषण या कामांसंबंधीची छोटी भाषणेही तयार करून द्यावी लागतात. या भाषणांतील विचार संबंधित व्यक्तीचे पण त्यांचे शब्दांकन मात्र आपण करावयाचे असते. काही वेळा पाहुणे, वक्ते आपला व्यक्ती-परिचय पाठवितात. त्यानुसार त्यांच्या परिचयाचे भाषण तयार करणे गरजेचे असते. श्रोते व पाहुणे यांच्या माहितीसाठी संस्थेचा अहवाल लिहून दिल्यास त्याचा परिणाम चांगला होतो. प्रासंगिक गरजेनुसार संस्थेची उद्दिष्टे, कार्य यांचा परिचय करून देणारी पत्रके, सार्वजनिक निधीसाठी आवाहन करणारी पत्रके, उत्पादनाची माहिती देणारी पत्रके, एखाद्या नव्या उपक्रमाची छोटीशी माहिती-पुस्तिका, जाहीर आवाहन या प्रकारचे लेखन वितरण, प्रसारणासाठी करून देणे आवश्यक असते. सूत्रसंचालकासाठी व व्यासपीठावरील मान्यवरांसाठी कार्यक्रमपत्रिकाही तयार करून द्यावी लागते. काही ठिकाणी निमंत्रणपत्रिकेच्या मजकुरापासून तिच्या छपाईपर्यंतचीही जबाबदारी उचलावी लागते. ही सर्वच कामे संबंधित संस्था व श्रोते यांना केंद्रस्थानी ठेवून करावयाची असतात. कार्यक्रमाद्वारे त्यांचा एकमेकांशी अनुबंध

जुळवणे व जोपासणे ही जबाबदारी अप्रत्यक्षपणे आपल्यावर असते. त्यासाठी कार्यक्रमाच्या सर्व घटकांतून भाषेचे उपयोजन जितके सुबोध, आकर्षक, डौलदार, प्रसन्न व श्रोत्यांना प्रभावित करणारे होईल, तितके समारंभाचे यश अधिक. सूत्रबद्ध नियोजनाला वक्तृत्व गुणाची जोड दिल्यास त्याचा प्रभाव चांगला पडतो. समारंभाला देखणेपण येते. शिस्तबद्ध नियोजन, भाषाप्रभुत्व, लेखनकौशल्य, वक्तृत्व, संघटनकौशल्य आणि श्रोत्यांशी संवाद साधण्याची हातोटी या गुणांच्या बळावर कार्यक्रमव्यवस्थापनाच्या क्षेत्रात केवढे तरी यश मिळविणे शक्य आहे. कमीअधिक प्रमाणात व सरमिसळीत स्वरूपात बोलण्याचे व लेखनाचे कौशल्य वरील सर्व कार्यांच्या मुळाशी आहे, हे येथे लक्षात येईल. सार्वजनिक समारंभात संघटनकौशल्य आणि लोकसंवाद साधण्यासाठी त्याची मोठीच गरज असते. सारांश, वक्तृत्व, लेखन आणि सूत्रबद्ध नियोजन ही कौशल्ये म्हणजे कार्यक्रमव्यवस्थापनाची त्रिसूत्री होय. (नसिराबादकर,२००८:३०,३१)

- **कार्यक्रमाच्या संयोजनाचे स्वरूप :**

प्रत्येक यशस्वी कार्यक्रमाचे श्रेय नेटक्या नियोजनाला दिले जाते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सूक्ष्म व तपशीलवार नियोजन आवश्यक असते. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१. आर्थिक नियोजन. २. कार्यक्रम स्थळ (स्टेज/ग्राऊंड) निर्मिती व सजावट. ३. निमंत्रण पत्रिका व कार्यक्रमपूर्व प्रसिद्धी. ४. श्रोते/प्रेक्षक/स्पर्धक/लाभार्थी यांच्या उपस्थितीचे नियोजन. ५. विविध कार्य समित्या (उदा. स्टेज समिती, प्रमाणपत्रे समिती, स्वागत समिती, भोजन समिती) व व्यक्तीनिहाय वाटून दिलेल्या कामाचे नियोजन. ६. प्रमुख पाहुणे/तज्ज्ञ मार्गदर्शक/परीक्षक निवड व पाहुणचाराचे नियोजन. ७. प्रत्यक्ष कार्यक्रमासाठी लागणाऱ्या साहित्याचे नियोजन (शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ/फुले, ग्रंथ, प्रतिमा, समई, भेटवस्तू, स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्रे, पारितोषिके, बॅज, रांगोळी इ.). ८. शिस्त व व्यवस्थापनाचे नियोजन. ९. पाणी, अल्पोपहार, भोजन यांचे नियोजन. १०. वेळेचे नियोजन. ११. वाहनतळ व वाहतूक व्यवस्था नियोजन इत्यादी.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेतल्यातरी कार्यक्रमाची यशस्वीता ही सामूहिक जबाबदारीतूनच सिद्ध होत असते. त्यामुळे व्यवस्थापनातील सर्व सदस्यांचा एकमेकांशी सुसंवाद असणे आवश्यक आहे. परस्परांवर विश्वास असणे गरजेचे आहे. योग्यवेळी त्यांच्यात दळणवळण होणे आवश्यक आहे. तरच कार्यक्रम यशस्वी होऊ शकेल. ज्याला जे काम योग्य पद्धतीने करता येईल; ते दिले की तो मन लावून ते पूर्ण करू शकतो. त्यामुळे अनेकदा व्यक्तीच्या आवडीनिवडीचा विचार करून त्याच्यावर कामाची योग्य ती जबाबदारी सोपवावी. त्याचप्रमाणे त्याचा वेळोवेळी पाठपुरावाही करणे आवश्यक आहे. म्हणजे ती वेळेत पूर्ण होईल. याची मनोमन खात्री होते.

- **महाविद्यालयीन उपक्रम :**

महाविद्यालयामध्ये विविध प्रकारचे कार्यक्रम, समारंभ, दिन साजरे केले जात असतात. प्रत्येक कार्यक्रम हा प्रासंगिक असतो. किंबहुना अशा स्वरूपाचे कार्यक्रम हे वेगवेगळ्या विषयांशी, विभागांशी संबंधित

असतात. उदाहरणार्थ शिक्षणशास्त्र विभागाचा शिक्षकदिन, इतिहास विभागाचा क्रांतिदिन, मराठी विभागाचे वाङ्मय मंडळ, भूगोल विभागाचा मकर संक्रांतीचा भूगोल दिन, सांस्कृतिक विभागाचे विविध कार्यक्रम उदा. नकला करणे, गीतगायन, कथाकथन, एकपात्री अभिनय, जयंती, पुण्यतिथी, विज्ञानविभागाचे विज्ञानमंडळ, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे वाणिज्य मंडळ. म्हणजेच विद्यार्थी हा आपापल्या अभ्यासविषयानुसार आणि आवडीच्या विषयानुसार विभागला जातो. तरीदेखील या सर्वांमध्ये त्याला उपयोगात आणावी लागते ती भाषा! विषय कोणताही असला तरी कार्यक्रमामध्ये त्याला आपले भाषिक कौशल्य म्हणजे भाषणाविष्कार पणाला लावावा लागतो. ज्या विद्यार्थ्यांकडे हा भाषणाविष्कार गुण असेल तो निश्चितच कौतुकास पात्र ठरतो! हे ध्यानात घ्यावे लागते. त्यामुळे कार्यक्रमाच्या व्यवस्थापनामध्ये प्रत्यक्ष व्यासपीठाशी ज्यांचा संबंध येणार आहे; त्यांच्याकडे भाषणाविष्कार हे कौशल्य असणे आवश्यक आहे, तरच संपूर्ण कार्यक्रम हा सुरुवातीपासून शेवटपर्यंत सुव्यवस्थितपणे पार पाडला जाऊ शकतो. अन्यथा अनेक अडथळ्यांना सामोरे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

- **कार्यक्रम संयोजनातील भाषिक कौशल्ये :**

भाषणकौशल्याचा साकल्याने विचार केल्यानंतर प्रत्यक्ष भाषण साधताना त्या कौशल्यांचा कसा वापर केला जातो. त्याचाही विचार करणे अपरिहार्य आहे. भाषणाचे विविध प्रकार असतात. कार्यक्रमात व्यक्तीला मिळालेल्या विविध पदांपासून उदाहरणार्थ प्रमुख पाहुणा, प्रमुख वक्ता, प्रमुख उपस्थिती, स्वागतकर्ता, परिचयकर्ता, प्रास्ताविककर्ता, आभार मानणारा, सूत्रसंचालक, मनोगत मांडणारा अशा विविध भूमिकांत व्यक्ती सभेला संबोधित करीत असते. अशा वेळी त्याची भूमिका, त्याला मिळणारा वेळ आणि कार्यक्रमातील त्याचे स्थान या सर्वांचा विचार करता त्याने आपल्या भाषेचा आणि भाषणकौशल्याचा उपयोग करणे गरजेचे ठरते. अतिशय साध्या सोप्या परंतु शैलीदार अंगाने सभेशी संवाद साधण्याचे कौशल्य हस्तगत करणे आवश्यक आहे.

डॉ.श्यामसुंदर मिरजकर यांच्या मते, कार्यक्रमाच्या संयोजनात लिखित अभिव्यक्तीचा वापर अत्यंत महत्त्वपूर्ण असतो. कार्यक्रमाच्या प्रभावी सादरीकरणात लिखित अभिव्यक्ती मार्गदर्शकाची भूमिका पार पाडते. लिखित अभिव्यक्तीत पुन्हा तीन गोष्टींचा समावेश होतो. १. कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकेचा मजकूर तयार करणे. २. कार्यक्रमाची रूपरेषा ठरविणे. ३. कार्यक्रमस्थळी फलकलेखन करणे किंवा डिजिटल बॅनरवरील मजकूर निश्चित करणे.

श्रोत्यांचे लक्ष हे प्रत्यक्ष संवाद साधणाऱ्या व्यक्तीकडे असते. त्यामुळे त्यामध्ये साधारणपणे पुढील बाबींचा समावेश होतो. त्या म्हणजे स्वागत, प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय, विद्यार्थी मनोगत, आभार प्रदर्शन आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन होय.

**अ. निमंत्रण पत्रिका :**

महाविद्यालयीन पातळीवर जे विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, शिबिरे, कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

त्या कार्यक्रमांची सर्वप्रथम निमंत्रण पत्रिका छापली जाते. कार्यक्रमातील निमंत्रित वक्ते आणि पाहुण्यांची नावे, कार्यक्रमाचा दर्जेदारपणा आणि कार्यक्रमाची मर्यादा ही त्या पत्रिकेवरून श्रोत्यांना ठरवता येते. या पत्रिका महाविद्यालय, संस्थेशी संबंधित पदाधिकारी, परिसरातील शाळा-महाविद्यालये, वाचनालये, विविध कार्यालये, विषयाशी संबंधित तज्ज्ञ लोक, विद्यार्थी, अपेक्षित श्रोतावर्ग यांना प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे पाठविल्या जातात. यांतून अपेक्षित असा श्रोतावर्ग हा कार्यक्रमाला उपस्थित रहावा, नियोजित कार्यक्रमाची अधिकाधिक प्रसिद्धी व्हावी, हा त्यामागचा मुख्य उद्देश असतो. निमंत्रण पत्रिकेची छपाई ही सुबक आणि आकर्षक असणे आवश्यक आहे. छपाई तंत्रज्ञानामुळे एका रंगापासून ते बहुरंगामध्ये ती छापली जाते. पत्रिकेच्या आकारमानानुसार अक्षरांचा आकार ठरवणे गरजेचे असते. जेणेकरून ती वाचनीय वाटेल. त्याचबरोबर भाषिक आणि व्याकरणिकदृष्ट्या ती निर्दोष असणे महत्त्वाचे आहे. निमंत्रण पत्रिकेत लेखनासाठी प्रमाण भाषेचाच उपयोग करण्यात यावा. दोन शब्द आणि दोन ओळींमध्ये योग्य ते अंतर असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ज्या विषयाशी संबंधित, महाविद्यालयाचा, संस्थेचा कार्यक्रम आहे. त्यासंबंधित काही प्रतिमा, संकेतचिन्हांचा समावेशही पत्रिकेत करण्यात यावा. त्यामुळे त्यामध्ये एकप्रकारची आकर्षकता जाणवेल. निमंत्रण पत्रिका ही आशयपूर्ण व प्रभावी असणे गरजेचे असते. निमंत्रण पत्रिकेत आयोजक संस्थेचे नाव, कार्यक्रमाचे स्वरूप, हेतू, उपस्थित मान्यवरांचे नाव, स्थळ, दिनांक व वेळ आणि निमंत्रक, समन्वयक, संयोजक यांच्या नावांचा स्पष्ट उल्लेख असावा लागतो. या बाबींची काळजी निमंत्रणपत्रिका तयार करताना घेणे आवश्यक आहे.

**आ. कार्यक्रमाची रूपरेषा :**

कार्यक्रमाची रूपरेषा म्हणजे सुरुवातीपासून शेवटपर्यंत कार्यक्रम हा कोणत्या पद्धतीने पुढे जाणार याचा आराखडा होय. एका सूत्रात संपूर्ण कार्यक्रम हा बांधला जातो. यात विशिष्ट क्रमाने प्रत्येकाला संधी दिली जाते. ही रूपरेषा संयोजकाकडून, समन्वयाकडून पूर्वनियोजित स्वरूपात केली जाते. जेणे करून कार्यक्रमाचा एकूण वेळ, त्यातील प्रत्येकाची भूमिका आणि त्यांना देण्यात येणारा वेळ या सर्वांचा विचार केला जातो. परंतु ऐनवेळी काही प्रमाणात यामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी देखील आदर्श नियोजन म्हणून कार्यक्रम पत्रिकेकडे पाहिले जाते. सर्वसाधारणपणे कार्यक्रमाची रूपरेषा खालीलप्रमाणे असते.

आयोजक संस्थेचे/महाविद्यालयाचे नाव

संयोजक विभागाचे नाव

कार्यक्रमाचे नाव

मराठी गौरव दिन कार्यक्रम

दि.    /   /

कार्यक्रम पत्रिका

स्वागत :

| | | |
|---|---|---|
| प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन | : | |
| प्रास्ताविक | : | |
| पाहुण्यांचा परिचय | : | |
| विद्यार्थी मनोगते | : | १. |
| | : | २. |
| मान्यवरांचे मनोगत | : | |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : | |
| अध्यक्षीय मनोगत | : | |
| आभार | : | |
| पसायदान/राष्ट्रगीत | : | |
| सूत्रसंचालन | : | |

**इ. फलकलेखन/बॅनर :**

कोणत्याही कार्यक्रमासाठी फलकलेखन ही अनिवार्य बाब मानली जाते. अलिकडे फलकलेखनाऐवजी डिजीटल बॅनरचा उपयोग केला जातो. असे असले तरी सदर कार्यक्रम कोणता आहे, हे कळण्यासाठी फलकलेखन गरजेचे आहे. फलकलेखनात अपेक्षेनुसार आयोजक संस्थेचे, शाखेचे नाव, कार्यक्रमाचे नाव, प्रमुख पाहुणे, प्रमुख वक्ते, प्रमुख उपस्थिती, अध्यक्ष, विभागाचे नाव, दिनांक त्याचबरोबर रिकाम्या जागेत फलक सुंदर दिसण्यासाठी एखादे चित्र आदी गोष्टी आवश्यक आहेत. कारण कालांतराने घटना विस्मृतीत गेल्यावर त्याचा वापर हा 'डॉक्युमेंट' म्हणून केला जातो. चर्चासत्रे, कार्यशाळा यांमध्ये उद्घाटनाचा कार्यक्रम, समारोपाचा कार्यक्रम, सत्रानुसार होणारी व्याख्याने इ. विभागणी असल्यामुळे एकापेक्षा अधिक वेळेस फलकलेखन अपेक्षित असते. अलिकडे संगणकाच्या वापरातून अशा प्रकारे फलक प्रदर्शित केले जातात. त्यामुळे फलकलेखन ही कोणत्याही कार्यक्रमात आवश्यक अशी बाब मानली जाते.

**ई. स्वागत :**

कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात ही सूत्रसंचालक सभेला संबोधून करत असतो. त्यात तो कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट करतो. त्यानंतर सर्व मान्यवर वक्ते व श्रोत्यांचे स्वागत शब्दपुष्पाने करून कार्यक्रमाला आरंभ करतो. अनेकदा त्याच्याकडून स्वागतासाठी विविध काव्यपंक्ती, चारोळ्या किंवा मान्यवर विचारवंतांच्या अवतरणांचा उपयोग केला जातो. परंतु यामुळे औचित्यहानी होणार नाही याची काळजी मात्र त्याने स्वत: घेतली पाहिजे. शक्य तितक्या कमीतकमी शब्दांचा आणि लाघवी भाषेचा वापर त्याने स्वागतासाठी करणे आवश्यक आहे. सामान्यत: सभेचे अध्यक्ष, व्यासपीठावरील उपस्थित मान्यवर व सभागृहातील श्रोते यांना

आदरार्थी संबोधून भाषणाची सुरुवात करावी. व्यासपीठावरील उपस्थितांची संख्या अधिक असल्यास त्या सर्वांचे नामनिर्देश वेळ घेणारे व कंटाळवाणे ठरतात. अशा वेळी 'सभेचे अध्यक्ष, व्यासपीठावरील सर्व मान्यवर आणि उपस्थित बंधुभगिनींनो,' असे संबोधावे. स्थल-काल-प्रसंगानुसार उचित असे संबोधन वापरावे. संबोधनाच्या पहिल्या उद्गारातूनच उपस्थितांच्या मनावर बोलणाऱ्याची पकड बसू लागते व सभेसाठी योग्य वातावरण तयार होते. त्यानंतर समारंभ आयोजित करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. त्यानंतर सत्कार समारंभ असल्यास गौरवमूर्तीचा परिचय, कर्तृत्व, व्यक्तिमत्त्व, तिला प्राप्त झालेले यश व सन्मान यांचे स्वरूप विशद करावे. समारंभाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे यांचा परिचय करून देऊन त्यांचे स्वागत करावे. समारंभातील सहभागी सर्वच व्यक्तींबद्दल आदर व जिव्हाळा प्रकट होईल असे बोलावे. शक्य तितक्या कमीतकमी वेळेचा उपयोग त्याने करावा.

### उ. प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन :

स्वागताच्या कार्यक्रमानंतर व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते संस्थेचे दिवंगत अध्यक्ष, महोत्सव किंवा समारोह, जयंती असेल तर संबंधित महापुरुषाची प्रतिमा, इष्ट देवतेची प्रतिमा यांना पुष्पहार किंवा गुलाबपुष्प अर्पण केली जातात. त्याचबरोबर दीपप्रज्वलन करून सदर कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले जाते.

### ऊ. प्रास्ताविक :

कार्यक्रमाचे हेतुकथन म्हणजे प्रास्ताविक होय. सदर कार्यक्रम हा कोणत्या कारणासाठी आयोजित केला आहे हे सांगणे म्हणजे प्रास्ताविक होय. त्यातील औचित्यता प्रास्ताविकातून स्पष्ट होत असते. प्रास्ताविक करणारे हे शक्यतो कार्यक्रमाचे संयोजक किंवा समन्वयक असतात. प्रास्ताविक हे मोजक्या आणि नेटक्या शब्दात मांडणे गरजेचे आहे. शक्यतो विस्तार आणि पाल्हाळीकता टाळावी. एकूणच कार्यक्रम घेत असलेली वेळ आणि कार्यक्रमाला लागणारा एकूण वेळ याचा विचार करता शक्य तितक्या आटोपशीर शब्दात प्रास्ताविक करणे आवश्यक आहे.

### ऋ. परिचय :

कार्यक्रमाला बोलावण्यात आलेले पाहुणे, प्रमुख वक्ते, प्रमुख उपस्थिती, अध्यक्ष या सर्वांचा परिचय श्रोत्यांना करून देणे अगत्याचे असते. अनेकदा प्रास्ताविक करणाराच परिचयही करून देत असतो. परंतु काही वेळेस परिचय करून देण्याची जबाबदारी ही वरिष्ठ व्यक्तीवर येऊन पडत असते. परिचय करून देत असताना शक्यतो निमंत्रित पाहुण्यांच्या किंवा वक्त्यांच्या खाजगी जीवनाचा परिचय करून देऊ नये. त्याचा सार्वजनिक जीवनातील व्यवहार आणि योगदान यावर अधिकाधिक भर द्यावा. त्याने जे जे पद भूषविलेले आहे, पारितोषिके, पुरस्कार मिळविलेले आहेत यांपैकी ठळक आणि विशेष बाबींवर भर द्यावा. त्यांना निमंत्रित करण्यामागचा हेतू सांगावा. यासाठी प्रमुख पाहुण्यांकडून त्यांचे परिचयपत्र मागवून घ्यावे. त्याचे वाचन, पुनर्वाचन करून घ्यावे जेणेकरून श्रोत्यांशी संवाद साधताना सहजता निर्माण होईल. परिचय करून देण्याचा वेळ हा पाच ते सात मिनिटांपेक्षा अधिकचा असता कामा नये.

### ए. मनोगत :

अनेकदा कार्यक्रमाचे स्वरूप पाहाता कार्यक्रमामध्ये मनोगत मांडण्याची संधीही दिली जात असते. उदा. इयत्ता दहावीचा सदिच्छा समारंभ, सेवानिवृत्तीचा कार्यक्रम, चर्चासत्रे, कार्यशाळांमधील समारोपाचा कार्यक्रम इत्यादी. अशावेळी मिळालेली संधी ही स्वअनुभव कथन करण्यासाठीची संधी असते. त्याला मुख्य भाषणाचे स्वरूप येता कामा नये. वेळेचा विचार करता अत्यंत मोजक्या शब्दांमध्ये हे मनोगत व्यक्त करणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमाचा आपणाला काय लाभ होणार आहे? किंवा झाला आहे? हे सांगण्यासाठी आपण तेथे उभा असतो, हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. किंवा सदर व्यक्ती सेवानिवृत्त होत असताना त्याचे संस्थेच्या घडणीमध्ये कोणते योगदान राहिलेले आहे, हे सांगण्याचे अगत्याचे आहे. त्याला शक्यतो कोणत्याही प्रकारचे व्यक्तिगत रूप येता कामा नये याचा विचार करणे आवश्यक आहे. शालान्त कार्यक्रमात विद्यार्थी काय घेऊन बाहेर पडतो आहे, याचे मनोगत तो मांडू शकतो. या सर्वात कार्यक्रमाशी संबंधित असेच विवेचन होणे आवश्यक आहे हे मात्र लक्षात ठेवावे.

### ऐ. प्रमुख पाहुणे/वक्त्यांचे भाषण :

विविध व्यक्तींच्या मनोगतानंतर प्रमुख पाहुणे किंवा वक्ते यांच्या भाषणाचे नियोजन असते. यांचे भाषण म्हणजे एकूणच कार्यक्रमाचा मूळ गाभा असे म्हटले जाते. कारण श्रोत्यांना अपेक्षित असणारा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे प्रमुख वक्त्याकडून आपण काय ऐकणार आहोत, हा असतो. त्यामुळे प्रमुख वक्ता हा कार्यक्रम ज्या विषयाशी संबंधित आहे त्यातील अधिकारी व्यक्ती किंवा तज्ज्ञ असला पाहिजे, असा रूढ संकेत असतो. प्रमुख वक्त्याच्या बोलण्यासाठी शक्यतो वेळेचे बंधन घातले जात नाही. तरी देखील कार्यक्रमाच्या एकूण वेळेचा विचार करता ४५-६० मिनिटांमध्ये वक्त्याने आपल्याला जो विषय दिलेला आहे त्याचे प्रतिपादन करण्यासाठी तो उपयोगात आणला पाहिजे. अत्यंत सूत्रबद्ध आणि नेटकेपणाने त्याने सभेला संबोधित करावे अशी अपेक्षा असते. त्यांना बोलावयास दिलेला विषय, त्याची सुरुवात, मध्य आणि शेवट नेमक्या भाषेत करावा. व्याख्यानासाठी शक्यतो प्रमाण भाषेचाच वापर करावा. शक्य त्या ठिकाणी प्रासंगिकता म्हणून बोलीभाषेचा किंवा समूह कोणत्या प्रकारचा आहे, त्याचा विचार करून संवादाच्या भाषेची निवड करावी हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे श्रोतावर्ग हा त्या वक्त्याकडे एकाग्र चित्ताने लक्ष वेधून घेईल. शेवटी विषय कोणत्या प्रकारचा आहे, यावर व्याख्यानाची दिशा ठरत असते. हलका-फुलका विषय असेल, तर अधिकाधिक हसवणूक होते आणि विषय वैचारिक असेल तर अधिकाधिक गंभीरपणे त्याची मांडणी केली जाते. त्याचबरोबर श्रोत्यांशी संवाद साधताना श्रोत्यांचा वैचारिक स्तर, त्यांचा प्रदेश, प्रासंगिकता याचाही विचार करणे अपेक्षित आहे. एकूण वक्त्याकडून अत्यंत प्रभावी आणि परिणामकारक अशा विषय प्रतिपादनाची अपेक्षा असते हे मात्र नक्कीच!

### ओ. अध्यक्षीय समारोप :

कोणत्याही कार्यक्रमाला अध्यक्ष हा असतोच. अध्यक्षांच्या परवानगीने संपूर्ण कार्यक्रम हा औपचारिकपणे

पुढे जात असतो आणि कार्यक्रमाचा शेवट हा अध्यक्षीय समारोपानेच होत असतो. कार्यक्रमाचा अध्यक्ष ही त्या क्षेत्रातील व्यासंगी आणि अनुभवी व्यक्ती असते. जी प्रमुख वक्ते किंवा पाहुण्यांच्या नंतर सभेला संबोधित करणारी असते. अनेकदा वक्त्यांच्या भाषणावर आपली मते मांडत मांडत स्वतंत्र विवेचनही करत असते त्यामुळे अध्यक्षीय समारोपाला अत्यंत महत्त्व असते. चर्चासत्रे, शिबिरे इत्यादींतून उद्घाटन, समारोप, विविध सत्रे या सर्वांसाठी स्वतंत्र अध्यक्ष असतात. अशावेळी अध्यक्षीय अधिकाराने वक्त्यांच्या विवेचनानंतर अध्यक्ष आपली मते सौम्य व सूचक शब्दांत आणि प्रगल्भ भाषेत मांडताना दिसून येतात. यातून अनेकदा दुर्लक्षित व अलक्षित क्षेत्रांचा उल्लेख करण्यात येतो. अनेकदा टीका-टिप्पण्णीही होताना दिसते इथे अध्यक्षांना पूर्णपणे स्वातंत्र्य असते.

**औ. आभार प्रदर्शन :**

कोणत्याही कार्यक्रमाचा शेवट हा आभार प्रदर्शनाने होत असतो. अनेकदा मुख्य वक्त्याच्या भाषणानंतर श्रोते उठून जाण्याच्या मानसिकतेत असतात किंवा जातही असतात. अशावेळी आभार मानण्याची औपचारिकता पूर्ण करावयाची असते. यामध्ये सर्वांविषयी कृतज्ञताभाव व्यक्त करावयाचा असतो. अशावेळी कमीतकमी वेळेत परंतु सर्वांच्या नावांचा आणि योगदानाचा ज्येष्ठतेनुसार उल्लेख करून हे काम पूर्ण करावयाचे असते. प्रत्यक्ष व्यासपीठावरील उपस्थितांबरोबरच कार्यक्रम संपन्न करण्यासाठी ज्यांची अप्रत्यक्ष, प्रत्यक्ष मदत झाली त्यांचाही उल्लेख आवश्यक आहे. आभार प्रदर्शनात पल्लेदार वाक्यांचा उपयोग न करता छोट्या छोट्या वाक्यांचा उपयोग करावा. शक्यतो आपल्या व्यक्तिगत मतांचे प्रदर्शन टाळावे. आभार प्रदर्शन करताना मात्र केवळ औपचारिकता न दाखवता भाषेत मार्दवता आणि आपुलकी असणे आवश्यक आहे.

**अं. सूत्रसंचालन :**

कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये सूत्रसंचालन हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला गेला आहे. सूत्रसंचालक हा व्यासपीठ आणि श्रोते यांच्यातील दुवा असतो. प्रत्यक्ष कार्यक्रमामध्ये सर्व बाबी या सूत्रसंचालकाच्या हाती असतात. प्रत्यक्ष कार्यक्रमात प्रसंगानुरूप अनेकदा बदल होण्याची, अनेक बाबी खाली-वर होण्याची दाट शक्यता असते, अशावेळी सूत्रसंचालकाने सतर्क असणे गरजेचे आहे. त्यामुळे नियोजित कार्यक्रमात घडणाऱ्या सर्व बाबी इत्यंभूत पातळीवर त्याला माहीत असणे आवश्यक आहे. कारण एकूणच सर्व कार्यक्रमात सुसूत्रता आणण्याचे आणि निवेदन करण्याचे काम तो करत असतो.

सूत्रसंचालन करणाऱ्या निवेदकाला अनेक गोष्टी ज्ञात असणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो बहुश्रुत असला पाहिजे. त्याला भाषेची अपेक्षित जाण आणि भाषेवरील पकड असणे आवश्यक आहे. प्रसंगानुरूप त्याला शब्दांचा वापर करता आला पाहिजे तरच तो योग्य निवेदन करू शकेल. तो जर शब्दांची पुनरूक्ती करत असेल, योग्य पदनाम माहीत नसण्याचा अभाव असेल, भाषेचे प्रौढपण, औचित्यपूर्णता या बाबी त्याला माहीत नसतील तर सूत्रसंचालन हे पूर्ण अपयशी ठरण्याची दाट शक्यता असते. निवेदन करण्यासाठी तो स्वतंत्र असतो. परंतु सभेचे संकेत आणि नियम यांना डावलून मात्र तो सूत्रसंचालन, निवेदन

करू शकत नाही. निवेदनाचा स्तर हा कार्यक्रमानुसार वेगवेगळा असू शकतो. उदा. शुभेच्छा समारंभ, कथाकथनाचा कार्यक्रम, काव्यवाचन स्पर्धा, गीतगायनाचा कार्यक्रम, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, चर्चासत्रे, शिबिरे, कार्यशाळा, मुशायरा, गझल कार्यक्रम इत्यादी. प्रत्येक कार्यक्रमाची निवेदनपद्धती ही वेगवेगळी असते. त्यानुसार त्याच्याकडे भाषेचे, शब्दांचे भांडार असणे गरजेचे आहे तरच तो योग्य निवेदन करू शकेल. कार्यक्रमाची दिशा ठरवण्याचे काम हे सूत्रसंचालकाकडे असते, कार्यक्रमाच्या एकूण वेळेचे नियोजन आणि कार्यक्रमाची गतिमानता ही त्याच्यावर अवलंबून असते हे मात्र लक्षात ठेवण्याची बाब आहे. प्रसंगी तो आपल्या वाणीने श्रोत्यांवर अधिराज्य गाजवू शकतो. उदा. सुधीर गाडगीळ यांचे नाव घेता येईल. उत्तम निवेदक म्हणून त्यांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रभर घेतले जाते. म्हणजेच निवेदकाकडे काही अर्जित गुण असले पाहिजेत. निवेदन, सूत्रसंचालन करताना भाषाशुद्धता, उच्चारशुद्धता, प्रसंगी विराम घेणे, आरोह-अवरोह घेणे इत्यादी बाबी माहीत असणे गरजेच्या आहेत. प्रसंगी पूर्वतयारी, पाठांतर, लिखित नोंदी या बाबीही महत्त्वाच्या ठरतात. सूत्रसंचालकाचे काम हे कार्यक्रम पुढे घेऊन जाणे हे आहे. त्यामुळे कमीत कमी आणि योग्य व समर्पक शब्दांत त्याने निवेदन करून कार्यक्रम पुढे घेऊन जाण्याचे कौशल्य दाखविले पाहिजे. प्रसंगी त्याने कोणत्याही प्रकारचे अतिशयोक्तपूर्ण वर्णन टाळावे. अलंकारिक भाषेचा आग्रह धरू नये. सूत्रसंचालकाची भाषा ही आवाहनपर असली पाहिजे. त्यात मार्दवता असणे आवश्यक आहे. संदिग्ध भाषा, अस्पष्ट स्वर इ. बाबी टाळाव्यात. एकूणच कार्यक्रमामध्ये परिणामकारकता साधण्याचे काम हे सूत्रसंचालक करत असतो. सूत्रसंचालकाकडे म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, सुविचार, अवतरणे, कविता, विनोद इत्यादींचा ठेवा असला पाहिजे. प्रसंगी वेळ निभावण्यासाठी त्याचा उपयोग तो करू शकेल. त्यातून त्याचे व्यक्तिमत्त्वही फुलून येताना दिसून येते. एकूणच सूत्रसंचालन हे प्रयत्नाने येणारे कौशल्य आहे. भाषेच्या कौशल्यपूर्ण वापराची संधी म्हणजे सूत्रसंचालन हे होय.

## ४.४ समारोप :

सारांशाने, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी भाषिक कौशल्ये आत्मसात होणे अत्यंत आवश्यक अशी बाब म्हणता येईल. त्यामुळे त्याच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनावर सापेक्ष असा परिणाम होऊ शकतो. व्यक्तीचा सामाजिक स्तर उंचावू शकतो. व्यक्तीच्या संवादपद्धतीवर सापेक्ष परिणाम होऊ शकतो. मातृभाषेप्रमाणेच तो इतर भाषेंकडेही सहभावाने पाहू शकतो. भाषेच्या विविध छटा अनुभवू शकतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक अडथळे दूर होऊ शकतात. समूहाशी आणि समाजाशी तो संवादी होऊ शकतो. व्यवस्थापन कौशल्यामुळे व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सार्वजनिक जीवनामध्ये विविध कार्यक्रमांच्या वेळी प्रसंगी कशा प्रकारे वेळेचे आणि कामाचे नियोजन करावे, हे त्याला सहज उमजू शकते. एकूणच व्यक्तिमत्त्व विकासामध्ये उपरोक्त कौशल्ये ही अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.

## ४.५ कठीण शब्दांचे अर्थ :

१. **संप्रेषण :** संदेशांची, माहितीची देवाणघेवाण.

२. **संभाषण :** व्यक्तींमधील परस्परातील वाग्युक्त भाषण.

३. **क्षमता :** व्यक्तीजवळ उपलब्ध असलेल्या ज्ञानवापराशी संबंधित बाब.

४. **स्त्रोत :** संदेश निर्मिती करणारी, व्यक्ती, यंत्रणा अथवा वस्तू.

५. **संकेत :** संदेशवहनार्थ योजलेली प्रतीकांची व्यवस्था.

६. **संकेतक :** संदेशाला संकेतरूप प्राप्त करून देणारे साधन.

७. **संदर्भ :** संप्रेषाणार्थ संकेतीकरण करून पाठविल्या जाणारी कोणतीही माहिती.

८. **शारीर भाषा :** हातवारे, खाणाखुणा, अंगविक्षेपांची भाषा, कायिक हालचाली.

९. **वक्तृत्व :** वाग्युक्त संदेश.

१०. **भाषण :** भाषिक चिन्हव्यवस्थेचा वापर करून केलेली वाचिक कृती.

११. **बोधन :** वस्तू, घटना, प्रसंग इ.ची इंद्रियगम्य जाणीव करून देणारी प्रक्रिया.

१२. **क्षमता :** शिकण्याने येणारी शक्ती किंवा ताकद.

१३. **अमूर्त विचार :** मूर्त किंवा वास्तव वस्तूंविषयी विचार न करता जेव्हा अमूर्त गोष्टींविषयी माणूस कल्पना करू लागतो तेव्हा त्याला अमूर्त विचार असे म्हणतात.

१४. **अवधान :** ही एक मानसिक प्रक्रिया असून एखाद्या विशिष्ट वस्तू, व्यक्ती, घटना, अगर प्रसंगावर जाणीव केंद्रित करणे किंवा मनाचा ओघ तिकडे वळवणे म्हणजे अवधान होय.

१५. **अभिवृत्ती :** सापेक्षतया व्यक्ती-वस्तू-प्रसंग यांच्या बाबतीत विशिष्ट रीतीने कृती करणे.

१६. **श्रोता समूह :** सामाजिक समूहाचा, सामान्य जमाव अगर गर्दीचा हा एक प्रकार आहे. एका विशिष्ट हेतूने एखाद्या केंद्रबिंदूभोवती जमणाऱ्या लोकांची ही गर्दी असते.

१७. **धारणा :** चित्त एकाच विषयावर केंद्रित करणे.

१८. **अभियोग्यता :** एखादी कृती करण्याची एखाद्या विशिष्ट विषयातील ज्ञान संपादन करण्याची जी उपजत अगर स्वाभाविक वृत्ती असते किंवा कल असतो त्याला अभियोग्यता असे म्हणतात.

१९. **सवय :** सर्वसामान्य अर्थाने सवय म्हणजे शिकलेली क्रिया.

२०. **तादात्म्य :** मानसिक जीवनाची एक यंत्रणा म्हणजे तादात्म्य होय, एकरूपता.

२१. **प्रतिमा :** मूळ वस्तूचे जे प्रतिबिंब उमटते त्याला प्रतिमा म्हणतात.

२२. **सतत सराव :** एखादे नवीन कौशल्य शिकत असताना शिकण्यासाठी वेळ वाढवून देणे म्हणजे सतत सराव.

२३. **भूमिका :** कोणत्याही सामाजिक समूहामध्ये व्यक्तीला विशिष्ट स्थानानुसार जे कार्य करावे लागते किंवा विशिष्ट वर्तन करावे लागते त्याला भूमिका असे म्हणतात.

## ४.६ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न (लघुत्तरी प्रश्न) :

१. भाषिक कौशल्ये म्हणजे काय? ते सांगून भाषिक कौशल्यांचा थोडक्यात आढावा घ्या.

२. भाषाविकासाची मुख्य कौशल्ये सांगून त्यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

३. श्रवण प्रक्रियेतील अडथळ्यांची कारणे संक्षिप्तपणे लिहा.

४. श्रवण कौशल्य सुधारण्यासाठी आवश्यक त्या उपायांवर चर्चा करा.

५. श्रवणप्रक्रियेचे महत्त्व विशद करा.

६. वाचन कौशल्याचे स्वरूप व महत्त्व विशद करा.

७. वाचन कौशल्य विकासाचे उपाय सुचवा.

८. उत्तम वाचनाच्या पद्धतीसाठी कोणकोणते गुण आवश्यक असतात, हे संक्षेपाने लिहा.

९. भाषण कौशल्य विकासाचे उपाय सुचवा.

१०. भाषण कौशल्यासाठी कोणकोणते अर्जित गुण अपेक्षित असतात, ते सारांशाने नमूद करा.

११. लेखन कौशल्यांचा थोडक्यात आढावा घ्या.

१२. 'लेखनकौशल्य हे कौशल्य क्रमांतील अंतिम कौशल्य आहे.' असे का म्हणतात?

१३. कार्यक्रमाचे संयोजन करताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी ते स्पष्ट करा.

१४. सूत्रसंचालन करताना संचालकाच्या अंगी कोणकोणते गुण आवश्यक आहेत, हे तुमच्या शब्दात विवेचन करा.

१५. सूत्रसंचालन म्हणजे काय ते सांगून आपल्या महाविद्यालयातील शिक्षक दिन कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाचा नमुना लिहा.

१६. आपल्या महाविद्यालयात संपन्न होणाऱ्या 'वार्षिक पारितोषितक वितरण समारंभा'च्या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेचा नमुना तयार करा.

## ४.७ संदर्भग्रंथ :

१. पाटील दत्ता, शिंदे अरुण (संपा.), शब्दसंहिता, (बी.ए.भाग १ व बी.कॉम.भाग १ क्रमिक पुस्तक), प्रकाशन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, जून २०१८.

२. जोशी भालचंद्र श्रीपाद, संवादशास्त्र, विजय प्रकाशन, नागपूर, द्वि. आ. २००७

३. नसिराबादकर ल. रा., व्यावहारिक मराठी, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आठवी आ. २००८

४. वाळंबे मो. रा., सुगम मराठी व्याकरण व लेखन, नितीन प्रकाशन, पुणे, पन्नासावी आ. २०१५

## ४.८ अधिक किंवा पुरक वाचनासाठी पुस्तके :

१. मारवाडे नरेंद्र, सरकटे सदाशिव, मराठी भाषा विकास संवर्धन व भाषिक कौशल्य, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. जुलै २०१०

२. तारापुरे सुनीता, जोशी रजनीश (संपा.), सूत्रसंचालन : एक कला, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, प्र. आ. २००८

३. देसाई रवींद्र, प्रभावी भाषणकला, प्रफुल्लता प्रकाशन, पुणे

४. पेंडसे अंजली, देहबोली, नीलकंठ प्रकाशन, पुणे, तिसरी आ. २००४

५. साने र. य., लेखनमित्र, विद्या विकास पब्लिशर्स प्रा. लि., नागपूर, २००७

६. गोखले द. न., शुद्धलेखन विवेक, सोऽहम् प्रकाशन, पुणे, १९९३

●●●

# घटक –१

# कविता

संत नामदेव : १) पतितपावन, २) पंढरीस जावे

अनंत फंदी : १) जमाना आला उफराटा, २) हे मूर्खा खूण तर्का

महात्मा फुले : १) मानवांचा धर्म एक, २) धीर

बालकवि : १) फुलराणी, २) अप्सरांचे गाणे

१.० उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ विषय विवेचन

 १.३.१ संत नामदेव (इ.स. १२७० ते इ.स. १३५०)

 १.३.२ अनंत फंदी (इ.स. १७४४ ते इ.स. १८१९)

 १.३.३ महात्मा फुले (इ.स. १८२७ ते इ.स. १८९०)

 १.३.४ बालकवी (इ.स. १८९० ते इ.स. १९१८)

१.४ कठीण शब्दांचे अर्थ :

१.५ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न :

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ संदर्भ ग्रंथ

१.८ संदर्भ सूची

१.९ अधिक वाचनासाठी ग्रंथ

१.१०उपक्रम

## १.० उद्दिष्टे :

या घटक वाचनानंतर आपणांस पुढील गोष्टी समजून येतील.

१. संतवाङ्मयातील महत्त्वाचे कवी नामदेव यांचा परिचय होईल.

२. संत नामदेवांचे अभंगस्वरूप लक्षात येईल.

३. संत नामदेवांचे विठ्ठल भक्ती समजण्यास मदत होईल.

४. शाहिरी काव्याचे स्वरूप व शाहीर अनंत फंदी यांच्या 'फटका' या काव्यरचना प्रकाराचे स्वरूप लक्षात येईल.

५. अनंत फंदींनी फटकेबाजीने समाजप्रबोधन कसे केले आहे याचा परिचय होईल.

६. म. फुले यांच्या वाङ्मयीन कार्याची ओळख होईल.

७. म. फुले यांच्या कवितेतून मानवताधर्माविषयीचे स्वरूप लक्षात येईल.

८. बालकवींच्या काव्यगुणांचा परिचय होईल; त्यांचे चरित्रही समजून घेता येईल.

९. बालकवींच्या कवितेतील निसर्गाचे रूप, प्रेमाचा सूर इ. गोष्टींचा परिचय होईल.

१०. संत वाङ्मय, शाहिरी काव्य, याबरोबर म. फुले, बालकवी यांच्या एकूण वाङ्मयाचा परिचय होईल.

## १.१ प्रस्तावना :

मराठी साहित्याची परंपरा, लेखक-कवी यांचा वाङ्मयीन परिचय या बरोबरच मराठी साहित्याविषयी अभिरूची निर्माण व्हावी, त्यासाठी विद्यार्थी मनाला रूचतील अशा वाङ्मयीन घटकांना समाविष्ट करणे महत्त्वाचे असते. भाषेविषयीची गोडी वाढणे जसे महत्त्वाचे असते, तसेच मराठी साहित्यपरंपरेत उल्लेखनीय लेखन करणाऱ्या लेखक कवींचा वाङ्मयीन आढावा घेणे हेही महत्त्वाचे आहे. अध्ययन आणि अध्यापन करताना या सर्वच घटकांचा उपयोग होतो. या घटकात संत नामदेव, अनंत फंदी, म. फुले आणि बालकवी यांच्या निवडक कवितांचा विचार केला आहे. प्रत्येक कवीचा स्वतंत्र कालखंड आणि विविध वाङ्मयीन प्रवाह यातून प्राचीन तसेच अर्वाचीन कवींची, त्यांच्या कवितेची आस्वादात्मक जाणीव विद्यार्थ्यांप्रती निर्माण व्हावी. यादृष्टीने विचार केला आहे. कविता, कवितेची भाषाशैली, आशयाचा आवाका, कवितेची रसग्रहणात्मक दृष्टी आणि त्यातून सर्जनशील काव्याचा आस्वाद महत्त्वाचा ठरतो. नामदेवांची विठ्ठल भक्ती, अनंत फंदींचे प्रबोधनात्मक विचार, म. फुलेंची मानवतेविषयीची सद्भावना आणि बालकवींचे फुलराणीचे लग्न या सगळ्यात अर्थबोधाची जाणीव प्रेमकाव्यातला सूर, प्रतिमांची व्यापकता अशा कितीतरी गोष्टींचे व्यापकरूप कवितेत आले आहे.

संत नामदेव यांची विठ्ठलभक्ती सर्वज्ञातच आहे. विठ्ठलाची अंत:करणापासून केली जाणारी भक्ती, भेटीसाठीची तळमळ, भेटीविनाचा विद्रोह, मनातली घालमेल, या सगळ्यातून प्रेम आणि भक्तीचे रूप अभिव्यक्त होते. शिवाय पंढरीविषयीचे महात्म्य, मनाच्या परिवर्तनाचे ठिकाण म्हणून पंढरपूरविषयीचा आदरभाव, यासगळ्यातून शुद्ध भक्तीची जाणीव नामदेवांनी मांडली आहे. अनंत फंदी सारख्या शाहिराची कवणे म्हणजे प्रबोधनाचे फटके आहेत. सामान्य माणसाला रांगड्या भाषेत सांगताना व्यावहारिक, प्रापंचिक उपदेशांबरोबरच नवा वर्तनाचा आदेश शाहीर देतात. पेशवेकाळ त्या काळातील अनागोंदीचा कारभार,

एकमेकांविषयीचा अनादर, चमचेगिरींना प्राधान्य आणि प्रामाणिक माणसाला पायदळी तुडविणे अशा गैरवर्तन करणाऱ्यांना शहाणपणाचे वैचारिक डोस अनंत फंदीनी दिले आहेत. स्पष्ट आणि सडेतोड शब्दात अनंत फंदीची काव्यरचना उल्लेखनीय आहे.

महात्मा फुले म्हणजे आधुनिक भारतातले महत्त्वाचे समाजसुधारक होत. सामान्यांच्या शोषणाविरुद्धचा मूलगामी विचार, सत्यशोधक समाजाची स्थापना, कृषिजनसमूहाचे आणि संस्कृतीचे व्यापक चित्र, सर्वांगीण अभ्यास या सर्व गोष्टीतून मानवतेचा धर्म, धैर्य आणि विचार अशा सर्वच पातळीवर त्यांचे योगदान मोठे आहे. माणूस आणि माणसाच्या भल्याविषयीचे चिंतन अत्यंत महत्त्वाचे आहे. याशिवाय बालकवींच्या कवितेतील निसर्गाचे अद्‌भूत सौंदर्य आणि निसर्गरूपे विलक्षण पातळीवर आली आहेत. कल्पकता, वेधकता, संवेदनशीलता याबरोबर निरागस फुलराणीची आल्लड प्रेमभावना प्रभावीपणे मांडली आहे. निसर्गातील विविध घटक, मानवी भावभावनांचे चित्र, मांगल्य आणि पावित्र्यातून फुलराणीचा रंगलेला लग्नसोहळा इ. गोष्टी बालकवींच्या कवितेत खूप प्रभावीपणे आल्या आहेत. या सर्वच गोष्टींचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे. एकूणच या चारही कवींच्या काव्यधर्माची प्रकृती आणि काव्यविचारांची व्यापकता मांडली आहे.

## १.३ विषय विवेचन :

### १.३.१ संत नामदेव (इ.स. १२७० ते इ.स. १३५०)

नरसी बामणी, जि. परभणी हे संत नामदेवांच्या पूर्वजांचे गाव. नामदेवांचा जन्म पंढरपूर येथे रविवार दि. २६ ऑक्टोबर, १२७० इ. रोजी झाला. शिंपी कुळातला जन्म, वारकऱ्यांचे घर, भक्तीपूर्ण वातावरण या सगळ्याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला. दामाशेटी हे वडील तर गोणाई ही त्यांची आई होय. भक्ती संप्रदायाची कौटुंबिकता असल्याने विठ्ठल भक्तीत रमलेले नामदेव प्रापंचिक जीवनात समृद्ध होते. त्यांची पत्नी राजाई तर नारा, विठा, गोंदा, म्हादा असे चार मुलगे आणि लडाई, गोडाई, येसाई, महादाई या चार सुना होत्या. शिवाय लिंबाई ही मुलगी तर आऊबाई ही बहीण होती. शिवाय जनाबाईही होती. असे १४-१५ जणांचे कुटुंब होते. संत नामदेव ज्येष्ठ विठ्ठलभक्त होते. नामदेवांनी श्री क्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ शनिवार दि. ३ जुलै, १३५० या दिवशी समाधी घेतली असे मानले जाते. मराठीतले पहिले भावकवी, भागवतधर्माचे पहिले संघटक आणि प्रचारक, कीर्तन परंपरेचे प्रवर्तक अशा अनेक अंगाने नामदेवांचे व्यक्तिमत्त्व संपन्न होते. पंजाब मधील 'घुमाण' येथे काही काळ त्यांनी वास्तव्य केले. सुंदर शब्दचित्रे, उत्तम भावकाव्य, उत्कट भक्ती ही त्यांच्या अभंगांची वैशिष्ट्ये आहेत.

'पतितपावन' या अभंगात नामदेवांच्या उत्कट विठ्ठलभक्तीचा अविष्कार व्यक्त झाला आहे. विठ्ठलावर असणारी अपार श्रद्धा, विठ्ठलाची अंतःकरणापासून सेवा करावी आणि त्याला सगुणरूपात पहावे ही त्यांची इच्छा आहे. मात्र इतक्या भेटीच्या तळमळीतूहनी विठ्ठलभेट न झाल्यास विठ्ठलाला स्पष्ट शब्दात सुनावतानाचा हा अभंग आहे. सर्वांचा तारणहार आणि पतितपावन नाम ऐकूण मी तुझ्या दाराशी आलो, मात्र तू त्राता नाहीस म्हणून मी माघारी जातोय. काहीतरी घेतल्याशिवाय काही देणे नाही असा तू उदार आहेस. मी तुझ्या कृपेचे द्वार कशासाठी धरू? तू तुझे भक्तीरूप पतितपावन असण्याच्या अभिमानाची बाब सोडून दे. आणि

पतितपावन हे नाव तुझे कुणी ठेवले? असा विद्रोही स्वरही अभंगात मांडतात. तू पतितपावन अथवा आधारकर्ता नाहीस हे संपूर्ण जगाला पटवून सांगण्यासाठी संपूर्ण तिन्ही लोकी मी दवंडी पिटीन. शिवाय तू तर मोठा विश्वासघातकी आहेस, हे ही जगाला ओरडून सांगेन. अशा रागानच आपली भावना व्यक्त करतात. मात्र काही काळानंतर विठ्ठलालाल आळवतात आणि तुझ्याकडून मला काही नको. माझ्याबद्दलचा प्रेमभाव तुझ्या काळजात अखंड राहू दे, यासाठीच मी तुझ्या चरणी लीन होतो. असा भाव व्यक्त करतात. एखाद्या लहान मुलाने परगावी गेलेल्या वडीलांना बोलवावे तशा लडिवाळपणे नामदेव विठ्ठलाला आळवतात. भेटीसाठी तळमळणाऱ्या नामदेवांना विठ्ठलभेट होत नाही. तेव्हा विठ्ठलावर रागावतात. प्रेम आणि भक्तीचे रूप अभिव्यक्त करताना विठ्ठलाविषयीचा भक्तीभाव या अभंगात व्यक्त होतो.

'पंढरीस जावे' या अभंगातून विठ्ठलभक्ती आणि पंढरीविषयीची महती सांगतात. नामदेवांचे कुटुंबच भक्तीप्रवण होते. आपल्या कुटुंबाचे प्रेरणास्थान असलेल्या नामदेवांनी आपल्या साध्या-सोप्या काव्यशैलीतून विठ्ठलासह पंढरीच्या भक्तीप्रेमाचा गोडवा गायिला आहे. पंढरपूर हे ठिकाण माणसाच्या परिवर्तनाचे ठिकाण असून अंतर्बाह्य पातळीवर बदलून जायचे तर भक्तांनी एकदातरी पंढरपूरला जावे. स्वत:च्या जीवनमुक्तीसाठी विठ्ठलाला उराउरी भेटावे. तन-मन-धन विठ्ठलचरणी अर्पण करून सदासर्वकाळासाठी प्रेमसुख अनुभवावे. सुखसंपन्नतेचे साजिरे विठ्ठलदर्शन डोळाभर साठवावे आणि स्वत:च्या जीवावरून लिंबलोण उतरूण टाकावे. विठ्ठलदर्शनाने कैवल्याचा अंतर्बाह्य अनुभव येतो, परिणामी ब्रह्मानंदाची अनुभूती प्राप्त होते. म्हणूनच कंठाशी प्राण आणून विठ्ठलाचे नामस्मरण करीत रात्रंदिवस रममाण होणारे नामदेव इतरांनाही पंढरपूरला जाण्यासाठी प्रेरणा देतात. किर्तनात दंग राहून समाजाला ज्ञानाचा प्रकाश देत विठ्ठलाविषयीचा भक्तीभाव या अभंगात व्यक्त केला आहे. भागवत संप्रदायाचे तत्वज्ञान, समानतेची शिकवण, मानवतेचा अनुभव देत विठ्ठलाविषयीच्या शुद्ध भक्तीचा प्रचार आणि प्रसार समाजात नामदेवांनी रूजवला.

**१.३.२ अनंत फंदी** (इ.स. १७४४ ते इ.स. १८१९)

पोवाडा आणि लावणी ही शाहिरी वाङ्मयाची दोन महत्त्वाची अंगे होत. आपल्या वाङ्मयीन निर्मितीसाठी लोकवाङ्मयातले अनेक संदर्भ शाहीर आपल्या काव्यरचनेसाठी घेतात. लोकवाङ्मयाच्या मौखिक परंपरेत घडलेले आणि पाठांतराने वाङ्मय जतन करणारे शाहीर खेड्यापाड्यातील शेतकरी, कामकरी हाच त्यांचा श्रोतावर्ग असायचा. शाहीर जे सांगायचे ते अत्यंत पोटतिडकीने व रांगड्या भाषेत सांगत असत. सर्वसामान्य माणसाला जे हवे ते देण्याचा प्रयत्न शाहीर करतात. मराठी वाङ्मयाच्या इतिसात शाहीरी काव्याला अधिक मोठे स्थान आहे. शाहीरी परंपरेत रामजोशी, होनाजी बाळा, शाहीर परशराम, शाहीर सगनभाऊ, शाहीर प्रभाकर यांच्या बरोबर शाहीर अनंत फंदीचे कार्य मोठे आहे. शाहिरांची वाङ्मयनिर्मिती सर्वसामान्य लोकांशी बांधिलकी मानणारी व समाजाशी नाते जोडणारी अशी आहे. अनंत फंदी यांचे मूळ गाव संगमनेर, जि. अहमदनगर होय. पूर्वजांचा पिढीजात धंदा सराफीचा व गोंधळ्याचा, बालपण खोड्या करण्यात गेले. फारसे शिक्षण नाही. मात्र भवानी बुवांच्या आशीर्वादाने कवित्वाची प्रेरणा मिळाली. आपल्या कार्यकर्तृत्वावर शाहीर म्हणून प्रसिद्धी मिळवली शिवाय पेशव्यांच्या दरबारातही स्थान मिळळवले. शाहिरी

काव्यात आपल्या आत्मविश्वासपूर्ण काव्याने अजरामर झालेला कवी म्हणजे अनंत फंदी होय. पेशवेकाळातील एक महत्त्वाचा कवी म्हणून त्यांचे स्थान मोठे आहे. सामाजिक जाणीव प्रभावी आणि जागरूक असल्याने समाजप्रबोधनात ते प्रभावी ठरले. व्यावहारिक उपदेशाबरोबर प्रभावी फटक्यांच्या रचनेतून संसारी माणसाला वर्तनाचा नवा आदर्श दिला. पोवाडे, लावण्या, फटके इ. त्यांचे साहित्य आजही उपलब्ध आहे. शाहिरी वाङ्मयाला समृद्ध करणाऱ्या शाहिरांमध्ये अनंत फंदींची रचना सर्वश्रेष्ठ आहे. अनंत फंदींचा खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा प्रसिद्ध आहे. अहिल्याबाई होळकर यांच्या प्रोत्साहनातून ते प्रसिद्ध कीर्तनकार बनले.

'जमाना आला उफराटा' या लावणीत अनंत फंदी यांनी पेशवेकाळातील अनागोंदीचे चित्र रेखाटले आहे. कुटुंबात कुणीच कुणाला किंमत देत नाहीत. प्रत्येकजण एकमेकांची निंदा करतात. स्वत:च्या आईकडे दुर्लक्ष करून सासूला किंमत देणारा जावई काय किंवा स्वत:च्या बहिणीला अपशब्द वापरून अपमाणित करणारा भाऊ मेहुणीला मात्र लाडा-कौतुकाने संबोधतो. आपल्याच आई वडीलांना शून्य लेखत त्यांची निर्भत्सना करून बायकोचे लाड पुरवणारा मुलगा इथे श्रेष्ठ ठरतो. असा हा उलटाच काळ असल्याचे कवी नोंदवतो. मालक आपला अन्नदाता असूनही मालकावर उलटणारे चाकर आज अधिक झाले. सावकाराची प्रत्येकाशी सुरू असणारी बेईमानी काय आणि दबारातली बिघडलेली शिस्त काय, या सगळ्यातून जगाची उलटी नितीमत्ता सुरू असल्याचेच जाणवते. खऱ्याचं खोटं होणारा दरबार काय कामाचा? रयत बुडवावी असे असणारे मत म्हणजे व्यापाऱ्यांनी केलेली लूट होय. चमचेगिरी करणाऱ्यांना प्राधान्य आणि फालतूंना किंमत असा विचित्र काळ आला आहे. अशा असंख्य गोष्टी सांगत सांगत कलीयुगाचा वाराच बदलला असल्याचे शाहीर फंदी सांगतात. प्रत्येक माणसाने आपली समज-उमज लक्षात घेवून अक्कल धारण करावी आणि शहाणेपणानं वागावं, हाच या कलगीवर सोटा असल्याचे मत फंदी नोंदवतात. समाजप्रबोधनाचा व्यापक विचार मांडताना शाहीर अनंत फंदी यांनी बदलत्या कलियुगात कलियुगाचा आणि पेशवेकालीन अनागोंदीचा कारभार कसा चालत होता, याचे व्यापक चित्र मांडले आहे.

'हे मूर्खा खूण तर्का' या लावणी रचनेत बाह्यजग आणि आंतरिक जग यांची व्यापकता मांडली आहे. जीवनातील कटू अनुभवांनी आलेलं शहाणपण भोवतालच्या परिस्थितीचंच सूक्ष्म निरीक्षण आहे. जगातील वास्तवसत्य दिसते तसे नसते हे उपरोधिक पद्धतीने मांडले आहे. बाहेरून चांगले वाटणारे आतून चांगले असेलच असे नाही याची असंख्य उदाहरणे सांगत जगाकडे सावधपणे बघण्याचा सल्ला कवीने दिला आहे. बाहेरून चांगला रुपया वाटणारा आतून मात्र केवळ तांब्याचा भुरभुराच दिसतो. तर रूबाबदार आणि बलशाली देहयष्टीचा शिपाई लढाईच्या क्षणी मात्र माघारी पळून जात असेल तर त्याची मर्दुमकी कसली? अंगठीवर विसावणारा हिरा मस्तकावर घन बसताच चुरा होऊन निरूपयोगी ठरतो. मग अस्सलपणा कशात आहे? मोती म्हणून हळूवारपणे जपताना फुग्यासारखी भुगा होणारी त्याची अवस्था होते. ज्याच्या अंगी दोष नाही असा साधू म्हणून संबोधावे तर साधूही अत्यंत विचित्रपणे जगणाराच भेटतो. एखादा मार्ग चांगला समजून चालत रहावे तर वाट्याला उकिरडाच येतो आहे. या सर्व घटना म्हणजे चांगल्या प्रापंचिकतेत परक्या पुरुषाने प्रपंचाला नासवल्यासारखे आहे. शहराची सौंदर्यपूर्ण मिजास आणि चांगली माणसे भेटतील असे वाटते, मात्र प्रत्यक्षात रस्त्यातून वाहणारे कळकट-मळकट पाणी पाहून शहराबद्दलची खरी ओळख पटते. घोडा प्रचंड

मोठ्या किंमतीचा असावा असे वाटते, मात्र प्रत्यक्षात न्याहाळून पाहिले तर तो काहीच उपयोगाचा नसतो. पिंजऱ्यात डोकावणारा राघू गोड भासू लागतो, मात्र प्रत्यक्षात त्यात कावळा आपली अदा दाखवत असतो. एखाद्या चतुर शहाण्या योगी पुरुषाला बोलवं तर त्याच्याशी संपर्कानंतर कळतं की, तो एखाद्या मूर्खासारखाच आहे. एखाद्या गायकाच्या गळ्यातून बाहेर पडारी गाण्याची लकेर आनंददायी असावी असे वाटले तरी गायकाच्या गळ्यातून बाहेर पडणारे अनंत फंदीचे शब्द एखाद्या शस्त्रासारखे हृदयाला टोचत राहतात. अनंत फंदीचे शब्द हे शस्त्रच आहेत. अशा दीर्घ काव्यरचनेतून अनंत फंदींचा उपदेशपर सल्ला, मौलिक व्यावहारिक संदेश, रांगडी भाषा, व्यावहारिक ज्ञान आणि आपल्या काव्यातून स्पष्ट आणि सडेतोडपणाने व्यक्त होणारी अनंत फंदींची काव्यरचना महत्त्वाची आहे. साधे शब्द, रांगडेपणा, व्यवहाराचा जीवनात होणारा उपयोग अशा अनेक गोष्टी वैशिष्ट्यपूर्णतेने त्यांच्या कवितेतून व्यक्त होतात.

**१.३.३ महात्मा फुले** (इ.स. १८२७ ते इ.स. १८९०)

महात्मा जोतीराव फुले आधुनिक भारतातले एक महत्त्वाचे समाजसुधारक होते. तात्विक चिंतनाबरोबर शिक्षणाविषयीचा उदात्त विचार त्यांनी मांडला. आपल्या विचारातून तळागाळातल्या सामान्यांच्या शोषणाविरुद्ध मुलगामी विचार मांडला. जनसामान्यांचे दु:ख-दैन्य-आर्थिक शोषण या सगळ्याचा अन्वयार्थ लावत प्रत्येकाला हक्काने जगता यावे, यासाठी धडपडणारे म. फुले म्हणजे बहुजनांच्या सामाजिक सांस्कृतिक इतिहासाचे जनकच होते. सत्यशोधक समाजाची स्थापना करून समाजाच्या परिवर्तनासाठी कार्यकर्त्यांचे संघटन त्यांनी उभे केले. तृतीयरत्न, छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, मराठी ग्रंथकार सभेस पत्र, हंटर आयोगापुढील शैक्षणिक निवेदन, सार्वजनिक सत्यधर्म इ. प्रकारच्या विविध साहित्यातून कृषिजनसमूहांच्या पर्यायी वाङ्मयीन संस्कृतीचे बीजारोपण त्यांनी केले. इंग्रजी, संस्कृत, मराठी ग्रंथांचे मूलभूत वाचन, वेदवाङ्मयाची जाणीव, पुराणवाङ्मयाचा सखोल अभ्यास या सर्वार्थाने त्यांचा व्यासंग मोठा होता. विचारांची तार्किक मांडणी, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाची उभारणी त्यांनी केली. शोषित समाजाची मुक्ती करणे, प्रत्येकाला स्वातंत्र्य मिळावे, मानवी प्रतिष्ठा आणि श्रमप्रतिष्ठा प्रत्येकाला मिळावी हा क्रांतिकारी मूल्यविचार यांनी दिला. मुलामुलींच्या शिक्षणासाठी शाळेची स्थापना, विधवा पुनर्विवाहास सहाय्य, बालहत्याप्रतिबंधक गृह, अस्पृश्यांसाठी पाण्याचा हौद खुला करणे यासारख्या असंख्य कृतीशील गोष्टींमधून शोषितांच्या मुक्तीचा जणू ध्यासच त्यांनी घेतला होता. त्यांच्या कलात्मक रचनेचे अखंड काव्य मानवी जीवनधर्म आणि व्यक्ती व समूह यातून जीवनधर्म सांगितले आहे.

'मानवांचा धर्म एक' या अखंड काव्यात माणसाने आपल्या सोईसाठी देव आणि धर्म निर्माण केले असल्याचे सांगतात. मात्र यातून काही चांगले होण्याऐवजी सर्वार्थाने शोषणच होत आहे. सर्वांचा निर्मिक जो एकच आहे, त्याला स्मरूनच सर्व वस्तूंचा उपभोग घ्यायला हवा असे ते सांगतात. मानवा-मानवात कुठलाही धर्मभेद-राज्यभेद असू नये. मानवी जीवनाच्या भल्यासाठी सत्यानेच प्रत्येक गोष्ट करावी आणि प्रत्येक गोष्टीचे भान ठेवावे. समाजातल्या जीवाला सुख मिळावे, यासाठीच मीही अखंड मानवतेची साधना करतो. धर्माच्या नावावर आपापसात न भांडता सर्वांनी सत्य हाच धर्म मानावा, अशा मानवतावादी विचारासाठी म. फुले सतत

आग्रही राहिले. निर्मात्याने पृथ्वीची निर्मिती करताना कसलाही भेदभाव केला नाही, मग माणसामाणसात इतका भेदभाव कशासाठी? जगाची निर्मिती करणाऱ्याने जर एकच पृथ्वी निर्माण केली आहे, झाडा-झुडपांचा भार, पानावेलींचा भार, गोडगोमट्या फळांचा भार, एकटा वृक्ष पेलतोच ना? असा सर्व भार पेलत असूनही सावली देतोच ना? तेव्हा कुठे भेदभाव असतो? पृथ्वी जसा सगळ्याचा भार पेलत मनवाच्या सुखसोईसाठी रात्रंदिवस फिरत राहते. सगळ्या जगाचा निर्माता जसा एक आहे, तसाच मानवाचा धर्मही एकच असावा. म. फुले म्हणतात, मानवधर्माची एक संध वृत्तीच सर्व शोषणातून माणसाला मुक्त करेल. सर्व निर्मितीचा जो धनी, त्याची भीती मनात असायलाच हवी.

'धीर' या अखंडातून माणूस आणि मानवी समूहजीवनात धाडसाची आणि धैर्याची बाजू अधोरेखित केले आहे. म.फुलेंनी तेव्हा मांडलेल्या विचारांना आजच्या काळातही खूप महत्त्व आहे. सत्यातून मनाची स्वच्छता होत असते. सत्यापासून दूर जाऊन माणूस असत्याने वागू लागला तर आपल्या अंत:करणाचा स्वस्थचित्तपणा हरवून जाईल. हृदयात सदैव धीराला जागा दिली तर सत्याचे वर्तनच आपल्या हातून घडेल. माणसाने आपल्या विचारातून सद्वर्तनी बनायचे तर नेहमीच सत्याची कास धरायला हवी. पीडा-दु:ख-दैन्यापासून अशा संकटांपासून दूर व्हयचे तर सत्यच आपल्याला तारू शकते. सत्याचा जिव्हाळाच माणसाला तारू शकतो. मानवी मनात धैर्याची बाजू असेल तर सर्वार्थाने आपण सुखी आणि यशवंत होतो. म. फुलेंनी हे सांगताना,

''पिडा दु:ख सोशी संकटे निवारी। गांजल्यास तारी। जगामाजी।

धीर धरूनीयां सर्वां सूख देती। यशवंत होती। जोती म्हणे।'

अशा शब्दांत धैर्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. एकूणात महात्मा जोतीबा फुले यांच्या कवितेतून माणूस आणि माणसाच्या भल्याविषयीचे चिंतन व्यक्त होते.

### १.३.४ **बालकवी** (इ.स. १९८० ते इ.स. १९१८)

निसर्ग-प्रेम आणि बालसुलभ भाव अशा विविध रंगानी नटलेली बालकवींची कविता मराठी कवितेत महत्त्वाची आहे. निसर्गाचे अद्भूत सौंदर्य आणि निसर्गाची विविध रूपे उलगडणारी कविता एकूण मराठी कवितेत मौलिक भर टाकणारी अशीच आहे. कवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ बालकवी यांचा जन्म धरणगाव जि. जळगांव येथे झाला. बालकवींच्या वडीलांची फिरस्तीची नोकरी, परिणामी अनेक ठिकाणी त्यांची शैक्षणिक हेळसांड झाली. एरंडोळ, यावल, जामनेर, बेटावद अशा ठिकाणी त्यांचे तिसरी पर्यंतचे शिक्षण झाले. वडील पोलीस खात्यात नोकरीवर होते. अत्यंत अल्पवयात काव्यलेखनास व शिक्षकी पेशास त्यांनी आरंभ केला. १९०७ साली कर्नल किर्तिकर यांच्या अध्यक्षतेखाली जळगांव येथे भरलेल्या कविसंमेलनात 'बालकवी' हे विशेषण देऊन त्यांच्या काव्यगुणांचा गौरव केला. कल्पकता, वेधकता आणि उत्प्रेक्षा ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये होत. पुढे रेव्हरंड ना. वा. टिळक व त्यांच्या कुटुंबियांचा बालकवींना सहवास लाभला. त्यामुळेच त्यांच्या काव्याला आणि जीवनाला वेगळे वळण मिळाले. १९१८ साली जळगावजवळच्या भादली रेल्वे स्टेशनच्या लेव्हलक्रॉसिंगवर मालगाडीखाली सापडून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. निसर्गाशी एकरूप

होऊन त्यांच्या चैतन्याच्या सौंदर्याच्या आणि मांगल्याच्या छटा टिपून घेणे हे बालकवींच्या कवितेचे विशेष. निसर्गाची जाणवणारी स्पंदने आपल्या संवेदनशील पदावलीतून ते व्यक्त करतात. निसर्गाविषयीची प्रेम, मानवी जीवनातील व्यापक बंधुभाव, समतेचे तत्त्वज्ञान आणि सुबोध शैली हे काव्यविशेषांचे नाते महत्वाचे आहे. मराठी काव्यसृष्टीतील नाजूक अंत:करणाचा व सोनेरी पंखाचा पक्षी म्हणजे बालकवी होत.

'फुलराणी' ही मराठी रसिकांची एक लाडकी कविता होय. मराठी रसिक वाचक मनाने ही कविता कितीही वेळा वाचली तरी दवबिंदूप्रमाणे ताजी आणि टवटवीत वाटणारी अशी आहे. सूर्यकिरणांनी उमलणारे फूल हे निसर्गातली अत्यंत साधी घटना. मात्र बालकवींनी त्यावर एक सुंदर स्वप्न फुलविले आहे. फुलराणी आणि रविकर यांच्या अस्फुट-निरागस प्रेमाची आणि त्यांच्या विवाहाची कहाणी सांगताना काल्पनिकतेचा सांजशृंगार मदतीला आणला आहे. निरागस आणि अल्लड फुलराणी, मनातली भोळीभाबडी प्रेमभावना, तिची स्वप्ने आणि रविकराशी झालेला विवाह याचे चित्रण ज्या भावमधुर सौंर्दवृत्तीने बालकवींनी केले आहे, ते मराठी साहित्यात अजरामर ठरले आहे. 'फुलराणी' म्हणजे बालकवींना पडलेले एक भावमधुर स्वप्न होय. एका निरागस मनात अनुभवणाऱ्या पहिल्या प्रेमाचे, तिच्या अंत:करणातील भावतंद्रीचे आणि प्रणयव्याकुळ वृत्तीचे सूक्ष्म संवेदन खूप प्रभावीपणे या कवितेत टिपले आहे.

हिरव्यागार गवतावर संध्याकाळच्या वेळी एक सुंदर कळी आपल्याच तोऱ्यात डोलत होती. अगदी निरागस आणि भाबडी अशीही कळी, तिला 'प्रणयचंचला भ्रूलीला' काही माहिती नव्हत्या. ती एक अव्याज मनाची साधीभोळी कुमारिका होती. सहज तिचे लक्ष मावळत्या सूर्याच्या किरणांकडे गेले, हा प्रकार नेहमीच खट्याळपणे वावरणाऱ्या वाऱ्याने पाहिला आणि तो वारा विनोदाने फुलराणीला म्हणाला,

'छानी माझी सोनुकली ती। कुणाकडे ग पहात होती।
तो रविकर का गोजिरवाना। आवडला आमुच्या राणीला।'

या प्रश्नाने लाजून गेलेल्या फुलराणीच्या मनात तेव्हापासून प्रेम वाटू लागले संध्याकाळ झाली. सगळे जग झोपी गेले, मात्र फुलराणी अस्वस्थच होती. मध्यरात्रीनंतर कुंजाकुंजातून काजवे चमकू लागले. निर्झर वनदेवीला गाणे आळवताना सगळे रान डुलत होते. मात्र फुलराणी प्रणयतंद्रीतच मग्न होती. अशातच गुंगी आली आणि तिला सुंदर स्वप्न पडले. त्या स्वप्नात प्रणयगीतानेच कुणीतरी कुणालातरी आळवते आहे. कुणीतरी एकमेकांचे हळूच चुंबन घेतल्याचे तिला दिसते. या स्वप्नदृश्याने फुलराणी जागी होते आणि तिची प्रणयव्याकुळता वाढते. दरम्यान पहाट होते. विरह संपतो. पृथ्वी नटून थटून आनंदाने हर्षोत्कुल झाली. मात्र फुलराणी स्वप्नसमाधीतच एकाग्र झाली होती. अशा मोहक वातावरणातच दाही दिशाला तेजाचा लख्ख मंडप कुणीतरी उभा केला. आकाशातून दिव्य वऱ्हाडी सुंदर पोषाखातून आले. चंडोल पक्षी जणू वाङ्‌निश्चय करायला निघाला. वारा आपल्या आवाजाने सनई वाजवू लागला. लग्नाची तयारी तर झाली. निर्झरांनी पखवाजांचा आवाज वाढवला आणि या थाटामाटात सोनेरी रविकराशी सुंदर फुलराणीचे लग्न लागले. फुलराणी आणि रविकर यांच्यात असणारा धुक्याचा अंतरपाट दूर झाला. दोघांचे मीलन होऊन जिकडेतिकडे

आनंदी आनंद झाला. फुलराणीची ही गोड आणि सुंदर कहाणी बालकवींनी आपल्या जादूई शब्दांनी निर्माण केलेली स्वप्नसृष्टि आहे. निसर्गवर्णनाची लबक, निष्पाप मन, प्रेमभावनेतली नजरानजर, विरहभावनेची अस्वस्थता, विरहाची प्रदीर्घ रात्र, विरहातली मनाची व्याकुळ अवस्था, ध्यानी ते स्वप्नी या न्यायाने प्रणयाकुल वृत्तीला पडणारी स्वप्ने आणि शेवटी घडणारा मनोमीलनाचा आनंद या सर्व गोष्टी बालकवींनी अत्यंत सहजपणे या कवितेत उलगडल्या आहेत. विवाहाचे वर्णन करताना बालकवींची प्रतिभाशक्ती प्रभावीपणे जाणवते. सकाळचा पांढराशुभ्र उजेड म्हणजे दाही दिशांना घातलेला मंडप, दवबिंदू म्हणजे उधळले गेलेले मोती. तांबूस प्रकाशातली चमकती सृष्टि म्हणजे भरजरी पोषाखाची वऱ्हाडी मंडळी, धुके म्हणजे अंतरपाट, कोकिळ, निर्झर यांचे गाणे म्हणजे वाजंत्री अशा असंख्य गोष्टी सांगत बालकवींनी कल्पनेची शब्दफुले या कवितेत हळूवारपणे मांडली आहेत. सरळ भावना, मनोज्ञ कल्पना आणि नाजुक वर्णनाने नटलेली भाषाशैली हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. निसर्गातील विविध घटकांवर मानवी भावभावनांचे आरोपन केल्यामुळे ही कविता मन मोहवून टाकते. फुलराणीच्या विवाहाचे वर्णन करताना तेजोमय मंडप, दिव्य वऱ्हाडी, लालसुवर्णी झगे, गुलाबी फेटे, मंगलपाठ, मंजुळ सनई या शब्दांनी मांगल्य आणि पावित्र्य वाढविले आहे. बालकवींच्या कवितेत शब्दसामर्थ्य आणि प्रतिभासामर्थ्य खूप प्रभावशाली आहे.

'अप्सरांचे गाणे' ही सुद्धा अशीच भावसुंदर कविता. सृष्टीच्या अचेतन घटनांतील चैतन्याची उभारी आणि सचेतन घटनांतील आर्ततेचा सरल प्रत्यय या कवितेत चित्रित केला आहे. या कवितेत सृष्टीची मोहिनी आहे. आणि सृष्टीचेच रूप असलेली लावण्यवती तिचेही रूप आहे. सौंदर्यसंपन्न अशा स्त्रीच्या पावलांना पुष्पदाटी कुरवळते आणि त्याच फुलांना ती सौंदर्यवती आपल्या कोमल स्पर्शाने सांभाळते. फुलांच्या गर्दीत अप्सरांचा होणारा प्रवेश आणि स्वच्छ जलाने स्नान केल्यानंतर या अप्सरांचे अधिक सुंदर दिसणे, एवढ्याच नेमक्या आशयाची ही कविता. बालकवींनी मात्र आपल्या निसर्गदत्त शब्दप्रतिमांनी कवितेचे सौंदर्य आणखी वाढवले आहे.

> 'सुमनाच्या गर्भामाजी। रसगंगा भरली जाती।
> आलिंगुनि तिज ही बसली। शुभ्र अद्रिशिखरे सगळी।'

अशा नाजूक सृष्टीवर जी पाऊले पडतील, या सृष्टीचा जो सहवास लाभेल, त्याचे हे विलोभनीय निसर्गसौंदर्याचे चित्र आहे. सृष्टीसौंदर्याला अत्यंत प्रेमाने न्याहाळणे, हेच संबोधणे या कवितेत आहे. संध्याकाळची सुंदर वेळ, निवांत वेळ आणि तीही रंगगंधाने फुललेली अशी प्रसन्न संध्याकाळ म्हणजे जणू अप्सराच होय. ही सुंदर संध्या म्हणजेच अप्सरा, अशी प्रतिमा या कवितेत आहे. गर्द दाट झाडीतून मंदपणे हलणारी झाडी, स्नानाची वेळ, परागसुमने पायाखाली येणार नाहीत, याची घेतलेली काळजी, फुलांचा बरसणारा थाट बघा, आणि सावकाशपणे वाट काढून जा हे सांगताना अत्यंत तरलपणे बालकवी सृष्टीसौंदर्य लिहितात. निसर्गसौंदर्याचा अनुभव घेताना रसमग्न तटस्थपणा बालकवींना प्राप्त होतो. मनाची निर्मळ असणारी रसिकवृत्ती निसर्गाचा गोडवा अधिक वाढवतो. गोड सुवासांचे मेघ सर्वत्र आळसून बसले आहेत.

थंडगार अशा अंगावर पडणाऱ्या जलकणिका भिजवताहेत. सृष्टीतली तन्मयता आणि माणसांची कल्पकता यांचे वेगळे चित्र बालकवी मांडतात.

'गोड सुवासाचे मेघ-आळसले जागोजाग
हिमकणिका त्यांच्या पडती - गोडधोड अंगावरती
स्नान करूं झडकरि बाई - पुनित ही गंगामाई।'

अशा सुंदर संध्येची ही प्रतिमा आहे. रविकीरणांचे विविधरंगी कपडे अंगावर घालून भृंगावर बसून मंजूळ गाणिगायली जातात. त्यामध्ये आनंदाने हसत रूसत गाणी म्हणणारी अप्सरांची व्यापकता बालकवी रेखाटतात. सृष्टीचा रस-रूप-स्पर्श-गंध-सौंदर्य पाहून त्यांच्याशी एकरूप होणे आणि स्वत:चे भान विसरून जाणे, ही एकरूपता या काव्यात गडद केली आहे. बालकवींची कविता निसर्गाने मोहरून धुंद होणारी, माणसाला सृष्टीसौंदर्याच्या गीत-सुरांत आंदोलित करणारी अशी कविता आहे. फुलांच्या गर्भात लपलेल्या रसगंगेत स्नान करू इच्छिणाऱ्या अप्सरांचे मोहक वर्णन करताना फुलांच्या शुभ्र अशा पुंकेसरांना धक्का लागू नये, म्हणून खबरदारी घेतात. निसर्गातील वातावरणामुळे बालकवींच्या काव्यप्रतिभेला बहर येतो. बालकवींच्या संवेदनशील मनाचे प्रगटीकरण म्हणजे ही कविता होय. अमर्याद असे निसर्गसौंदर्य आणि अर्थपूर्णता असलेल्या सृष्टीच्या सहवासात कवीच्या निर्मलमनाची गंधमय अवस्था या कवितेत ठळकपणे व्यक्त झाली आहे.

## १.४ समारोप :

वरील सर्व विवेचनातून वाङ्मयीन जाणीव, भाषेची गोडी, कवीचे शब्द सामर्थ्य, विविध कालखंडातील कवींचा प्रातिनिधिक परिचय आणि त्यांच्या काव्यातील जाणीवांचा शोध घेण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला आहे. कविता, भाषा, विचार, समाज, सामाजिक प्रबोधन, भक्तीची कल्पना, भक्तीच्या सामर्थ्यांची प्रभावी जाणीव, व्यापक विचारधारा इ. सगळ्या गोष्टींची कल्पना येते. संत नामदेवांची विठ्ठलभक्ती, म. फुलेंचा मानवतावादी विचार, शाहीर अनंत फंदींचे फटके आणि बालकवींची निसर्गरूपे या सगळ्याच गोष्टींचे विस्ताराने आकलन होते. प्राचीन काळापासून पुढचा सर्व प्रवास एकूण काव्यपरंपरेत महत्त्वाचा ठरला आहे. याची प्रचिती वरील सविस्तर विवेचनावरून येते.

## १.५ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न :

### अ) योग्य पर्याय निवडा.

१. कोणते नाम ऐकुनी आलो मी द्वारा ?

(पतितपावन / विठ्ठल / ब्रह्मानंद)

२. काय आला उफराटा ?

(जमाना / कलियुग / व्यापार)

३. सर्वांचा धनी कोण आहे ?

(निर्मिक / पृथ्वी / जिव्हाळा)

४. आंदोली संध्येच्या बसुनी, झोके कोण घेते ?

(रजनी / पहाट / संध्यासमय)

५. फुलराणीचा वाङ्‌निश्चय करायला आकाशी कोण चालला ?

(चंडोल / कबुतर / हंस)

**उत्तरे :**

१) पतितपावन, २) जमाना, ३) निर्मिक, ४) रजनी, ५) चंडोल

**१.६ सरावासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. पंढरीस जाऊन काय व्हावे, असे नामदेव सांतात ?

(जीवन्मुक्त / आनंदी / भक्त)

२. उपराट्या जमान्यात मुलगा आईला दूर ढकलून सासूला काय म्हणतो?

(काशी / गंगा / देवता)

३. कुणाच्या गर्भामाजी / रसगंगा भरली ताजी ?

(सुमनाच्या / गंगामाईच्या / सुवासाच्या)

४. मानवांचे धर्म किती असावेत, असे म. फुले म्हणतात ?

(एक / पाच / आठ)

५. हिरव्यागार सुंदर मखमलीवर कोण खेळत होते ?

(फुलराणी / रजनी / वनदेवी)

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) विठ्ठलदर्शनाने येणारा अंतरर्बाह्य कैवल्याचा अनुभव नामदेवांनी कसा वर्णन केला आहे ?
किंवा

मानवता हा एकच धर्म मानावा, असे आवाहन म. फुले यांनी आपल्या कवितेतून केले आहे; सविस्तर लिहा.

**सरावासाठी प्रश्न.**

१. अनंत फंदींनी आपल्या लावणीतून पेशवेकालीन अनागोंदीचे चित्र कसे रेखाटले आहे ते सविस्तर लिहा.

२. निसर्गातील विविध घटकांचे वर्णन बालकवींनी कोणत्या शब्दांत मांडले आहे ते सविस्तर लिहा.

३. संत नामदेवांची विठ्ठलभक्ती या विषयी थोडक्यात लिहा.

४. फुलराणीच्या विवाहवर्णनातील शब्दांचे मांगल्य आणि पावित्र्य बालकवींनी कसे रेखाटले आहे ते स्पष्ट करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ :


१. देशमुख माधव गोपाळ, नामदेव, साहित्य अकादमी, तिसरी आवृत्ती, २००८

२. पवार गो.मा. / हातकणंगणेकर, म.द. निवडक मराठी समीक्षा, साहित्य अकादमी दु.आ. २००७.

३. कुलकर्णी वा. ल, मराठी कविता : जुनी आणि नवी, पॉप्युलर, १९८०

४. कुलकर्णी गो. म. भिडे, श्री. र. मराठीचे स्वरूपदर्शन, मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९५४.

५. अदवंत म.ना./ भोसले द. ता, सौंदर्यकुंज, व्हीनस प्रकाशन पुणे, दु. आ. १९८१.


## १.८ संदर्भ सूची :


१. देसाई डी.ए. व इतर, नामदेवांचे निवडक अभंग, संपादन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८

२. डहाके वसंत व इतर, संत साहित्य : आकलन आणि अध्यापन, संपादन, म.रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे, प्र.अ. २०११

३. जोग रा. श्री. / कुसुमाग्रज, काव्य वाहिनी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, दु.आ. १९६८

४. पाटील पुरुषोत्तम, कविभारती, बालकवी विशेषांक, खंड २, जाने-एप्रिल, १९९२.

५. शिंदे विश्वनाथ, बहुजनांच्या सांस्कृतिक इतिहासाचे जनक : म.फुले, अक्षरवाङ्मय, एप्रिल-जून २०१८.


## १.९ अधिक वाचनासाठी ग्रंथ :


१. मिरजकर श्यमासुंदर, संत नामदेव, समाजशास्त्रीय अभ्यास, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०१६.

२. कवठेकर बाळकृष्ण, वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा, नवसाहित्य प्रकाशन, बेळगांव.

३. म.फुले यांची समग्र कविता.

४. कुसुमाग्रज, फुलराणी (बालकवींची निवडक कविता), सारस्वत प्रसारक मंडळ, पुणे.

५. ठोमरे पार्वतीबाई, समग्र बालकवी, व्हीनस प्रकाशन, पुणे.

६. नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७. साम्यवादी, दीपावली विशषांक, बेळगांव, म.फुले विशेषांक.

**१.१० उपक्रम :**

१. समग्र म. फुले वाचा.

२. बालकवींच्या कवितांची ध्वनिचित्रफित ऐका.

३. निसर्गात फिरून टिपणे लिहा.

❖ ❖ ❖

## घटक –२

# कविता

विंदा करंदीकर : १) माझ्या मना बन दगड, २) झपताल

वाहरू सोनवणे : १) गोधड, २) चळवळ म्हणजे

प्रज्ञा दया पवार : १) माणसासारखा माणूस असूनही, २) आग आणि फुफाटा

एकनाथ पाटील : १) शहर एक उदास पोकळी, २) शोधयात्रा

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.३ कवी परिचय

२.४ विषय विवेचन

२.४.१ विंदा करंदीकर

२.४.१ एकनाथ पाटील

२.५ कठीण शब्दांचे अर्थ :

२.६ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न :

२.७ अधिक वाचन

२.८ संदर्भ ग्रंथ

**२.० उद्दिष्टे :**

विद्यार्थी मित्रहो, बी.ए. भाग–१ 'आवश्यक अनुषंगिक निवड' मराठी या विषयाच्या दुसऱ्या सत्रामधील अभ्यासक्रमामध्ये कविता या वाङ्मय प्रकारातील विंदा करंदीकर, वाहरू सोनवणे, प्रज्ञा दया पवार, एकनाथ पाटील यांच्या प्रत्येकी दोन कवितांचा अभ्यास आपण करणार आहोत. यामुळे तुम्हांस,

१. आधुनिक मराठीमधील १९२० नंतरच्या कवितेचे स्वरूप समजून येईल.

२. विंदा करंदीकर यांची सामाजिक तसेच स्त्रीच्या व्यक्तीमत्त्वाच्या बहुविध अशा पैलूंचे चित्रण केलेली कविता समजून घेता येईल.

३. १९६० नंतरच्या मराठी कवितेतील दलित, ग्रामीण, आदिवासी साहित्य प्रवाहांची सुरूवात लक्षात येईल.

४. वाहरू सोनवणे यांचा आदिवासी जाणिवेचा विचार आणि चळवळीच्या केंद्रस्थानी असणाऱ्या माणसाचे महत्त्व समजून घेता येईल.

५. प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेतून स्त्रियांच्या विस्तृत अवकाशाचे वर्णन आणि पुरुषी मानसिकतेचे आलेले चित्रण समजेल.

६. एकनाथ पाटील यांच्या कवितेतील गाव आणि शहर यांच्या द्वंद्वात सापडलेल्या तरूण पिढीची घुसमट समजून घेता येईल.

**२.१ प्रस्तावना :**

आधुनिक मराठी कवितेची सुरूवात केशवसुतांच्या कवितेपासून झाली. त्यामुळे आधुनिक मराठी कवितेचे ते जनक ठरतात. त्यांनी मराठी कवितेत नव्या संकल्पना रूजविल्या. १९२० नंतर रविकिरण मंडळाची कविता निर्माण झाली. त्यातूनच मराठी कवितेचे दालन समृद्ध होत गेले. १९३० नंतर मराठी कवितेत कुसुमाग्रज यांच्या कवितेचा उदय झाला. कुसुमाग्रजाची कविता ही केशव सुतांच्या कवितेशी नाते सांगते. मराठी कविता अशा एका उंचीवर जात असताना अनेक ग्रामीण, शहरी महानगरी कवींनी आपल्या सभोवतालच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीचे चित्रण आपल्या कवितेतून केलेले आहे.

याच काळामध्ये विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकरया त्रयींनी मराठी कवितेला गावागावात पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे मराठी कविता शहरापासून खेड्यापर्यंत आणि खेड्यापासून गावगाड्यापर्यंत क्रमाक्रमाने विकसित होत गेली. विंदा करंदीकरांनी 'स्वेदगंगा' (१९४९) या कवितासंग्रहापासून साहित्य प्रांतात आपली एक वेगळी मुद्रा उठविली. १९३७ पासून १९८५ पर्यंत सातत्यपूर्ण त्यांनी कविता, बालकविता, अनुवाद, समीक्षा या प्रांतात आपले प्रतिभासंपन्न असे लेखन केलेले आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी या साहित्य प्रवाहांनी आपल्या जीवन जाणिवा व्यक्त करण्यास सुरूवात केली. यातील दलित साहित्याने कविता, आत्मकथन याद्वारे आपले दु:ख व्यक्त करून माणुसकीची हाक दिली. आदिवासी साहित्यामध्ये गावकुसाबाहेरचे जगणे चित्रित झालेले आहे. या सत्रात वाहरू सोनवणे यांच्या गोधड संग्रहातील 'गोधड' व 'चळवळ म्हणजे' या दोन कवितांमधून आदिवासी प्रगल्भ जाणिवेचे चित्रण येते. तर माणुसकीसाठी चळवळ कशी आवश्यक असते याबद्दलही कवी आपल्य भावना व्यक्त करताना दिसतो.

नव्वदोत्तर कालखंडात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांचे वारे वाहू लागले. या काळातही स्त्री आपल्या अस्तित्वासाठी झगडत असताना इथल्या सामाजिक व्यवस्थेने तिच्यावर अन्याय, अत्याचार, विषमतेची वागणूक दिल्याचे चित्रण प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेतून येते. माणुसकीसाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मुल्यांची जपणूक करण्याचे आवाहनही त्यांच्या कवितेतून प्रतिबिंबित होते. नव्वदोत्तर काळात गावगाड्याचे बदलते चित्रण एकनाथ पाटील यांच्या कवितेतून येते. गाव आणि

शहर याच्या मधोमध उभे असणाऱ्या तरूणांच्या भावविव्हल स्थितीचे चित्रण ते नेमकेपणाने करतात. रोजी रोटीसाठी गाव सोडावे लागते. तरीही आपली पाळेमुळे गावात कशी घट्ट रुतून बसलेली आहेत त्याचे चित्रण 'शहर एक उदास पोकळी' व 'शोधयात्रा' या कवितेतून येते.

**२.३ कवी परिचय :**

- **विंदा करंदीकर** (२३ ऑगस्ट १९१८ ते १४ मार्च २०१०)

विंदा करंदीकर हे मराठी वाङ्मयाची विविध दालने समृद्ध करणारे प्रयोगशील कवी आहेत. १९३७ ते १९८५ ही विंदाची साहित्यिक कारकीर्द. या काळात त्यांनी आपला प्राध्यापकी पेशा सांभाळून कविता, गीते, समीक्षा, बालकविता, लघुनिबंध, अनुवाद असे विविध प्रकारचे लेखन केले. १९८१ मध्ये 'विरूपिका' संग्रहाच्या प्रस्तावनेत काव्यक्षेत्रातील निवृत्ती जाहीर केली. प्रत्येक वाङ्मय प्रकारात त्यांनी स्वत:ची अशी कसदार भर घातली. या प्रयोगशील आणि चतुरस्त्र प्रतिभेच्या साहित्यिकाला भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्काराने (२००६) सन्मानित केलेले आहे.

'स्वेदगंगा' (१९४९), 'मृदगंध' (१९५४), 'धृपद' (१९५९), 'जातक' (१९६८) आणि 'विरुपिका' (१९८१) हे कवितासंग्रह. 'राणीची बाग' (१९६१), 'एकदा काय झाले' (१९६१), 'सशाचे कान' (१९६३), 'एटू लोकांचा देश' (१९६३), 'परी ग परी' (१९६५), 'अजबखाना' (१९७४), 'सर्कसवाला' (१९७५), 'पिशी मावशी आणि तिची भूतावळ' (१९८१), 'अडम्‌तडम्' (१९८५) हे बालकविता संग्रह. 'स्पर्शाची पालवी' (१९५८), 'आकाशाचा अर्थ' (१९६५) हे दोन लघु निबंध संग्रह आहेत. 'ॲरिस्टॉटरचे काव्यशास्त्र' (१९५७), 'फाऊस्ट भाग-१' (१९६५), 'राजा लिअर' (१९७४) हे अनुवादित ग्रंथ. 'संत ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव' (१९८१) हा त्यांनी अर्वाचीनीकरण केलेला ग्रंथ. 'परंपरा आणि नवता' (१९६७) या समीक्षा लेखसंग्रह करंदीकारांची एकूणच वाङ्मयीन कामगिरी चौफेर व दर्जेदार आहे. सावंतवाडी येथे १९९६ मध्ये झालेल्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे हे अध्यक्ष होते.

- **वाहरू सोनवणे :** (जन्म : ६ ऑगस्ट १९५०) श्रीखेड, पो. राखेड, ता. शहादा, जि. नंदूरबार

वाहरू सोनवणे हे आदिवासी साहित्य प्रवाहातील अग्रगण्य कर्तृत्वाचे गौरवशाली नाव आहे. १९९० च्या दरम्यान साथी काळूराम दोधडे यांच्या बरोबर वाहरूंनी आदिवासींच्या आत्मसन्मानाची व आदिवासी अस्मितेची चळवळ संघटित करायला सुरूवात केली. अजूनही आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांसाठी ते अविरत लढत आहेत, संघर्ष करत आहेत. आपल्या समाजाला दु:ख दैन्यातून तसेच शोषणातून बाहेर काढावे या प्रखर जाणिवेतून चळवळीत ओढले गेले आणि क्रियाशील कार्यकर्ते झाले. आदिवासीच्या चळवळीला गतिशीलता प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी गाणी रचली. चळवळींची स्फूर्तदायी गाणी रचणारा हळूहळू चिंतनशील कवी बनला. त्यांचे 'गोधड' (१९८७), 'रोडाली' (२९१४) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. 'गोधड' कविता संग्रहाचा हिंदी अनुवाद 'पहाड हिलने लगा', 'वाहरू सोनवे यांच्या निवडक कविता' (२०००) प्रकाशित. कोल्हापूर येथे सन २००० मध्ये झालेल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. याबरोबरच पाचवे

आदिवासी साहित्य संमेलन, पालघर (१९९०), परिवर्तन साहित्य संमेलन, साकोली (१९९४), दुसरे नंदूरबार जिल्हा साहित्य, शहादा (२०१०) या संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. विविध सामाजिक, सांस्कृतिक घडामोडीवर ते सातत्यपूर्ण लेखन करतात.

- **प्रज्ञा दया पवार** (जन्म: ११ फेब्रुवारी १९६६)

नव्वदोत्तर कालखंडातील महत्त्वाची कवयित्री. 'अंत:स्थ' (१९९३), 'उत्कट जीवघेण्या धगीवर' (२००२), 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' (२००७), 'आरपार लयीत प्राणांतिक' (२००९), 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' (२०१३) हे कवितासंग्रह. 'टेहलटिकोरी' (२०१५) ललितगद्य. 'धांदात खैरलांजी' (२००७) हे नाटक. 'मी भयंकराच्या दरवाजात उभा आहे' (२००७), 'विमुक्तांचे स्वातंत्र्य' (२०१८) ही संपादने प्रकाशित आहेत. राज्यशासनाच्या वाङ्मय पुरस्काराबरोबरच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, महाराष्ट्र फाऊंडेशन, अमेरिका असे महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त. त्यांच्या कवितांचे अनुवाद मल्याळम, तमिळ, तेलुगू, कन्नड, गुजराथी, हिंदी, बंगाली, रशियन आणि इंग्रजीमध्ये झालेले आहेत. पद्मश्री दया पवार प्रतिष्ठान, मुंबई या संस्थेच्या कार्याध्यक्ष. सामाजिक चळवळीत विशेषत: स्त्री संघटनांमध्ये सक्रीय सहभाग सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे याठिकाणी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

- **एकनाथ पाटील** (जन्म : ०२ डिसेंब, १९७२)

नव्वदीनंतरच्या कालखंडातील महत्त्वाचे कवी 'सत्वशोधाच्या कविता' (२००४), 'खुंट्यावर टांगलेली दु:ख' (२००९) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित. शेतकरी साहित्य पुरस्कार, विशाखा काव्य पुरस्कार, भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार प्राप्त. यापूर्वीही विद्यापीठीय अभ्यासक्रमात कवितांचा समावेश. '१९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा' (२००९), 'जागतिकीकरण आणि वर्तमान आव्हाने' (२०१६) या ग्रंथाचे संपादन. 'सॉक्रेटिस ते दाभोलकर-पानसरे व्हाया तुकाराम' या रिंगण नाटकांच्या एका भागाचे लेखन. 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका' या वाङ्मय नियतकालिकाचे संपादक कोल्हापूर जिल्ह्यातील पिंपळगाव (भुदरगड) हे मूळगाव. सध्या इस्लामपूर (जि. सांगली) येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयामध्ये मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

विद्यार्थी मित्रांनो, याठिकाणी विंदा करंदीकर, वाहरू सोनवणे, प्रज्ञा दया पवार व एकनाथ पाटील यांच्या आपणास अभ्यासाला असणाऱ्या कविता पाहूयात.

**माझ्या मना बन दगड – विंदा करंदीकर**

हा रस्ता अटळ आहे!
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय
ज्ञानाशिवाय; मानाशिवाय
कुडकुडणारे हे जीव
पाहू नको! डोळे शीव!

नको पाहू जिणे भकास;
ऐन रात्री होतील भास;
छातीमध्ये अडेल श्वास.
विसर यांना, दाब कढ;
माझ्या मना बन दगड!

    हा रस्ता अटळ आहे!
    ऐकू नको हा आक्रोश,
    तुझ्या गळ्याला पडेल शोष.
    कानांवरती हाथ धर,
    त्यातूनही येतील स्वर.
    म्हणून म्हणतो ओत शिसे;
    संभाळ, संभाळ, लागेल पिसे !
    रडणाऱ्या, रडशील किती ?
    झुरणाऱ्या, झुरशील किती ?
    पिचणाऱ्या, पिचशील किती ?
    ऐकू नको असला टाहो;
    माझ्या मना दगड हो!

हा रस्ता अटळ आहे!
येथेच असतात निशाचर
जागोजाग रस्त्यावर.
असतात नाचत काळोखात;
हसतात विचकुन काळे दात;
आणि म्हणतात, ''कर हिंमत,
आत्मा वीक, उचल किंमत!
माणूस मिथ्य, सोने सत्य;
स्मरा त्याला, स्मरा नित्य''
भिशील ऐकून असले वेद;
बन दगड, नको खेद!

    बन दगड आजपासून;
    काय अडेल तुझ्यावाचून;
    गालावरचे खारे पाणी
    पिऊन काय जगेल कोणी?

काय तुझे हे नि:श्वास
मरणाऱ्याना देतील श्वास ?
आणिक दु:ख छातीफोडे
देईल त्यांना सूख थोडे?
आहे दु:ख तेच फार;
माझ्या मना कर विचार;
कर विचार : हस रगड;
माझ्या मना बन दगड!

हा रस्ता अटळ आहे!
अटळ आहे घाण सारी;
अटळ आहे ही शिसारी
एक वेळ अशी येईल
घाणीचेच खत होईल!
अन्यायाची सारी शिते
उठतील पुन्हा; होतील भुते
या सोन्याचे बनतील सूळ!
सुळी जाईल सारे कुळ.
ऐ टापा! ऐक आवाज!
लाल धूळ उडते आज;
याच्या मागून येईल स्वार;
या दगडावर लावील धार!
इतके यश तुला रगड;
माझ्या मना बन दगड!

### झपताल

ओचे बांधून पहाटे उठते... तेव्हापासून झपाझपा वावरत असतेस.
....कुरकुरणाऱ्या पाळण्यामधून दोन डोळे उमलू लागतात;
आणि मग इवल्या इवल्या मोदकमुठीतून तुझे स्तनांवर
बाळसे चढते. उभे नेसून वावरत असतेस. तुझ्या पोतेऱ्याने
म्हातारी चूल पुन्हा एकदा लाल होते आणि नंतर
उगवता सूर्य दोरीवरील तीन मुतेले वाळवू लागतो;

म्हणून तो तुला हवा असतो! मधून मधून तुझ्या पायांमध्ये
माझी स्वप्ने मांजरासारखी लुडबुडत असतात; त्यांची मान
चिमटीत धरून तू त्यांना बाजूला करतेस. तरी पण
चिऊकाऊच्या मंमंमधील एक उरलेला घास त्यांनाही मिळतो.
तू घरभर भिरभिरत असतेस; लहानमोठ्या वस्तूंमध्ये
तुझी प्रतिबिंबे रेंगाळत असतात... स्वागतासाठी 'सुहासिनी' असतेस;
वाढताना 'यक्षिणी' असतेस; भरविताना 'पक्षिणी' असतेस;
साठविताना 'संहिता' असतेस; भविष्याकरता 'स्वप्नसती' असतेस.
... संसाराच्या दहाफुटी खोलीत दिवसाच्या चोवीस मात्रा
चपखल बसवणारी तुझी किमया मला अजूनही समजलेली नाही.

**गोधड – वाहरू सोनवणे**

माझी फाटकी गोधड
मळलेली
गोधडीतल्या गोधडीत
गुदमरत राहिली
आंबट वासाने नाक
खालीवर करून
कुशी बदलत राहिलो
गोधडीत नाक खुपसून
आंबट वास सोसत राहिलो
याच गोधडीत
पूर्वज विझत गेलेत
अश्रूंनी गोधड भिजत गेली
आणि
आंबट वास
आठवण देत राहिला

पूर्वज दुःखांची
आजच्या वारसदारांना,
माझी फाटकी गोधड
मळलेली‌ः

## चळवळ म्हणजे

चळवळ म्हणजे काही
दोन पाच दिवसांची जत्रा नव्हे;
की नदीला आलेला पूर नव्हे!
चळवळ म्हणजे माणुसकीचा गाभा
सतत विकसित होत जाणारा प्रवाह
प्रवाह तो -
मातीच्या कणा-कणातून पाझरतो
लहान मोठ्या झऱ्यांना
जोडतो, सामावून घेतो.

हा तो प्रवाह जो थांबत नाही
दगडं टाकून
अडवले, अडत नाही
वळणे घेत
खडक चट्टांने फोडत
असमानतेतून वाट काढत
समतोल महासागराकडे
गतिमान होत असतो

अरे, भल्या माणसा -
तेवढाच त्याला ध्यास असतो;
तेवढाच त्याला ध्यास असतो.

**माणसासारखा माणूस असूनही! – प्रज्ञा दया पवार**

त्याला काढायचीच तिची नग्न धिंड
करायचं तिला विद्रूप
चाबकाने फोडून काढायचंय
भरचौकात
उकळत्या तेलात हात घालायला लावून
पहायचीय तिची सत्त्वपरीक्षा कठोर
शहानिशा करायचीय त्याला
तिच्या पाकुळलेल्या देहामनाची
सतत सिद्ध करायचंय पौरुषत्व
विधिरचिताच्या अधिकारानं
त्याला आपसुकच प्राप्त झालेलं

.... तरीही हात चोळत तो बसलाय शांत
आतल्या आत उकळत
त्यानं घरात लटकावल्यात
महामानवांच्या तसबिरी
यच्चयायवत क्रांतिकारी
अर्थात त्याची स्व-प्रतिमा आहे
अतिशय सुसंस्कृत सालस
पुरोगामी पुरुषाची
ती वाचू शकते
त्याने डोळ्यांच्या बाहुली आड
महत्प्रयासाने दडवलेली नृशंस हिंसा,
जाणू शकते
त्याचं दुःख अपार

पुरुष असल्याची
त्याला मोजावी लागतेय जबर किंमत
माणसासारखा माणूस असूनही!

## आग आणि फुफाटा

मला नव्हता फाडायचा
साळसूद मुखवटा आदर्शाचा
सोयच करायची होती संस्कृतीची
बेमालूम चालत आलेली

केंद्र आणि परीघ
फारकत नाही केली मी
वाहत आणला
वहिवाटेचा निखारा
फडफडणाऱ्या पदातून शालीन
मिसळला सगळ्याच मिथ्यकथांत
माझा समकालीन भाव समर्पित

असं काही शिकवलं नव्हतं मला
कुणी कधीच
पण जगण्यातच होती लागण
किरकोळ बाई करून करून काय करेल
आगीतून निघून फुफाट्यात पडेल!

आग आणि फुफाटा
फक्त दोन पर्याय आहेत भाषेला
किरकोळ बाईप्रमाणे
पुरुषरचित

## शहर : एक उदास पोकळी – एकनाथ पाटील

माझ्या गावापासून तुटलेला मी
आणि हे शहरही मला सामावून घेत नाही
मला शोधता येत नाही गाव हे शहर ही उदास पोकळी.
गावानंतर शहरापर्यंत मला कुठंच शोधता येत नाही माझी ओळख

इथल्या बिनचेहऱ्याच्या भावनाहीन चौकटींमध्ये
मला बसवता येत नाहीत माझे जन्मजात संस्कार.

रात्री अपरात्री झोपेत हे शहर माझ्या मेंदूवर करते प्रहार
आणि तिथूनच कोसळतात मी जपलेले माझ्या अस्तित्वाचे बुरुज
सुरू होतो माझ्या अध:पतीत दुखनाईचा अथक प्रवास
मेंदूत खुरुट करणाऱ्या सततच्या जागरणांमुळे माझ्यातला हरवून जातो मी
हे शहर त्याची अस्वस्थ, अत्यवस्थ भौतिक संस्कृती

मला रोखता येत नाही
माझ्या रक्ताच्या थेंबाथेंबातून धमण्यांमार्गे
शरीरात प्रवेश करणारा शहराचा एक एक संस्कार.
मला भेदता येत नाही इथला चक्रव्यूह
अस्तित्व गमावलेला मी
माझा मलाच संताप येतो तेव्हा
मागे वळण्याच्या सगळ्याच वाटा खुडल्या जातात आपोआप.
पाय तर असे अधू झाल्यागत
आणि गावानं मला सामावून घेण्याच्या सगळ्या शक्यताही मावळल्या आहेत
गाव तर कुठंच सोडून आलोय दूरवर नजरेपल्याड
आता वळताही येत नाही पाठीमागं
माझ्या गावापासून तूटलेला मी
आणि हे शहरही मला सामावून घेत नाही आपल्यात.

**शोधयात्रा**

मुळांसकट उपटून टाकावं एखादं झाड
तसाच मी फेकला गेलो
गरजेपोटी गावातून शहराकडं.
मातीनेच तोडून टाकावी झाडांशी असणारी नाळ
तसा माझा गावही नाकारतो आता माझ्याशी असणारं नातं
त्यामुळे मला शहरात जगता येत नाही धडपणानं.

इथं नसतं मोकळं आकाश, काळी माती, हिरवी रानं
नसतात नद्या, झाडं, पशू-पक्षी आणि गावाकडची माणसं
असतात सत्त्व गमावून बसलेल्या निर्जीव माणसांची किडलेली मनं
आणि भकास चेहऱ्यावर फासलेले उदासीचे रंग.

मला कळत नाहीत इथल्या चौकाचौकात गरगरणारे फसवे भोवरे
आणि आडव्या तिडव्या भिरभिरणाऱ्या वाऱ्याचा लावता येत नाही अर्थ.
मला येत नाही मिसळता मतलबांच्या गर्दीत कुठंच प्रयत्नानं
मला ओळखत नाहीत शहराचे परके रस्ते
तरीही मी भ्रमिष्टासारखा फिरत असतो. एकटाच वणवण.

मी शोधतो इथल्या प्रत्येक संदर्भात माझ्या गावाचं गावपण
तेव्हा हे शहर मला हसतं उपहासानं
मी भ्रमिष्ट होत जातो अधिकच...

व्यवहाराच्या चाकोऱ्या झुगारून वळतो गावपांढरीच्या दिशेनं जेव्हा...
तेव्हा मला सहन होत नाही गावाचं हातपाय पोटाशी दुमडून बसणं
सहन होत नाही माझंच माझ्या गावापासून पारखं आणि पोरकं होणं
आणि अस्वस्थावस्थेतच मी फिरते भ्रमिष्टासारखा, पुन्हा पुन्हा
उद्ध्वस्त शहराच्या बकाल रस्त्यांवर अपरिहार्यपणानं
गावठाणाच्या असंभव खुणा शोधत अजूनही...

**२.४ विषय विवेचन :**

- **विंदा करंदीकर**

**१) माझ्या मना बन दगड :**

विंदा करंदीकर हे मराठी साहित्यातील तिसरे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त करणारे साहित्यिक त्यांच्या कवितेतून सामाजिक विचारांची बीजे रोवलेली दिसून येतात. 'माझ्या मना बन दगड' या कवितेमधून सामाजिक जाणिव व्यक्त झाली आहे. समाजामधील ज्या लोकांना प्राथमिक गरजा नीटपणे मिळालेल्या नाहीत, त्याचा आक्रोश ऐकूण आपणाला यासाठी काहीही करता येत नाही म्हणून स्वत:च्या मनाला ते म्हणतात, ''माझ्या मना बन दगड'' जीवन जगण्याचा इथला रस्ता साधा-सोपा नाही. त्याला अनेक प्रकारचे आडथळे आहेत. त्या अडथळ्यांना पार करूनच आपणाला जीवन जगायचे आहे. हे करत असताना अनेक प्रकारचे भास होतील. छातीमध्ये श्वास आडेल यांना विसरून, सगळ सहन करून हे जीवन जगायला पाहिजे.

इथल्या पारंपरिक व्यवस्थेबद्दल कवी म्हणतो, या व्यवस्थेत माणसांचा आक्रोश ऐकून गळ्याला शोष पडेल. जरी कानावरती हात धरला तरी त्यातूनही वेदनांचे स्वर ऐकू येतील. म्हणूनच हे मना, तू कानामध्ये शिसे ओत, नाहीतर तुला या सर्व गोष्टींचा त्रास होईल. शेवटी सारखे किती रडायचे, झुरायचे आणि पिचायचे. हा वेदनांचा टाहो ऐकूण घेण्यापेक्षा आपले मन कठीण करायला हवे. असा आशावादी सूरही इथे प्रकट होतो. या व्यवस्थेत रात्रीचे निशाचर जागोजागी रस्त्यावर भेटतील. तुझ्याकडे पाहून ते आपले काळे दात विचकतील. त्यामुळे तू येणाऱ्या सर्व परिस्थितीला हिंमतीने सामोरे जा! कारण इथे माणूस खोटा असून सोने सत्य मानणारी ही व्यवस्था आहे. यामध्ये तू मनाला कोणताही खेद वाटून घेऊ नकोस.

कवी आशावादी मांडणी करत असताना स्वत:शीच असे म्हणतो की, आजपासून तू तुझी भूमिका पक्की कर. कारण तुझ्यामुळे श्वास देऊन ते जगणार आहेत काय? यातून एकच होऊ शकते ते म्हणजे, सुख थोडसे व दु:ख अफाट असणार आहे. यासाठी हे मना तू हा विचार करून या व्यवस्थेत जगायला शीक, इथल्या माणसाला आपल्या न्याय आणि हक्कासाठी सतत झगडावे लागते आहे. इथे जर यश मिळवायचे असेल तर या व्यवस्थेवर स्वार होऊन आपली नेमकी दिशा पक्की करायला पाहिजे. या कवितेत कवीला समाजामधील शोषित, वंचित लोकांचे हाल बघवत नाहीत. त्यांचा आक्रोश ऐकून वाईट वाटते. त्याच्यासाठी आपल्याला काहीही करता येत नाही म्हणूनच कवी म्हणतो, 'माझ्या मना बन दगड' या सर्व परिस्थितीला समाजातील निशाचर जबाबदार असतात. इथल्या वंचितांना फक्त कोरडी सहानुभूती दाखवून काहीही उपयोग नाही. पुढे हेच शोषित लोक एक दिवस क्रांतीचे दूत बनतील. यावेळी त्या क्रांतीत हे निशाचर नष्ट होतील. म्हणूनच या व्यवस्थेमध्ये चिरडले गेलेले हे वंचित लोक क्रांती करतील. त्यामधूनच नवसमाजाची निर्मिती होईल. असा आशावादही व्यक्त होतो.

**२) झपताल :**

'झपताल' या कवितेमध्ये स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा घेतलेला शोध हा वास्तव असल्याचे जाणवते. संसारिक स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचे बहुविध अशा पैलूंचे चित्रण येते. 'झपताल' या तालचित्रामधील स्त्री ही बाळाला दूध पाजणारी, चुलीवरती स्वयंपाक करणारी, कपडे धुणारी आहे. ही स्त्री काम करत घरभर भिरभिरत असते. आपल्या दररोजच्या कामामध्ये नवऱ्याच्या स्वप्नांना तिला साथ देता येत नाही. परंतु ती त्याकडे दुर्लक्षही करत नाही. हे ही महत्त्वाचे आहे. घरातील सर्व कामामध्ये ती स्वागत करताना सुहासिनी असते. वाढताना यक्षिणी असते. मुलांना भरवताना पक्षिणी असते. तर बचत करून साठवताना ती संहिता असते. हा सगळा संसाराचा गाडा ती दहाफूट खोलीमध्ये दिवसाच्या चोवीस मात्रा कशी बसवते याचे कवीला आश्चर्य वाटते. प्रेमजाणिवेच्या विविध छटा अशा काव्यगुणांनी ही कविता स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध वेगळेपणाने घेताना दिसून येते.

- **वाहरू सोनवणे :**

**१) गोधड :**

वाहरू सोनवणे हे आदिवासी साहित्य प्रवाहातील महत्त्वाचे कवी आहेत. 'गोधड' या काव्यसंग्रहाचा

अर्थ सांगताना ते म्हणतात. '' 'गोधड' या संग्रहाचा जाणकार चुकीचा अर्थ लावतात. ही गोधड आदिवासींच्या वेदना, व्यथांची नसून सडलेल्या, फाटलेल्या समाजव्यवस्थेची ही गोधड आहे. ती बदलण्याची वेळ आलेली आहे.'' आदिवसांची परिस्थिती ही फाटक्या मळलेल्या गोधडीप्रमाणे झालेली आहे. त्यामध्ये काही सुधारणा नाही. या परिस्थितीत ती गुदमरून गेलेली आहे. पिढ्यान्‌पिढ्या त्यांचे शोषण होत आहे. आदिवासींची ही दयनीय अवस्था पूर्वापार चालत आलेली आहे. फाटक्या, मळक्या गोधडीवरून कविने आदिवासींचे चित्रण उभे केलेले दिसते. मानवी जीवनाला गुदमरून टाकणारी गोधड आदिवासींची समस्या अचूकपणे टिपते. गेली कित्येक पिढ्यांमध्ये ही व्यवस्था तशीच आहे. आता या व्यवस्थेत जीव खूपच गुदमरून जातोय. कारण ही व्यवस्था जीर्ण आणि मळकट झाली आहे. तिच्यातून कुबट, आंबट वास येत आहे. ती आता बदलायला हवी. फाटकी गोधड, आंबट वास अशा प्रतिमाही या कवितेत आल्या आहेत. भारतीय समाजातील शोषित व उपेक्षित घटकांची व्यथा-वेदना या कवितेतून व्यक्त झाली आहे.

**२) चळवळ म्हणजे :**

'चळवळ म्हणजे' या कवितेतून मानवी समाजाला गतीमान करणाऱ्या कृतीशील प्रवाहाचे चित्रण आलेले आहे. कवीला परिवर्तनाची आस आहे. तो स्वत: चळवळीतील कार्यकर्ता असल्याने आपल्या न्याय आणि हक्कासाठी चळवळ उभी करतो. मात्र ही चळवळ म्हणजे जत्रा किंवा नदीला आलेला पूर नाही. सतत विकसित होत जाणारा हा प्रवाह आहे. म्हणजेच चळवळ ही माणुसकीचा महत्त्वाचा गाभाभूत घटक आहे. माणूसकीसाठी अपाली प्रतिष्ठा पणाला लावणाऱ्या चळवळींच्यामध्ये अनेक प्रकारचे विरोध आहेत. तरीही या विषमतेच्या व्यवस्थेमधून चळवळ विशाल महासागरासारखी वाट काढत असते. यासाठी आपल्या चळवळीच्या केंद्रस्थानी माणूस असायला हवा हे कवी विशेषत्वाने इथे नोंद करतो.

- **प्रज्ञा दया पवार :**

**१) माणसासारखा माणूस असूनही !**

एकविसाव्या शतकात स्त्रियांच्या जगण्याचे अवकाश विस्तृत झाले असले तरी आजही तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही. ही शोकांतिका आहे. स्त्री आणि पुरुष मानवी जीवानतील संवादी अनुबंध असले तरीही पुरुषाची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी ही एक उपभोगाची वस्तू अशीच आहे. आजही पुरुष स्त्रीच्या संपूर्ण देहावर आपलीच मालकी मानतो. परंतु आधुनिक स्त्रीने पुरुषाच्या भोगाने साधन बनने नाकारले. त्यातूनच स्त्रीला आपले माणूस म्हणून अस्तित्व असणे गरजेचे असल्याचे अधोरेखित होते.

'माणसासारखा माणूस असूनही !' या कवितेत पुरुषांच्या मनातील स्त्रीबद्दलचे नकारात्मक विचार व्यक्त झालेले आहेत. स्त्री आपल्या स्वअस्तित्वासाठी झटत असताना त्याला असे वाटते की, तिची नग्न धिंड काढावी. तिला चाबकाने फोडावे, उकळत्या तेलामध्ये हात घालायला लावून तिची कठोर सत्त्वपरीक्षा घ्यावी. यामध्ये तिच्या स्त्री देहाचे लचके तोडून त्याला आपलं पुरुषपण दाखवून दद्यायचंय. परंतु त्याला आता यातील काहीच करता येत नाही. कारण स्त्री ही आपल्या अस्तित्वासाठी जागृत झालेली आहे, त्यांना जगण्याचं भान

आलं आहे. त्यामुळे पुरुषी वृत्तीचा माणूस रिकामटेडका असा हात चोळत बसला आहे. तो विचाराने सुसंस्कृत आणि पुरोगामी असा आहे. त्याच्या घरात साहजिकच महापुरुषांचे फोटो आहेत. मात्र त्याच्या मनात स्त्रीबद्दल हिंसाच भरलेली दिसते. या सर्वात तो पुरुषी वृत्तीचा असल्यामुळे पारंपरिक व्यवस्थेचे जतन केल्याने तो माणूस असूनही या सर्वांचा त्याला चांगला-वाईट परिणाम भोगावा लागत आहे. या कवितेमधून कवयित्री समता व न्यायाची अपेक्षा व्यक्त करते.

**२) आग आणि फुफाटा :**

'आग आणि फुफाटा' या कवितेमधून पुरुषरचित समाजव्यवस्थेच्या संस्कृतीचे चित्रण केलले आहे. पुरुषी मानसिकतेचा आदर्श भासवलेला हा चेहरा आपणाला फाडायचा नव्हता. परंतु स्त्रीला दुय्यम स्थान दिल्याने तिने या व्यवस्थेत सारे निमूटपणे सहन केले. कुणी कितीही शिकवले तरी स्त्री ही बंड करू शकत नाही असा रिवाजच इथल्या व्यवस्थेने घालून दिलेला होता. तरीही आपल्या स्वअस्तित्वासाठी एखाद्या स्त्रीने बंड केले तरी काहीही होऊ शकत नाही. अशा गैरसमजातून या व्यवस्थेत स्त्री ही आगीतून उठून फुफाट्यात पडेल याची जोखीम चोखपणे पुरुषी व्यवस्थेने केलेली दिसून येते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत आग आणि फुफाटा हे पर्याय भाषेप्रमाणे पारंपरिक असल्याचे कवयित्री सूचित करते. नीतीमत्तेच्या नावाखाली पुरुषाची पाशवीवृत्ती रोजच स्त्री अनुभवत असते. अशी स्त्रीवेदना या कवितेतून अस्वस्थता निर्माण करताना दिसते.

- **एकनाथ पाटील :**

**१) 'शहर : एक उदास पोकळी' :**

या कवितेमध्ये अर्थाजनासाठी गाव सोडून शहरात स्थायिक झालेल्या आणि तरीही ज्यांची मूळं गावात घट्ट रुतून बसलेली आहेत, अशा तरूण पिढीची घुसमट व्यक्त झालेली आहे. गावगाड्यातील विषमतेला विरोध करीत तिथल्या उदात्त आणि सशक्त अशा सामाजिक, सांस्कृतिक परंपरांचा ही कविता जोरकस आग्रह धरते. खेड्यापाड्यातील समूहभावांच्या मूल्याबद्दल कमालीची आस्था या कवितेमधून व्यक्त झाली आहे. खेडे आणि शहर यांच्या मूल्य व्यवस्थेमधला ताण या कवितेमधून येतो. खेड्याच्या मुक्त, नैसर्गिक आणि समूह संस्कृतीत वाढलेल्या या कवितेतील नायकाच्या मनात शहराबद्दल आकस नाही. पण शहरात गावखेड्यातल्या सारखं मुक्त आणि मनासारखं जगता येत नसल्याची खंतही व्यक्त होते. या कवितेमधून खेड्यातल्या माणसाचं पिचलेपण गंभीरपणे अधोरेखित केले आहे. कृषीसंस्कृतीची विदारकता आणि ढासळते. मूल्य पाहून खचणाऱ्या मनाची संवेदनशीलता कवितेतून दिसून येते. साधे शब्द, भाषिक आविष्कार यामुळे कवितेतील ढळक वैशिष्टे लक्षात राहतात.

**२) शोधयात्रा :**

या कवितेमधून शहराच्या धकाधकीच्या भौतिक, तकलादू जीवनपद्धतीने खेड्यापाड्यातील माणसांची होणारी कोंडी आणि तिच्यातून सुटण्यासाठीचा संघर्षही प्रकट झाला आहे. गावापासून तुटलेपणाची भावना आणि शहरात मिळणारी उपरेपणाची वागणूक यांच्या पेचात सापडलेल्या पिढीच्या परात्मभावाची जाणीव ही

कविता करून देते. शहरातल्या प्रत्येक संदर्भात गावाचं गावपण शोधताना दु:ख, दारिद्र्य कवीला सहन होत नाही. त्यामुळे शहराच्या बकाल रस्त्यावर गावठाणाच्या अनेक खुणा शोधत असल्याची जाणीव व्यक्त होते. खेड्याची मुळं जपू पाहणाऱ्या पिढीचा प्रतिनिधी या अंगाने गावखेड्याची ओळख पुसणाऱ्या जागतिकीकरणाच्या काळात या कवितेचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. वर्तमानाला संवादी असणारी एकनाथ पाटील यांची कविता आपल्या सकस परंपरेच्या सत्त्वाला जोडून घेते हे या कवितेचे बलस्थान आहे.

**२.५ समारोप :**

आधुनिक मराठी कवितेचा अभ्यास करत असताना विंदा करंदीकर यांच्या कवितेतून सामाजिक आशयाबरोबर मानवी नातेसंबंधाचे प्रत्ययकारी चित्रण येते. 'माझ्या मना बन दगड' या कवितेत प्राथमिक गरजाही न मिळालेल्या माणसाविषयीची सहानुभूती व्यक्त झाली आहे. 'झपताल' या कवितेतून संसारिक स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचे बहुविध अशा पैलूंचे चित्रण येते. वाहरू सोनवणे यांच्या 'गोधड' कवितेमधून आदिवासींना अजूनही मूलभूत गरजा मिळालेल्या नसल्याचे चित्रण येते. तर 'चळवळ म्हणजे' या कवितेत चळवळ ही माणूसकीचा गाभा असून विषमतेच्या या व्यवस्थेत ती विशाल महासागरासारखी वाट काढत असते. कारण तिचा महत्त्वाचा केंद्रबिंदू माणूस हा असतो.

प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेतून स्त्रीकडे आजही इथली पुरुषी व्यवस्था माणूस म्हणून पाहत नसल्याचे चित्रण येते. त्यांच्या 'माणसासारखा माणूस असूनही !' या कवितेत पुरुषाच्या मनातील 'स्त्रीबद्दलचे नकारात्मक विचार प्रस्तुत हातेत. त्याचबरोबर कवयित्री या कवितेत समता व न्यायाची अपेक्षा व्यक्त करते. 'आग आणि फुफाटा' या कवितेत पुरुषरचित समाजव्यवस्तेच्या संस्कृतीचे चित्रण केलेले आहे. स्त्री स्वअस्तित्वासाठी बंड करू लागली तर तिला आगीतून उठवून फुफाट्यात टाकले जाते. अशी समाजव्यवस्था इथे कार्यरत असल्याचे चित्रण येते. एकनाथ पाटील यांच्या 'शहर : एक उदास पोकळी' या कवितेतून ग्रामीण भागातील तरुणांची घुसमट व्यक्त झाल्याचे दिसते. 'शोधयात्रा' या कवितेमधून भौतिक जीवनपद्धतीमध्ये खेड्यापाड्यातील माणसांची होणारी कोंडी आणि संघर्ष प्रकट झाला आहे. या कवितेत खेड्यातील माणसाची होणारी कोंडी आणि संघर्ष प्रकट झाला आहे. या कवितेत खेड्यातील माणसाची शहरामध्ये राहत असताना भौतिक तकलादू जीवनपद्धतीमधील कोंडी प्रकट झाली आहे.

**२.५ कठीण शब्दांचे अर्थ :**

**निशाचर** – रात्री फिरणारा,

**शिसारी** – वीट, मळमळणे

**यक्षिणी** – यक्षस्त्री

**चोवीसमात्रा** – चोवीस तास

**गोधड** – वाकळ

**गाभा** – मधला भाग, गर्भ

**तसबिरी** – फोटो

**शालीन** – सज्जन,

**समर्पित** – अर्पण करणे

**चक्रव्यूह** – एक प्रकारची सैन्याची वाटोळी रचना.

**बुरुज** – कोटाच्या तटबंदीत जागोजागी केलेली वर्तुळाकार तटबंदी

**नाळ** – नातं,

**सत्त्व** – सार, अस्तित्व

**गावठाण** – गावाची जागा.

## २.६ स्वाध्याय / सरावासाठी प्रश्न :

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. ऐकू नको असला ............... माझ्या मना दगड हो!
(संस्कार / विचार / टाहो)

२. काय तुझे हे निश्वास .......... देतील श्वास ?
(मरणाऱ्यांना / जगणाऱ्यांना / आपल्यांना)

३. कुरकुणाऱ्या पाळण्यामधून दोन ............ उमलू लागतात.
(जीव / डोळे / अश्रू)

४. गोधडीतल्या गोधडीत ............ राहिलो.
(लपत / सलत / गुदमरत)

५. आजच्या वारसदारांना माझी ........... गोधड मळलेली !
(फाटकी / मळकी / पूर्वीची)

६. चळवळ म्हणजे ............ गाभा.
(माणुसकीचा / संघटनेचा / संघर्षाचा)

७. मातीच्या कणा-कणातून पाझरतो लहान मोठ्या ............. जोडतो.
(लोकांना / झऱ्यांना / जमिनी)

८. ........... असल्याची त्याला मोजावी लागतेय जबर किंमत.

(माणूस / पुरुष / बाप)

९. आग आणि फुफाटा फक्त .......... पर्याय आहेत भाषेला.

(एक / दोन / तीन)

१०. त्याने घरात लटकावल्यात ............ तसबिरी.

(आईच्या / बापाच्या / महामानवांच्या)

११. जगण्यातच होती लागण किरकोळ .......... बनून जगण्याची.

(बाई / माणूस / बाप)

१२. मला शोधता येत नाही ............. ही उदास पोकळी.

(घर ते गाव / गाव ते शहर / भावना व विचार)

१३. रात्री अपरात्री झोपेत हे शहर माझ्या ............ करते प्रहार.

(मनावर / अंगावर / मेंदूवर)

१४. तरीही मी .............. फिरत असतो एकटाच वणवण.

(भ्रमिष्टासारखा / मनासारखा / निवांत)

१५. मी शोधतो इथल्या प्रत्येक संदर्भात माझ्या ............ गावपण.

(माणसाचं / गावाचं / आपलेपणाचं)

**उत्तरे :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) टाहो, | २) मरणाऱ्यांना | ३) डोळे | ४) गुदमरत, |
| ५) फाटकी | ६) माणूसकीचा | ७) झऱ्यांना | ८) पुरुष |
| ९) दोन | १०) महामानवांच्या | ११) बाई | १२) गाव ते शहर |
| १३) मेंदूवर | १४) भ्रमिष्टासारखा | १५) गावाचं | |

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. विंदा करंदीकर यांच्या 'माझ्या मना बन दगड' आणि 'झपताल' या कवितांमधील काव्यसौंदर्य स्पष्ट करा?

२. चळवळ म्हणजे माणूसकीचा गाभा असते? हे वाहरू सोनवणे यांनी 'चळवळ म्हणजे' या कवितेतून कसे सांगितले आहे.

३. प्रज्ञा दया पवार यांच्या कवितेमधून पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीयांची होणारी घुसमट कशाप्रकारे व्यक्त झाली आहे?

**२.७ अधिक वाचन :**

१. मंगेश पाडगावकर यांनी संपादित केलेल्या 'संहिता' कवितासंग्रहाची प्रस्तावना आवजूर्न वाचा.

२. प्रा. प्रशांत नागावकर यांनी संपादित केलेले 'वाहरु सानेवणे : व्यक्तीपासून समष्टीपर्यंतचा सम्यक प्रवास' हा ग्रंथ वाचा.

३. प्रज्ञा दया पवार यांचा 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' हा कवितासंग्रह वाचा.

४. एकनाथ पाटील यांचा 'खुंट्यावर टांगलेली दु:ख' हा कवितासंग्रह वाचा.

**२.८ संदर्भ ग्रंथ :**


१. मराठी कविता आणि आधुनिकता - यशवंत मनोहर.

२. मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप - संपा. गो. मा. पवार

३. आदिवासी साहित्य आणि संस्कृती - भुजंग मेश्राम

४. मराठी कवितेच्या नव्या दिशा - महेंद्र भवरे

५. काव्याची भूषणे - म.वा. धोंड.

६. वर्तमान पिढीचे संदर्भ - संपा. चंद्रकांत पोतदार.


❖❖❖

## घटक –३ व ४

# निबंध लेखन

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.३ स्वरूप आणि व्याप्ती

३.४ निबंधाचे घटक

३.५ निबंधाचे प्रकार

३.५ निबंधाची वैशिष्ट्ये

३.६ सरावासाठी निबंध विषय

३.७ संदर्भ

### ३.० उद्दिष्टे :

या घटकाचे वाचन केल्यानंतर आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

१. निबंध या वाङ्मय प्रकाराची ओळख होईल.

२. निबंध लेखनाची पूर्वपीठिका समजून येईल.

३. निबंधाच्या प्रकारांचा परिचय होईल.

४. महाविद्यालयीन व स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक अशा निबंधलेखन कौशल्याचा विकास होईल.

### ३.२ प्रास्ताविक :

निबंध हा मराठी भाषेतील लोकप्रिय वाङ्मय प्रकार आहे. नि + बन्ध = बांधणे असा त्याचा अर्थ आहे. मराठी शब्द कोशात 'निबंध' या शब्दाचा अर्थ नियमबद्ध असणारा लेख, नीटपणे पक्का जोडलेला लेख असा दिलेला दिसतो. निवडक शब्दांत बांधलेला, मांडलेला, विवेचन केलेला विषय म्हणजे निबंध अशी ढोबळमानाने निबंधाची व्याख्या करता येईल.

मराठी भाषेतील निबंध लेखनाची परंपरा विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर यांच्यापासून ते श्री. म. माटे, खांडेकर, फडके, सानेगुरुजी, विनोबा भावे, अनंत काणेकर, आदींनी अधिक समृद्ध केलेली दिसते. विचारप्रेरक, कल्पनाप्रधान, साहित्यविषयक, व्यक्तिगुणवर्णनपर राजकीय, सामाजिक इ. अनेक

प्रकारचे निबंध लिहून या मंडळींनी निबंधाच्या माध्यमातून मराठी गद्यलेखनाचे दालन अधिक समृद्ध केलेले आपणास दिसून येते.

आजचे युग हे स्पर्धेचे आहे. अनेक विद्यार्थी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एम.पी.एस.सी.) आणि केंद्रीय लोकसेवा आयोग (यू.पी.एस.सी.) यांसारख्या परीक्षांना बसतात. तिथे त्यांना मुख्य परीक्षेत निबंध लेखन अनिवार्य असते. यादृष्टीने विद्यार्थ्यांना या निबंध वाङ्मय प्रकाराची ओळख व्हावी. त्यांची तयारी व्हावी हा उद्देश याठिकाणी ठेवलेला आहे.

## ३.३ स्वरूप आणि व्याप्ती :

साहित्य हे गद्य आणि पद्य या दोन रूपांच्या मध्ये लिहिले जाते. पद्यामध्ये लय, छंद, अलंकार, रसनिष्पत्ती इ. गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावे लागते. गद्यामध्ये मात्र दैनंदिन जीवनातील भाषेचा वापर केला जातो. निबंध हा गद्य साहित्याचा आविष्कार आहे. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र या गद्य साहित्य प्रकारात कथानकाला विशेष प्राधान्य असते; पण निबंधात विषयाला प्राधान्य असते. निबंधाच्या विषयाला कोणत्याही प्रकारचे मापदंड असत नाही. सामान्यातील सामान्य घटना तसेच सामान्यातील असामान्यत्व देखील निबंधाचा विषय होऊ शकते. निबंधाला शब्द मर्यादेचे बंधन असत नाही. सर्वसाधारणपणे ५०० ते १००० शब्दांतील निबंधाला सामान्य निबंध म्हटले जाते वा १००० ते ३००० शब्दांतील निबंधास दीर्घ निबंध संबोधले जाते. मुख्य विषयाला अनुसरून विचारांच्या क्रमबद्ध मांडणीला निबंध लेखनात महत्त्वाचे स्थान असते.

- **निबंध लेखनाची महत्त्वपूर्णता** :

व्यक्ती आपले विचार व्यक्त करण्यासाठी मौखिक अथवा लिखित आविष्कारांचा उपयोग करत आलेली आहे. आपले विचार बोलून व्यक्त करण्याच्या पद्धतीला 'मौखिक आविष्कार' म्हटले जाते, तर विचार लिहून व्यक्त करण्याच्या पद्धतीला लिखित आविष्कार म्हटले जाते.

एखादी व्यक्ती या दोन्ही आविष्कार तंत्रांचा वापर किती सक्षमतेने करते यावर तिचे व्यावहारिक यश अवलंबून असते. एखाद्याकडे बोलण्यापेक्षा लिहिण्याचे कौशल्य वैशिष्ट्यपूर्ण असते ती व्यक्ती लेखक, साहित्यिक म्हणून नावारूपाला येते, तर ज्याच्याकडे मुद्देसूद बोलण्याचे कौशल्य वैशिष्ट्यपूर्ण असते ती व्यक्ती 'वक्ता' म्हणून नावारूपाला येते. काही वेळेला एखाद्या व्यक्तीमध्ये या दोन्ही कौशल्यांचा सुंदर मिलाप दिसून येतो.

सर्वसाधारणपणे निबंध लेखनाद्वारे एखाद्या व्यक्तीच्या लेखन कौशल्याची सहज पडताळणी करता येते. निबंध लेखनाद्वारे व्यक्तीचे ज्ञान-अनुभव, विचार-विचार व्यक्त करण्याची पद्धत, विचार मांडणीतील सूत्रबद्धता यांची ओळख पटते. त्यामुळे निबंध लेखन हे व्यक्तीच्या लेखन कौशल्याचा आरसा आहे असे म्हटले जाते.

विद्यार्थ्यांच्या बाबतीत विचार केला तर शालेय व महाविद्यालयीन जीवनाबरोबरच स्पर्धा परीक्षांमध्ये ही

निबंध लेखन कौशल्य यश मिळवून देण्यासाठी उपयुक्त ठरते. सूत्रबद्ध विचार करण्याची सवय व लिखाणाचा सराव केला तर विद्यार्थ्यांमध्ये 'निबंध लेखन कौशल्य' सहज विकसित होऊ शकते.

- **निबंधाची प्रमुख तीन अंगे** :

सर्वसामान्यपणे निबंधाची प्रमुख तीन अंगे मानली जातात.

**१) आरंभ** : या भागात निबंधाच्या विषयाचा परिचय होतो. याद्वारे वाचकाला प्रस्तुत निबंधातील पुढील भागाचा सहज परिचय होतो.

**२) मध्य** : निबंधाचा मध्य हा निबंधाचा महत्त्वाचा भाग मानला जातो. निबंधाच्या विषयवस्तूचे विस्तृत रूप इथे पाहावयास मिळते.

**३) समारोप** : निबंधाचा हा शेवटचा भाग असतो. या ठिकाणी निबंधाचा संपूर्ण सार एकवटलेला असतो.

## ३.४ निबंधाचे घटक :

निबंधाचे लेखन सूत्रबद्ध, आकर्षक होण्यासाठी निबंधाचा प्रारंभ व शेवट, निबंधातील मुद्दे, मुद्द्यांची मांडणी व विस्तार, निबंधाची भाषा, निबंधाचे प्रकार हे घटक फार महत्त्वाचे ठरतात. यशस्वी निबंध लेखन करण्यासाठी या घटकांचा कसा वापर करता येतो, ते विस्ताराने पाहू.

- **निबंधाचा प्रारंभ व शेवट** :

निबंधाची सुरुवात आकर्षक हवी. तसाच शेवटदेखील योग्य ठिकाणी हवा. म्हणजे जे सांगावयाचे ते पूर्ण झाल्याची खात्री पटल्यावर तिथेच निबंधाचा शेवट करावा.

निबंधाची सुरुवात व शेवट करण्याच्या विविध पद्धत आहेत. १) एखाद्या वेधक वाक्याने, सुभाषिताने, म्हणी, सुविचार, अभंग यांचा वापर करून निबंधाची सुरुवात करता येईल.

२) एखाद्या संवादाने सुरुवात व शेवट करता येईल.

३) एखादे 'अवतरण' देऊनही सुरुवात आकर्षक व शेवट परिणामकारक करता येईल.

निबंधाची सुरुवात एखाद्या संवादाने कशी करता येते ते पाहा...

'पावसाळ्यातील एक दिवस' या विषयाच्या निबंधाची सुरुवात पुढीलप्रमाणे करता येईल.

'अगं रोहिणी, कॉलेजला निघालीस तर छत्री घेतलीस का?'

'नको गं आई ते लोढणं! काही पाऊस पडत नाही.'

'पण किती भरून आले पाहिलेस का?'

'संध्याकाळी असेच भरून आले होते. पडला का?'

'अगं त्याचा नेम नसतो. तो लहरी राजा!'

'असू दे. मी आता पोहोचेन' असे म्हणून मी निघाले. वळणावर पोहोचते नाही तोच टपोरे थेंब पडू लागले की!'

'शब्दांचे सामर्थ्य' यासारख्या विषयाच्या निबंधाची सुरुवात करताना तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या ओळी देता येतील.

उदा.

'आम्हा घरी धन। शब्दांचीच रत्ने।

शब्दांचीच शस्त्रे। यत्न करू।।

शब्दची आमुच्या। जीवाचे जीवन।

शब्दे वाटू धन। जनलोका।।'

**'आजचा शेतकरी' यासारख्या विषयाच्या निबंधाचा शेवट करताना...**

'पेरील जैं शेतकरी न काही

तैं खावयाला मिळणार नाही,

जगात होईल अनर्थ सारा,

जरी रुसे शेतकरी बिचारा।'

या काव्य ओळी देता येतील.

'आदर्श लोकनेता : राजा शिवछत्रपती' यासारख्या विषयाच्या निबंधात शिवाजी महाराजांचा वेगळेपणा, स्वराज्य स्थापनेचा उद्देश व त्यातल्या अडचणी, स्वराज्याची व्यवस्था, व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू या मुद्द्यांचा विस्तार केल्यानंतर **'प्रजेच्या सुखाचा विचार करणारा व दु:खाचा नाश करणारा हा लोक-नायक होता. खऱ्या अर्थाने हा रयतेचा राजा होता,'** यासारख्या **विधानाने** निबंधाचा शेवट करता येईल.

- **निबंधातील मुद्द्यांची मांडणी व विस्तार :**

निबंध लेखनाचा विषय निश्चित झाला की, विषयानुरूप समर्पक मुद्दे काढणे महत्त्वाचे असते. समर्पक मुद्दे हा निबंधाचा आत्मा असतो. कोणत्याही निबंधासाठी मुद्दे काढण्यापूर्वी निबंधाच्या विषयाचा अर्थ नीट समजून घेणे महत्त्वाचे ठरते. अर्थ नीट समजून घेण्यासाठी विषयातील प्रत्येक शब्दाकडे लक्ष द्यावे लागते. उदा. 'पावसाळा', 'तो एक पावसळा' व 'पावसाळ्यातील एक दिवस' हे तीन विषय घ्या; पण ह्या विषयांवर निबंध लिहिताना प्रत्येकात फरक करावा लागेल. 'पावसाळा' या निबंधात सर्वसामान्यपणे पावसाळ्यात दिसणाऱ्या दृश्यांचे, घडणाऱ्या गोष्टींचे वर्णन येईल. 'तो एक पावसाळा!' या निबंधात वैशिष्ट्यपूर्ण पावसाळ्याचे म्हणजे पावसाने खूपच अतिरेक केला किंवा पावसाने हुलकावणी देत पडलाच नाही तर अशाचे वर्णन येईल; पण 'पावसाळ्यातील एक दिवस' ह्या निबंधात एकाच दिवशी एका ठिकाणी काय काय घडले, याचे वर्णन येईल.

समर्पक मुद्दे शोधण्यासाठी विद्यार्थ्यांनी निबंध विषयाच्या संबंधित अनुभव आठवावेत. अनुभव गोळा करताना काही स्वतःचे अनुभव, काही दुसऱ्यांचे ऐकलेले, निरनिराळ्या पुस्तकांतील वाचलेले, इतर माध्यमांद्वारे मिळविलेले, स्वतः कल्पकतेने रंगविलेले अशा सर्व तऱ्हेचे अनुभव चालू शकतात. एकत्रित केलेल्या अनुभवातून काही अनुभवांची निबंध लिहिण्यासाठी निवड करावी लागते. ही निवड करताना पुढील गोष्टी लक्षात घ्याव्यात. १) कोणत्या अनुभवाचे हुबेहूब वर्णन करता येणे शक्य आहे ते ठरवावे. २) अनुभव वैशिष्ट्यपूर्ण आहे का ते पाहावे. ३) त्या अनुभवात काही गंमतीशीर आहे का ते पाहावे.

**निबंध लेखनाचा विषय निश्चित केल्यावर मुद्द्यांची निवड, मांडणी व विस्तार कसा करावा ते पाहा.**

उदा.

१) 'पाणी अडवा-पाणी जिरवा' हा निबंधाचा विषय निवडल्यावर पुढीलप्रमाणे मुद्दे निवडून त्यांचा विस्तार करता येईल.

**मुद्दे** : पाणीटंचाई ही फार मोठी समस्या - भारतात भरपूर पाऊस- पण बहुतांशी पाणी वाहून जाते. - धरणे उभारली - पण तोटाही- धरणांमुळे वीज- पंपांनी पाणी उपसणे- विहिरी कोरड्या- नद्या जोडण्याचा उपक्रम- वृक्षतोड थांबविणे आवश्यक- 'पाणी अडवा, पाणी जिरवा'- जमिनी खालील पाण्याची पातळी वाढविणे आवश्यक.

२) 'वन्यप्राण्यांचे संरक्षण' हा निबंधाचा विषय निवडल्यावर पुढीलप्रमाणे मुद्दे निवडून विषय विस्तार करता येईल.

**मुद्दे** : अभयारण्य- प्राण्यांना अभय असणारे ठिकाण- तीनशे वर्षांपूर्वी जमिनीचा साठ टक्के भाग वनांनी व्यापलेला- पाश्चात्य, राजे, सरदार यांच्या शिकारीच्या शौकामुळे प्राण्यांची हत्या - तसेच हस्तिदंत, प्राण्यांची कातडी इत्यादीसाठी प्राण्यांची हत्या- वाढत्या लोकसंख्येबरोबर वनांचे प्रमाण कमी - म्हणून प्राणी जीवन नष्ट होत चालले- पर्यावरणाचा समतोल ढासळू नये म्हणून अभयारण्ये हवीत- प्राण्यांना नैसर्गिक वातावरणात ठेवले जाते- तरीही प्राण्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष व हेळसांड- लहानपणापासूनच प्राणीप्रेमाचे संस्कार केले पाहिजेत.

- **निबंधाची भाषा** :

निबंध लेखनात निबंधाच्या भाषेला फार महत्त्व असते. भाषेवरून निबंधकाराचा व्यासंग, विद्वत्ता, विचार करण्याची क्षमता, मुद्दा पटवून देण्याची पद्धत समजून येते. निबंधाची भाषा प्रभावी असावी. तिच्यामध्ये क्लिष्टता असू नये. भाषा सुबोध व रसाळ असावी. योग्यशब्दांची निवड, शब्दांची मांडणी, विविध वाक्यप्रचारांचा चपखलपणे वापर, थोरामोठ्यांची अवतरणे, उद्‌गार सुविचार, म्हणी यांचा योग्य वापर यामध्ये निबंधाच्या भाषेचे खरे यश दडलेले असते.

निबंधाचे सौंदर्य खुलविण्यासाठी भाषेचा वापर कसा करता येतो ते पाहा-

**आशयानुरूप शब्दांची निवड केल्याने,** वापर केल्याने निबंधाचे सौंदर्य वाढते उदा. पावसाचे वर्णन करताना - रिमझिम पडणारा पाऊस, रपरप पडणारा पाऊस, धो धो पडणार पाऊस, मांजराच्या पावलांनी येणारा पाऊस हे निरनिराळे शब्द वेगवेगळ्या पद्धतीने वापरल्याने पावसाच्या पडण्याची कल्पना देतात.

असे निरनिराळे शब्द वापरता येण्यासाठी आपण आपला शब्दसंग्रह वाढविला पाहिजे. समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, अनुरूप शब्द कुठे, कसे वापरावेत याची आपल्याला योग्य ती समज असणे आवश्यक आहे.

वाक्यात सौंदर्य निर्माण करण्यासाठी विविध प्रकारची वाक्यरचना निबंधात योजता येते. **विधानार्थी वाक्य, उद्‌गारार्थी वाक्य, प्रश्नार्थक वाक्य** यांचा वापर परिणाकारक ठरतो. उदा.

कितीतरी गुराढोरांना कृष्णेने जलसमाधी दिली असेल!

पण कृष्णेला त्याचे काय हो?

वरील उद्‌गारार्थी व प्रश्नार्थी वाक्यांच्या योग्य वापरामुळे कृष्णा नदीच्या प्रलयाचे यथार्थ दर्शन घडते.

**थोरामोठ्यांचे उद्‌गार, अवतरणे प्रसंगानुरूप वापरल्याने निबंधाचे भाषासौंदर्य वाढतेच;** पण परिणामकारताही वाढते.

उदा. ''तू सुशिक्षित झालास की तुझी जबाबदारी संपत नाही. तू दुसऱ्याला साक्षर केले पाहिजेत.''

हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे **अवतरण, उद्‌गार** 'सुशिक्षितांची सामाजिक जबाबदारी' या विषयावरच्या निबंधात वापरणे योग्य ठरते. किंवा

'जे का रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।

तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।'

यांसारख्या **अभंगाच्या ओळी** 'संतांची शिकवण' या अभंगात प्रसंगानुरूप वापरल्या तर निबंध प्रभावी होऊ शकतो.

थोडक्यात, निबंधाच्या यशाचा आलेख भाषेच्या परिणामकार वापरावर अवलंबून असतो, हे लक्षात ठेवावे.

भाषेवर प्रभुत्व अभ्यासातून येत असते. त्यामुळे विविध विषयावरील ग्रंथाचे सातत्यपूर्ण वाचन, भाषेतील व्याकरणाच्या नियमांचे सखोल ज्ञान या विषयी विद्यार्थ्यांनी सदैव जागरूक असणे आवश्यक आहे.

- **निबंधाचे प्रकार :**

विषय, विचार, मांडणी पद्धत, शैली यांच्या आधारे निबंधाचे विविध प्रकार पडतात.

१) वर्णनात्मक निबंध २) चिंतनात्मक निबंध ३) कल्पनाप्रधान निबंध ४) आत्मवृत्तपर निबंध ५) व्यक्तिचित्रिणात्मक निबंध ६) चरित्रात्मक निबंध ७) लघुनिबंध

या प्रकारांचे सविस्तर विवेचन आपण पुढे पाहणार आहोत.

## ३.५ निबंधाचे प्रकार :

निबंधाचे विषयानुरूप विविध प्रकार पडतात. स्थूलमानाने निबंधाचे पुढील प्रकार महत्त्वाचे मानले जातात.

१) वर्णनात्मक निबंध २) चिंतनात्मक/वैचारिक निबंध ३) कल्पनाप्रधान निबंध ४) आत्मवृत्तपर निबंध ५) व्यक्तिचित्रणात्मक निबंध ६) चरित्रात्मक निबंध ७) लघुनिबंध

या प्रकारांचे स्थूलमानाने स्वरूप व त्या त्या प्रकारातील एका नमुना निबंधाचा विचार मुद्द्यानुसार करू.

**वर्णनात्मक निबंध** : या प्रकारच्या निबंधात आपण पाहिलेला एखादा प्रसंग, एखाद्या स्थळाला दिलेली भेट, प्रवासात आलेले अनुभव, पाहिलेला निसर्ग हे या निबंधाचे विषय असतात. या अनुभवाचे वर्णन इतके सुरसपणे करावे लागते की, तो प्रसंग वाचकांच्या नजरेसमोर जसाच्या तसा उभा रहावा लागतो. या वर्णनातून जिवंत शब्दचित्रच तयार झाले पाहिजे याची दक्षता घ्यावी लागते. निबंध लेखकाची निरीक्षणशक्ती, ओघवती व चित्रदर्शी भाषाशैली यांवर या निबंधाचे यश अवलंबून असते.

जी घटना अथवा प्रत्यक्ष स्थळ आपण पाहिलेले असते, त्याच्या विषयी काहीएक भावना आपल्या मनात तयार झालेली असते. त्या भावनेचे तरंग आपल्या निबंधातून उमटले पाहिजेत. असे झाले तरच वर्णनात्मक निबंध वाचनीय होतो.

**नमुना निबंध** : मी पाहिलेली आग

**मुद्दे** : प्रचंड आवाजाने जाग– धावपळ– आरडाओरडा– वातावरणातील भयाचे चित्रण– आगीचे भीषण रूप –वर्णन– धुराचे लोट, किंकाळ्या, लोकांचे सल्ले– अग्निशमन दलाचे आगमन– जीव धोक्यात घालून प्राण वाचविणारे काहीजण– तरुणांच्या सेवाभावी वृत्तीचे दर्शन– मनावरील ठसा.

**चिंतनात्मक/वैचारिक निबंध** : या प्रकारच्या निबंधात वैचारिकतेला महत्त्व असते. निबंध लेखकाला आपल्या प्रतिपाद्य विषय विचाराच्या समांतर जाणाऱ्या तसेच विरोधी असणाऱ्या बाजू मांडाव्या लागतात. एकप्रकारे येथे समाजातील भोवतालच्या गोष्टींवर साधकबाधक चर्चा घडवून आणावी लागते. आजचे राजकारण, शिक्षणव्यवस्था, कुटुंबसंस्था, भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांची पीछेहाट, विज्ञानक्रांती यांसारख्या विषयावर चिंतनात्मक निबंधातून भाष्य केले जाते. इथे निबंधकाराचे सूक्ष्मसमाज निरीक्षण, वैचारिक बैठक, विविधांगी वाचन या गुणांचा कस लागतो. आपल्या विषयाच्या समर्थनार्थ आपण मांडलेले मुद्दे कसे योग्य आहेत, ते विविध उदाहरणांसह निबंध लेखकाला पटवून द्यावे लागते. निबंधाची भाषा साधी, सोपी जरूर वापरावी; पण हा निबंध वैचारिक आहे याचे भान सदैव बाळगावे लागते.

**नमुना निबंध** : भ्रमणध्वनी (मोबाईल) : शाप की वरदान?

**मुद्दे** : भ्रमणध्वनीचा शोध हा एक महान शोध – खूप दुष्परिणाम – मोबाईलवर सतत बोलत राहणे– भोवतालापासून तुटलेपण– एसएमएस, व्हॉटस्ॲप मेसेजेसचे खूळ– वाईट उपयोग– बदनामी व अंधश्रद्धा आणि जातीय दंगली भडकविण्यासाठी– चांगले उपयोग– कोणाशीही, कुठेही, कधीही संपर्क– कामाचा वेग

वाढला- वेळेचा अपव्यय कमी- शाळकरी मुले व वृद्ध व्यक्तींसाठी उपयोगी- अडचणींच्या वेळी तर देवदूतच- गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी उपयोगी- चांगले-वाईटपण वापर करणाऱ्यांवर अवलंबून.

**कल्पनाप्रधान निबंध** : या प्रकारच्या निबंधात कल्पकतेला प्राधान्य असते. जी गोष्ट प्रत्यक्षात अस्तित्वात येऊ शकणार नाही, ती अस्तित्वात आली तर किंवा जे कधीही घडू शकणार नाही, ते प्रत्यक्षात घडले तर काय परिणाम होतील, कोणते बदल घडतील हे सांगणारा निबंध म्हणजे कल्पनाप्रधान निबंध होय.

या निबंधाची सुरुवात समाजातील एका दैनंदिन प्रसंगातून करता येते. सहजसुंदर, नावीन्यपूर्ण चित्तवेधक कल्पनांनी हा निबंध नटवावा लागतो. अनपेक्षित व स्वप्नवत वाटणाऱ्या कल्पनांची मालिका गुंफत हा निबंध खुलवायचा असतो. चमत्कृतीमुळे हा निबंध वाचकप्रिय ठरतो. 'मी मुख्यमंत्री झालो तर...', 'परीक्षा बंद झाल्या तर...', 'मला लॉटरी लागली तर...' असे जर-तर स्वरूपाचे विषय या निबंधाचे असतात.

**नमुना निबंध** : मी मुख्यमंत्री झालो तर

**मुद्दे** : महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद- मुख्यमंत्र्यांची परंपरा- आजचा महाराष्ट्र - त्यातील अडचणी- सार्वजनिक क्षेत्रातील प्रश्न - कामे- शेतीच्या पाण्याचे प्रश्न - रस्ते, शाळा, दळणवळणाची साधने यांत सुधारणा - दुर्बल घटकांचा विचार - बेकारांची समस्या- आरोग्यसुविधा- इत्यादीसंबंधी प्रश्न - कोणत्या उपाययोजना करणार.

**आत्मवृत्तपर निबंध** : या प्रकारच्या निबंधात एखादी सजीव, निर्जिव वस्तू आपली कथा सांगते आहे, अशी कल्पना केलेली असते. यामुळे प्रथमपुरुषी एकवचनी भाषेचा वापर इथे आवश्यक ठरतो. सजीव, निर्जीव वस्तू आपली कैफियत, व्यथा सांगते आहे अशी रचना करून त्यांच्या सुख-दुःखावर प्रकाश टाकावा लागतो. लेखनात इतकी आत्मीयता निर्माण करावी लागते की, त्या वस्तू आणि व्यक्तिविषयी वाचकाच्या मनात आपुलकी निर्माण झाली पाहिजे.

स्वातंत्र्यसैनिकाचे मनोगत, मोबाईलचे आत्मवृत्त, महात्मा गांधींच्या पुतळ्याचे आत्मवृत्त, भंगार गोळा करणाऱ्या मुलाचे मनोगत इ. या निबंध प्रकाराचे विषय होऊ शकतात.

**नमुना निबंध** : स्वातंत्र्यसैनिकाचे मनोगत

**मुद्दे** : सर्वजण स्वातंत्र्य उपभोगता - पण स्वातंत्र्य कसे मिळाले. हे जाणण्याची इच्छा नाही. स्वातंत्र्यासाठी झगडलेल्या स्वातंत्र्यसैनिकांची कदर नाही- स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी ध्यास घेतलेला होता- असंख्य यातनामय प्रसंगांना हसतमुखाने सामोरे- बलिदान व्यर्थ गेले नाही- देशाला स्वातंत्र्य मिळाले- मिळालेले स्वातंत्र्य टिकविण्याची- त्याची जोपासना करण्याची गरज - म्हणून स्वातंत्र्यासाठी त्याग केलेल्यांचे स्मरण करणे आवश्यक.

**व्यक्तिचित्रणात्मक निबंध** : या प्रकारच्या निबंधात शब्दांच्या सहाय्याने एखाद्या व्यक्तीचे चित्र रेखाटले जाते. हे शब्दचित्रण रेखाटताना त्या व्यक्तीचा रंग, रूप, चेहरा, शरीराची ठेवण, व्यवसाय, पोषाख, स्वभाव, बोलण्या-चालण्याची लकब यांचा बारकाईने अभ्यास करून मांडणी केली जाते. या व्यक्तीच्या

आयुष्यातील महत्त्वपूर्ण प्रसंग, आठवणी यांची गुंफन करीत ते व्यक्तिचित्र इतके सहजसुंदर साकारावे लागते की, ते व्यक्तिचित्र आपल्या आसपासचे आहे असे वाटले पाहिजे. एखादा हमाल, पोस्टमन, लाँड्रीवाला, आजोबा, चहावाला पोर, शिक्षक इ. शब्दचित्रे या निबंध प्रकारात येतात. भाषा सहजसुंदर चित्तवेधक व संवादी असावी लागते.

**नमुना निबंध** : माझे आजोबा

**मुद्दे** : आजोबांची आठवण- पहिला परिचय- दम्याचा विकार- अतिशय चांगल्या व रसभरित गोष्टी सांगावयाचे- देवदर्शन व घरी फेरफटका- त्यांचा व्यांसग - समाजकार्य- त्यातून तयार झालेले व्यक्तिमत्त्व- बोलण्या-चालण्यातील पद्धत- निर्व्यसनी स्वभाव- जमीन खरेदी-विक्री व्यवसाय- अतिशय कष्ट- संगीताचे उपासक- तबलावादन- भजने- अर्धांगवायूचा झटका- निधन.

**चरित्रात्मक निबंध** : या प्रकारच्या निबंधात कल्पकतेपेक्षा वास्तवाला अधिक प्राधान्य द्यावे लागते. देशाच्या इतिहासावर, समाजकारणावर, राजकारणावर प्रभाव टाकलेल्या व्यक्तीची चरित्रे या निबंधाचा विषय असतात. यामध्ये इतिहासकालीन व्यक्ती, समाजकारणी, साहित्यिक, स्वातंत्र्यसैनिक, संशोधक-शास्त्रज्ञ इ. समावेश होतो.

चरित्रपर निबंधात व्यक्तीचा जन्म, बालपण, शिक्षण, कौटुंबिक जीवन, व्यवसाय, स्वभाववैशिष्ट्ये, त्या व्यक्तीचे सामाजिक,राजकीय क्षेत्रातील कार्य, सद्यःपरिस्थिती या गोष्टी व्यक्तिचित्रणात्मक निबंध लेखनात लक्षात घेणे गरजेचे ठरते. या व्यक्तिचित्रणातून वाचकाला प्रेरणा मिळावी. हा या निबंध लेखनामागचा उद्देश असतो. छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, लता मंगेशकर, सचिन तेंडुलकर अशा विविध क्षेत्रांतील मान्यता पावलेल्या कितीतरी व्यक्ती या निबंधाचा विषय होऊ शकतात.

एखाद्या प्रसंगाने, आठवणीने या निबंधाची सुरुवात करता येते तसेच आकर्षक शेवट करता येतो. चरित्रकारावर टीका मात्र करू नये.

**नमुना निबंध** : छत्रपती संभाजी महाराज

**मुद्दे** : राज्यारोहणापूर्वीचे संभाजी-संभाजींचे बालपण-वयाच्या आठव्या वर्षी मिळालेली पाच हजारांची मनसबदारी- शिवाजी सोयराबाई- आग्रा येथील कैद व सुटका- हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत प्रत्यक्षाप्रत्यक्ष सहभाग- संभाजी-शिवाजी यांच्यात पडत गेलेले अंतर- संभाजींचे दिलेरखानाकडे जाणे- मोगलांकडून संभाजींचे परत माघारी येणे- संभाजी- पन्हाळगडावर - राज्यारोहणानंतरचे संभाजी- शिवरायांचा मृत्यू- राज्यारूढ संभाजी- संभाजी व सोयराबाई- अण्णाजी दत्तो, राजारामाचे मंचकारोहण, कटकारस्थाने- स्वराज्याच्या दाराशी येऊन ठेपलेला बलाढ्य बादशहा आलमगीर- संभाजी व अकबर- संभाजी व सिद्धी- संभाजी पोर्तुगीज- संभाजी व स्वराज्यातील जनता- संभाजींनी जिंकलेल्या लढाया- बेसावध अवस्थेत कैद.

**लघुनिबंध** : या प्रकारच्या निबंधात विषयाचे बंधन असत नाही. इथे विचाराला महत्त्व असते; पण प्रचाराला स्थान असत नाही. इथे लेखकाची सहृदयता, रसिकता, भावनाशीलता, कल्पकता, बहुश्रुतता यांना विशेष महत्त्व असते. लेखकाच्या या गुणांमुळे लघुनिबंध आकर्षक व उच्चदर्जाचा बनतो. लघुनिबंधाचे विषय साधे, हलके-फुलके असू शकतात. उदा. आरसा, छत्री, पहिला पांढरा केस इ. इथे लेखक वाचकाशी आपण गप्पा मारत आहोत. अशी भूमिका स्वीकारून लेखन करीत असतो. त्यामुळे या निबंधाच्या लेखनात संभाषण, संवाद याला महत्त्व येते.

**नमुना निबंध** : जीवन त्यांना कळले हो!

**मुद्दे** : जगण्यात मौज- साध्या-साध्या गोष्टीत आनंद- छंद- कलासाधना- संशोधन- खूप कष्ट- यातना- परार्थ जीवन- कवी बा. भ. बोरकर- 'मीपण ज्यांचे पक्व फळा परी सहजपणे गळले हो! जीवन त्यांना कळले हो! ध्येय्य-ध्येय्यपूर्तीसाठी घेतलेले कष्ट, जीवनातील समाधान.

**समारोप** : अभ्यासाच्या सोयीसाठी आपण निबंधाचे वरील प्रकार केलेले आहेत. समाजातील अनेक घटना, प्रसंग हे निबंध लेखनाचे विषय होऊ शकतात. निबंध लेखकाची भाषाशैली, अनुभव समृद्धता, विषय मांडण्याची कला या गोष्टींना निबंध लेखनात विशेष महत्त्व असते. निबंध या वाङ्मय प्रकाराने मराठी साहित्य व समाजमन अधिक समृद्ध केलेले आहे. त्यामुळे हा वाङ्मय प्रकार विशेष महत्त्वाचा ठरतो.

## ३.५ निबंधाची वैशिष्ट्ये :

- निबंधाची भाषा साधी, सोपी आणि सौंदर्यपूर्ण असावी.
- निबंधकर्त्याने कृत्रिम भाषेच्या निर्मितीमागे लागू नये. कृत्रिम भाषेच्या अवडंबरामुळे निबंधाचा विषय, आशय वाचकांपर्यंत पोहोचू शकत नाही.
- निबंधातील शब्दांचे क्रम अनुरूप असावेत. शब्द अर्थपूर्ण आणि प्रवाही असावेत.
- निबंधामध्ये मराठी भाषेच्या व्याकरणाचे पालन होणे आवश्यक आहे. शुद्धलेखनाचे नियम व्यवस्थित वापरले जातील याची दक्षता घ्यावी.
- अप्रामाणिक मतमतांतरांना निबंधात स्थान देऊ नये.
- आपले विचार आणि भावना प्रकटीकरण यांची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घ्यावी. भावनेच्या भरात किंवा अतिउत्साहात एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगितली गेली, तर 'पुनरुक्ति दोष' निर्माण होतो. पुनरुक्तिदोषापासून निबंधकाराने सदैव सावध असावे.
- आपल्या निबंधाचा प्रतिपाद्य विषय कोणता आहे, याचे निबंधकाराला सदैव भान असावे. निबंध विषयाला पूरक असणाऱ्या मतांचाच ऊहापोह करणे योग्य वाटते. निबंध विषयाशी संबंधित नसणाऱ्या मतांना, विचारांना स्थान देऊ नये.

- सुविचार, सुभाषिते, म्हणी, वाक्प्रचार, अवतरणे यांचा प्रसंगानुरूप वापर करावा. त्यामुळे निबंधाचे साहित्यिक सौंदर्य वाढते. शिवाय निबंध प्रभावशालीही बनतो.

- निबंधात प्रवाहीपणा असावा. विषय प्रकटीकरणात कुठेही शिथिलता येणार नाही, याची दक्षता घ्यावी. विचार शिथिलता हा मोठा दोष मानला जातो.

- संदर्भमूल्यता आणि प्रासादिक गुणवत्ता हे निबंधाचे वैशिष्ट्य असते. संपूर्ण निबंधावर लेखकाच्या वैचारिक व साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची छाप पडली पाहिजे. निबंधाद्वारे लेखक, वाचकांशी 'गुजगोष्टी' करतो आहे, असे वाटले पाहिजे. विषय मांडणी बरोबर निबंधकार सामाजिक समस्येवर निरीक्षणाबरोबर न्यायदान करीत आहे असे वाटले पाहिजे.

वरील वैशिष्ट्यांनी नटलेला निबंध हा आदर्श निबंध ठरतो. त्यामुळे या वैशिष्ट्यांना सदैव नजरेसमोर ठेवून निबंध लेखन केले तर लेखकांच्या हातून आदर्श निबंधांची निर्मिती होईल असे वाटते.

## ३.६ सरावासाठी निबंध विषय :

**१) वर्णनात्मक निबंध** :

१) पावसाची विविध रूपे

२) चौपाटीवरील संध्याकाळ

३) पहाटेची भ्रमंती

**२) चिंतनात्मक निबंध** :

१) चित्रपटातील हिंसाचार व युवापिढी

२) शेतकऱ्यांच्या आत्महत्या

३) अंधश्रद्धा- सामाजिक शाप

**३) कल्पनाप्रधान निबंध** :

१) कलावंत नसते तर...

२) मी शिक्षणमंत्री झालो तर...

३) मला पंचवीस लाखांची लॉटरी लागली तर

**४) आत्मवृत्तपर निबंध** :

१) एका पुतळ्याचे मनोगत

२) मी 'रेडिओ' बोलतोय

३) एका स्वातंत्र्यसैनिकाचे मनोगत

**५) व्यक्तिचित्रणात्मक निबंध :**

१) माझे आजोबा

२) आमची स्वयंपाकीणबाई

३) आमचे कांबळे सर

**६) चरित्रात्मक निबंध :**

१) म. जोतिराव फुले- एक आदर्श समाजसेवक

२) कर्मवीर भाऊराव पाटील

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**७) लघुनिबंध :**

१) हसरे घर

२) एकेकांचे स्वभाव

३) भविष्याचे वेड

## ३.७ संदर्भ :


१) निबंध - शास्त्र व कला - प्र. न. जोशी

२) निबंध लेखनाकडे वाटचाल - सुमन बोकील

३) मराठी निबंध - रा. ग. जाधव

४) सुंदर मराठी निबंध लेखन व व्याकरण - श्रीपाद भागवत

५) मराठी निबंध : उद्गम आणि विकास - डॉ. गिरीश मोरे

६) मराठी निबंधमाला - नवनीत प्रकाशन

७) निबंध लेखन - आरेखन - के सागर


• • •